नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका



…ाळी अंक
…ब्बर १९५०

…यु
…ग
…वा
…णी

…पादक
…ष्ण चोरघडे

… २ रु.

वर्ष ५ वें

या अंकांत

अंक ११ वा

दिवाळीच्या आनंद आणि उत्साहांत मराठी भाषेची प्रतिष्ठा व सेवेची
आठवण मराठी जनतेस असो.

अनुक्रमणिका

उषा

[ऋग्वेद : मंडल १ : सूक्त ११३.]

दा. ल. अडोणी

★

[पृथ्वी]

पहा ! अवतरें कसें विमल तेज भूमीवर
प्रकाश अतिचित्र हा उदय पावला सत्वर;
तमारि मिहिरास जी खचित जन्मदा लाघली
तिचेस्तव झणीं निशा त्यजुनि अंबरा लोपली १

करीं रविशिशुप्रती धरुनि पीतगौरा उषा
मुदें प्रकटतां, त्यजी वसति श्यामवर्णा निशा;
समानगुण सोदरा अनुसरी क्रमाने नित
नभीं विहरतां करी भुवन चित्रवर्णांकित. २

स्वसाद्वय पहा ! क्रमी पथ अनंत जे भासती
सुशासित क्रमें सुखें गगनमार्गि संचारिती;
सदासहविचारगा, दिसति नित्य भिन्नाकृती
कदापि न निशा, उषा विरम, खंड घेती पर्थी ३

सुदीप्तिमय चित्र ही मधुरसत्यदायी उषा
स्वयें उघडिते पहा, सकल गोपुरें राजसा,
अम्हां विभव अर्पुनी, निज कृतींत व्हाया रत
करी सकल मानवां गगनकन्यका जागृत ४

प्रबोधित जनां करी, धरुनि भाव ऐसा मनीं–
पथीं अलस सुप्त जे, क्रमणसिद्ध होवो झणी,
झटो कितिक लाधण्या विभव, भोग्य वा ईप्सित
दिसो सकल सूक्ष्मही म्हणुनि अल्पदृष्टीयुत ५

हृदीं धरुनि हेतु हे करि उषा तुम्हां जागृत
यशास्तव झटो कुणी, सफल कार्य व्हाया नित;
स्वकर्मरत हो कुणी, सुखद ज्यांचिया योजना
दिसो सुपथ मानवां, उचित ज्यास जो जीवना ६

सुशुभ्रवसनांकिता सुभग शोभते शालिनी
सुवर्णमयदेहिनी खलु वसुंधरास्वामिनी,
पहा ! भगवती उषा सहज लाधली दृष्टिला
अजी वितरि मंगले ! क्षितिवरीं विभा उज्ज्वला ७

प्रभा पसरुनी करी चलित जीवजातास ही
अचेतन मृतापरी शयनमग्न जे त्यांसही
अखंड दिसती पुढे, प्रथम त्यांतली भामिनी
उषा विगत ज्या तयां अनुसरे नभोगामिनी ८

हुताशन प्रदीप्त तूं सहज सिद्ध केला असे
प्रकाशमय त्वद्गुणें रवि करी जगाला उषे !
प्रबुद्ध करिशी जनां यजनकर्म जे वांछिती
कृती प्रिय तुझ्या अशा बहुत सर्व देवांप्रती ९

उषा विगत नी अजी विलसतात ऐशा स्वसा
पहा विहरती नभीं क्षणभरास एकैकशा
विलाप करिते नवोदित अपार ज्येष्ठेस्तव
सख्या इतर भेटतां क्षणिं विलीन होई नव १०

उषेस अवलोकिलें विलसतां पुरा ज्या जनीं
धराविगत हाय ! तें स्मरणमात्र राही मनीं
द्युलोकदुहिता असे अजि अम्हांस दृग्गोचर
पुढे बघति जे हिला क्रमिति व मार्गा नर ११

उषे ! खलविनाशिनी ! विभवयुक्त ! सत्यव्रते !
तुझें जनन सद्व्रता, मधुरसत्य सारस्वते !
हवी सुरगणार्थ तूं रुचिर आणशी मंगले !
वरेण्य नभकन्यके ! विलस येथ गे उज्ज्वले ! १२

अनादि समयाहुनी प्रातदर्नीं प्रकाशी मही
वदान्य वरवर्णिनी वितरिते विभा आजही
भविष्यसमयीं सदा विलसु · दे उषाभामिनी
जरामरणमुक्त ही स्वसुपथानुसंचारिणी १३

अनुक्रमणिका

प्रभाभरणमंडिता विलसते द्युलोकीं उषा
हिने धवळिली क्षणीं सहज श्यामवर्णा रसा;
प्रबोधित करी जनां तुरग रक्तवर्णांकित
अता सुभग येतसे, सुखदवाहनीं जी स्थित. १४

जनास्तव सर्वे किति रुचिर वस्तु आणी सती
प्रदर्शित करी द्युती नवऊपूर्ण प्रज्ञावती;
उषा अमर पातल्या, चरम त्यांतली ही गमे
पुढे विलसती बहु, प्रथम भास्वती की रमे. १५

उठा, अवतरे बघा ! भुवनशक्ति, चैतन्यदा
नभीं तिमिर लोपला, विलसते विभा हर्षदा;
रविक्रमणमार्ग हा सुगम तद्गुणें जाहला
चिरायु जन हो जिये, सकल पातलों त्या स्थला १६

रुचे स्तवन ज्या सदा, रचुनि गीत हा आदरें
उषा बघुनि चिन्मया, कवन गाइ मोदस्वरें
वदान्यवर देवते ! वितरि दीप्ति भक्तांस्तव
अपत्ययुत जीवनासह विभेस तूं वर्षव. १७

प्रदान हय धेनु जी करि, सुमान्य वीरांसही
बघोनि निज याचकां, सदय शोभवीते मही
यदा स्तवनगायना अनिलतुल्य तारस्वरें
करीं, तुजकडे वडो गमन याज का या स्वरें १८

प्रसू सुरगणास तूं, अदितिशक्ति ! कीर्तिध्वजे !
रुचो तुजसि याग हा, वितरि दीप्ति मित्राग्रजे !
उषे ! परिसुनी स्तुती, विलस कांतियुक्त स्वयें
प्रदान नवजीवना करि जनास लोकप्रिये ! १९

उपासक सदा करी स्तवनपूजना, त्यांस्तव;
अपूर्व बल घेउनी शुभद नित्य येती नव;
असो अदितिच्या सर्व वरुणमित्र आशीर्युत
द्युलोक, पृथिवी तसे सकल लोक हो संमत २०

●

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य मंदिर

★

विदर्भ साहित्यसंघाला मध्यप्रदेश सरकारने पाऊण एकर जागा देणगी म्हणून दिल्यामुळे विदर्भ साहित्य मंदिराच्या उभारणीचा प्रश्न आता निकडीला आलेला आहे व संघाजवळ आज स्वतःचा असा कांही मंदिरनिधि नसतांनासुद्धा संघाच्या नेत्यांनी विदर्भ साहित्य मंदिराच्या उभारणीचें काम तातडतोब हातीं घेण्याचा संकल्प केला आहे. हा संकल्प सिद्धीस नेण्याच्या कामीं महाविदर्भातील उदार आणि वाङ्मयप्रेमी धनिक संघाला तत्परतेने सहाय्य करतील, याबद्दल मला शंका नाही.

पण, महाराष्ट्राच्या पूर्वसीमेवर असलेल्या मध्यप्रदेशाच्या राजधानींत आपल्याला जें हें विदर्भ साहित्य मंदिर बांधावयाचें आहे, तें केवळ दगडविटांचें नाहीं; तर मराठी भाषा आणि महाराष्ट्र संस्कृति यांच्या सेवेला वाहिलेल्या कार्यकर्त्यांची प्रणाली या मंदिराच्या रूपाने आपल्याला निर्माण करावयाची आहे. मंदिर हें फक्त शरीर, फक्त बहिरंग आहे; निरपेक्ष कार्यकर्त्यांची नैष्ठिक सेवाबुद्धि हें या शरीराला, या बहिरंगाला सतत कार्यस्फूर्ति देणारें आणि कार्यप्रवृत्त करणारें चैतन्य होय. हें चैतन्य विदर्भ साहित्यसंघांत उत्पन्न करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

विदर्भ ही महाराष्ट्र संस्कृति आणि मराठी साहित्य यांची जन्मभूमि आहे. आधुनिक काळांतहि विदर्भाने कोल्हटकर, दसरी, विनोबाजी यांच्यासारखे कला, विज्ञान आणि जीवन यांचे द्रष्टे निर्माण केलेले आहेत. ती ही विदर्भभूमि, सध्याच्या स्वातंत्र्योत्तर संक्रमणकाळांत, संयुक्त महाराष्ट्राची स्थापना आणि महाराष्ट्र संस्कृतीची पुनर्घटना घडवून आणण्याच्या कामीं पुढाकार घेईल, अशी मला आशा आहे. विदर्भ साहित्य मंदिर हें विदर्भापुढील या महान् कार्याचें प्रसादचिन्ह ठरो !

'प्रसाद', धंतोली, नागपूर
तारीख २६-१०-५०

ग. त्र्यं. माडखोलकर

●

वाङ्मयसमीक्षा आणि साहित्यशास्त्र

माधव गोपाळ देशमुख

★

'वाङ्मयसमीक्षा' म्हणजे लिटररी क्रिटिसिझम् आणि 'साहित्यशास्त्र' म्हणजे वाङ्मयीन व विशेषत: काव्यविषयक साहित्याची वा तत्त्वांची पद्धतशीर मांडणी. ॲरिस्टॉट्ल्चें Poetics (काव्यशास्त्र) व Rhetoric (अलंकारशास्त्र) सोडल्यास सर्वस्वी शास्त्रनिबद्ध असें 'साहित्य' पाश्चात्यांत क्वचितच आढळतें. तर उलटपक्षी इंग्रजी वाङ्मय टीकेची पद्धति इकडे येण्यापूर्वी भारतीय वाङ्मयांत वाङ्मयसमीक्षा अशी नव्हतीच. अलीकडे मात्र एकीकडे भारतीय साहित्यशास्त्र आणि दुसरीकडे पाश्चात्यांच्या पद्धतीची वाङ्मयसमीक्षा या दोहोंचीहि हळू हळू येथे वाढ होत आहे. मराठी भाषेंत तर ज्ञानेश्वर ते रामदास या कालखंडांतील साहित्यशास्त्र भारतीय पद्धतीला धरून मांडण्याचा एक प्रयत्नहि केलेला आहे; आणि संस्कृतांतील दोन हजार वर्षांपासून विकसित होत असलेल्या साहित्यशास्त्राचा बराचसा भाग विविध भारतीय भाषांत वेगवेगळ्या प्रकारांनी उतरून घेण्याचेहि अनेक प्रयत्न झाले आहेत व होत आहेत. परंतु वाङ्मयसमीक्षा आणि साहित्यशास्त्र या जोडीजोडीने विकसित होत असलेल्या पद्धतींचा परस्पर तुलनात्मक विचार कोठे केलेला आढळत नाही. असा विचार मोठा कुतूहलजनक होईल असें वाटल्यावरून तो या छोट्या लेखांत दिग्दर्शित करण्याचें योजिलें आहे.

वाङ्मयसमीक्षा आणि साहित्यशास्त्र या दोन नांवांकडेच आधी लक्ष्य द्या. समीक्षा म्हणजे टीका आणि शास्त्र म्हणजे जमा झालेलें व व्यवस्थित मांडणी केलेलें ज्ञान. समीक्षा वाङ्मयाची आणि शास्त्र साहित्याचें. वाणीचा विकार लागलेले सर्व विचार हा वाङ्मयाचा मूळ अर्थ. पण आता तो शब्द इंग्रजींतील 'लिटरेचर' ला समानार्थक झाला आहे. लिटरेचरमध्ये ज्याप्रमाणे सर्वसामान्य टिकून राहिलेले ग्रंथ (literature in general) व विशेषत: कलात्मक किंवा ललित ग्रंथ (artistic literature) असे दोन्ही अर्थ गोवलेले आहेत तशीच स्थिति वाङ्मयाचीहि आहे. प्राचीन काळीं राजशेखराने 'इह हि वाङ्मयम् उभयथा काव्यं च शास्त्रं च ।' जींत काव्याप्रमाणे शास्त्राचाहि समावेश होईल अशी वाङ्मयाची व्याख्या केलेली असली तरी आज शास्त्राचा प्रदेश वाङ्मयसीमेबाहेर मानला जातो. किंबहुना वाङ्मयसमीक्षा या शब्दांत मुख्यत: ललित वाङ्मयाचीच समीक्षा अपेक्षित

असते. 'साहित्य' ह्या शब्दाचीहि तीच स्थिति आहे. 'शब्दार्थौ सहितौ' या भामहाने केलेल्या काव्याच्या व्याख्येप्रमाणे साहित्य म्हणजे व्यापक अर्थाने काव्य अर्थात् आजचें ललित वाङ्मय ठरतें. पण मराठी संतवाङ्मयांत व आजच्या व्यवहारांत हा शब्द तत्सम राहिला नसून त्याला आता राजशेखरादिकांनी सुचविलेला व ज्ञानेश्वरांपासून मराठींत रूढ झालेला 'शब्दार्थयोः यथावत् सहभावेन या विद्या' असा उपकरणवाचक अर्थ आला आहे. त्यावरून साहित्यशास्त्र म्हणजे वाङ्मयाचें वा काव्याचें शास्त्र नव्हे; तर वाङ्मयाचें निरीक्षण, परीक्षण, समीक्षण वा अन्वीक्षण करण्याचे जे निकष, मूल्यें वा तत्त्वें अर्थात् जें कांही 'साहित्य' जमा झालें असेल त्याची क्रमवार व व्यवस्थित मांडणी.

आता जरा विषयाच्या दृष्टीने. वाङ्मयसमीक्षेचा विषय अर्थात् वाङ्मयकृति. पण साहित्यशास्त्राचा विषय 'साहित्य'. म्हणजेच वाङ्मयसमीक्षेचीं मूल्यें. वाङ्मयसमीक्षा हा खुद्द वाङ्मयाचाच एक प्रकार होतो. कारण ज्या वाङ्मयकृतीचें समीक्षण करावयाचें ती ललित असेल तर तिच्या समीक्षणांतहि लालित्य येणारच. कारण वाङ्मयकृतींत जर तिच्या कर्त्याचा आत्माविष्कार असेल तर तिच्या समीक्षेंतहि समीक्षकाचा आत्माविष्कार व्हायलाच हवा. म्हणूनच अनातोल् फ्रान्सने म्हटलें आहे— " The good critic is he who relates the adventures of his Soul among the master pieces. " आता साहित्यशास्त्राकडे पाहा. त्यांत जर वाङ्मयविषयक मूल्यांचें मूल्य ठरवितांना वा वाङ्मयीन तत्त्वांची शास्त्रोक्त मांडणी करतांना शास्त्रज्ञाचें व्यक्तित्व 'प्रकट' होऊं लागलें तर त्याला शुद्ध शास्त्राचें स्वरूप कधीच येणार नाही!

जरा वेगळ्या परिभाषेंत सांगावयाचें झालें तर असें नाही का म्हणता येणार की, वाङ्मयाप्रमाणेच वाङ्मयसमीक्षाहि बहुतांशीं आत्मनिष्ठ (Subjective) असते तर साहित्यशास्त्र हें 'साहित्या' प्रमाणेच वस्तुनिष्ठ (Objective) असते! आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा या दोन्ही गोष्टी बऱ्याचशा अन्योन्यव्याप्त आहेत, हें तर खरेंच पण स्थूलमानाने हा दृष्टिकोणांतला फरक लक्षांत घेण्यासारखा खास आहे.

वाङ्मयसमीक्षा प्रत्येक वाङ्मयकृति ही एक विशिष्ट बाब आहे असें समजून तिचें परीक्षण करते. अर्थात् एखाद्या विशिष्ट कृतीची समीक्षा करणें हेंच तिचें प्रयोजन होय. हें प्रयोजन साधण्यासाठी समीक्षक हा त्या कृतीची दुसऱ्या एखाद्या समान कृतीशी तुलना करील, कर्त्याच्या व्यक्तित्वाचें उद्घाटन करून दाखवील, ऐतिहासिक व सामाजिक परिस्थितीचा प्रभाव त्या कृतीवर वा कर्त्यावर कसा पडला आहे याचेंहि तो विवेचन करील. अनेक कलाकृतींच्या निरीक्षणावरून क्वचित्प्रसंगीं तो एखादा सामान्य सिद्धान्तहि काढून दाखवील. परंतु अशा प्रकारें बाह्यतः त्याचें विवेचन हें निगमन (inductive) पद्धतीचें दिसत असलें तरी तीं वस्तुतः विगमनाची (deductive) असते. कारण एखादी वाङ्मयकृति समीक्षेसाठी घेण्यापूर्वी वाङ्मयाचे कांही सर्वमान्य निकष हे त्याने गृहीतच धरलेले असतात. ते तो आपल्या कुवतीप्रमाणे त्या कलाकृतीला लावून दाखवितो व त्यामुळेच त्याचीहि कृति वाङ्मयाप्रमाणेच हृद्य होते.

उलटपक्षीं साहित्यशास्त्रांत वाङ्मयाच्याच नव्हे तर वाङ्मयसमीक्षेच्याहि मुळाशी असलेलीं मूल्यें वा तत्त्वें यांचें उद्घाटन व शास्त्रशुद्ध मांडणी केलेली असते. हीं तत्त्वें शास्त्रकार निगमन पद्धतीनेच संशोधन करून प्रस्थापित करीत असतो. पण पाश्चात्य पद्धतींच्या प्रबंधांसारखें आपलें प्राथमिक संशोधन तो कधी लोकांसमोर ठेवीत नाहीं. अशा संशोधनाने फलित झालेले सिद्धान्त वा निष्कर्ष तो आधी सांगतो व मग त्यांचा उहापोह करतो. आपल्या सिद्धान्तावर येणारे आक्षेप तो आपल्या पूर्वपक्षांत खुलासेवार मांडून दाखवितो व त्यांचें मुद्देसूद खंडन करून मूळ सिद्धान्त प्रस्थापित करणाऱ्या उत्तरपक्षाचें मंडन करतो. अर्थात् बाह्यतः साहित्यशास्त्राची मांडणी विगमन पद्धतीची दिसत असली तरी वस्तुतः ती उलट असते. कारण शास्त्रीय पद्धति म्हटली की, ती वस्तुनिष्ठ आणि निगमनात्मक असणारच. तिच्यांत वाङ्मय समीक्षेंतील आत्मपर हृद्यता कशी येणार !

थोड्या वेगळ्या तऱ्हेने सांगावयाचें झालें तर वाङ्मयसमीक्षेंत साहित्यशास्त्रां-तील तत्त्वांचा वाङ्मयकृतीशी समन्वय केलेला आढळतो तर साहित्यशास्त्रांत त्या तत्त्वांचें पृथक्करण, वर्गीकरण व सिद्धान्तन केलेलें असतें. अर्थात् स्थूलमानानेच वाङ्मयसमीक्षा ही समन्वयात्मक (Synthetic) असते तर साहित्यशास्त्र हें पृथ-क्करणात्मक (analytical) असतें. वाङ्मयाप्रमाणेंच वाङ्मयसमीक्षेच्याहि एका टीका-काराने सांगितलेल्या वस्तुदर्शन (reportage), वस्तुनिरूपण (interpretation) व वस्तुनिर्मिति (creation) या एकाहून एक श्रेष्ठ अशा प्रती ठरतील तर साहित्य-शास्त्रांत कोणत्याहि शास्त्रामध्ये आढळून येणाऱ्या पायऱ्या कमीअधिक महत्त्व देऊन मांडलेल्या आढळतील. वाङ्मयाच्या प्रसाधनें, अथवा निकष यांचें संकलन त्यांचें वर्गीकरण व उलटसुलट प्रमाणें देऊन केलेलें खंडनमंडनात्मक सिद्धान्तन याच त्या पायऱ्या. वाङ्मयसमीक्षेत प्रामुख्याने व्यक्तित्वाचें उद्घाटन तर साहित्यशास्त्रांत वाङ्मय-मीमांसेच्या तत्त्वांचा उहापोह.

वाङ्मयसमीक्षेंत वाङ्मयाशी साक्षात् संबंध येतो तर साहित्यशास्त्रांत तो पर्यायानें. कारण वाङ्मयापेक्षा 'वाङ्मयाच्या मुळाशी असलेल्या तत्त्वांशीच येथे गांठ. हीं तत्त्वें वाङ्मयसमीक्षेला वावडीं कशीं असतील ! पण त्या तत्त्वांची कृतिनिरपेक्ष अशी चर्चा समीक्षक सहसा करणार नाही. काव्याची व्याख्या करून ती तात्त्विक दृष्टीने कशी निर्दोष आहे याचा काथ्याकूट करण्याऐवजी समोर असलेल्या वाङ्मयकृतीला सर्वमान्य व्याख्या कशी तंतोतंत लागू पडते किंवा विशेषतः कशी लागू पडत नाही याचेंच मनोहर वर्णन तो करील. किंबहुना काव्य ही व्याख्या करण्याची गोष्टच नव्हे; ती फक्त वर्णन करून सांगतां येईल, हें चातुर्याने सांगणें एवढीच आपली इतिकर्तव्यता मानील.

एका दृष्टीने वाङ्मयसमीक्षकाला वाङ्मयकृतीचा जरा अधिक डोळसपणाने आस्वाद घेणारा एक रसिक मार्गदर्शकच म्हणाना. उत्कृष्ट वाङ्मयसमीक्षक हा वाङ्मय-कृतीचें रहस्य तर उलगडून दाखवीलच पण तिचा रसास्वादहि जनसुलभ करून देईल पण साहित्यशास्त्र-! तें तर जाणूनबुजून वाङ्मयकृतींचें व्याकरण होय. वैयाकरण हे प्रयोगशरण असतात त्याप्रमाणेच साहित्यशास्त्रज्ञ हेहि सरतेशेवटी

वाङ्मयशरणच असावे लागतात. केवळ व्याकरण शिकून कांही एखादी भाषा शुद्ध लिहितां अगर बोलतां येणार नाही. त्यासाठी आधी व्यक्त करण्यासारखे व इतरांना बोध होईल असे विचार अगर विकार मनांत असावे लागतात. ते रूढ प्रयोगानुसार शुद्ध आहेत किंवा नाही. एवढें फक्त व्याकरणावरून फार तर कळूं शकेल. आधी भाषा व नंतर व्याकरण. त्याप्रमाणे आधी वाङ्मय नंतर त्याचें साहित्य व नंतर त्याचें शास्त्र हा स्वाभाविक क्रम होय.

वाङ्मयसमीक्षेचा उपयोग वाङ्मयाचा आस्वाद अधिक अभिज्ञतेने व रसिकतेने घेतां येणें हा एक व समीक्षेचाहि वाङ्मयीन आस्वाद घेणें हा दुसरा. परंतु साहित्यशास्त्राचा कांही 'उपयोग' असूं शकेल का ? शंका वाटते. कोणतेंहि शास्त्र म्हणजे जर जमा झालेलें व व्यवस्थित केलेलें ज्ञान असेल तर अशा शास्त्राचा ज्ञानोपासनेखेरजि उपयोग तो कोणता असणार ?

आता वाङ्मयासारख्या एखाद्या कलेच्या रसग्रहणासाठी तिच्या मुळाशी असलेल्या तंत्राचें किंवा तत्त्वाचें ज्ञान कितपत आवश्यक आहे ? या प्रश्नाचें उत्तर खरोखरच कठिण आहे. ज्ञानाची उंची मोजतां येईल. पण कलाकृतीच्या आस्वादांतील कमीअधिकपणा हा नेहमी व्यक्तिव्यक्तींत वेगळाच असणार ! खुद्द वाङ्मयसमीक्षकाबाबत देखील "You know who the critics are? The men who have failed in literature and art."— Benjamin Disraeli आणि "Reviewers are usually people who would have been poets, historians, biographers etc. if they could; they have tried their talents at one or at the other and have failed; therefore they turn critics"— S. T. Coleridge असे जेथे अनुदारपणाचे उद्गार मोठमोठे लोक काढतात तेथे तंत्रविशारदांची कलाकृतींचे मसणजोगी (Undertakers) म्हणून संभावना झाली तर त्यांत कांहीच आश्चर्य नाही !

"विना न साहित्यविदाऽपरत्र गुणं कथंचित् प्रथते कवीनाम् ।" साहित्यशास्त्राचें ज्ञान असल्यावाचून कवींच्या गुणांची प्रसिद्धी होऊं शकत नाही, असें साहित्यकोविदांनी खुशाल म्हणावें; परंतु काव्यप्रकाश हा एक यवन आहे आणि या घटिंगणाने तिला फरफटत ओढल्यामुळे बिचाऱ्या काव्याली-कुलांगनेची मोठी केविलवाणी स्थिति होते, हें सुभाषित विसरतां येत नाही ! एवढें खरें की साहित्यशास्त्राची केवळ जुजबी माहिती असली तरी सहृदयाला वाङ्मयकृतींचा उत्कट आस्वाद घेतां येईल. सहृदयत्व अंगी बाणण्यास काव्यानुशीलनाभ्यास, विशदीभूत मन व वर्णनीय तन्मयीभवनयोग्यता हे गुण व या गुणांच्या योगाने मिळणारा हृदयसंवाद पुरेसा आहे. त्यासाठी वाङ्मयसमीक्षाहि उपयोगी पडेल. पण सर्वच शास्त्रांप्रमाणे साहित्यशास्त्राचाहि प्रदेश उपयुक्ततेपासून फारच दूर नाही का ?

अरिस्टॉटलच्या 'रेटॉरिक'चा परिचय

अच्युत नारायण देशपांडे

★

[हा लेख लिहिण्यांत दोन हेतु आहेत. एक आयसोक्रेटस आणि अरिस्टॉटल या सुप्रसिद्ध ग्रीक साहित्यशास्त्रज्ञांचे वक्तृत्वकला आणि गद्यलेखनकला या संबंधींचे विचार रूपरेषात्मक स्वरूपांत सर्वसाधारण सुशिक्षित मराठी वाचकांना कळावे; आणि दुसरा, मराठींतील गद्यलेखनकलेच्या नियामक तत्त्वांची आणि तंत्राची मीमांसा करण्याची मराठी गद्याच्या अभ्यासकांना प्रेरणा मिळावी.]

★

ख्रि. पू. चवथ्या शतकापर्यंतच्या काळांत ग्रीक साहित्यशास्त्रज्ञांनी काव्यशास्त्रविषयक विचारांत बहुमोल भर टाकली; त्याचप्रमाणे वक्तृत्वकला आणि गद्यलेखनकला यांच्या संबंधींहि याच काळांत त्यांनी मौलिक विचारांचें प्रतिपादन केलें. आयसोक्रेटस आणि अरिस्टॉटल यांनीच प्रामुख्याने या उपरोक्त प्रतिपादनांत भाग घेतला. कालांतराने जेव्हा रोममध्ये वक्तृत्वकलेचा उत्कर्ष झाला तेव्हा या दोघांचेच ग्रंथ सिसेरो, डायोनिसस व क्विंटिलियन यांच्याकडून प्रमाणभूत मानले गेले.

ख्रि. पू. चवथ्या शतकांत वक्तृत्वकलेच्या विकासाला ग्रीसमधील विशिष्ट सामाजिक आणि राजकीय परिस्थिति कारणीभूत झाली. त्यावेळीं सृजनशील साहित्यनिर्मितीला ओहोटी लागली. देशांत सर्वत्र राजकीय अस्वास्थ्य माजलें. साहित्याची उपेक्षा होत चालली. लोकांचें लक्ष राजकीय प्रश्नांकडे अधिक तीव्रतेने वेधलें गेलें. नाट्यगृहांपेक्षा लोकांना न्यायकचेरींचें आकर्षण व महत्त्व जास्त वाटूं लागलें. लोक जाहीर सभांतून राष्ट्रसंवर्धनाच्या प्रश्नांसंबंधीं चर्चा करूं लागले. साहजिकच, जाहीर रीतीने भाषण करण्याच्या कलेला सामाजिक व राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें. वक्तृत्वकलेचा पद्धतशीर अभ्यास करण्याची व तींत प्राविण्य संपादण्याची लोकांना आवश्यकता भासूं लागली. दुर्दैवाने या कलेचें सर्वांगीण आणि सुसंगत अध्ययन करण्यास उपयोगी पडतील अशा तऱ्हेचे ग्रंथ त्यावेळीं ग्रीस देशांत उपलब्ध नव्हते.
२५७ प्लेटोने तर वक्तृत्ववाद्यांवर चांगलेंच कोरडे ओढले होते आणि आपल्या 'रिपब्लिक'-

मध्ये वक्तृत्वाच्या अध्ययनाला मुळीच स्थान दिलेलें नव्हतें. वक्तृत्वकलेची हा पूर्वकालीन अनास्था आणि तिची भासत असलेली तत्कालीन आवश्यकता लक्षांत घेऊन तिची निष्ठापूर्वक व शास्त्रशुद्ध रीतीने जोपासना करणें जरूर होतें. हें सामाजिक कार्य आयसोक्रेटस आणि अरिस्टॉटल यांनी उत्तम रीतीने पार पाडलें. राजकारणाच्या आणि शिक्षणाच्या दृष्टीने वक्तृत्वकलेचें वाढलेलें महत्त्व त्यांना पूर्णपणें पटलें; म्हणून त्यांनी आपापल्या शाळेंतून या कलेचें अध्यापन सुरू केलें. अर्थातच या दोघांचे या कलेकडे पाहण्याचे दृष्टिकोन भिन्न होते; तरी पण एवढें मात्र निश्चित की या दोघांनी वक्तृत्वकलेच्या आणि त्याबरोबरच स्वाभाविकपणें गद्यलेखनकलेच्या तात्त्विक नि तांत्रिक स्वरूपाच्या विवेचनांत अमूल्य भर टाकली.

आयसोक्रेटस आणि अरिस्टॉटल यांपैकी प्रथम आयसोक्रेटसने आपल्या शाळेंतून खि. पू. ३९२ मध्ये वक्तृत्वकलेचें अध्यापन सुरू केलें. आयसोक्रेटस (जन्म—खि. पू. ४३६; मृत्यु—खि. पू. ३३८) हा प्लेटो आणि अरिस्टॉटल यांचा समकालीन. तो जातीने मुरब्बी व कसलेला वक्ता असल्यामुळे त्याच्या शाळेचा लौकिक सर्वत्र वाढला. गॉर्गियसच्या या शिष्यवराने इतकी अमूप लोकप्रियता मिळविली की दूरदूरचे लोक त्याच्या शाळेंत वक्तृत्वाचें अध्ययन करण्यास येऊं लागले. त्याच्या वेळचे किती तरी प्रसिद्ध वक्ते आणि कांही राजेसुद्धा त्याच्या शाळेंत शिक्षण घेऊन गेले. ही त्याची उदंड लोकप्रियता अरिस्टॉटलला मान्य नव्हती असें म्हणतात. आयसोक्रेटस हा फक्त भाषेच्या माधुरीकडे व सौंदर्यपूर्णतेकडेच लक्ष देत असे व वक्तृत्वकलेच्या आद्य तत्त्वांची तो पायमल्ली करीत असे, असा अरिस्टॉटलचा त्याच्यावर आरोप होता असें सांगतात. तोंडीस तोंड म्हणून अरिस्टॉटलनेहि आपल्या शाळेंतून शास्त्रशुद्ध व कलापूर्ण वक्तृत्वाचें अध्यापन करण्यास सुरवात केली. असें असलें तरी आयसोक्रेटसचें कार्य स्वतंत्र आहे आणि अरिस्टॉटलच्या प्रतिक्रियेची पार्श्वभूमि म्हणून त्याचें स्वरूप जाणून घेणें आवश्यक आहे.

आयसोक्रेटसचें वाशिष्ट्य हें की त्याच्या काळीं ग्रीक वक्तृत्वकलेला जें तत्त्वभ्रष्ट, संकुचित आणि कृत्रिम स्वरूप प्राप्त झालें होतें तें नाहींसें करून त्याने तिला उदात्त आणि उच्च अशी सांस्कृतिक भूमिका प्राप्त करून दिली. त्यावेळीं वक्तृत्वकलेच शिक्षण देणाऱ्या सोफिस्टांनी वाणीचा नुसता व्यभिचार चालविलेला होता. कोर्टकचेऱ्यांतील झगड्यांत खोटेनाटे युक्तिवाद करून आपलें म्हणणें खरें कसें करावें किंवा एखाद्या पौराणिक विषयावर निरर्थक आणि शुष्क वादविवाद कसे करावे हें शिकविणें, हें त्या सोफिस्टांचें ध्येय असे. वक्तृत्वाचा हा दुरुपयोग आयसोक्रेटसला मुळीच पसंत नव्हता. त्याच्या काळीं अशा एक समजूत प्रचलित होती की कांही निश्चित ठराविक नियमांचें अध्ययन आणि संयोजन केलें की हमखास वक्तृत्व-कला हस्तगत झालीच पाहिजे; उलट, वक्तृत्वकला ही केवळ तंत्राची कलमें घोकल्याने येणारी कला नसून ती एक सृजनशील कला आहे असें आयसोक्रेटसचें म्हणणें असे. तसेंच, आपलें तर्ककौशल्य, बुद्धिचापल्य आणि वाक्पटुत्व सिद्ध करण्याकरिताच मुख्यतः उपयोगी पडतील अशा तऱ्हेच्या निरर्थक व जीवनाच्या दृष्टीने अगदीच निरुपयोगी असलेल्या विषयांची आपल्या वक्तृत्वाकरिता निवड करण्याची तत्कालीन

प्रवृत्ति त्याला मुळींच संमत नसे. क्षुद्र व क्षुल्लक विषयांवर केवळ आत्मप्रतिष्ठा-प्रदर्शनाकरिता वक्तृत्वाच्या फेरी झोडणें हें त्याच्या मतें कमकुवतपणाचें लक्षण होतें. गंभीर विषयावर समतोल चर्चा करण्याकरिता तशी अंगीं कुवत असावी लागते. प्रतिपाद्य विषय भव्य आणि प्रभावी असला म्हणजे आपोआप त्याचें व्यक्तीकरण करणाऱ्या शब्दांना भव्य नी प्रभावी स्वरूप प्राप्त होतें, हा त्याचा सिद्धान्त होता.

जीवनांतील वक्तृत्वकलेचें स्थान किती महत्त्वाचें आहे याचें विवेचन करतांना आयसोक्रेटस म्हणतो की जीवनांतील कितीतरी सुखें आपणांस या वाणीच्या बळावर मिळूं शकतात. वाणी ही मोठी प्रभावी शक्ति आहे. वाणी नसती तर मानवाला नगरें उभारतां आलीं नसतीं, राज्य चालवितां आलें नसतें, समाजधारणेला आवश्यक असे कायदे करतां आले नसते, रमणीय कलानिर्मिति करतां आली नसती. विचार करायला नि केलेला विचार कृतींत आणायला आपल्याला वाणीचें साहाय्य लागतें. लोकांना शिकवायला वाणीच साहाय्यीभूत होते. दुष्ट विचारांचें निराकरण करायला, कल्याणकारी विचारांचें प्रतिपादन व प्रसरण करायला, मतभेद मिटवायला, ज्ञान वाढवावयाला, अज्ञानांना सज्ञान करायला आणि ज्ञात्यांच्या ज्ञानाची कसोटी पाहायला—या सर्व गोष्टी करायला वाणीचाच फक्त उपयोग होऊं शकतो. पुन्हा, क्षुद्र व्यक्तींना नि विचारांना सामर्थ्यशील प्रतिष्ठेवर आरूढ करावयाचें आणि प्रतिष्ठित व पूज्य व्यक्तींना व विचारांना पदच्युत करायचें, हा तर वाणीच्या हातचा मळ आहे. वाणीवरून बोलणाऱ्या माणसाची वैचारिक कुवत, त्याची आकलनशक्ति, त्याचें शील, त्याचे गुणावगुण यांचें सहज ज्ञान होतें. (या ठिकाणीं, 'महान् आत्म्याचें प्रभावशालित्व त्याच्या महान् उद्गारांत प्रतिध्वनित झालेलें असतें.' 'Great utterance is an echo of greatness of soul' या लॉंगिनसच्या वचनाची आठवण होते). वाणीसंबंधींचे आयसोक्रेटसचे हे विचार केवळ श्रोत्यांच्या दृष्टीने मांडलेले नसून वाचकांच्या दृष्टीने मांडलेले होते; त्यामुळे ते विचार वक्तृत्वाला जितके लागू पडतात तितकेच ते गद्यलेखनालाहि लागू पडतात असें दिसून येतें.

वक्तृत्वकलेच्या नि गद्यलेखनकलेच्या अभ्यासाला आधारभूत असलेलीं कांहीं तत्त्वें आयसोक्रेटसने सांगितलेलीं आहेत. तीं अशीं: १. या कला शिकण्याचे ठराविक नि सनातन नियम नाहीत. वक्तृत्व किंवा गद्यलेखन हें शास्त्र नाही; ती एक कला आहे. ती साध्य होण्याकरिता मूळची अनुकूल दैवी देणगी, सतत परिश्रम व अभ्यास आणि कलेच्या तंत्राचें ज्ञान या तीन गोष्टींची आवश्यकता असते. २. कसलेल्या नि मुरलेल्या वक्त्याचा किंवा गद्यलेखकाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्याचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करण्यानेच ती कला हस्तगत होऊं शकते. वक्तृत्वकलेच्या नि गद्यलेखनकलेच्या अध्ययनांतील आदर्शाच्या चिंतनाचें नि अनुकरणाचें महत्त्व आयसोक्रेटसनेच प्रथम इतक्या आग्रहाने आणि आवेशाने मांडलें.

वक्तृत्वाचें व कलात्मक गद्यलेखनाचें नियमन करणारीं कांहीं महत्त्वाचीं

तत्त्वेंहि आयसोक्रेटसने प्रतिपादिलेलीं आहेत. तीं अशीं: १. गद्यलेखन किंवा

वक्तृत्व हें कवितेप्रमाणें कलात्मक असावें. त्यांत तालबद्धता असावी. काव्यसेवनापासून होणाऱ्या आनंदाइतकाच उत्कट आनंद त्यांच्यापासूनहि व्हावा. त्याकरिता गद्य-लेखनांत आणि वक्तृत्वांत कल्पनाविलास असावा, वैचित्र्य असावें आणि भाषा ठळक अलंककारांनीं विभूषित केलेली असावी. २. " असें लिहावें किंवा बोलावें की लोकांना असें वाटलें पाहिजे की आपल्याला अगदी असेंच लिहितां किंवा बोलतां आलें पाहिजे, पण अभ्यासाशिवाय मात्र त्यांना तसें लिहितां किंवा बोलतां येऊं नये. " ३. गद्य हें काव्याप्रमाणे विविधतापूर्ण आणि प्रभावी असावें. स्तुतिपर वर्णनासारख्या पद्याच्या क्षेत्रांतहि गद्याने आपलें कर्तृत्व गाजवून दाखवावें. ४. बोलण्याचा किंवा लिहिण्याचा विषय क्षुद्र, क्षुल्लक नसावा; तो मौलिक, महत्त्वपूर्ण नि अभिनव असावा. विषय जुनाच असेल तर त्याचें प्रतिपादन अभिनव असावें. ५. विषयाच्या नि प्रसंगाच्या दृष्टीने जें उचित असेल तेंच बोलावें किंवा लिहावें. ६. गद्यलेखनांत रूपकगर्भ, सुंदर, अकृत्रिम आणि परिचित शब्द वापरावे. ७. स्वरांचा संघर्ष होऊं देऊं नये. ८. ज्या शब्दसमुच्चयाने सुरवात केली असेल त्यानेच बहुधा शेवट करावा. ९. प्रतिपाद्य विषयाची मांडणी क्रमबद्ध आणि विकासशील असावी.

आयसोक्रेटस हा वक्तृत्वाचे फक्त दोनच प्रकार मानतो. १. प्रतिपक्षाचा पराभव करूं शकणारें, तसेंच राष्ट्रसंवर्धनाच्या प्रश्नांची प्रभावी चर्चा करूं शकणारें वक्तृत्व; आणि २. कोर्टकचेऱ्यांतील झगड्यांतलें वक्तृत्व. तो भाषणाचे किंवा गद्यलेखाचे क्रमवारीच्या दृष्टीने चार भाग पाडतो : १. प्रस्तावना २. निवेदन, ३. सिद्धान्तनिर्वचन, ४. समारोप.

आयसोक्रेटसची वक्तृत्वविषयक व गद्यलेखनविषयक विचारसरणी थोडक्यांत वर सांगितल्याप्रमाणे आहे. त्याच्याविषयी विशेषेंकरून लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही की त्याने कलापूर्ण नि शैलीपूर्ण वक्तृत्वाला नि गद्यलेखनाला तत्त्वज्ञानाइतकीच उच्च शिक्षणाचें एक आवश्यक अंग म्हणून मान्यता मिळवून दिली आणि वक्तृत्वाच्या नि गद्यलेखनाच्या प्रतिपाद्य विषयांत नि प्रतिपादनपद्धतींत अभिनव सुधारणा सुचविल्या. शिवाय, सिसेरोच्या वक्तृत्वावर त्याच्या शिकवणीचा झालेला परिणाम पाहिला म्हणजे आपणास त्याच्या कर्तृत्वाचें खरें महत्त्व कळतें. आयसोक्रेटसची पाठशाळा म्हणजे ट्रॉयमधील अश्वच होत, या अश्वांवर नेहमी वीरच बसून यावयाचे, असें सिसेरो आयसोक्रेटससंबंधीं म्हणत असे. आयसोक्रेटसचा सिसेरोवर पडलेला प्रभाव आणि सिसेरोचा आधुनिक गद्यलेखकांवर पडलेला प्रभाव पाहिला म्हणजे त्याचें कर्तृत्व अधिक स्पष्ट होतें व उठून दिसतें.

खि. पू. चवथ्या शतकांतील वक्तृत्वकलेवर व गद्यलेखनकलेवर लेखन करणारा दुसरा महत्त्वाचा लेखक म्हणजे अरिस्टॉटल हा होय. याला आयसोक्रेटसची वक्तृत्वाध्यापनपद्धति पसंत नसे हें वर सांगितलेंच आहे. तो आयसोक्रेटसच्या वक्तृत्वविषयक ग्रंथांबद्दल नेहमी तिरस्कार व्यक्त करीत असे. वक्तृत्वकलेचीं खरीं तत्त्वें आयसोक्रेटसला कळलींच नाहींत, तेव्हा आपण तीं मांडावीं या हेतूने त्याने

Rhetoric हा ग्रंथ लिहून काढला. आयसोक्रेटसच्या मृत्यूनंतर अथन्स येथे हा ग्रंथ लिहिण्यांत आला. या ग्रंथांत कांही ठिकाणीं त्याने आयसोक्रेटसच्या सिद्धान्तांचें अयथार्थत्व दाखवून दिलें आहे तर कांही ठिकाणीं आपल्या सिद्धान्तांच्या पुष्ट्यर्थ त्याने आयसोक्रेटसच्या भाषणाचीं उदाहरणें दिलीं आहेत. आश्चर्याची गोष्ट ही की त्याने डेमॉस्थेनिसचा कोठेहि उल्लेख केलेला नाही.

अरिस्टॉटलने पूर्ववयांत वक्तृत्वकलेसंबंधीं Gryllus आणि Theodectia हीं दोन पुस्तकें लिहिलीं होतीं. Rhetoric हें त्याने त्याच विषयावर उतारवयांत पण भिन्न दृष्टिकोनांतून लिहिलेलें पुस्तक आहे. त्यावेळीं त्याने केलेल्या केवलस्वरूपी शास्त्रें, उद्बोधक शास्त्रें, नि उत्पादक शास्त्रें या शास्त्रांच्या वर्गीकरणांत काव्याप्रमाणे वक्तृत्वालाहि उत्पादक शास्त्रांच्या वर्गांत घातलें आहे. Rhetoric ची भूमिका जवळ जवळ Poetics सारखीच म्हणजे कांही अंशीं प्रतिक्रियात्मक आणि कांही अंशीं विधेयात्मक अशी आहे. वक्तृत्वकला ही केवळ लोकांचें मन वळविण्याची एक क्लृप्ति आहे असें म्हणणाऱ्या प्लेटोला अप्रत्यक्षरीत्या उत्तर देण्यांत या ग्रंथाचा कांही भाग खर्च झालेला आहे.

Rhetoric या पुस्तकाचे एकंदर तीन भाग आहेत. पहिल्या दोन भागांत वक्तृत्वाच्या प्रतिपाद्यविषयाची चर्चा केलेली आहे. प्रतिस्पर्ध्यांच्या युक्तिवादांचें निराकरण, वक्तृत्वाचें उद्दिष्ट, मानवी भावनांचा वक्तृत्वाच्या प्रभावाच्या दृष्टीने अभ्यास इत्यादि प्रश्नांचें विवेचन या दोन भागांत आलेलें आहे. तिसऱ्या भागांत वक्तृत्वकलेच्या तांत्रिक अंगाची चर्चा केलेली आहे.

Poetics मध्ये प्रकट झालेलीं अरिस्टॉटलच्या विवेचनपद्धतीचीं वैशिष्ट्यें, Rhetoric मध्येहि प्रकट झालेलीं आहेत. १. Poetics प्रमाणेच Rhetoric हा ग्रंथहि त्या विषयाचें पूर्वज्ञान असलेल्यांकरिताच लिहिलेला आहे. Poetics प्रमाणे यांतहि त्याच्या व्याख्यानांचीं केवळ टांचणें आहेत असाहि कयास आहे. २. दोन्ही ग्रंथांत ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अवलंब केलेला आहे. ३. मानसशास्त्राला अनुसरून केलेलें तत्त्वशोधन– हें या दोन्ही ग्रंथांतील विवेचनपद्धतीचें आणखी एक महत्त्वाचें साम्य आहे.

अरिस्टॉटलच्या मतें, वक्तृत्व ही एक कला असून एकंदर ज्ञानविज्ञानाच्या सुसंबद्ध, एकात्मक व्यवस्थितींत तिचें स्थान स्वतंत्र आहे. संपूर्ण ज्ञानव्यवस्थितीशी ती स्वाभाविकपणें निगडित झालेली आहे. त्याने वक्तृत्वाचे तीन प्रकार मानलेले आहेत; कारण वक्तृत्वाने ज्या लोकांचीं मनें वळवावयाचीं असतात ते साधारणपणें तीन प्रकारांत बसतात–कोर्टकचेऱ्यांतील, राजकीय सभांतील आणि उत्सवप्रसंग संमेलनांतील. यावरून वक्तृत्वाचे स्वाभाविकपणेंच तीन प्रकार पडतात. न्यायाधिशाला उद्देशून करावयाचीं भाषणें, सभेपुढे करावयाचीं भाषणें आणि वक्तृत्वकलेचें कसब दाखवून लोकांचें रंजन करण्याकरिता करावयाचीं भाषणें. आयसोक्रेटसने केलेल्या दोन प्रकारांपेक्षा हे तीन प्रकार अधिक व्यापक नि तर्कशुद्ध आहेत.

Rhetoric च्या पहिल्या दोन भागांतील विवेचन थोडक्यांत पुढे दिल्या-प्रमाणे आहे. श्रोत्यांच्या अंत:करणांतील असूया, द्वेष इत्यादि अनिष्ट मनोवृत्तींना जागृत करणारा वक्तृत्वाचा प्रकार त्याज्य समजावा. लोकांचीं मनें अवश्य वळवावीं; पण तीं अशा अनिष्ट भावना उद्दीपित करून नव्हे, तर आपल्या युक्तिवादाला तर्कशुद्ध व विवेकनिष्ठ अशा भक्कम व मजबूत पायावर उभारून. लोकांचीं मनें वळविण्याकरिता आधी त्यांच्या मनाचा अभ्यास करावा, त्यांचें मानसशास्त्र जाणावें, त्यांना उपकारक होतील अशा भावनांना उत्तेजित करण्यास शिकावें. युक्तिवादांतील मुद्यांच्या परिणाम-कारक रचनेसंबंधीं विवेचन करतांना त्याने वाक्याचे दोन प्रकार सांगितलेले आहेत— १. सिद्धान्त प्रतिपादन करणारीं वाक्यें आणि २. त्या सिद्धान्ताचें समर्थन करणारीं वाक्यें. भाषणाच्या किंवा गद्यलेखनाच्या आयसोक्रेटसने पाडलेल्या चार भागांना अरिस्टॉटलने अंशत मान्यता दिलेली आहे. तर्कशुद्ध विचारसरणीचा आणि मानसशास्त्राधिष्ठित विवेचनपद्धतीचा पुरस्कार करण्यांत तो प्लेटोच्याच पाउलावर पाऊल ठेवतो, असें दिसून येतें.

साहित्यशास्त्रांतर्गत शैलीच्या मौलिक विवेचनाच्या दृष्टीने Rhetoric चा तिसरा भाग अत्यंत उपयुक्त नि मार्गदर्शक आहे. अरिस्टॉटलची शैलीसंबंधींची भूमिका मोठी मार्मिक आहे. एखादी गोष्ट वाचकांना किंवा श्रोत्यांना पटवून देण्याकरिता ती फुगवून सांगावी लागावी, तिच्याकरिता वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या भावना उद्दीपित कराव्या लागाव्या, हा वाचकांच्या नि श्रोत्यांच्या मनाचा कमकुवतपणा आहे, अशी त्याची दृष्टि आहे. तो म्हणतो, " No teacher commends geometry by graces of Style. " जें सत्य असेल तें सरळ निवेदन करण्याने काम भागलें पाहिजे असें त्याचें मत. अर्थात् ही गोष्ट ज्यांचा बौद्धिक विकास पुष्कळच झालेला आहे अशा लोकांच्या बाबतींतच शक्य आहे. त्यामुळे सर्वसाधारण आकलनशक्तीच्या लोकांकरिता जें कांही बोलावें किंवा लिहावें लागतें त्यांत भावनो-त्कटता असली पाहिजे हें त्याने मान्य केलें आहे.

उत्कृष्ट लेखनशैलीचीं अरिस्टॉटलने दोन महत्त्वाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. १. स्पष्टार्थता; २. औचित्य. एखाद्या वस्तूचा गुणधर्म त्या वस्तुकडून होणाऱ्या मुख्य व विशिष्ट कार्यावरून ठरविला जातो आणि तें कार्य जितक्या उत्तम रीतीने पार पडेल तितका त्या वस्तूचा दर्जा वाढतो, या तत्त्वाला अनुसरून त्याने हीं दोन तत्त्वें सांगितलीं. आपलें म्हणणें समजावून सांगणें हें लिहिण्याचें-बोलण्याचें मुख्य कार्य; तें यशस्वीरीतीने पार पाडण्याकरिता आपलें लिहिणें-बोलणें स्पष्ट नि उचित असलें पाहिजे. आपलें लिहिणें-बोलणें स्पष्टार्थबोधक नि औचित्यपूर्ण करण्याकरिता योग्य शब्दांची निवड केली पाहिजे. स्पष्टार्थत्वाकरिता परिचित आणि आकलनसुलभ असे लोकांच्या नेहमीच्या बोलण्यांतले शब्द योजावे. त्याचबरोबर, भाषा प्रभावशाली नि सौंदर्यपूर्ण करण्याकरिता कांही अपरिचित शब्दांचा अधूनमधून तुरळक उपयोग करावा; त्यामुळे भाषेंत विस्मयजन्य आल्हादकत्व निर्माण होतें. काव्यांत अपरिचित नि नवीन निर्माण केलेले शब्द अधिक शोभतात; उलट, गद्यांत प्रतिपाद्य विषयाचा दर्जा काव्याच्या मानाने कांहीसा कनिष्ठ प्रतीचा असल्यामुळे (कारण, तो प्रतिपाद्य

विषय सर्वसामान्य बहुजनसमाजाकरिता असतो) त्यांत शक्यतोंवर प्रचलित नि परिचित भाषाच उपयोगांत आणावी. एवढ्यानेच गद्यलेखनांत कलात्मकता येणार नाही. त्याकरिता आणखी एक गोष्ट केली पाहिजे; आणि ती म्हणजे रूपकाची योजना. समर्पक रूपक वापरणें हें कांही सोपें काम नाही. त्याकरिता प्रतिभा लागते; केवळ अभ्यासानें तें जमत नाही. रूपक कां वापरावयाचें ? तर रूपकांत विलक्षण आकर्षकत्व असतें; पुन्हा, अर्थविषदीकरणाकरिता मानसशास्त्रदृष्ट्या तें अत्यंत उपयोगी ठरतें. परिचित आणि अपरिचित शब्दांच्या नि कल्पनांच्या सह्योजनेने निर्माण होणारें सुस्पष्टत्व, आकर्षकत्व आणि विस्मयजन्य आल्हाददायकत्व हे गुण रूपकांच्या समुचित योजनेनें अधिक उत्कट रीतीने निर्माण होतात. लोक नेहमीच्याच बोलण्यांत रूपकगर्भ शब्द वापरतात; त्यामुळे रूपकांच्या योजनेमुळे भाषेंत आपोआपच स्पष्टार्थत्व येतें. पुन्हा लोकांना नवीन ज्ञान लवकर लवकर ग्रहण करण्यांत आनंद वाटतो. रूपकांमुळे तो लाभ सहज साधतो. रूपकांत दोन भिन्न वस्तूंचें एकाच वेळीं ज्ञान होत असल्यामुळे व त्याबरोबरच त्या वस्तूंतील साम्य प्रत्ययास येत असल्यामुळे वाचकांस बौद्धिक आनंद होतो व रूपकांबद्दल अलौकिक आकर्षण वाटतें. शिवाय, कांही रूपकांत दोन अत्यंत भिन्न वस्तूंतील अकल्पित सादृश्य अचानकपणें प्रत्ययास येत असल्यामुळे वाचकांस एक प्रकारचा चमत्कृतिजनक आल्हाद वाटतो. रूपकांच्या योजनेसंबंधींहि कांही विधायक सूचना त्याने केल्या आहेत. तो म्हणतो, रूपकें हीं नेहमी प्रतिपाद्यविषयाशीं नी प्रतिपादनाच्या उद्दिष्टाशीं सुसंगत असावीं. उद्देश सौंदर्यदर्शनाचा नि सौंदर्यसंवर्धनाचा असेल तर सुंदर नि उदात्त उपमानांची निवड करावी; उद्देश विडंबन किंवा उपहास करण्याचा असेल तर नीच नि तुच्छ उपमानांची निवड करावी. रूपक असें असावें की त्यांतील चमत्कृतिपूर्ण सादृश्य चटकन् लक्षांत यावें; त्यांतील साम्य ओढूनताणून साधलेलें नसावें. ज्यांत अंगचेंच नादमाधुर्य आणि अर्थसौंदर्य आहे असे शब्द रूपकांकरिता वापरावे.

योग्य शब्दांची निवड-या शैलीच्या एका प्रमुख घटकाबद्दल हें विवेचन झालें. शैलीचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे समुचित शब्दसंहिता आणि संश्लिष्ट वाक्य-रचना. त्याकरिता भाषा शुद्ध असावी, वाक्प्रचारांचा उपयोग करावा; लिंग, वचन, अव्ययें यांच्या उपयोगांत चुका नसाव्या; उद्देश हा की लेखन स्पष्टार्थबोधक असावें. वाक्यांतील वाक्यांशांची जुळणी सुसंबद्ध असावी, व्यापक नि अनिश्चित संज्ञांचा बेताने उपयोग करावा, व्यक्तीकरणांत संदिग्धता नसावी; अर्थात् लेखकाला जाणून-बुजून संदिग्ध राहावयाचें असेल तर गोष्ट वेगळी ! लेखनांत प्रसाद असावा. गौण वाक्यांचे डव्यावर डबे रचून वाक्याची लांबच लांब आगगाडी केलेली नसावी. विरामचिन्हांच्या उपयोजनेंत अव्यवस्थितपणा नसावा.

अरिस्टॉटलच्या मतें शैलीचा तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे प्रौढत्व. एकंदर लेखनपद्धतीला प्रौढत्व आणण्याकरिता रूपकांची व साभिप्राय विशेषणांची योजना करावी. तींत काव्यात्मकतेचा अतिरेक होऊं देऊं नये. एकवचनाऐवजी अनेक-वचनांचा अनेकदा उपयोग करावा. खि. पू. ४ थ्या शतकांतील अँटिमॅकस नांवाच्या कवीने सुचविलेला आणखी एक उपाय अरिस्टॉटलला संमत आहे आणि तो म्हणजे

कोणत्याहि वस्तूंचें अभावात्मक वर्णन करणें. एक तर, असें वर्णन वाटेल तितकें वाढविता येतें आणि दुसरें असें की विशिष्ट वस्तूंच्या अभावाच्या बाजू उलगडतां उलगडतां त्या वर्णनाला एक प्रकारचें तरलत्व, सूक्ष्म नि उदात्ताकर्षक स्वरूप प्राप्त होतें. प्रभावशाली शैलीच्या निर्मितीकरिता अरिस्टॉटलने सुचविलेला हा उपाय निःसंशय त्याच्या मार्मिक व सूक्ष्मग्राही रसिकतेचा स्पष्ट द्योतक आहे.

शैलीचा आणखी एक घटक म्हणजे मजकुराच्या निवेदनांत नि भाषेंत पाळावयाचें औचित्य. प्रतिपाद्यविषय, त्याचा वाचकाच्या मनावर होणारा परिणाम आणि तो विषय मांडणारें काल्पनिक वा खरें पात्र-यांना अनुरूप आणि पोषक अशी भाषा असावी. भव्य नि गंभीर विषयाचें प्रतिपादन शिथिल नको किंवा क्षुल्लकांचें प्रतिपादन उगीच भव्य नि भारदस्त नको. भावनोत्कट उद्गाराकरिता संयुक्त, अपरिचित नि साभिप्राय शब्द वापरावे. काव्यांत अशा तऱ्हेचे शब्द वापरलेले असतात, कारण त्यांत भावनोत्कटता असते किंवा ॲरिस्टॅटलच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'काव्य ही प्रस्फूर्त वस्तु असते.' 'Poetry is an inspired thing' शिवाय, बोलणाराची भाषा ही त्याचें वय, त्याची सामाजिक प्रतिष्ठा, त्याचें लिंग, त्याचें राष्ट्रीयत्व यांना अनुसरून असावी. या औचित्यगुणामुळे भाषेंतील नि प्रतिपादनांतील केवळ सौंदर्यच साधतें असें नाही; तर त्यामुळे प्रतिपाद्यविषयाची आकलनसुलभता नि परिणामकारकताहि वाढते.

गद्यलेखनशैलीचा अरिस्टॉटलने सांगितलेला आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे गद्यलेखनांतली तालबद्धता. तो म्हणतो, "Prose should have rhythm but not metre." पायथागोरसच्या पंथांतील लोकांचें म्हणणें असें की विश्वाचें आकलन होण्यास आकड्यांची कल्पना अत्यंत उपयुक्त ठरते. या कल्पनेच्या उपयोजनेमुळे आपल्या वस्तुविषयक ज्ञानाला निश्चितत्व येतें. प्लेटोने हीच कल्पना संगीत, काव्य व गद्य यांना लावली आणि त्यावरून, तालबद्धतेमुळे एकंदर लेखनांत व्यवस्था येते, हें अनुमान काढलें. पूर्वसूरींचें हें विवेचन लक्षांत घेऊन अरिस्टॉटलने असें प्रतिपादन केलेलें आहे की तालबद्धतेच्या अभावीं लेखनाला संदिग्धता नि अनिर्बंधता येतें. जें अस्पष्ट आणि अनिर्बंध तें अर्थातच अनाकर्षक नि आकलनदुर्लभ ठरतें; म्हणून गद्यलेखनांत तालबद्धता लागते. तालबद्धता पाहिजे, पण वृत्त नको; कारण वृत्त म्हटलें की कृत्रिमता यायची आणि तीमुळे प्रतिपादनाच्या परिणामकारकतेची धार बोथट व्हावयाची! शिवाय, वृत्तयोजनेमुळे वाचकांचें लक्ष प्रतिपाद्य विषयावरून कांहींसें विचलित होऊन तें वृत्तांतील मनोहारित्वावर केंद्रित व्हावयाचें!

अरिस्टॉटल वाक्यनिबंधाचे दोन प्रकार करतो. पहिल्या प्रकारांत वाक्यें अखंड साखळीप्रमाणे अव्ययादिकांनी जोडलेलीं असतात; दुसऱ्या प्रकारांत प्रत्येक वाक्य स्वयंपूर्ण असून एकंदर वाक्यसमूहांतील प्रतिपादनाशीं सुसंबद्ध असतें. अरिस्टॉटल म्हणतो, पहिला प्रकार प्राचीन आहे; पण तो शिथिल स्वरूपाचा असल्यामुळे निरुपयोगी ठरत चालला आहे. दुसरा प्रकार हा त्याच्या बांधेसूदपणामुळे अधिक आकर्षक आणि परिणामकारक वाटतो. गद्यलेखनांत दुसऱ्या प्रकाराचा अवलंब केल्यास त्यांत आपोआपच रचनासौष्ठव येतें, तें स्मरणसुलभ होतें. त्याकरिता प्रत्येक वाक्य स्वयंपूर्ण

असावें. त्यांत एक स्पष्ट कल्पना मांडलेली असावी. त्याचीं गौण वाक्यें फार लहान किंवा फार मोठीं नसावीं. वाक्य लांबचलांब असलें म्हणजे प्रतिपादनांतील युक्तिवादाचा धागा फारच म्हणजे तुटेपर्यंत ताणला जातो. वाक्य अगदीच आखुड असलें तर प्रतिपादनांतील युक्तिवाद ग्रहण करण्याच्या वेगांत असलेल्या वाचकाचा झोक जाऊन तो ठेचाळण्याचा संभव असतो.

शैलिसंबंधींच्या विवेचनाचा समारोप करतांना अरिस्टॉटल आणखी दोन महत्त्वाच्या सूचना करतो. (१) लेखनांत चैतन्य आणि टोकदारपणा असावा. त्याकरिता उपमा, रूपक, विरोधाभास, चेतनगुणोक्ति या अलंकारांचा आणि शाब्दिक कोट्यांचा उपयोग करावा.- रूपकाचें सामर्थ्य त्याने मागे वर्णिलेंच आहे. विरोधाभासामुळे दोन विरोधी वस्तूंवर किंवा विधानांवर एकदम प्रकाश पडत असल्यामुळे एक प्रकारची बौद्धिक मौज वाटते. विरोधाभासात्मक वाक्य जितकें लहान व आटोपशीर असेल तितकी त्या विरोधाची तीव्रता अधिक उत्कटत्वाने प्रत्ययास येते व रसिकाच्या बौद्धिक आनंदाचीहि उत्कटता वाढते. अचेतन वस्तूवर चेतनागुणाचा आरोप केल्याने शैलीचें प्रभावशालित्व वाढतें. (२) वक्तृत्वाच्या प्रत्येक प्रकाराची शैली भिन्न असावी. कोर्टकचेऱ्यांत न्यायाधिशासमोर करावयाचें भाषण हें साधें, सरळ, साधार, अचूक, सफाईदार नि अनलंकृत असावें. जनसमुदायापुढे करावयाचें भाषण हें एखाद्या देखाव्याच्या चित्राप्रमाणे असावें. त्यांतील बारीकसारीक तपशील हा अगदी ओबडधोबड नि अर्धवट स्वरूपाचा असतो; पण तें चित्र दुरून पाहिलें असतां मात्र त्या तपशिलांतल्या उणीवा मुळीच जाणवत नाहीत; उलट, तें दुरून पाहिलें असतां सर्व तपशीलांचा संकलित परिणाम हा अनुकूल व आनंददायी होतो. तीच गोष्ट ह्या भाषणाची. वक्तृत्वकलेतील प्राविण्य दाखविण्याकरिता करावयाच्या भाषणाची शैली ही अचूकपणा, सफाई, सूक्ष्म छटांचा संयमित नि कलापूर्ण आविष्कार, अर्थाच्या भिन्न भिन्न छटांचा योग्य उठाव—या गुणांनी युक्त असावी.

अरिस्टॉटल म्हणतो, लेखनाची शैली वेगळी, बोलण्याची शैली वेगळी. पट्टीच्या साहित्यिकांनी लिहून काढलेलीं भाषणें अगदी निर्जीव नि कळाहीन भासतात; तर पट्टीच्या वक्त्यांनी लिहून काढलेलीं भाषणें अव्यवस्थित व बेडौल वाटतात.

याशिवाय अरिस्टॉटलने या ग्रंथांत वक्तृत्वासंबंधीं आणि एकंदर कलेसंबंधीं कांही महत्त्वाचीं विधानें केलीं आहेत. तीं अशीं:—(१) कलाकृति इतकी स्वाभाविक वाटावी की तींतील कृत्रिमता मुळीच जाणवूं नये; कारण लोकांना स्वाभाविक असेल व दिसेल तें पटतें; कृत्रिम पटत नाही. (२) अतिरेक सर्वदा वर्ज्य समजावा. आपलें बोलणें किंवा लिहिणें कमी उठावदार झालें तरी चालेल; पण त्यांत फाजील उठावदारपणा व भडकपणा येऊं देऊं नये. निष्काळजीपणाने कसेंतरी केलेलें लेखन चालेल; पण कलेच्या कृत्रिम संस्कारांचीं एकावर एक पुटें चढविलेलें लेखन तापदायकच होईल. तो म्हणतो:—" Too much art does more harm than utter carelessness; the latter is not good, but the other is positively bad." (३) प्रतिपाद्य विषयाला सुरवात करण्यापूर्वी उद्बोधक प्रस्तावना असावी. त्यामुळे वाचकांची उत्सुकता उगीच ताणली जात

नाही आणि त्याला विषयाची आगाऊच स्पष्ट कल्पना येऊन जाते. कलेच्या दृष्टीनेहि अर्थातच ही गोष्ट आवश्यक ठरते. (४) कला ही कधीच संकुचित विशिष्टांवर केंद्रित होत नाही, तर ती साधारणीकरणाच्या व्यापाराने विशिष्ट घटनांमागील सामान्य तत्त्वांचें दर्शन घडविते. " No art considers the particular." (५) कलाकृतींतील आनंद हा जिज्ञासापूर्तीमुळे होणारा असून त्या कृतींतील अनुकृतीच्या कौशल्याच्या जाणिवेने झालेला असतो हें त्याने Poetics मध्ये सांगितलें होतें. येथे तो म्हणतो-कलाकृतीचा आनंद हा जिज्ञासापूर्तीप्रमाणेच तींतील अद्भुत अंशामुळेहि होतो.

वक्तृत्व आणि गद्यलेखन यांचें नियमन करणाऱ्या तत्त्वांचें शास्त्रशुद्ध पद्धतीने निर्वचन करणारा Rhetoric हा पहिलाच उपलब्ध ग्रंथ आहे. त्यांतील विवेचन तर्कनिष्ठ आणि अनुगामी पद्धतीचें आहे. तें मानवी स्वभावाच्या ज्ञानावर आधारलेलें आहे; त्यामुळेच तें चिरस्थायी झालेलं आहे. प्रतिपाद्यविषय गंभीर व उदात्त असावा, भाषेंत नि रचनेंत स्पष्टार्थबोधकता नि औचित्य असावें, अनुकूल तालबद्धता असावी अलंकारांची सुजाण योजना असावी, कला स्वाभाविक वाटेल अशी असावी—ही थोडक्यांत Rhetoric ची भूमिका आहे. या ग्रंथाचें खरें महत्त्व लक्षांत येण्याकरिता हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे की तो Poetics प्रमाणे अगदीच स्वतंत्र ग्रंथ नाही. त्याच्यावर तत्कालीन विचारवन्तांचा व परिस्थितीचा प्रभाव पडलेला आहे. एकतर, या ग्रंथाचा कांही भाग, वक्तृत्व ही कलाच नव्हे असें म्हणणाऱ्या प्लेटोच्या आक्षेपाचें निराकरण करणारा, व म्हणून प्रत्युत्तरात्मक आहे. पुन्हा, या विषयावर पूर्वकालीन लेखकांनी मांडलेल्या उत्कृष्ट विचारांवरच या ग्रंथांतील सिद्धान्त आधारलेले आहेत. त्याच्या काळीं गॉर्गियासच्या भपकेबाज, दिखाऊ व पोकळ लेखन-भाषण पद्धतीचें गद्यलेखनपद्धतींत अनुकरण करण्याची जी प्रवृत्ति होती तिचा निषेध करण्याच्या व योग्य शैलीबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्दिष्टांतून या ग्रंथाचा बराचसा भाग निर्माण झालेला आहे. शब्दांतील माधुर्य, संगीत आणि सूचकता या गुणांचा अरिस्टॉटलने या ग्रंथांत जवळजवळ मुळीच विचार केलेला नाही. तो लेखांतील व भाषणांतील औचित्याचा, रूपकाच्या संयोजनेचा व तालबद्धतेचा पुरस्कार या ग्रंथांत करतो तो ज्यांच्यामुळे वाचकांच्या भावना हलवून सोडावयाच्या या उद्दिष्टाकरिता नव्हे तर वाचकांच्या बुद्धीवर अनुकूल व हितकारक परिणाम करावयाचा हा हेतु डोळ्यांपुढे ठवून. शैलीचे तत्कालीन निकष हे भावनाजागृतीच्या सामर्थ्यावर आधारलेले असत; ते बुद्धिनिष्ठेवर आधारलेले असावे अशी अरिस्टॉटलची प्रामाणिक समजूत होती. म्हणून तो लोकांच्या भावना हलवून सोडण्याचें विलक्षण सामर्थ्य असलेल्या डेमॉस्थेनीसच्या शैलीचा मुळीच उल्लेख करीत नाही. विवेचनांत या उणीवा असूनसुद्धा Rhetoric ने वक्तृत्वकलेच्या व गद्यलेखनाच्या शास्त्रशुद्ध विवेचनाचा पाया घातला यांतच या ग्रंथाचें महात्म्य साठविलेलें आहे.

जीवनकला

आरोग्यमंत्री ना. वा. शि. बारलिंगे

★

राष्ट्राचें धन किंवा वैभव हें त्याच्या एकंदर शारीरिक आणि बौद्धिक परिश्रमांवर अवलंबून असतें. राष्ट्रांतला रोगी माणूस हा आपली उत्पादनक्षमता राष्ट्राला प्रदान करीत नाहीच, तर उलट दुसऱ्याची शक्तिदेखील स्वतःवर शुश्रूषादिरूपाने खर्ची घालतो आणि अशा तऱ्हेने राष्ट्राचें एकपट नव्हे तर दुप्पट नुकसान तो करीत असतो.

तथापि शारीरिक किंवा बौद्धिक क्षमता जास्तीतजास्त कमावल्याबरोबर राष्ट्राचें वैभव वाढेलच असें मात्र नाही. त्याकरिता कमीतकमी श्रमांत जास्तीतजास्त कल्याण किंवा सुख निर्माण करण्याची बुद्धि अगर कल्पनाशक्ति ही आमच्यांत असावयाला पाहिजे, आणि याचीच दुसरी बाजू म्हणजे आपल्याजवळ असलेली शक्ति, संपत्ति, उत्पादनाचीं साधनें आणि वेळ यांपैकी कांहीहि जरा देखील वाया जाणार नाही अशी खबरदारी घेण्याची प्रवृत्ति म्हणजेच हिशेबीपणा राष्ट्रांतल्या प्रत्येक घटकाच्या अंगीं बाणावयाला पाहिजे. टापटिपीचा संसार यालाच म्हणतात आणि रामदासाचा " नेटका प्रपंच "हि हाच होय. परंतु अर्थातच हिशेबीपणा म्हणजे कार्पण्य किंवा बावळटपणा नव्हे. जीवन संपन्न, सुखमय आणि कलायुक्त करण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढ्याच वस्तु योजण्याचें कौशल्य याचेंच नांव हिशेबीपणा, आणि आवश्यकतेपेक्षा अधिक किंवा कमी शक्ति, वस्तु किंवा धन खर्च करणें हेंच कार्पण्य अथवा बावळटपणा होय. ज्यांच्यामध्ये हिशेबीपणा असतो ते श्रीमंत होतात आणि ज्यांना हिशेब समजत नाही ते एके काळीं वैभवशाली आणि संपत्तिमान असले तरी सरतेशेवटीं दरिद्री होतात. जी गोष्ट हरएक व्यक्तीला तीच राष्ट्रालाहि लागूं आहे. राष्ट्राच्या अंगीं हिशेबीपणा बाणला तरच तें राष्ट्र संपन्न होऊं शकेल.

आज आमच्यामध्ये हा नेटकेपणा जरादेखील दिसून येत नाही. आमच्या घरांचीच रचना पहाना ! बाहेर सूर्य आपल्या तेजाने लखलखत असतां भर दिवसा आमच्या घरांत दिवे लावण्याची जरूर भासते. बाहेर वाटेल तेवढा वारा वहात असतां आम्हाला घरामध्ये पंखे लावावे लागतात; व तें कां ? तर आमची गृहरचना आम्ही जाणूनबुजून तशी केली म्हणून. घरामधले कित्येक भाग—उदाहरणार्थ दिवाणखाना—चोवीस तासांमध्ये केवळ दोनतीन तासांपेक्षा जास्त वापरले जात नाहीत. घरच्या

अनुक्रमणिका

समानामध्येहि तोच प्रकार. वेळूचे लांकडी पलंग किंवा खाटा आम्हांला तेवढ्या प्रतिष्ठित वाटत नाहीत तर आपण त्यांच्याकरिता लोखंड खर्च करतों व इकडे आवश्यक राष्ट्रोपयोगी वस्तूंकरिता लोखंडाची टंचाई भासते. स्वयंपाकघर, शौचकूप, स्नानगृह वगैरेंच्या अंतर्रचनेबद्दल तर आम्ही कधीच विचार करावयाला तयार नाही. आपल्या चौवीस तासांपैकी किती वेळ आपण व्यर्थ दवडतों याचीहि आपणाला जाणीव नाही.

जी गत आमच्या मध्यम वर्गाची तीच गत कांही अंशीं शेतकऱ्यांची देखील आहे. वर्षानुवर्षे आमच्या खेड्यापाड्यांतून नद्यानाले अव्याहतपणें वाहात राहतात, आणि त्यांच्याच बाजूला असलेलीं शेतें पाण्याच्या अभावीं सुकत असतात. वास्तविक नदीनाल्यांतील पाण्याचा उपयोग कमीतकमी कांठच्या लोकांनी तरी करून घ्यावयाला पाहिजे. परंतु जमीनींतून उत्पन्न केवळ चार महिने घ्यावयाचें आणि त्यानंतर आठ महिने ती पडीत ठेवायची असाच प्रघात—उत्तरप्रदेश आणि पंजाब यांमधील कांही भाग सोडला तर—सर्वत्र दिसून येतो.

औषधांबद्दल तर बोलावयालाच नको. भोंवताल औषधि वनस्पति वाटेल तेवढ्या प्रमाणांत उगवत असतांना त्यांची आपण माहिती करून घेत नाही, आणि तीच औषधि परदेशांत जाऊन निरनिराळ्या तथाकथित रामबाण औषधांच्या स्वरूपांत आपल्यासमोर आली म्हणजे ती विकत घेणें मात्र आपल्या बावळटपणाला परवडतें. भोंवतालची सामान्य परिस्थिति देखील आपणाला माहीत नसते. चातक पक्षी ही केवळ कविकल्पना आहे म्हणून आम्ही खुशाल त्यावरील जुनीं काव्यें वाचतों आणि त्या संकेतावर नवीं काव्यें रचतों देखील. तथापि तो बिचारा आपल्या सभोंवती उडणारा, वागडणारा आणि आक्रंदन करणारा एक पक्षी आहे हें आपल्या गावींहि नसतें. आमच्या पुस्तकालयांमध्ये आमचें सर्व वर्गीकरण म्हणजे विषयवार! वयोवर्गाप्रमाणे पुस्तकांची वर्गवारी करण्याची कल्पनाहि अजून कुठे केलेली आढळत नाही. या अशा एक ना दोन, हजारो गोष्टी रोज आपल्या डोळ्यांसमोर येतात. ज्याला आपण सरकारी नियोजन (Planning) म्हणतों त्याच्यापुढे राष्ट्रांतील प्रत्येक नागरिकाच्या स्वाधीन असलेल्या २४ तासांपैकी ८ तासांच्याच विनियोगाचा उद्देश असूं शकतो. परंतु राष्ट्रांतील प्रत्येक नागरिक त्याच्या रोजच्या व्यवहारांत हिशेबीपणा न आणील तर त्याच्याजवळ उरलेल्या १६ तासांचा त्याला स्वतःच्या जीवनाकरिता व पर्यायाने राष्ट्राकरिता देखील पुरता उपयोग करून घेतां यावयाचा नाही. जमीन, वेळ, साधनसामग्री, शक्ति आणि पैसा यांच्या उपयोगाबाबत जास्तींतजास्त हिशेबीपणा आणल्यामुळेच राष्ट्राची धनसंपत्ति वाढूं शकते हा मूळ सिद्धांत मानला तर वर निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या अपव्ययामुळे आपण आज किती हीनदीन बनलों आहोंत याची थोडीफार कल्पना येऊं शकते.

सामान्यतः हिशेबीपणाची व्यवहाराशींच सांगड घालतात. परंतु माझ्या मतें तर हिशेबीपणाचा कलेशीहि फार मोठा संबंध आहे. जिला आपण कला म्हणतों ती वास्तविक भाषेचाच एक प्रकार आहे, असें मी मागेच कोठेतरी एकदा म्हटलेलें आहे. स्वतःच्या सामर्थ्याचा कमींत कमी व्यय करून आपल्या भावना किंवा विचार

किंवा उद्देश शक्य तेवढ्या स्पष्टपणें व्यक्त करण्याची भाषा म्हणजेच कला! भाषा आणि कला यांमध्ये जर अंतर असेल तर तें येवढेंच की भाषेमध्ये जे निरनिराळे शब्द आहेत ते निसर्गामध्यें जे सामान्य गुण दिसतात त्यांचीं प्रतीकें (Symbols) आहेत. घोडा म्हणजे सामान्य घोडा, काठी म्हणजे सामान्य काठी; विशिष्ट घोडा किंवा विशिष्ट काठी यांच्याकरिता भाषेमध्ये शब्द आढळून येणार नाहीत. परंतु सत्य वस्तु ज्या विशिष्ट स्वरूपामध्ये निसर्गामध्ये असते त्याच स्वरूपामध्ये ती व्यक्त करावयाची झाल्यास सामान्य भाषा तें कार्य यशस्वीपणें करूं शकत नाही. वस्तूमधील सामान्याकरिता ज्याप्रमाणे सामान्य भाषा वापरावयाची असते त्याचप्रमाणे विशिष्ट वस्तु व्यक्त करण्याकरिता जी भाषा तिलाच कला असें म्हणतात. आवाज आणि स्वर यांमध्ये अशाच प्रकारचा फरक आहे. ज्याला आपण आवाज म्हणतों त्यांत आपल्या कंठांतून निघालेले निरनिराळे स्वर भरमसाट एकत्रित झालेले दिसतात. हे सर्व स्वर जाऊन जेव्हा मूळ एकच स्वर कायम राहतो तेव्हा आपण गवयाचा सूर लागला असें म्हणतों. म्हणजे, गवयाचें सर्व सामर्थ्य जेव्हा एकच स्वर काढण्यामध्ये एकवटलें जातें–म्हणजे या बाबतींत तो जेव्हा जास्तींत जास्त विशेषीपणा आणतो–तेव्हाच त्याच्या कंठांतून कलायुक्त स्वर निघूं शकतो. सचेतन आणि जड वस्तू यांमध्येहि हाच फरक दिसून येईल. कार्यक्षमतेच्या दृष्टीने सचेतन वस्तूमध्ये कमींतकमी शक्ति खर्च करून जास्तींतजास्त काम करण्याचें सामर्थ्य असतें. माणूस जेवढें कार्य करतो त्यासाठी शक्ति मिळवायला त्याला फार कमी वस्तूंची गरज असते. ठरलेल्या विवक्षित कामाला जसजशी जास्त शक्ति लागूं लागते, तसतशी आणि त्या प्रमाणांत वस्तुहि कमी कमी सचेतन होत जाते. या दृष्टीने जडत्व हें दुसरें तिसरें कांही नसून सचेतनाचीच एक सीमावस्था (Limiting case) होय.

राष्ट्र जिवंत, समृद्ध आणि कलासंपन्न व्हावयाचें असेल तर त्यांतील प्रत्येक घटकासमोर हा एक निराळा दृष्टिकोन असावयाला पाहिजे. केवळ राष्ट्रीय संयोजनामुळे (National Planning) हें कार्य व्हावयाचें नाही. तर राष्ट्राच्या प्रत्येक घटकालासुद्धा स्वतःपुरतें वेगळें संयोजन करावेंच लागेल. याच उद्देशाने आणि या दृष्टिकोनाचें एक उदाहरण म्हणून नागपूरमध्ये " जीवनप्रदर्शिनी " नांवाच्या एका प्रदर्शनाची योजना प्रत्यक्षांत आणण्याचें घाटत आहे. पण तेवढ्याने कार्य होणार नाही. देशाचें जीवनमान वाढविण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक स्वदेशप्रेमी माणसाने जीवनांत मन घालून जीवनकलेची जोपासना करणें आवश्यक आहे व त्या दृष्टीनेच या प्रश्नाला चालना देण्याचा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

मध्यप्रांत वऱ्हाडांतील वाङ्मयविषयक जागृति

कै. नी. ब. ऊर्फ बापूसाहेब भवाळकर.

[ऑगस्ट १९५० च्या 'युगवाणी'त नागपूर येथील मागील पिढींतील सुप्रसिद्ध साहित्यिक व संशोधक कै. नीलकंठ बलवंत ऊर्फ बापूसाहेब भवाळकर (२१-५-१८७६—२४-११-१९४२) यांचा 'नागपूर वऱ्हाडांतील वाङ्मयविषयक जागृतीचें अल्प समालोचन' हा लेख पुरवणीसह प्रसिद्ध झाला असून त्याला म. म. प्रि. मिराशी यांनी खुलासेवजा एक लहान टीप जोडली आहे. १९३३ च्या नाताळांत नागपुरास नाट्याचार्य खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन भरलें होतें. त्यानिमित्त त्या काळीं नागपुराहून निघत असलेल्या 'वागीश्वरी' मासिकाने जाने. १९३४ चा अंक 'संमेलनांक' म्हणून प्रसिद्ध केला होता. त्या अंकासाठीं बापूसाहेबांनी वरील लेखांत अधिक माहितीची भर घालून प्रस्तुत लेख तयार केला होता. तो प्रसिद्धिशिवाय तसाच पडून होता. बापूसाहेबांचे चिरंजीव गजाननराव भवाळकर यांच्याकडून तो 'युगवाणी'ला मिळत आहे. त्यांतील पुनरुक्त भाग गाळून अवशिष्ट भाग येथे देण्यांत येत आहे. बापूसाहेबांनी हा लेख जसजसें आठवेल तसातसा लिहून काढल्यामुळे त्यांत क्वचित् कालानुक्रम चुकला आहे; क्वचित् कांही ग्रंथकारांचीं नांवें गळलीं आहेत आणि क्वचित् कांहीं माहिती देण्याचें राहून गेलें आहे.

प्रस्तुत लेखाचा आरंभ प्राचीन विदर्भाच्या साहित्यसेवेपासून झाला आहे. मागल्या लेखांत तो भाग नसल्याने येथे कायम ठेवला आहे. त्यापुढे भोसलेशाहींतील शास्त्री, पंडित, पुराणिक व हरिदास मंडळीच्या साहित्यसेवेचें वर्णन आहे; तें मागील लेखांत आलें असल्याने येथे गाळलें आहे. या दोन्ही लेखांत बापूसाहेबांनी फक्त नागपूर प्रांतांतीलच पंडितांच्या साहित्यसेवेचा परामर्श घेतला आहे, तोहि अपूर्ण आहे. अलिकडे गंगाधरशास्त्री मंगरूळकर यांचे ग्रंथ उपलब्ध झाले असून ते नागपूर विद्यापीठाच्या वाचनालयाच्या 'हस्तलिखित विभागां'त दाखल झाले आहेत. अलिकडे एक दोन महिन्यांपासून नागपूरचे एक तरुण व उत्साही संशोधक श्री. सुरेश डोळके हे 'तरुण भारतां'त नागपूर प्रांतांतील संतसाहित्यावर संशोधनपर लेख लिहीत आहेत. त्यांनी विद्यापीठाच्या 'हस्तलिखित विभागा'चे मुख्य डॉ. करंबेळकर यांच्या सहाय्याने व डोके बुवा, निखालस महाराज, कोलबा, अयाचित बुवा इत्यादिकांच्या मठांतील ग्रंथसामुग्रीच्या आधाराने भोसलेशाहींतील संत व पंडित कवींच्या साहित्यावर प्रकाश

पाडल्यास हवा आहे. वऱ्हाडांतील देवनाथ, दयाळनाथ, विष्णुकवि इत्यादि संतांची कविता प्रसिद्ध आहे. उर्वरित संतांच्या साहित्याचें संशोधन करून तें प्रसिद्धीस आण-ण्याचें कार्य 'शारदाश्रमा'सारख्या संस्थेने हातीं घेणें अवश्य आहे ' महाकोसलमध्ये पथरिया येथे १८४० च्या आसपास पांडोबा व्यंकटेश करकरे उपनांव राघव हे कवि होऊन गेले. यांचीं सुरथसुधन्वाख्यान, शिविचक्रवर्त्याख्यान, गजगौरीव्रत व वीरमणी-कथा हीं काव्यें आहेत. यांपैकीं शेवटलें काव्य 'काव्यसंग्रहा'च्या १४ व्या भागांत आलें आहे. या कवीच्या काव्यांचा विशेष हा की याने मराठी आख्यानांत हिंदी छंदांचा व बुंदेलखंडांत प्रचलित असणाऱ्या हिंदी भाषेचा सरांस उपयोग केला आहे. सागर विद्यापीठांतील मराठीचे प्रमुख प्रा. दा. ल. अडोणी यांनी या प्रांताच्या त्या भागांतील साहित्याचें संशोधन केल्यास त्यांना यश येण्याचा संभव आहे.

भोसलेशाहींतील साहित्यिकांनंतर बापूसाहेब अव्वल इंग्रजींतील साहित्यिकांकडे वळले आहेत. बापूसाहेबांनी हा लेख लिहिला त्यावेळीं १८०४ पासून पुढे कलकत्त्याच्या कॉलेजांत मराठी भाषेचें अध्यापन करणाऱ्या पंडित वैजनाथ शर्मा व त्यांचे मराठी ग्रंथ यासंबंधीं कांही माहिती उपलब्ध नव्हती. जबलपूरच्या महाराष्ट्रवाचनालयाने आपल्या रौप्यमहोत्सव स्मृतिनिमित्त डिसें. १९३९ मध्ये एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत आपल्या प्रांतांतले विद्वान् संशोधक डॉ. य. खु. ऊर्फ अप्पासाहेब देशपांडे यांनी सदहू वैजनाथ व त्यांचे ग्रंथ यांची माहिती दिली आहे. डॉ. देशपांडे हे स्वित्झरलंडमध्ये झ्युरिच् येथे इतिहास-परिषदेसाठी गेले असतांना लंडनच्या इंडिया ऑफिस लायब्ररींत व ब्रिटिश म्युझियम् लायब्ररींत त्यांनी ही माहिती परिश्रमपूर्वक मिळविली आहे. वैजनाथ शिवराम कानफाडे हे नागपूर प्रांतांतले असून सिंहासन-बत्तीशी, राजा प्रतापादित्याचें चरित्र व हितोपदेश हे यांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. बंगालमधील श्रीरामपूर येथील मिशनचे मुख्य डॉ. केरी यांनी १८०५ मध्ये मराठी व्याकरण छापलें, त्यांत त्यांना वैजनाथांचें साहाय्य झालें. वैजनाथांचा त्यांनी 'विद्यानाथ' असा संस्कृतरूपाने उल्लेख केला आहे. हें व्याकरण म्हणजे मराठींतील पहिला छापील ग्रंथ होय. यांत नागपुरी मराठी भाषेचे प्रयोग आहेत.

यापुढे बापूसाहेबांनी कै. हरि माधव पंडित व कै. वामन दाजी ओक यांच्या साहित्यसेवेचें वर्णन केलें आहे. पंडित व ओक हे मूळचे मुंबई प्रांतांतलेच. परंतु नागपुरांत इंग्रजी जारी झाल्यावर नोकरी निमित्ताने ते इकडे आले, इकडेच स्थायिक झाले. या दोघांचा विविधज्ञानविस्तार व काव्यसंग्रह या मुंबईच्या मासिकांशीं संबंध असल्यामुळे यांच्या प्रोत्साहनाने तरुण असणारी के. व्ही. लक्ष्मणराव, चंद्रप्पा नायडू, श्रीधरपंत परांजपे, प्रि. गोखले, अलेकर, घुले, स्वतः बापूराव, दामुअण्णा ओक इत्यादि मंडळी या मासिकांच्या द्वारें पुढे आली. त्यांचा कांहींच उल्लेख मागील लेखांत नसल्यामुळे तें येथे तसेंच कायम ठेवलें आहे.

यानंतर बापूसाहेबांनी नागपुरांतील तत्कालीन वृत्तपत्रें व मासिकें यांचा परामर्श घेतला आहे. तो मागील लेखांत आला असल्याने प्रस्तुत लेखांत गाळला आहे. जाने. १९३४ च्या 'विहंगमां'त श्री. आनंदराव जोशी यांनी 'नागपुरांतील कांही अस्तं-गत मासिकें' या आपल्या लेखांत 'लोकरंजन,' 'नीरजोल्लास,' 'ऋषि,'

'रसिकोद्यान', 'मराठामित्र' इत्यादि मासिकांची मनोरंजक माहिती दिला आहे. मार्च १९३४ च्या 'विहंगमां'त 'लोकरंजना'वर त्यांचा स्वतंत्र लेखच आहे. जिज्ञासूंनी हे लेख अवश्य वाचावेत.

यापुढे बापूसाहेबांनी या प्रांतांत शिक्षण घेऊन नोकरीनिमित्त बाहेर गेलेल्या साहित्यसेवकांची माहिती दिली आहे. ती सर्वस्वी नवीन आहे. या मंडळींपैकी कै. प्रि. वा. ब. पटवर्धन ऊर्फ कवि वसंत हे येथील हिस्लॉप कॉलेजचे विद्यार्थी असून काव्यें व नाटकें परिणामकारक रीतीने शिकविण्याची पद्धत त्यांनी रे. व्हिटन् यांच्याकडून उचलली होती. पटवर्धनांचा आणि केशवसुतांचा परिचय नागपूरचाच. केशवसुतांच्या कवितासंग्रहांत पटवर्धनांना उद्देशून एक कविता असून त्यांत नागपूरचा निर्देश आहे. पटवर्धनांचा काव्य आणि काव्योदय हा प्रबंध प्रसिद्ध आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठांत मराठी भाषेवर व्याख्यानें दिलीं होतीं, तीं 'विल्सन् फायलॉलॉजिकल् लेक्चर्स' मध्ये समाविष्ट झालीं आहेत. मोतीवुवाला हे पटवर्धनांचे वर्गबंधु. हे जातीचे मारवाडी वाणी. खांडव्याचे राहणारे. बी. ए. झाल्यावर पटवर्धनांबरोबर हेहि पुण्यास गेले व डे. ए. सोसायटीचे आजीव सेवक झाले. 'ज्ञानचक्षू'चे मालक सापकर यांना यांनी 'सुविचारसमागम' या नांवाचें मासिक काढण्यास प्रवृत्त केलें. हें मासिक १ मे १८९८ पासून सुरू झालें होतें. यांत यांचे 'मराठी भाषेच्या सद्य:स्थिती' संबंधींचे लेख प्रसिद्ध झाले होते. ते पुनर्मुद्रित व्हावेत अशी इच्छा श्री. चिं. ग. कर्वे यांनी प्रगट केली होती. (पाहा—प्रतिभा १५ नोव्हेंबर १९३६) मोतीवुवालांना विलायतेस अभ्यास करण्यासाठी एक स्कॉलर्शिप मिळाली होती. ती घेऊन ते विलायतेस जाण्यास निघाले. परंतु वाटेंत आजारी पडले आणि पोर्टसैद येथे इस्पितळांत मरण पावले. जानेवारी १९०१ च्या 'सुविचारसमागमां'त मोतीवुवाला यांच्यावरील मृत्युलेख आहे.

बापूसाहेबांनी या लेखाचा शेवट विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकापाशी केला आहे. हा भाग तसाच कायम ठेवला आहे. बापूसाहेबांच्या या दोन्ही लेखांवरून एक दोन महत्त्वाच्या गोष्टी विशेष लक्षांत येतात. त्यांचा येथे निर्देश करतों. पहिली गोष्ट ही कीं या प्रांतांतील साहित्याचें बीजारोपण हरिपंत पंडित व वामनरावजी ओक यांनी केलें. या दोघांहून वयाने वडील असे भाऊ महाजन व नाना सोवनी या प्रांतांत अगोदरच स्थायिक झाले होते. पण त्या दोघांच्या आयुष्याचा उत्तरार्ध केवळ मौनांत गेला. यासंबंधीं बापूसाहेबांनी या लेखांत पुढील टीप जोडली आहे.—

"यांच्या (पंडित व ओक) वैयक्तिक चळवळीचें वैशिष्ट्य प्रशंसनीय मानावें लागतें; कारण मराठी वर्तमानपत्राचे (प्रभाकराचे) आद्य जनक व नियतकालिकांचे प्रणेते भाऊसाहेब ऊर्फ गोविंद विठ्ठल महाजन हे या प्रांतांत आपल्या ॲडव्होकेट पुत्राबरोबर येऊन नागपुरांत स्थायिक झाले होते. त्यांच्या कर्तबगारीबद्दल शंकाहि घेतां येणार नाही. परंतु त्यांनी या प्रांतांत आल्यावर साहित्याचा संन्यास घेतला. दुसरें उदाहरण नाना सोवनी वकील यांचे देतां येईल. हे नट नाट्यकुशल शीघ्रकवि होते व कै. परशुरामपंत गोडबोले यांना

'सर्वसंग्रहा'च्या संपादनांत साह्य करीत असत. परंतु इकडे नागपुरांत वकिली सुरू केल्यानंतर त्यांनीहि असाच लेखणीचा संन्यास केला होता. दोन्ही पुरुष कर्ते व अव्वल दर्जाचे विद्वान्, पण त्यांना देखील या प्रांतांत आल्यावर सरस्वतीस पराङ्मुख होऊन केवळ लक्ष्मीच्या सेवेंत आयुष्य घालवावेसें वाटलें. म्हणून आम्हांस अशा प्रतिकूल परिस्थितींत सरस्वतीस न विसरणारांचें पुण्यस्मरण करणें व त्यांच्या कार्याची प्रशंसा करणें महत्त्वाचें वाटतें." बापूसाहेब म्हणतात त्याप्रमाणे पंडित व ओक हे सामान्य शिक्षकाच्या पेशाचे असून तसल्या परिस्थितींतहि सरस्वतीसेवा करणारे होते. महाजन व सोवनी यांचीं स्मारकें 'महाजनांचा वाडा व महाजनांची चाळ' आणि 'सोवनी गल्ली' यांच्या रूपाने आजहि सीताबर्डीवर दृष्टीस पडतात, तशीं पंडित व ओक यांचीं स्मारकें दिसत नाहीत. पंडित हे शेवटी भोंसल्यांच्या इस्टेटीचे मॅनेजर होते. ते संपादक असतांनाच वि. ज्ञा. विस्तारांत पंतअमात्य बावडेकरांचें 'आज्ञापत्र' प्रसिद्ध झालें होतें. या आज्ञापत्रांत आरंभीं 'बंगाल, ठठ्ठा, डाका' इत्यादि स्थलांचा उल्लेख आहे. त्यावरून 'आज्ञापत्रा'चें मूळ हस्तलिखित नागपूरकर भोंसल्यांच्या संग्रहांतलें तर नसावेना, अशी एक शंका मनास चाटून जाते. पंडित व ओक यांनीच के. लक्ष्मणराव व घंटय्या नायडू यांच्यासारख्या परप्रांतीयांना मराठींत लिहिण्याची स्फूर्ति दिली. जून १८९१ च्या 'सुविचारसमागमा'च्या कव्हरवर 'आमचे नागपूरस्थ मित्र के. लक्ष्मणराव यांना कै. पंडित व ओक यांच्या सहवासाचा बराच लाभ झाला आहे' असा उल्लेख आहे. नायडूंवर मी स्वतः १ डिसें. १९३६ च्या 'प्रतिभे'त एक लेख लिहिला होता. वि. ज्ञा. वि. च्या सप्टें. १८८२ व सप्टें. १८८५ अंकांत त्यांच्या काव्याचीं व नाटकाचीं परीक्षणें असून तीं पंडित व ओक यांनी लिहिलीं आहेत. त्या काळीं लेखांवर नांव देण्याची पद्धति नव्हती. पटवर्धन, मोतीबुवासा, आपटे, परांजपे इत्यादि तरुण मंडळीसमोर पंडित व ओक यांचाच आदर्श होता. ओकांवर माधवानुजांची एक कविता आहे. पटवर्धनांनी पंडितांच्या मृत्यूवर कविता लिहिली आहे. त्यांत पंडित व ओक या दुक्कलीच्या मार्मिकतेचा व रसज्ञतेचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला आहे;

परि ओकांसम तव आप्त मित्र नेम्याने !
तव दृष्टि होय अंधळी भरून अश्रूने !
ही चोरी नाही ! खून तुझ्या हृदयाचा !
कीं पंडित खुडिला कंदच तव कलिजाचा !

दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की आपली भाषा व वाङ्मय प्रभावी असेल, तर अन्य भाषा बोलणारेहि तिच्याकडे आकृष्ट होतात. के. लक्ष्मणराव, घंटय्या नायडू, मोतीबुवासा इ. नांवें या विधानास साक्ष आणतां येतील. गुदस्ता (१९४९ च्या मेंत) पुण्यास आचार्य जावडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन भरलें होतें. त्या वेळीं ग्रंथकारांचें जें पहिलें संमेलन झालें होतें त्याकडे नायडूंनी कांही सूचना पाठविल्या होत्या असें मागील रिपोर्टांवरून आढळतें असें जाहिर झालें होतें. यावरून नायडूंची मराठीविषयींची आस्था दिसते. रसिकोद्यानाचे संपादक महम्मद अब्दुल्लाखान होते हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

तिसरी गोष्ट अशी की, नागपूर हे भारताच्या मध्यप्रदेशाच्या अगदी मध्यांत असल्यामुळे इथे निरनिराळ्या भाषाभगिनींचें संमेलन आयतेंच होतें, त्यामुळे परस्पर-

विचारविनिमय सुकर आहे. कै. माधवराव सप्रे यांचीं 'दासबोध' व 'गीतारहस्य' यांचीं भाषांतरें, कै. भगाडे यांचें 'ज्ञानेश्वरी'चें भाषांतर व श्री. यादवराव जामदार यांचें 'तुलसीरामायणा'चें भाषांतर या विधानाचा पाठपुरावा करतील. बंगालींत लेखन करणारे देउस्कर नागपूरचेच होते.

बापूसाहेबांच्या या लेखांत वऱ्हाडांतील साहित्यसेवकांसंबंधींची माहिती फारच थोडी आहे. त्याचप्रमाणे जबलपुराकडील पावणसकर, गोळवलकर इत्यादिकांचा उल्लेख नाही. इतकेंच काय, पण हरिपंत पंडितांचे चिरंजीव कै. बळवंत हरि पंडित यांच्या साहित्यासंबंधींहि माहिती नाही. ही सर्व माहिती पुढेमागे सुसंगत देण्याचा मनोदय आहे. १५-१०-५०

—भवानीशंकर श्री. पंडित

१. वऱ्हाडमध्यप्रांत साहित्यसेवेंत मागासलेला आहे अशी सार्वत्रिक समजूत झालेली दिसते; राजकारणांत देखील पूर्वी या प्रांतावर असाच दोषारोप करण्यांत येत असे. अशा स्थितीचें कारण तेव्हा असें सांगण्यांत येई की हा प्रांत इंग्रजांच्या वहिवाटींत अखेरीस गेल्यामुळे तिकडे कलकत्ता, मद्रास मुंबईसारखी या प्रांतांत सर्वांगीण जागृति झाली नाही. सर फिरोजशहा या प्रांतास हिंदुस्थानाचा Sleepy Hollow म्हणत असत व इकडील लोक कॉंग्रेस भरविण्यास माघारे घेत म्हणून त्यांचा मनांतून उपहास होत असे. परंतु हा दोष प्रांतांतील लोकांचा नसून स्थानिक राज्यव्यवस्थेच्या धोरणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा तो पायबंद होता हें पुष्कळांस माहीत नसल्यामुळे तसा गैरसमज झाला असावा. जोंपर्यंत मध्यप्रांत इंग्रजांच्या हुकमतींत आला नव्हता तोंपर्यंत भोंसल्यांच्या अंदाधुंदीबद्दल रे. स्टीफन हिस्लॉपसाहेब कलकत्त्याच्या Friend of India वर्तमानपत्रांत टीका करीत असत तेव्हा त्यांची पाठ थोपटली जात असे; परंतु पुढे हा प्रांत खालसा झाल्यावर सरकारचें धोरण लागलीच बदललें. याबद्दल सदर हिस्लॉपसाहेबांच्या चरित्रांत एक मनोरंजक दाखला मिळतो. हिस्लॉपसाहेब गोंड लोकांबरोबर मिसळून त्यांच्या दंतकथा व भाषासाहित्य गोळा करीत असत आणि भूस्तरविषयक अथवा कीटकशास्त्रविषयक टिपणें घेत. त्यांच्यामध्ये खिस्तीमताचा प्रसार करीत असत तोंपर्यंत सरकार त्यांच्यावर अत्यंत खूष असत व त्यांच्या धर्मप्रसारास सहाय्य करीत असत. परंतु जेव्हा हिस्लॉपसाहेबांनी या प्रांताचा कारभार चालविणाऱ्या लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांच्या कारभारावर टीका प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली तेव्हा ते सरकारच्या रोषास पात्र होऊन त्यांच्या बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या Friend of India वर अब्रूनुकसानीची फिर्याद करण्याचा धाक घालण्यांत आला आणि या बातम्या कोण पुरवीत असतो याचा छडा लावून हिस्लॉपसाहेबांस तंबी देण्यांत आली. जेथे प्रत्यक्ष गोऱ्या इसमावर इतका निर्बंध तेथे इतरांची गोष्ट बोलणें नको; परंतु तो काळ आता उरला नाही. गेल्या पाऊणशे वर्षांत या प्रांताने सर्व प्रकारचीं सार्वजनिक स्वरूपाचीं कार्यें मोठ्या उत्साहाने, धीटपणाने व कित्येकदा विद्रोहक धोरणावर आघाडीने हल्ला करून यशस्वीपणें पार पाडलीं आहेत. त्यामुळे प्रागतिक आणि व्यापक दृष्टीचे म्हणून या प्रांतांतील लोकांचा सामाजिक, औद्योगिक व राजकीय चळवळीसंबंधाने लौकिक झालेला आहे.

२. वाङ्मयाच्या, विशेषतः मराठी भाषेच्या साहित्यप्रांतांत या देशाचा अधिकार राजशेखराच्या शब्दांत "सरस्वतीजन्मभूः" असा आहे. महाराष्ट्र देशाचा आश्रय करून व वैदर्भी पद्धतीचा पुरस्कार करून जी "महाराष्ट्री" प्राकृत भाषा सरस्वतीची "पद्यगिरा" झाली ती याच भूमींत, आणि पुढे त्यांतून जो मराठीचा कोंब फुटला तो तरी याच विदर्भ देशांत, ही गोष्ट विसरतां येत नाही. ही सारस्वतोपासना या प्रांतांत फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. बुद्धधर्मांच्या माध्यमिक सिद्धांताचा प्रस्थापक नागार्जुन हा याच प्रांताचा रहिवासी होता; दंडी-भवभूति-भारवी हे महाकवि याच प्रांतांतले; सप्तशतीकार "हाल", बृहत्कथाकार गुणाढ्य, कातंत्रसूत्रकार शर्ववर्मा, राजाभोज, प्रवरसेन, हेमाद्रि, वोपदेव, नलचंपूकार त्रिविक्रमभट, ज्योतिषाचार्य भास्कर इत्यादि अनेक विद्वानांचीं माहेरें याच भूमींत होतीं. अर्वाचीन संशोधनाने आणखीहि कित्येक मनोरंजक पण महत्त्वाच्या गोष्टी उघडकीस आल्या आहेत. मराठीचे आद्य कवि मुकुंदराज यांची समाधि भंडारा जिल्ह्यांतील आंभोरा येथे आम-कन्हान आणि वैनगंगा या तीन नद्यांचा संगम झालेल्या स्थानीं नदीच्या मध्यधारेंत असणाऱ्या बेटावर चैतन्येश्वराचें देवालय आहे, तेथे आहे असें रा. राजवाडे यांनी सिद्ध केलें आहे. तसेंच मराठी गद्याच्या बाबतींतहि अग्रपूजेचा मान महानुभावी पंथाचा संस्थापक श्रीचक्रधर यांच्या सिद्धांतसूत्रपाठास द्यावा लागतो. सारांश या प्रांतांत सरस्वतीची उपासना पूर्वापार चालत आली असून ज्ञानेश्वरांच्या भाषेंत "ईश्वरनिष्ठांची मांदियाळी", एकसारखी देवनाथ-दयाळनाथ-गुलाबराव-मोतीबाबा जामदारापर्यंत अव्याहतपणें चालूं आहे.

३. गेल्या शतकांत इंग्रजांचा संबंध येऊन भोंसल्यांच्या दरबारीं एल्फिन्स्टन्, जेंकिन्स वगैरे रेसिडेंट येऊं लागल्यापासूनचें स्थूलावलोकन केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की जरी राज्यव्यवस्थेंत स्थायिकपणा नव्हता व तो काळ बराच अस्थिर असा गेला तरीहि पवनी-भंडारा-चंद्रपूर-रामटेक इत्यादि ठिकाणीं पाठशाळा होत्या व वर्षासनें, वेतनें, मोकासी इनामें वगैरे देऊन भोंसल्यांचे दरबारीं विद्वानांचा चांगलाच परामर्श घेतला जात असे.

४. इंग्रजी विद्येचा प्रारंभ नागपुरांत १८४५ सालीं झाला असें म्हणतां येईल; त्या सालीं स्टीफन हिस्लॉपसाहेबांनी एका खाजगी इंग्रजी शाळेची स्थापना नागपुरांत शहरांत बाजारओळींत केली. सागर येथेहि एक इंग्रजी हायस्कूल होतें व तेथे मराठी व इंग्रजीचें शिक्षण दिलें जात असे. पुढे विद्याखात्याची स्थापना झाल्यावर त्या खात्यांत जी मंडळी मुंबई प्रांतांतून आली त्यांनी फुरसदीच्या वेळीं एकत्र जमून लेखनवाचन करण्यासाठी सीताबर्डी येथे एक क्लब काढला होता. या क्लबास मदत करणारांत प्रसिद्ध सर नसरवानजी टाटा यांचें नांव आढळतें. या क्लबाचे उपाध्यक्ष प्रसिद्ध वाङ्मयसेवक यशवंतराव उदास हे होते. विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेला व एके काळीं सर्वतोमुखी स्तुतीस पात्र झालेला "सोमसहाबळेश्वरवर्णन" नामक स्थलवर्णनात्मक प्रबंध यशवंतरावांनी याच क्लबाच्या बैठकींत वाचला. यशवंतराव हे प्रथम या प्रांतांत चंद्रपूर हायस्कूलचे फर्स्ट असिस्टंट मास्तर म्हणून आले; तेथे गोविंदराव भागवत हे त्या वेळीं हेडमास्तर होते. पुढे जेव्हां हायस्कूलचे वर्ग बंद केले तेव्हां त्यांची
 बदली कामठीस झाली व लवकरच त्यांची योजना नागपुरास ट्रान्सलेटरचे कामावर

झाली. १८७१ मध्ये त्यांनी सेन्ससचें काम केलें व नंतर ते जुडीशियल कमिशनरचे डेप्युटी राजिस्ट्रार झाले. हे वयाच्या ३५ व्या वर्षी क्षयाने अकालीं मरण पावले. त्यांनी क्लबमध्ये शिरगणती, शिवाजीचा पोवाडा, शाळाखात्यांतील मराठी क्रमिक पुस्तकें वगैरे विषयांवर निबंध वाचले; त्यांच्या मनांत धोममहाबळेश्वरावरील प्रबंधाच्या धर्तीवर रामटेक व पंचमढी यांचीं वर्णनें लिहिण्याचें होतें, व ते नागपूर प्रांताच्या इतिहासाचीं कागदपत्रें गोळा करीत होते. या क्लबमध्ये जे आणखी दुसरे सभासद आपले विचार प्रगट करीत असत, त्यांत कै. हरि माधव पंडित, वामन दाजी ओक, वामनराव कोल्हटकर, बळवंतराव गोखले इत्यादिकांचा समावेश केला पाहिजे. हरिपंत पंडितांच्या नारायणराव पेशव्यांच्या वधावरील नाटकाचा बराच भाग येथे वाचून दाखविण्यांत आला होता. वामनराव ओकांनी आपल्या "माधवनिधन" काव्याचें या क्लबाच्या बैठकींत वाचन केलें होतें; रा. रघुनाथराव शहाणे यांनी झाशी संस्थानवर एक निबंध या संस्थेपुढे वाचला होता व गोंडी भाषेच्या व्याकरणावर एक निबंध रा. केशवराव भवाळकर यांनी वाचला. पुढे हे सभासद नोकरीच्या फेरबदल्यांत इतस्ततः पसरून गेल्यामुळे या क्लबाच्या बैठकी थांबल्या व त्याचेंच पुढे राजाराम लायब्ररींत रूपांतर झालें.

५. या प्रांतांत वाङ्मयविषयक काम करणाऱ्या पहिल्या संस्थेचा इतिहास असा आहे; तथापि तिच्या सभासदांनी व्यक्तिशः ही चळवळ पुढे चालूंच ठेवली हें विसरतां येत नाही. यांच्या वैयक्तिक चळवळीचें वैशिष्टय प्रशंसनीय मानावें लागतें; कारण मराठी वर्तमानपत्राचे आद्यजनक व नियतकालिकांचे प्रणेते भाऊसाहेब ऊर्फ गोविंद विठ्ठल महाजन हे या प्रांतांत आपल्या ॲडव्होकेट पुत्राबरोबर येऊन नागपुरास स्थायिक झाले होते. त्यांच्या कर्तबगारीबद्दल शंकाहि घेतां येणार नाही. परंतु त्यांनी या प्रांतांत आल्यावर वाङ्मयोपासनेचा संन्यास घेतला. रा. हरिपंत पंडित यांचा विविधज्ञान-विस्ताराशी संबंध असल्यामुळे त्या मासिकांत नागपूरकर भोसल्यांची बखर, वगैरे ऐतिहासिक बखरी व दुसरे चर्चात्मक निबंध त्या मासिकांत या प्रांतांतील विद्वान लोक पाठवूं लागले. रा. वामनरावजी ओक यांचे अनेक चरित्रात्मक लेख त्यांत प्रसिद्ध झाले, आणि प्रसिद्ध मालाकार विष्णुशास्त्री यांच्या बरोबर वामनरावजींचे यमकबद्ध कवितेचा मराठींत प्रथम कोणी प्रारंभ केला या वादापासून तों मोरोपंतांच्या कवितेवरील प्रसिद्ध सामन्यापर्यंत अनेक लेख नागपुरांतच तयार होऊन गेले आहेत. १८७५—१८९५ पर्यंत जो वीस वर्षांचा काळ गेला त्या अवधींत मराठीच्या वाङ्मयविषयक चळवळींचें नागपूर हें पुण्याच्या खालोखालचें महत्त्वाचें केंद्र बनलें होतें. काव्येतिहाससंग्रहांत अनेक बखरी, पत्रें व काव्यें नागपुराहून रा. पंडित-ओक यांनी गोळा करून व टीपा देऊन पाठवलीं; काव्यसंग्रहाचें काम रायपूरवरून वामनराव आमरणांत चालवीत होते; प्रसिद्ध पंचवटीस्थलनिर्णयाचा वाद देखील श्रीमंत कुरुंदवाडकरांशी नागपुराहून ओक-पंडित-कें. व्ही. लक्ष्मणराव खेळवीत होते. पतितोद्धाराची व पुनर्विवाहाच्या मतप्रसाराची चळवळ येथेच दृढमूल झाली; सारांश या प्रांताचें वाङ्मयविषयक भवितव्य घडविण्याच्या महद्भाग्याचें श्रेय रा. पंडित व ओक यांनाच द्यावें लागेल यांत तिळमात्र शंका नाही. तें कार्य त्यांनी झीज सोसून या प्रांतांत करून व पुढे तेंच वाङ्मयकार्य तशाच उत्साहाने करण्यास समर्थ असा शिष्यवर्ग आपल्या खास देखरेखीखाली तयार करून या प्रांतास सर्वस्वी ऋणी केलें आहे. रा. पंडितांच्या

प्रोत्साहनाने या प्रांतांत कांही नाटकेंहि प्रसिद्ध झालीं. त्यांत दत्तोपंत गावंडे कॅन्ट्रॅक्टर यांचें "संगतिविपाक" नाटक प्रख्यात असून शाहू नगरवासी मंडळी याचा प्रयोग करीत असत.

६. पंडितांच्या शिष्यवर्गांत अग्रोल्लेखाचा मान हनुमंतगडचे महंत श्रीधरराव परांजपे यांना द्यावा लागेल. मोरोपंतांच्या केकावलीवर त्यांची बृहट्टीका स्वेकास अवगत आहे. त्यांची वाङ्मयतपस्या आता पराकोटीस गेली आहे व त्यांनी आपलें सर्व आयुष्य परमार्थास वेंचलें आहे. रा. केशव विश्वास फणसे हे पंडितांचे पट्टशिष्य; त्यांचा मोरोपंतावरील व्यासंग प्रसिद्ध असून त्यांनी कित्येक सुंदर कविता प्रसिद्ध केल्या आहेत. दुसरा उल्लेख के. व्ही. लक्ष्मणराव यांचा करावा लागेल. हे तेलगू (आंध्र) ब्राह्मण, जन्मभाषा तेलगू, परंतु त्यांनाहि मराठीची उपासना करण्याचा बहुमान रा. पंडितांच्या सहवासांत मिळाला. हे इंग्रजी शिक्षणासाठी भंडाऱ्यास आपल्या बहिणीकडे आले व नंतर नागपुरास आल्यावर हरिपंतांच्या आहारीं पडले व सामाजिक सुधारणेच्या उत्साहांत कृष्णशास्त्री तेलंगांशी पुनर्विवाहसमर्थन करूं लागले. त्यांना मराठी कवितेचा नाद लागला व पुढे वामनरावांनी त्यांना मुक्तेश्वर वनपर्व संपादण्यास दिलें. तें काम त्यांनी फार श्रमपूर्वक केलें व पुढे मोरोपंतांचें कर्णपर्वहि त्यांच्याकडे टीपा देण्यासाठी स्वाधीन केलें. हे एम्. ए. ची परीक्षा झाल्यावर आपल्या प्रांतांत गेले व तेथे त्यांनी नागपुरांत जीं आयुष्याचीं ध्येयें निर्माण केलीं होतीं तींच पुढे व्यवहारांत आचरूं लागले व " विज्ञानसर्वस्वमु " आंध्र विश्वकोशाचें अवाढव्य काम सुरू करून आपल्या मातृभाषेची सेवा करूं लागले. मधून मधून ते मराठी मासिकांत आंध्र वाङ्मयाचा परिचय करण्याचें बंधुकार्य करीत असत. विविधज्ञान-विस्तारांतील दंडीच्या अवंतीसुंदरीकथेवर आणि राधामाधवचंपूवर त्यांचे संशोधक व परीक्षणपर निबंध त्यांच्या मराठीवरील गाढ प्रेमाची साक्ष देतात. हे १९२३ मध्ये मद्रास येथे वारले. जसे लक्ष्मणराव तसेच आणखी एक तेलगू साहित्यसेवक या प्रांतांत मराठीमध्ये ग्रंथकार, कवि व भाषाशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचें नांव रा. घंटय्या. यांनी अर्वाचीन निर्यमक कवितेचा प्रथमतः मराठींत पुरस्कार केला व " मैना " काव्य हें ५६ श्लोकांचें एक खंडकाव्य प्रसिद्ध केलें. यांचा दुसरा मराठी ग्रंथ " केशरी मंदील " नामक एक नाटक आहे. या दोन्ही पुस्तकांचा विविधज्ञान-विस्तारांत परामर्श घेतला आहे. ज्यांची मातृभाषा मराठी नव्हे अशांनी ही रचना केली आहे इकडे दुर्लक्ष न केल्यास त्या वेळचे हे प्रयत्न खास अभिनंदनीयच समजले पाहिजेत. जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजांत रा. घंटय्याच्या स्मरणार्थ दोन शिष्यवृत्ती ठेवलीं आहेत यावरूनहि त्यांची लोकप्रियता स्पष्ट होते. रा. घंटय्या हे मराठी-प्रमाणे इंग्रजींत देखील कविता करीत असत. परंतु त्यांचा विशेष महत्त्वाचा ग्रंथ " मराठी भाषेची मूळ पीठिका " हा आहे. हा निबंध १८८१ मध्ये लिहिला आहे व त्यावेळी मराठीच्या उद्गमाकडे विद्वानांचें लक्ष नुकतेंच वेधूं लागलें होतें. डॉ. विल्सन यांचीं मतें अग्राह्य ठरूं लागलीं होतीं, हॉअर्नेल व बीम्स यांचे ग्रंथ नुकतेच बाहेर पडले होते व डॉ. भांडारकर यांचीं भाषाविषयक व्याख्यानें अद्यापि पुरीं झालीं नव्हतीं. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी मराठीच्या उत्पत्तिबद्दल व शब्दांच्या निर्वचसिद्धीबद्दल आपल्या व्याकरणांत थोडीशी चर्चा सुरू केली होती. त्या काळांत भाषेच्या तुलनात्मक विचारास चालना देऊन कानडी-

अनुक्रमणिका

तेलगु–गोंडी वगैरे मराठीशीं शेजारधर्माने नांदणाऱ्या ज्या भाषा त्यांच्यांत मराठीशी जीं साम्यस्थळें आढळलीं त्यांबद्दल उहापोह करून व्याकरणाची व रूपसिद्धीची दृष्टी उजळण्याचा रा. घंटय्या यांनी फारच घटितणाचा प्रयत्न केला. मराठीचा उगम प्राकृतापासून झाला असून ती भाषा पाली–शौरसेनी–मागधी–गुर्जरी वगैरे देशी भाषांच्या संघटनाने पोसली गेली आहे व तिला कित्येक द्रविडी शब्दांचा संपर्क झाला आहे हा सिद्धांत स्थूलत: त्या निबंधांत विशद करण्याचा यत्न केला आहे. हा प्रयत्न राजारामशास्त्री भागवतांच्या आगोदरचा असल्यामुळे त्यांचा बहुमानाचा उल्लेख होणें जरूर आहे.

७. याप्रमाणे पोटापाण्याच्या मागे असतांना देखील फुरसदीच्या वेळीं या मंडळीने जें सारस्वतकार्य केलें त्याचें मोल करितां येत नाही. जो प्रकार मध्यप्रांतांत तोच वऱ्हाडांतहि या काळीं झाला व तेथून अण्णासाहेब महाजनींच्या अग्रेसरत्वा खाली "ज्ञानसंग्रह" हें मासिक १८७२ मध्ये निघालें व जठार, देवभानकर, केसकर, बजाबा प्रधान, काणे, चिटनवीस, जयवंत वगैरे मंडळीच्या जुटीने तेथे त्यांनी नियत-कालिकाच्या द्वारें वाङ्मयसेवा सुरू केली. महाजनींचीं तिन्ही नाटकें, कायमच्या धारेबंदीवरील निबंध व कुसुमांजली हा स्फुट काव्यसंग्रह वऱ्हाडांतच परिस्फुट झाले. गोविंदराव काण्यांचे गौतमबुद्धचरित्र, केसकरांचीं नाटकें, जयवंतांच्या कादंबऱ्या, प्रधानांची देवसेनी, इत्यादि ग्रंथ अजूनहि रसिकांच्या स्मरणांत आहेत.

× × × ×

८. रा. ओक व पंडित यांच्या मृत्यूनंतर या प्रांतांतील सारस्वतसेवेची धुरा कांही काळ देशसेवक पत्राचे संपादक रा. महादेवराव पाध्ये यांच्यावर पडली. त्यांनी तें काम चिकाटीने वामनराव जोश्यांच्या मदतीने कांही काळ चालविलें व त्या काळांत त्यांनी जपान देशाचा इतिहास प्रसिद्ध केला. पण पुढे धंद्याच्या व्यापामुळे वर्तमानपत्राकडे पुरेसें लक्ष देतां येईना, तेव्हा मदतीस रा. ओगले यांस घेतलें व नंतर सर्व अधिकार अच्युतराव कोल्हटकरांस देऊन त्यांनी आपल्या हौसेस निराळी मुरड देऊन उद्यम कार्यांच्या महत्त्वाची गोडी निर्माण करण्यासाठी उद्योगधंदे, शेतकी वगैरे विषयांस वाहिलेलें असें मासिक काढूं लागले. आता ते मासिकहि तरुण पिढीच्या स्वाधीन करून हक्काने मिळविलेल्या विश्रांतीचें दुर्लभ सुख उपभोगीत आहेत. माधवराव पाध्यांनंतर पुढे आलेल्यांत अच्युतराव साठे यांचा निर्देश करावा लागेल. हे मॉरिस कॉलेजातील अत्यंत हुशार विद्यार्थी असून कॉलेजांत असतांना देशसेवकांत लिहीत असत. मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेंत अस्खलित वक्तृत्वाची यांना देणगी होती व कविता करण्याचा त्यांना नाद असे. पुण्यास ते महाराष्ट्र कॉलेजांत इंग्रजीचे अध्या-पक झाल्यावर लोकमान्यांच्या नजरेंत भरले व त्यांना सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी करून १८९७ सालच्या दुष्काळांत सारातहकुबीच्या चळवळींत ते कुलाबा जिल्ह्यांत व्याख्यानें देत असतां सरकारच्या अवकृपेस पात्र होऊन कैद झाले. पुढे त्यांतून मुक्तता झाल्यावर कांही काळ त्यांनी कोल्हापुरास वकीली केली, व समर्थ पत्राचें संपादनाचा भार अण्णासाहेब विजापूरकरांनी यांच्यावर सोपविला. त्या वेळीं ग्रंथमालेत व विविधज्ञानविस्तारांत यांचे निबंध येत असत, म्याक्समुल्लरसाहेबांच्या स्वतंत्रतेचा निबंध ग्रंथमालेंत यांनी भाषांतर करून प्रसिद्ध केला. पुढे नागपुरास ते वकीली करूं

लागले व तेथे असतांना त्यांच्या व रा. भवाळकरांच्या कविता "पद्यपद्माकर"-रूपाने प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर सरकारी नोकरीचा योग येऊन पेन्शन घेईपर्यंत ते मधून मधून विस्तारांत लिहीत असत. विशेषतः ली. वॉर्नरसाहेबांच्या "हिंदुस्थानचा नागरिक" या पुस्तकावरील त्यांच्या परीक्षणाची त्यावेळीं फार प्रशंसा झाली होती. सरकारी नोकरींतहि वाङ्मयसेवा करितां येते व त्याप्रमाणे रा. साठे यांनी वऱ्हाडचे प्रसिद्ध संतकवि दयाळनाथ व देवनाथ यांच्या काव्यांच्या सटीप आवृत्त्या प्रसिद्ध केल्या. यांचें वाचन बहुविध असल्यामुळे ते वारंवार कॉलेजांतून व विद्वत्सभेंतून भाषणें करीत असत. नागपूर युनिव्हर्सिटींत त्यांनी मराठी भाषेचा प्रवेश नख-शिखांत व्हावा म्हणून खटपट केली व आज ज्या विश्वविद्यालयांत मराठी भाषा घेऊन अविचलितपणें एम. ए. व पीएच. डी. होतां येतें अशी नागपूरच्या युनिव्हर्सिटीमध्ये ही परिस्थिती येण्यास रा. साठे यांची खटपट पुष्कळ कारणीभूत झाली आहे.

रा. साठ्यांच्या जोडीने काम करणारे दुसरे साहित्यसेवक रा. नारायणराव अळेकर हे होत. यांचा इतिहासाचा व्यासंग प्रसिद्ध असून प्रख्यात ब्रह्मेन्द्रस्वामी-वादांत त्यांनी पुढाकार घेतला होता व ग्रंथमाला व विस्तार यांत रा. देव व अळेकर ही दुक्कल या वादांत बराच वेळ चमकत होती. त्या काळांतले आणखी प्रसिद्ध पुरुष रा. कृष्णशास्त्री घुले हे होत. त्यांचे वेदविषयक व धर्मशास्त्रविषयक लेख विस्तारांत प्रसिद्ध झाले आहेत. परंतु त्यांचा ओढा ऋग्वेदकालीन संशोधनाकडे असल्यामुळे मराठीपेक्षा संस्कृतांतच ते गढलेले असतात. रा. विठ्ठलराव लिमये यांनी "विश्वनिरीक्षण" हा वेदांतावरील ग्रंथ याच सुमारास प्रसिद्ध केला. रा. दफ्तरी यांचें ज्योतिषविषयक ज्ञान राम–कृष्णांच्या जन्मापासून महाभारताच्या युद्धकालापर्यंत हिंडून पुराणांचें संशोधन करून त्यांनी अनेक चर्चात्मक निबंध प्रसिद्ध केले व विशेषतः अथातोधर्मजिज्ञासा या मंत्राचा उच्चार करून अत्यंत स्वतंत्र बुद्धीने लिहिलेला "धर्मरहस्य" हा अप्रतीम निबंध तयार केला. या प्रांतांत रा. दफ्तरीसारखा तीक्ष्ण व स्वतंत्र प्रज्ञेचा दुसरा विद्वान् सांपडणें अवघड आहे.

९. योगक्षेम साधीत असतां वाङ्मयसेवा करणाऱ्या मंडळींची वर जशी माहिती दिली तशीच या प्रांतांतून बाहेर गेलेली बरीच मंडळी स्थानांतर करून प्रसिद्धीस आली आहेत. अशा मंडळींत रा. नारायणराव टिळक, वासुदेव गोविंद आपटे, वासुदेव बळवंत पटवर्धन, मोतीबुवासा, केशवसुत, अच्युतराव कोल्हटकर आणि श्रीधर व्यंकटेश केतकर यांचीं नांवें प्रमुखपणें दृष्टोत्पत्तीस येतील. रा. टिळक यांनी धर्मांतर करूं नये म्हणून हरिपंत पंडितादि नागपूरच्या मंडळींनी फार खटपट केली. त्यांचा योगक्षेम चालविण्याचीहि हमी घेण्यांत आली होती; परंतु त्यांना आत्मोद्धारार्थ हा प्रांत सोडावा लागला व त्यामुळे त्यांच्या वाङ्मयात्मक यशाचे वांटे-करी होण्याचें भाग्य या प्रांतास मिळालें नाही. त्यांचीं पहिलीं काव्यें (बापाचें अश्रुः माझी भार्या), पहिलें नाटक (संगीत गोदुःखविमोचन) व मासिकपत्र (काव्य-कुसुमांजलि) नागपुरांतूनच प्रसिद्ध झालीं. रा. वासुदेवराव आपटे योगक्षेमार्थ तिकडे गेले व शिक्षक, संपादक होऊन अखेरीस "आनंदा"च्या संसारांत रमले. रा. मोती-बुवासा यांची वाङ्मयसेवा सुविचारसमागमाच्या रूपाने दोन तीन वर्षें झाली. वासुदेवराव पटवर्धनांची पहिली कविता नागपुरास प्रकट झाली व पुढे ते पुण्यास

जाऊन "सुधारकाची" धुरा त्यांनी अंगावर घेतली. शिक्षा भोगून परत आल्यावर अच्युतराव कोल्हटकर मुंबईस स्थायिक होऊन तेथे त्यांनी श्रुतिबोध–उषा–संदेश–Message काढून मराठी वर्तमानपत्रांच्या स्वरूपांत, भाषेंत व व्याप्तींत क्रांती करून टाकिली. आपल्या ज्ञानकोशाच्या सिद्धीसाठी डॉ. केतकरांनी येथून भांडवल उभारून स्वस्त मजूरी व विपुल कारागीर मिळणाऱ्या ठिकाणीं कारखाना उघडून टोलेजंग शब्दशिल्प उभारलें. त्याच काळांत फुरसदीमध्ये त्यांनी कादंबरीकाराची भूमिका घेऊन चार सुंदर व स्वतंत्र विचाराच्या कादंबऱ्या निर्माण केल्या. सारांश या प्रांतांतून बाहेर गेलेल्या सारस्वतभक्तांची सेवा तिकडेहि बहुमानार्ह होऊन त्यांच्या कर्तृत्वाचें सार्थक झालें याबद्दल या प्रांतास केव्हाहि अभिमानच वाटेल.

वामनराव ओकांच्या मागे त्यांचें कार्य रा. दामोदरपंत ओक व भवाळकर यांनी चालविलें. रा. भवाळकर यांनी तुकारामाचे गुरु केशवचैतन्य यांच्या चरित्राचा ओवीबद्ध 'केशवचैतन्य कल्पतरु' प्रसिद्ध केला व मोरोपंतांचे हरिवंश त्यांच्या संपादकत्वाखालीं काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाले. रा. ओक यांनी काव्यसंग्रहांत मुक्तेश्वर–मोरोपंत–उद्धवचिद्धन–शुभानंद वगैरे कवींच्या ग्रंथांच्या सटीप आवृत्त्या प्रसिद्ध केल्या आहेत व नुकतीच मोरोपंतांच्या कर्णपर्वाची सुंदर सटीक आवृत्ति त्यांच्या उद्यमशीलतेची व कुशाग्र दृष्टीची साक्ष देण्यास तयार आहे. अजूनहि हें वंशपरंपरित कार्य ते मनोभावानें व एकनिष्ठेनें बजावीत आहेत व मोरोपंतांच्या आदिपर्वाची संशोधित आवृत्ति त्यांच्या हातून तयार होत आहे.

१०. या विसाव्या शतकांत या प्रांतांत पुढे आलेल्यांत अग्रपूजेचा मान तात्यासाहेब कोल्हटकरांस द्यावा लागेल. पूर्वीचे साहित्यसेवक सामान्यत: नक्षत्ररूपानें चमकत; पंडित–ओकांसारखा सूर्यमाला फारच विरळा असत. पण त्या प्रकारच्या ग्रहमालेच्या चक्रवर्तीपणाचा अधिकार रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना मिळाला असें म्हटलें पाहिजे. स्वत: कवि, नाटककार व प्रबंधकार या नात्यानें नवीन पद्धतीचे ते निर्माते व आद्यगुरु झाले व आपल्या थाटाचे शिष्य सभोंवती जमा झालेले पाहून साहित्यसंसारांतील "सानंदं सदनं" युक्त सार्थकतेची जाणीव होऊन जर ते समाधानानंदाच्या समाधींत मग्न असतील तर तें योग्यच म्हणावें लागेल. त्यांच्या साहित्यसेवेच्या संसारास हा निबंध अपुरा पडेल हेंच खरें. मल्हार खंडेराव चिटनवीस, रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी, वामनराव जोशी, नारायणराव वेहरे, आनंदराव टेकाडे, रा. बळवंतराव खापर्डे, जयरामपंत अस्नारे, रा. पाळेकर, दादासाहेब महाजनि रा. देवधर, रा. यादवराव काळे, हिंदी साहित्यांत ज्ञानेश्वररामदासांचा प्रवेश करून देणारे सप्रे व भगाडे आणि तुळशीदासास मराठी वस्त्रें पेहरविणारे रा. जामदार, महानुभावीय वाङ्मयाचीं दालनें प्रकाशित करणारे अप्पासाहेब देशपांडे–इत्यादिकांचें नामसंकीर्तन करून पुण्यांश जोडावा हेंच समुचित होय.

११. महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत हें समालोचन झालें आहे; नंतरचा काळ म्हणजे गेल्या वीस वर्षांचा आढावा देण्याचें कार्य येथे आज करीत नाही; कारण त्या काळांत निर्माण झालेलें वाङ्मय अद्यापि परिपक्व दशेस येऊन टीकाकारांच्या अथवा संग्राहकांच्या करड्या नजरेस पात्र झालें नाही. तरी पण या आजच्या काळांत ज्या नव्या संस्था उदय पावत आहेत त्यांवरून नियतकालिकांस वाचकवर्ग अभिज्ञपणें

पोषीत अशी परिस्थिती आली आहे असें विश्वासपूर्वक म्हणतां येतें. कवींचे अनेक रंगा-रंगाचे फुलताटवे दरवर्षी जोमाने फुलूं लागले आहेत; हेंहि तरुण पिढीच्या भावुकतेच्या निर्भराचें द्योतक समजावें लागतें; अभ्यासू मंडळी मात्र अद्यापि झळकूं लागली नाही. या प्रांताच्या खास हक्काचीं अशीं सारस्वत प्रांतांतील दोन तीन संशोधनस्थळें प्रकट झालेलीं आहेत; पण तिकडे अद्यापि जिज्ञासूंचा ओघ वळलेला दिसत नाही. त्याचा निर्देश करून हा निबंध पुरा करूं.

१२. या प्रांताच्या प्राचीन इतिहासाचें अजून पुरें संशोधन झालें नाही. जुन्या राजवटींचा मध्ययुगीन इतिहास अजून शिलालेख–ताम्रपटांच्या साह्याने तयार व्हावयाचा आहे. त्या कार्याचा प्रारंभ महाकोशल समितीने केला आहे; तिकडे होतकरू विद्वानांचें लक्ष गेलें पाहिजे. दुसरी गोष्ट रा. ब. हिरालालसाहेब यांनी जैनवाङ्मयांतील अपभ्रंशभाषेतील ग्रंथांचे अस्तित्व या प्रांतांत आहे हें शोधून तिकडे संशोधन सुरू केलें आहे. अर्वाचीन आर्योत्पन्न भाषांचा उगम अपभ्रंशापासून झाला या उपपत्तीस पोषक असें वाङ्मय प्रकट नव्हतें तें आतां हिरालालसाहेबांच्या खटपटीमुळे उपलब्ध झालें आहे. त्याचें अध्ययन केल्यास हिंदी व गुजराती भाषेच्या उद्गमाची परिसीमा स्पष्ट होईल. महाराष्ट्राच्या अपभ्रंशाचें वाङ्मय अजून उपलब्ध झालें नाही तरी महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासाने मराठीची रूपसिद्धी ज्ञानेश्वरांच्या काळापर्यंत सर्व तऱ्हेने सिद्ध होणार आहे. आणि या दोन्ही संशोधनांच्या मदतीने मराठीच्या उगमस्थानाची अधिक स्पष्टता होणार आहे. नंतरच्या काळांतील ऐतिहासिक कागद-पत्रें अजून गोळा झालीं नाहीत. गोंडी राजवटीचा इतिहास विल्ससाहेबांनी लिहून त्या शाखेच्या संशोधनास मदत केली आहे. नागपूर वऱ्हाडांतील मराठे-भोंसलेशाहींतील सरदार घराण्यांचे वृत्तांत अजून गोळा व्हावयाचे आहेत व त्या कामांत बरीच महत्त्वाची ऐतिहासिक साधनसामग्री उपलब्ध होण्यासारखी आहे. अठराव्या शतकांतील युरोपियन प्रवाशांचा या प्रांतांतील प्रवासाचा वृत्तांत मि. विल्स यांनी दिलेला आहे; परंतु अजून संशोधन न झालेली सामग्री, पोवाडे, जानपद गाणीं, आख्यायिका, दंतकथा इत्यादि या प्रांतांत पुष्कळ आहे व ती गोळा व्हावयाची आहे. वऱ्हाडांत जुनें मराठी वाङ्मय संग्रहित आहे तें अद्यापि प्रकाशित करावयाचें आहे. मराठी गद्याचा प्रारंभ एकनाथांपूर्वी तीन शतकें मागे गेला आहे व त्यामुळे ज्ञानेश्वरांपासून त्याची परिणति कशी होत गेली हें महानुभावीय हस्तलिखितांवरून स्पष्ट व्हावयाचें आहे. त्या वाङ्मयांत उत्कृष्ट दर्ज्याचीं काव्यें व प्रमेयस्वरूपाचे गद्यग्रंथ अजून अप्रकाशित व आपणांस अज्ञात आहेत; त्यांचा आस्वाद घ्यावयाचा आहे. हें अफाट कार्य केवळ सामुदायिक बळावर होईल म्हणून ती संघशक्ती या कामीं निर्माण व्हावी व संमेलनादिकांच्या द्वारें लोकांच्या हृदयांत सहानुभूतीचा उदय होऊन तिला सक्रियता मिळावी हीच ईश्वराजवळ मागणी आहे. आजपर्यंतच्या हकीगतीवरून या प्रांतांत बुद्धिमान, प्रज्ञावंत व प्रतिभासंपन्न मंडळींची वाण दिसत नाही; ग्रंथनिष्पत्तीचीं साधनें–छापखाने–आता विपुल झालीं आहेत व गेल्या चार वर्षांत लेखनव्यवसायाचें उद्दीपन करण्याचीं साधनें—नियतकालिकें–झपाट्याने वाढीस लागलीं आहेत. तेव्हा मंडळी आहेत, कार्य आहे व साधनेंहि आहेत. उणीव केवळ संघटनेची-परस्परांच्या सहानुभूतीची दिसते. तेवढी गोष्ट सिद्ध झाली म्हणजे या प्रांतांतील सारस्वतोपासनेची काळजी दूर होईल.

●

पुकार

★

दाम करी काम इथे चांदबिबी सलामास
काय पामरिची कथा महेशही जिथे दास!

टू – सर्टिफिकेट इथे मिळे चवरिचा मान
विश्वांतला वाहतसे अनुकूल समीरण!

रिद्धि-सिद्धि सज्ज इथें सकाळच्या सम्मार्जनीं
सांडे सुगंधी चंदन वरुणाच्या झारितुनी!

अन्तरांत जळे दीप श्रामदान ठायिं ठायीं
पाजळिते निरांजन हेमलता सूनबाई!

देव्हाऱ्यांत शुचिष्मंत रामायण पढे विधी
पोथींतला बोधसार कृतींत ना इथे कधी!

तरी कोटि पुण्यांक हे वहींतल्या जमेकडे
झांकलेल्या रांजणिंचे कोण मोजणार खडे!

मूळ शोधूं नये पण उणा तोल पदरांत
खोल शिरायाचि चोरी या कुबेरी कायद्यांत!

तोळा तांदुळाच्या मिषें घडा घडा मतदान
सेवेंतही डाव इथे रामसखा निवडून!

रामराज्य मात्र नाम इथे मोजकेंच सुखी
झळकते जाहिरात 'जनतेचि पाटीलकी!'

त्रस्त कुणी ठणाणतो न्याय-पुकारिचे नाद
गोषांतली नूरराणी म्हणे 'झूट ही फिर्याद!'

प्रजापाळ पक्षपाती याचा मिंधा राम इथं
संमोहला चळलाहि चिरिमिरी खात खात!

गीतेंतलें आश्वासन आठवावें चक्रपाणि!
युगेश्वरा! योगेश्वरा!! पुकारते युगवाणी

प्रजापरित्राणाय या धर्म संस्थापनेसाठी
याच युगीं याच दिनीं प्रगटावें काळ्या हाटीं!

●

—पुंडलिक

मध्यप्रान्तांत मराठीचें भवितव्य

प्रभाकर दिवाण

★

मध्यप्रान्ताच्या कायदेमंडळांत नुकताच राज्यभाषेचा कायदा पास झाला. त्याप्रमाणे यापुढे या प्रान्ताची राज्यभाषा हिंदी व मराठी राहणार असून सरकारी कारभार मात्र हिंदींतून चालणार आहे. या ठरावावर पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचें जें भाषण झालें त्यांत त्यांनी प्रान्तांतील मराठी जनतेला लवकर हिंदी शिकून घेण्याची सूचना केली आहे. ठरावांत हिंदी आणि मराठी ह्या दोन्ही प्रान्ताच्या राज्यभाषा राहतील असें म्हटलें असलें, तरी राज्यकारभार मात्र हिंदींतूनच चालणार असल्यामुळे मराठीला राज्यभाषेचा लावलेला टिळा निव्वळ दिखाऊ आहे असें दिसतें. हिंदी आणि मराठी ह्या दोन्ही भाषा प्रान्ताच्या राज्यभाषा असतील तर दोन्ही भाषांतून राज्य-कारभार चालायला नको काय ? म्हणजे मराठी भागांत मराठींतून व हिंदी भागांत हिंदींतून राज्यकारभार चालला पाहिजे. त्याकरता प्रान्ताच्या सर्व सरकारी नोकरांना हिंदी आणि मराठी दोन्ही भाषा उत्तम यायला नकोत काय ? कारण त्याशिवाय प्रांतांतील हिंदी व मराठी जनतेशी सारखेच समरस ते कसे होऊं शकतील ? याचाच अर्थ हा की प्रान्तांतील सर्व शाळांत हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषा शिकविण्यांत आल्या पाहिजेत. हिंदी भागांत मराठी ही दुय्यम भाषा राहील तर मराठी भागांत हिंदी ही दुय्यम भाषा राहील. प्रांतांतील दुय्यम शिक्षणांत हिंदी आणि मराठी ह्या दोन्ही भाषा सक्तीच्या राहतील. त्यामुळे प्रांतांतील प्रत्येक दुय्यम शिक्षण पूर्ण केलेल्या मनुष्याला हिंदी व मराठी दोन्ही भाषा उत्तम येऊं शकतील व तो दोन्ही भाषांत लेखन, वाचन आणि भाषण करूं शकेल. असें झालें तरच मध्यप्रान्ताच्या हिंदी आणि मराठी ह्या दोन्ही राज्यभाषा आहेत असें म्हणतां येईल.

पण राज्य-भाषेचा जो कायदा करण्यांत आला आहे त्यांत अशा प्रकारची कांही तरतूद केलेली नाही. मराठी भागांत देखील राज्य-कारभार हिंदींतूनच चालणार आहे, मराठी शाळांतून हिंदीचें शिक्षण सक्तीचें होणार आहे आणि मराठी लोकांनी हिंदी लवकर शिकून घ्यावी अशी ताकीदहि देण्यांत आली आहे. तेव्हा हें स्पष्ट आहे की, मध्यप्रान्ताची राज्यभाषा फक्त हिंदी हीच राहणार आहे ! अर्थात् मराठीवर हिंदी भाषेचें व मराठी भाषिया-वर हिंदी भाषियांचें राज्य मध्यप्रांतांत कायद्याने प्रस्थापित झालें आहे असेंच म्हणावें

लागेल. सामान्य जनतेच्या मातृभाषेंत जोंपर्यंत राज्यकारभार होत नाही तोंपर्यंत जनतेचें राज्य झालें असें म्हणतां येणार नाही. सर्वसामान्य जनतेचें शिक्षण प्राथमिक शिक्षणाच्या पुढे जाणारें नाही म्हणून मध्यप्रांतांतील सर्वसामान्य मराठी जनतेचें शोषण राज्यकारभाराची भाषा हिंदी झाल्यामुळे हिंदीवाल्यांकडून होत राहणार हें उघड आहे.

हिंदी ही राष्ट्रभाषा आणि राज्यभाषा झाल्यामुळे इतर प्रान्तीय भाषांचें कोणतेंहि नुकसान होणार नाही, त्यांच्या सर्वांगीण विकासाला त्यामुळे कोणतीहि बाधा येणार नाही, हिंदीच्या उन्नतीबरोबर त्यांचीहि उन्नति होईल वगैरे गोष्टी सांगण्यांत येत आहेत. परंतु त्या केवळ समजावणीच्या स्वरूपाच्या आहेत. मध्य-प्रांतांत यापुढे मराठीला फक्त मराठी शाळांतून, मराठी भाषिकांच्या घरीं आणि कथा–काव्य–कादंबरी इत्यादि ललित साहित्यांत फार तर अवकाश राहणार आहे. सभा–संमेलनें, बाजार–हाट, जनपदें–नगरपालिका, कायदेमंडळें, राज्यकारभार, वर्तमानपत्रें, शास्त्रीय वाङ्मय इत्यादि सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांतून यापुढे तिला फारसा अवकाश राहणार नाही व त्यामुळे मराठी भाषेची आणि मराठी जनतेची सर्वांगीण उन्नति कुंठित झाल्याशिवाय राहणार नाही हें कोणीहि सांगूं शकेल. उच्च शिक्षणाचें माध्यमहि हिंदीच ठेवण्यांत यावें असा बनाव घाटत आहे आणि तो यशस्वी होणार यांतहि शंका दिसत नाही. तेव्हा उच्च शिक्षणांतून मराठीची आपोआपच हकाल-पट्टी होईल. घरांतील दिवाणखाने, बैठकी, मोठ्यांच्या अभ्यासाच्या खोल्या वगैरे महत्त्वाचा बहुतेक भाग हिंदी भाषेला देण्यांत आल्यावर मराठीला स्वयंपाकघर, लहान मुलांची अभ्यासाची खोली, माजघर वगैरे घराच्या बिन–महत्त्वाच्या भागां-तच आपला संसार थाटावा लागेल. त्यामुळे तो वैभवशाली आणि वर्धिष्णु कसा काय होणार !

हिंदीच्या पुरस्कर्त्यांना असें वाटत आहे की हिंदीला राष्ट्रभाषेचें स्थान दिलें, हिंदीतून सर्व राज्य-कारभार चालूं केला, हिंदीचें शिक्षण सर्व शाळांत सक्तीचें ठेवलें, उच्च शिक्षणाचें माध्यम हिंदी ठरलें की सर्व हिंदुस्थानांत हिंदीला अधिकाराचें स्थान मिळेल, आर्थिक व व्यावहारिक कारणांकरता सर्व लोक आपल्या मातृभाषेपेक्षा हिंदीला जास्त महत्त्व देतील व अशा प्रकारें हिंदीचा प्रचार होऊन प्रान्तीय भाषा हळूहळू निस्तेज होतील व भविष्यकाळीं हिंदुस्थानांत हिंदी हीच एकमात्र भाषा शिल्लक राहील. ही गोष्ट ते उघड बोलत नाहीत, परंतु त्यांच्या मनांत मात्र ही गोष्ट आहे व त्या अनुरोधाने त्यांचे प्रयत्न चालू आहेत. एकएका क्षेत्रांत हिंदीचा चंचूप्रवेश ते घडवून आणीत आहेत, हिंदी राज्य-भाषा झाली, आता ती उच्च शिक्षणाचें माध्यम व्हावी म्हणून त्याचा प्रयत्न चालू आहे. हें झाल्यावर दुय्यम शिक्षणहि हिंदीतून देण्यांत यावें असा प्रयत्न सुरू होईल. आणखीहि पुष्कळशा गोष्टी होतील. परंतु अशा कितीहि गोष्टी केल्या तरी प्रान्तीय भाषा नामशेष होतील असें जर ते समजत असतील तर तें मात्र चुकीचें आहे. निदान मराठीच्या बाबतींत तरी असें म्हणतां येईल की मध्यप्रान्तांत हिंदीला कितीहि पुढे आणलें गेलें तरी मराठी ही मरणार नाही. उलट "कीं तोडिला तरु फुटे अणखी भराने" या न्यायाने ती

अधिकच जोमदार बनण्याची शक्यता आहे. हिंदीच्या आक्रमणामुळे मराठी मरेल ही भीति बाळगण्याचें कारण नाही, परंतु एक गोष्ट मात्र अवश्य होईल आणि ती ही की हिंदीच्या द्वारें मध्यप्रान्ताला एक-संघ आणि एकात्म करण्याचें जें स्वप्न हिंदीचे पुरस्कर्ते आज पाहात आहेत, त्याऐवजी मध्यप्रान्तांत हिंदी व मराठी जनतेंत द्वेष आणि संघर्षाची वाढ होऊन प्रान्त खिळखिळा आणि शक्तिहीन झालेला पाहण्याचें त्यांच्या नशीबीं येईल.

हिंदीला राष्ट्रभाषेचें स्थान देण्याच्या मी विरुद्ध आहे असा याचा अर्थ कोणी करूं नये. हिंदुस्थानांत एका राष्ट्रभाषेची आवश्यकता आहे आणि हिंदी हीच त्याकरता योग्य आहे. मध्यवर्ती सरकारचा कारभार हिंदीमध्ये चालावा व हिंदुस्थानच्या सर्व शाळांतून हिंदीचें शिक्षण देण्यांत यावें हें मला मान्य आहे. मात्र प्रान्तीय राज्यकारभार प्रान्तीय भाषांतूनच चालला पाहिजे. प्रान्तांतील प्राथमिक, दुय्यम व उच्च वगैरे सर्व शिक्षण प्रान्तीय भाषांतूनच व्हायला पाहिजे. प्रांत हिंदीला घुसवणें म्हणजे त्या त्या भाषांवर व तद्भाषी लोकांवर हिंदीने व हिंदी-भाषी लोकांनी आक्रमण करण्यासारखें आहे. पं. द्वारकाप्रसाद मिश्र म्हणाले की मध्यप्रान्तांत हिंदी-मराठीच्या बाबतींत कोणताहि पक्षपात करण्यांत येणार नाही. मग असें जर आहे तर मराठीवाल्यांना जसा हिंदी शिकण्याचा त्यांनी उपदेश केला तसा हिंदी-वाल्यांना मराठी शिकण्याचा उपदेश करावयास नको काय ? मी म्हणतों, मध्य-प्रान्ताला एकात्म आणि एक-संघ बनविण्याचा हा एक-तर्फी फार्स पुरे झाला ! जोंपर्यंत मध्यप्रान्तांतील हिंदी शाळांत मराठी सक्तीचें करण्यांत येणार नाही, सर्व सरकारी नोकरांना हिंदीप्रमाणेच मराठीहि, कमीतकमी मॅट्रिकइतकें तरी, आलेंच पाहिजे असा कायदा करण्यांत येत नाही, आणि राज्यकारभार मराठी प्रदेशांत मराठींतूनच चालविण्यांत येत नाही तोंपर्यंत मध्यप्रान्तांत मराठी जनतेला आपलें राज्य आहे असें वाटणें शक्य नाही, त्यामुळे एक तर मराठी जनतेला हिंदी भाषिकांच्या सत्तेखाली मुकाट्याने राहावें लागेल किंवा मराठी भाषेचा वेगळा प्रान्त तरी करावा लागेल. ह्याशिवाय ह्यांतून सुटण्याचा दुसरा मार्ग नाही.

अनुक्रमणिका

गत्यवरोध

वाटेंत कांटेरी तारांचें कुम्पण
धुरानें माखल्या दिशा काळोखल्या
मधून मधून
गुडुम् गुडुम्
बसती तोफांच्या नादें कानठळ्या
केव्हा ही युद्धाची आवस संपेल !
स्नायूंचें कंपन
बधिरल्या मांसपेशी
रायफली मागे चाप आवळीत
अपेशी करंटे पाप चाळवीत
एक व्यक्ति, उभा
व्यक्तिमागे देश
सरोष सावेश
भावनाविहीन
खंदकांत दवा धरून मशीन
माणसाचे झाले स्विच् नी बटनं
आत्मे सर्व फ्यूज !
त्रिगुणांची वूज !
सारखे कालिके ! मुंडांचें गुंफण !

सरली लढाई शिपाई बेकार
मनांत पुनः ते करती विचार
परत पडेल केव्हा रे ठिणगी
परत झडेल पड्धम नी दुंदुभी
हिंसेचें रंगण
चाललें अखंड
थोपटीत दंड
कितीक हुकूम्शहा
लुळे कोलमडती !
जगांतील जनता इतकी का खुळी
राहिली अजून आंधळी, दुबळी !
वाटेंतील काटेरी कुंपणें नी
कुजल्या प्रेतांचे ढिगारे
रक्तांचे हे सडे
सर्व वडे, कडे
साफ कोलमडे
जेव्हा विश्वमैत्री जागी–उभी म्हणे–नको युद्ध, पुरें !

—प्रभाकर माचवे

“ रस ” आणि “ भाव ”

रामचंद्र लक्ष्मण गुप्ते

★

एप्रिल १९५० च्या अंकांत चांदा येथे फेब्रुवारीच्या ता. ४, ५ ला भरलेल्या वि. सा. संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. मा. गो. देशमुख यांनी केलेल्या भाषणांतील महत्त्वाच्या भागाचा गोषवारा ‘ रसव्यवस्था ’ या शीर्षकाखाली युगवाणींत प्रसिद्ध झाला आहे. डॉक्टरसाहेब विद्वत्ताप्रचुर बोलले, परंतु त्यांचे मुद्दे व युक्तिवाद खात्री पटवीत नाहीत. ‘ रसा ’च्या ऐवजी ‘ भावगंध ’ शब्द सुचविल्याने कोडें सुटत नाही. वास्तविक ‘ रस ’ म्हणजे ‘ भाव ’ व ‘ भाव ’ म्हणजे ‘ रस ’. तसेंच हे शब्द व त्यांचे अर्थ एकमेकांचे पूरक आहेत. रसांतील आविर्भाव अनुभवणें काय किंवा भावांतील रस ग्रहण करणें काय दोन्हीहि ‘ माया तेंचि ब्रह्म–ब्रह्म तेंचि माया ’ या कोटींतील आहेत. फरक इतकाच की, कुठे ‘ भाव ’ शब्द चांगला दिसेल तर कुठे ‘ रस ’ शब्द योग्य दिसेल.

रसाला जिव्हेंद्रियाचा ढोबळ विषय म्हणावयाचें तर गंधाला घ्राणेंद्रियाचा ढोबळ विषय म्हणतां येईल. आणि अशा रीतीने विषयांची विल्हेवाट लावली की मनाने कोणत्याहि संवेदनेची अपेक्षा करूं नये, नुसतें विश्लेषण करीत रहावें, असें होईल. पण आपण उचितार्थाच्या अनुषंगाने या दोन्ही शब्दांच्या सिद्धगुणधर्मांची (concreteness) थोडी शहानिशा करूं. ही शहानिशा सुकर होण्यासाठी आपण हें काम उदाहरणांच्या सहाय्याने करूं.

‘ वत्सल ’ हा भाव की रस ! ‘ वत्सलरस ’ या शब्दाने जी मुग्धमधुर आर्द्रतेची दुग्धधारा अंतःकरणांत उत्पन्न होते ती ‘ वत्सलभाव ’ या शब्दाने होत नाही. येथे ‘ वत्सलभाव ’ हा शब्द कोरडा वाटतो.

‘ कवितारस मनांत झडकरी यावा–पुण्याचा ठेवा ’ या उक्तीमधल्या ‘ कविता-रस ’ या शब्दाने निर्माण होणारी रुचि ‘ कविताभाव ’ अथवा ‘ कवितागंध ’ या शब्दाने निर्माण होऊं शकत नाही.

‘ भावपरिमल ’ व ‘ भावगंध ’ हे शब्द चिकित्सेच्या दृष्टीने निरनिराळे वाटतात. पहिल्यांत वस्तुमाधुर्याचें प्राबल्य आहे, दुसऱ्यांत आमोदाचें आहे.

'Bee' कवींनी 'सौंदर्यांचि काव्य' म्हटलें आहे. तसेंच कुणी 'आश्चर्यांचि काव्य' किंवा 'आनंदाचें काव्य' किंवा 'रसगंधाचि काव्य' असें तितक्याच यथार्थतेने म्हणूं शकेल. कारण हे सर्वच शब्द चांगले, व आपआपल्या परीने योग्य व कलापूर्ण आहेत. पण एकांतील रहस्य किंवा स्वारस्य दुसऱ्यांत नाही.

'रससिद्ध कवि' या शब्दयोजनेने जो अर्थ मनांत उभा राहतो तो अर्थ 'भावसिद्ध कवि' या शब्दयोजनेने सिद्ध होत नाही.

साधारणतः 'भावांत' उद्दीपन व 'रसांत' ओघ असतो.

उदाहरणार्थ 'भावगीत' व 'रसात्मकं काव्यं'! पहिल्यांत वीणारवाची व दुसऱ्यांत चंदनरसाची कल्पना मनांत येते.

'रस' या शब्दाने 'इंगित' व 'सार' हेंहि अर्थ मनांत येतात. 'भाव' या शब्दाने 'इंगित' जास्त सूचित होतें. परंतु आपल्या सर्वांगांनी 'सार' सूचित होत नाही. 'सार' या शब्दाने 'आवश्यकता', 'यथार्थपणा', 'प्राबल्य', 'उत्तमत्व', 'सत्व', 'बळ', 'योग्यता', 'सामर्थ्य', 'क्षीरत्व', 'तत्त्व', 'सारांश' हे जे अर्थ मनांत येतात ते सर्व 'रस' या शब्दांत अंतर्भूत आहेत असें संवेदनेने वाटतें. 'भाव' हा शब्द यांतल्या कांही संवेदनांना कमी पडतो. येथे 'रस' शब्दाची सर्व व्यंजना 'भाव' शब्दांत उमटत नाही. जीवनाची मूल्यें बदलत राहतातच. परंतु मनाची संवेदना मनाला समजते. 'भावपरिमळ' भोगतां येतो तसा 'रससुगंध' हि अनुभवतां येतो. 'भावसमुदाय' मनांत उभा राहतो तसा 'रससमुच्चय' हि राहतो. 'भावांत' ध्वनीचा अनुनाद असतो तर 'रसांत' अंतःकरणांतल्या स्वादाचा अनुनय असतो. पण 'रसांतली' अनुनीति (Courtesy, request, entreaty, conciliatory act etc.) 'भावांत' कमी प्रतीत होतें असें वाटतें. उलट 'भाव' शब्दाने जी feeling, emotion, expression ची स्थिति उपस्थित होते ती 'रस' शब्दाने नीट होत नाही.

> " नव्या उमेदी, नवे जिव्हाळ, नव्या मराठ्यांचे (मराठीचे ?)
> नवे भरोसे, नवें कवन हें, नव्या उमाळ्यांचे ! "

या उदाहरणांत रसोत्पत्ति नाही—भावोत्पत्ति आहे. पण ही भावोत्पत्ति मिश्र व गोंधळलेल्या रंगांची असल्यामुळे ती काय आहे हें नीट सांगतां येत नाही. ती अभूतार्थदर्शक (abstract) आहे, परंतु तींत सहानुभूति व अनुकम्पा आहे. आणि ती एक प्रकारचें नवें वातावरण व नवतरसहकाराची आवश्यकता उत्पन्न करीत आहे.

परंतु याशिवाय अशीं कांही उदाहरणें आहेत की जेथे—

> 'भाव' आणि 'रस' यांचा 'समसमां संयोग कीं जाहला'
> 'दयाळा, खेळ निष्ठुर हा हंसाया मांडला कां रे ?'

या उद्‌गारांत करुणभाव आहे तितकाच करुणरसहि आहे.

दुसरें उदाहरण—

“ देवी बोलांनी दिलेल्या शुभनवनयनांनी ।
मूर्तामूर्तहि मी निरखिली देवाची करणी ॥
काय अहा हा ! तें लोचन भाग्य मुखें वानूं ! ।
तें सुख वर्णाया कोणती रसवंती आणूं ! ॥
निज मानस शान्त, तेजाकाशहि तें शान्त ! ।
तारे ही शांत, तयांचें लखलखणें शान्त ! ॥
ही अवनी शान्त, तिच्यांतिल गडबडहि शान्त ! ।
नादस्मृति शान्त, सुखाचे आवेगहि शान्त ! ॥
अनेक भावांनी उडविला हृदयीं आकान्त ।
या नवनयनांनी दिसे तो आकान्तहि शान्त ! ॥
एवं शान्तीचें पसरलें साम्राज्यचि भंवते ।
श्रेयस् जीवाचें शांतिच्या स्पर्शीतरि रमते ॥
अचिन्त्य मृदु उठले भावघन सौरभरसरंग ।
स्वसंवेद्य, त्यांचें कथावें कसें अंतरंग ! ॥

येथे ‘ मरत्या जीवाला पाजला घोट अमृताचा ! ’ असेंच नाही का वाटत ? या वर्णनांत अनुभवाच्या भावस्थितीचे स्पर्श आहेत, रसमाधुर्याचा ओघ आहे, संवेदनांची सार–समाधि आहे. अशा ठिकाणीं व्याख्येचा तंगपणा जाचक होतो, आपोआप ताणला जातो व शेवटी तुटून पडतो.

सारांश, कलेचा अनुभाव (dignity-splendour), प्रभाव (lustre), महिमा (greatness), अर्थगौरव (depth of meaning), आणि तिचें श्रेष्ठत्व (excellence) व औदार्य (magnanimity) हीं जेथे ज्या शब्दाने जास्त प्रतीत होतील तो शब्द तेथे योजणें चांगलें.

(यांतील नवीं उदाहरणें येथील सुप्रसिद्ध कवी श्री. ज. श्री. देशपांडे, वकील यांच्या अप्रसिद्ध काव्यांतून कांही ठिकाणीं थोडा फरक करून घेतलीं आहेत.)

अभ्राच्या गालीं— (मुक्तच्छन्द)

अभ्राच्या गालीं छान लागलें प्रकाशाचें बोट
अन्धाराला आला सोन्याचा फेंस
उन्च प्रासादाच्या मस्तकीं बसला
सोन्याचा मुकुट
सज्जे, माळे, गच्च्या, कळस, घुमट
न्हाले उजेडांत!

उजेड! उजेड!
साऱ्या दुनियेंत झाला उजेड!

त्रैलोक्यदीपका,—
अरे, पडूं दे रे
एकादा तरी किरण तुझा या चिंचोळ्या गल्लींत!

—राजकवि काळेले

●

शशिवदने!

★

शशिवदने, मन कठिण तुझें, पण अति कोमळ तनु!
हसित वदन पण दो भुवयांचें अदय तुझें धनु!
तूं देतेस ठराविक जेव्हा एक नकारच—
मी नुसता बघतोंच तुझें, सखि, वदन, नयन, हनु!

उपहासाचें रम्य तुझें कर मधुर हसित, सखि!
दिसलों तर कर बुद्धिपुरस्सर नयन चकित, सखि!
सौंदर्याचें घडवित दर्शन तूं 'नाही' म्हण:
मी जगतों पण एक चिरन्तन प्रेम करित, सखि!

धरणीभवती सन्तत फिरतो अति लम्पट, अधु—
हा अवमानित चिरवंचित पण अपराजित विधु:
चिरपरिचित या प्रतिकाराच्या अतिरेकातच—
असतो विजयी प्रीतीचा, सखि, अजरामर मधु!

—ना. घ. देशपाण्डे

●

उद्या

★

माझ्या भाबड्या भूमीचे
भुरके करडे कण
युगायुगांच्या पिक्यांना
त्यांनी दिधलें पोषण ! १

विझवी अदम आग
हें माथ्याचें दहिवर
उद्या डुलेल जगांत
गार ताऱ्यांचें शिवार ! २

कोर चौथीच्या चंद्राची
माझिया विळ्याची धार
उद्या झुकेल पुढती
हिरेजडित अंबर ! ३

माझ्या हातांत गोफण
इंद्रधनूची वीण रे
उद्या मिरासदारांची
पार होतील पाखरें ! ४

माझी दासाची बासरी
जगा मोहील गावोनी
उद्या काबाड कष्टांच्या
सांजरंगाची रागिणी ! ५

दयेमायेची यमुना
वाहे भरोनी दुथडी
उद्या येतील किनारीं
साऱ्या देशींचे सौंगडी ! ६

गुण्यागोविंदें खातील
कांदा चटणीभाकर
उद्या सच्चा विश्रमांना
समाधानाची ढेकर ! ७

माझा मोडका मावचा
हा उद्याचें सिंहासन
प्रेम सत्य शांति सत्ता
होईल विराजमान ! ८

माझ्या स्वप्नांच्या या कळ्या
दडल्या रात्रीच्या दळीं
फुलवायाला येईल
उद्या अंशुमाली माळी ९

भा. आ. पांढरीपांडे

(लघुनिबंध)

माझ्या मामाच्या घरीं—

शान्ताराम

✶

पुष्कळ दिवसांपूर्वी माझ्याशी माझा एक स्नेही जें बोलला, जसें बोलला तें सगळेंच्या सगळें मला आजहि स्पष्ट आठवतें. उत्तर हिंदुस्थानांतील निरनिराळीं प्रेक्षणीय स्थळें बघून तो नुकताच परतला होता. तो आपल्या प्रवासांतल्या अनेक गमती सांगेल व तें ऐकून आपण रंगून जाऊं अशा अपेक्षेने मी त्याला भेटलों, पण प्रत्यक्ष भेटींत मला असें आढळून आलें की त्याला खोदून-खोदून विचारल्याशिवाय त्याच्या तोंडून कांहीच निघत नाही. वाचलेल्या माहितीच्या आधारावर मी त्याला विचारावें "ताजमहालाचा गोल घुमट सुंदर दिसत असेल नाही ? प्रयागला संगमाच्या ठिकाणीं गंगायमुनांचें पाणी पांढऱ्याकाळ्या 'पट्ट्यासारखें दिसतें म्हणतात तें खरें का ? कुतुबमिनारकडे पाहतां पाहतां मान दुखूं लागली असेल अन् वरून खाली बघितलेंस तेव्हा आपण गलिव्हर आहोंत अन् खाली बुटक्यांचें राज्य आहे असें वाटलें असेल नाही ?" आणि त्याने थोडक्यांत उत्तर द्यावें अशा आमच्या प्रश्नोत्तरी गप्पा पुष्कळ वेळ चालल्या आणि शेवटी मला कंटाळा आला. बोलतां बोलतां तो जें मला म्हणाला, त्याच्या चेहऱ्यावर जे भाव प्रतिबिंबित झाले ते मात्र इतक्या वर्षांनंतरहि मी विसरूं शकलों नाही. मी जेव्हा त्याला पुष्कळच प्रश्न विचारले तेव्हा तो संथपणें म्हणाला, "काय सांगूं गड्या, कुतुबमिनारपुढे मी उभा होतों व वर पाहात होतों त्या वेळीं मला असें वाटलें; असें उंच उंच वाटलें, माझें डोकें विचारांनी इतकें भरून आलें, असें निराळें निराळें वाटूं लागलें की आपल्या सर्व भावना, सर्व विचार लिहून काढावे, म्हणून कागद-पेन्सील घेऊन बसलों. पण वाटेल तेवढा प्रयत्न केला तरी कागदावर चार वाक्यें धड उतरेनात. एवढें वाटत होतें आंत पण बाहेर कांही येईचना. माझ्याऐवजी तूं हीं स्थळें बघितलीं असतीस तर कांही फायदा झाला असता. नाही तर आमचें बघणें—नुसतेंच बघणें..."

हें सांगतांना त्याचा चेहरा इतका विषण्ण झाला होता की मलाहि थोडेसें वाईट वाटलें; आणि खोटें कशाला सांगूं ? त्याच क्षणीं मला हसूंहि आलें. सुदैवाने माझा तो स्नेही देखील स्वतःच्या असमर्थतेबद्दल खदखदून हंसला आणि हसत हसतच म्हणाला, "जाऊं द्या बेटं. नाहीच जमायचें आपल्याला."

माझ्या मित्रासारखं प्रत्येकाला कधी ना कधी वाटतं असेलच—मला तर तें नेहमीच वाटतें. एखाद्या गाण्याच्या बैठकीवरून परत आल्यावर मला वाटूं लागलें

की माझ्या मनांत सुरांची, तानांची, आलापांची नुसती गर्दी माजली आहे; पण गळ्याबाहेर त्यांतलें एक येईल तर शपथ. विहीरींतच नाही तर पोहऱ्यांत कुठून येणार ? ही म्हण एरवी खरी असेल–म्हणजे विहीरीच्याच बाबतींत तेवढी खरी असेल. पण गळ्यांत अडकलेल्या सुरांना किंवा डोक्यांत बंद असलेल्या शब्दांना ती मुळीच लागू पडत नाही. काय वाटेल तो प्रयत्न केला तरी गळ्यांत माजलेल्या स्वरांच्या जंगलांतून एखादें सुंदर मोहक संगीत-पुष्प मी खुडूं शकत नाही–इतरांना दाखवूं शकत नाही. खास मित्रांच्या सोबतींत मी कुठे सहलीला गेलों तर तसा प्रयत्न मी मुद्दाम करतों आणि केवळ मैत्रीखातर मित्र माझ्या गाण्याला देखील गाणें समजतात. पण तें खरें नव्हे. मित्रांच्या मेळाव्यांत किंवा स्नानगृहाच्या एकांतांत मी म्हणतों तें गाणं नव्हे. थोडा वेळ मी गाण्याचा प्रयत्न करतों खरा पण लगेच माझ्या त्या मित्रासारखें एकाच वेळीं विषण्ण होत व हसत हसत मी स्वतःशाच म्हणतों, " जाऊं द्या बेटं, नाहीच जमायचं आपल्याला ! "

पण मी माझ्या गाण्याबद्दल माहिती सांगितली ती नुसती ओघाने. माझ्या मित्राची अशी समजूत आहे की माझी निदान शब्दांबाबत तरी अशी ' करुणरम्य ' परिस्थिति होणार नाही. माझ्या त्या मित्राचा जसा माझ्याविषयी गैरसमज झाला तसाच तो इतरांनाहि होणें अशक्य नाही; किंबहुना स्पष्टच बोलायचें तर इतरांचा तसा गैरसमज वाढत्या प्रमाणावर होईलच. एवढेंच नव्हे तर आपल्याविषयींचा हा गैरसमज वाढविण्याचे मी सर्व प्रयत्न करीन. पण मला आज वाटतें तसेंच शेवट-पर्यंत वाटेल की आपल्याला कांही ' तें ' जमायचें नाही.

जें मला जमत नाही व कधींहि जमणार नाही अशी माझी खात्री आहे तें मी अट्टाहासाने कां करतों ? लिहिण्याचा हा अव्यापारेषु व्यापार मी थांबवत कां नाही ? कारण तो थांबवतां येत नाही. लिहिण्याच्या उद्योगाचें मला व्यसनांशी एक विचित्र साम्य दिसतें. व्यसनें कां जडतात या तपशीलांत मी जाणार नाही; मला जातां येणार नाही. लिहिण्याचें व्यसन माणसाला कां जडतें हें सुद्धा मला सांगता यावयाचें नाही. एवढें मात्र नक्की की कांही लोकांना जडतें आणि एकदा तें जडलें की सुटत नाही. आपण व्यसन सोडण्याचे प्रयत्न करतों खरें पण तें सुटत नाही. फार तर ज्यांच्या सहवासांत तें आपल्याला प्रथम जडलें त्यांच्याच देखत तें आपण करूं. सिगरेट ओढणें मला सर्वांच्या देखत आवडत नाही; मी त्यांना भितों म्हणून नव्हे, पण कांही ठराविक लोकांच्या बरोबरच सिगरेट पिणें मला आवडतें. त्यांनी सिगरेट दिली की माझ्या-च्याने ' नाही ' म्हणवत नाही. मी एखादे वेळीं ' नाही ' म्हणालों तरी ते म्हणतात, " राहूं दे आम्हांला माहीत आहे. उगीच लपवतोस कशाला ? हं चल ओढ. " माझ्या लिहिण्याबाबत देखील माझी अशीच वृत्ति आहे. चार रसिक व सहृदय मित्र सोडले तर मी कुणाच्या समोर लेखक म्हणून मिरवत नाही. कांही लेखक मिरवतात. मिरवोत बिचारे. मला त्यांच्याविरुद्ध कांही म्हणायचें नाही. मला तें जमत नाही; आवडत नाही. आता सिगरेटचा वास जसा लपून राहत नाही तसा माझ्या लिखाणाचा वास लोकांना आला तर मी काय करणार ? तसें होत असलें तर मी माझ्या व्यसनाची स्पष्ट कबूली देऊन मोकळा होतों झालें. तेंच माझ्या लिखाणाचें. सांगण्याचा मतलब असा की एकदा जडलेलें लिखाण सहसा सुटत नाही. क्वचित् उपरति होऊन सगळाच आनु-

अनुक्रमणिका

कांहीं बदल झाला तर गोष्ट वेगळी. एरवी लिखाण सुटायचें असेल तर तें लागण्या-पूर्वीच— त्यानंतर क्वचितच. आणि आपण समजतों त्यापेक्षा किती तरी अधिक लोकांना हें लिहिण्याचें व्यसन जडलें असतें. त्यांनी कितीहि लपविलें तरी त्यांचीं पत्रें, त्यांचे अर्ज; त्यांच्या विनंत्या पाहिले की किती लोकांना हें व्यसन जडलें आहे हें चटकन् कुणाच्याहि लक्षांत येईल. फार काय, माझा एक मित्र गणिताचा प्राध्यापक आहे; त्याच्याकडे आलेल्या गणिताच्या वह्या वाचतांच त्याची आणि माझी खात्री पटली की गणिताचें विद्यार्थी म्हणविणारे पुष्कळसे लिहिण्याचें व्यसन करीत असतात—गणिताची वही भरतां भरतां, गणित सोडवितांना देखील! "माझा हा ड्राफ्ट तर बघा. एकदा वाचून बघाच." असें म्हणणाऱ्यांत नियमित लेखकां-पेक्षां मला कचेरींतल्या कारकुनांची व त्यांच्या साहेबांचीच संख्या अधिक आढळली. कांहीजण तर हें व्यसन इतक्या गुपचुप तऱ्हेने कुणालाच पत्ता न लागेल अशा तऱ्हेने करत असतात की त्यांच्या मृत्यूपर्यंत कुणाला माहितसुद्धा नसतें; ते कुणाला कळूंच देत नाहीत. त्यांच्या यशस्वी व निरोगी आयुष्याचीं कारणें शोधतां शोधतां त्यांच्या डायऱ्या आपल्या हातीं पडतात अन् मग त्यांच्या व्यसनाविषयी आपल्याला कळतें. कोणत्याहि व्यसनाबद्दल नेहमी सांगण्यांत येतें की अल्प प्रमाणात तीं मोठीं उपकारक असतात. व्यसनांच्या बाबतींत तें कितपत खरें आहे हें मी सांगूं शकत नाही. पण लिखाणाच्या बाबतींत मात्र तें सर्वस्वी खरें आहे अशी माझी श्रद्धा आहे. लिखाणामुळे जीवनांत एक सुसंगत आकार निर्माण होतो. लिखाणाशिवाय आयु-ष्याला आकार उरत नाही; रंग येत नाही. अशा आयुष्याविषयी मला तिरस्कार आहे; त्यापेक्षा प्रयत्न करून " जाऊं द्या वेट. आपल्याला नाही जमायचें " असं म्हणणारा माझा स्नेही मला आवडतो. कारण माझी खात्री आहे की त्याने " जाऊं द्या " म्हटले तरी तें जात नाही—जमणार नाही ही गोष्ट निराळी. जमणार नाही यात वाईट वाटण्याचें कारण नाही. तो जसा हसला तसेंच हसायला हवें. लिहिणें सुटत नाही म्हणून वाईट वाटून घेण्याचेंहि कारण नाही. एखादा माणूस व्यसनामुळे वाया गेला तर त्याचें आणि इतरांचें नुकसान होईल पण लिखाणामुळे एखादा वाया गेला तर कुणाचेंच कांही नुकसान होणार नाही. माझ्यापुरतें बोलायचें तर लिखाणा-मुळे वाया जाण्याइतकें मी लिहीत नाही; आणि उद्या कदाचित् वाया गेलोंच तरी मला वाईट वाटणार नाही. पण इतकें मात्र खरें की लिखाण एकदा जडलें की सुटत नाही अन् म्हणूनच मी स्वतःच्या असमर्थतेबद्दल खिन्न होत अन् हंसत लिहिणार आहे. अर्थात् मला तें कधीच जमायचें नाही हेंहि तितकेंच खरें.

मला लिहिणें जमणार नाही असा मी सारखा उद्‌घोष कां चालवला आहे! एखाद्या टीकाकाराने मला सांगितलें, " बाबारे, तुला नाही जमायचें तें " आणि मी आपला बचाव करीत आहे असा मुळीच प्रकार नाही. कारण एखाद्या टीकाकाराचें मी ऐकणारा नव्हे; तेवढ्यासाठीच तर मी व्यसनाचा उल्लेख— चांगला भरपूर उल्लेख केला. एक तर सुदैवाने मला तसें बजावायची नोंद घेण्यासारख्या टीकाकाराला सवड झाली नाही. दुसरें, सदैव पाईप तोंडांत घालून हिंडणाऱ्याचें धूम्रपान डोळ्यांत भरतें आणि टीकेचा विषय होतें. माझें लिहिणें आहे घरच्या घरीं फक्त जेवण झाल्यावर अर्धामुर्धा चिरूट ओढण्यासारखें! तेवढ्याच प्रमाणात तें इतरांना माहीत आहे. त्यामुळे कुणी माझ्या सवयीवर भाष्य करावें इतकी ती डोळ्यांत भरणारी

नाही. याउपर एखाद्याने हुडकून तिचा शोध लावलाच आणि आपलें मत प्रदर्शित केलें तर हुरळून जाण्यासारखा अथवा चिडून जाण्यासारखा सामान्यत: माझा स्वभाव नाही. शिवाय माझ्या लिहिण्याचा बरेवाईटपणा मी व्यक्तींपेक्षा पुस्तकांवरून अधिक ठरवतों. पुस्तकांत व्यक्तींच्यापेक्षा अधिक सुसंगति असते; त्यांचे पूर्वग्रह, न पटणारीं विधानें बाजूला सारण्याची सोय असते. तेव्हा टीकाकारांच्या किंवा वाचकांच्या विरूद्ध ढाल म्हणून मी माझ्या लिखाणांतील अपुरेपणाचा, उणीवेचा, असमर्थतेचा वारंवार उच्चार करीत नाही. मला खरोखरच वाटतें की आपल्या मनांत जें जें येतें, हृदयांत जें जें कल्लोळ करतें तें सर्वच्या सर्व मला शब्दांत उतरवतां येत नाही; मलाच नव्हे कुणालाच येत नाही; कुणी तसा प्रयत्न देखील करूं नये; जिथे शेक्सपीयरसारखा दिव्य कलावंत अपयशी ठरला तिथे येरागबाळांचें काय काम ! हो, शेक्सपीअर अयशस्वी ठरला.

शेक्सपीअरवर काय वाटेल तें बोलतां येतें ही सोय असल्यामुळे— केवळ तेवढ्यामुळेच— मी असें म्हणत नाही. पण शेक्सपीअर किंवा अशाच दुसऱ्या महान् लेखकाचें लिखाण वाचत असतांना लिखाणाच्या सर्वसामान्य अपयशाची मला सारखी जाणीव होत असते. हॅम्लेट मी पुष्कळदा वाचलें, हॅम्लेटवरहि मी बरेंच वाचलें आणि तरीहि एखाद्या गणिताचें निश्चित उत्तर काढावें तसा मी हॅम्लेटचा अर्थ काढूं शकलों नाही. कुठल्याहि लिखाणाचा निश्चित अर्थ निघेल— पिळून सगळा अर्थ काढतां येईल असें मला वाटत नाही. बरेंचसें कळलें आहे; आणि त्याहून पुष्कळसें कळायचें राहलें आहे असेंच सारखें वाटत असतें. कित्येकदा तर असें वाटतें की हॅम्लेट परीक्षेला असतांना आपण पास झालों इतपतच त्याचा अर्थ आपल्याला कळला आहे. शेक्सपीअरला तरी कळला होता की नाही कोण जाणे ! शेक्सपीअर झाला म्हणून काय झालें ! पाण्याच्या पृष्ठावर येऊन तर कधी आंत जाऊन बघणाऱ्या माशासारखें त्याला फार तर जीवनाचें दर्शन झालें असेल ! मासा केवढाहि मोठा झाला तरी तो असें का म्हणूं शकणार आहे "मला जीवन समजलें" ! फार तर कुतुबमिनारासमोर उभा राहून कांही तरी उंच उंच, निराळें निराळें वाटून बेणाऱ्या माझ्या मित्रासारखा तो नुसता थक्क होईल. किती रंग, किती ढंग, किती आकार, किती विकार, किती विचार, किती अविचार, किती संगति, किती विसंगति, किती जीव, किती धडपड— हें सगळें समजायचें कसें आणि कुणी ! समजलेंच तर कितपत समजेल ! समजलें तेंच खरें कशावरून ! जाणवलें तेंच सत्य कशावरून ! हा पारा पकडायचा कसा आणि कुणी ! प्रत्येकाचें जग निराळें; माझें निराळें, तुमचें निराळें, आंधळ्यांचें निराळें, डोळसांचें निराळें, डोळसांचें देखील निरनिराळें, माणसांचें निराळें, पक्ष्यांचें निराळें, प्राण्यांचें निराळें, हें जग पाहून, अनुभवून, जाणवून, कल्पून नुसतेंच कंपित व्हायचें, थरथरायचें आणि ही थरथर कागदावर उमटवायची ! लहान लहान बाळें नाही का एकमेकांना मारे कांही तरी सांगत असतात; एकमेकांचें कांही तरी समजत असतात, खूष होत असतात; भांडत असतात, तसलाच हा पोरखेळ, एक खेळ मांडायचा; आपल्या हाताने तो मोडायचा; पुन्हा दुसरा मांडायचा; थोडा वेळ हसवायचें, थोडा वेळ भांडायचें; थोडा वेळ इतरांना समजावायचें, थोडा वेळ समजून घ्यायचें, हे सगळें कसें लिहितां येईल ! नुसती धडपड करायची— पुष्कळदा अभिनिवेशाने धडपड करायची अन्

शेवटी म्हणायचें, " जाऊं दे बेटं " आणि खिन्न व्हायचें, हसायचें, पण प्रयत्न मात्र " जमणार नाही " म्हणून सोडायचा नाही.

गाण्याच्या मैफलींत नाही का गवई गातो, कंठांतून सूर काढतो, पोटांतून काढतो. पुष्कळसे सूर निघतात. सारखे हातवारे करून त्यांना पकडत असतो; त्यांना कानपिचक्या देतो. तेव्हा कुठे तो समेवर येतो. तो खुलतो; श्रोते खुलतात. पण त्याचें कारण एवढेंच की तेवढेच सूर, तेवढ्याच ताना पकडायच्या असा गायक आणि श्रोत्यांत कट असतो; एकमेकांशी संगनमत करून आपल्या आवाजाची, आपल्या ऐकण्याची मर्यादा ते ठरवीत असतात. पण त्या मर्यादेपलीकडे जायचा प्रयत्न केला की अपयश, जमलें नाही म्हणायचें, नुसतेंच हातवारे करायचे, अपयशा-बद्दल हसायचें; दुःखी व्हायचें. पण ही मर्यादा निश्चित नाही, जितकें जायची ताकद असेल तितकें पुढे जायचें. जाण्याला भरपूर वाव आहे. वाव आहे म्हणूनच पुढे जायचें; जितकें जाववत असेल तितकें पुढे जायचें; प्रत्येक टप्प्याला म्हणायचें " नाही जमत बुवा. " पण पुढेंच जायचें. कारण त्या मार्गावर टप्पे मुळीं नाहीतच. असलेच तर ते आपण ठरवलेले, प्रत्येकाच्या मर्यादित शक्तीने ठरवलेले !

ही धरपकड करा कशासाठी ? केल्याशिवाय राहवत नाही हें तर उत्तर आहेच. पण ही झाली निव्वळ मुजोरी. हें कांही खरें उत्तर नव्हे. जगाच्या विविधतेची, विशालतेची, वैचित्र्याची सारखी क्षणाक्षणाला जाणीव होत असते. विविध संवे-दनांची, अनुभवांची, कल्पनांची, प्रतिमांची, विचारांची आंतल्या आंत गर्दी होत असते व ती आपल्याला जाणवत असते. पण ही जाणीव पकडतां येत नाही; पकडायला जावें तो पुष्कळसें निसटून जातें आणि विरून जातें. रात्रीं ताऱ्यांच्या अफाट पसाऱ्याकडे पाहिलें तर किती अगणित चमकत्या जगांचें दर्शन होतें; पण सकाळीं उठून पाहावें तों कांही नाही. ' माझ्या मामाच्या घरीं हजार गाई सकाळीं उठून कांही नाही ' असा प्रकार ताऱ्यांच्या बाबतींतच होतो असं नाही. आपल्या अनुभवाच्या बाबतींत आपल्याला येणाऱ्या विश्वाच्या प्रत्ययाबाबत सारखा होत असतो. पण त्यामुळे आपल्या आंतरिक संपत्तीचा मात्र आपल्याला सुगावा लागतो; त्यामुळे आनंदाचीं, सुखदुःखाचीं हजारो कारंजीं आंतल्याआंत उडतात व सकाळच्या दवाने ओलींचिंब झालेल्या फुलासारखे आपण ताजेतवाने होत असतो; क्षणोक्षणीं नवीन होत असतों. ही सगळी संपत्ती, हें सगळें नाविन्य, ही सगळी प्रसन्नता, ही सगळी विविधता शब्दांच्या चिमटींत कशी पकडायची ? कुणी पकडायची ? कुणाच्या हातीं लागली तरी अंशतःच ! जें मोठमोठ्यांना साधलें नाही तें मला साधणार नाही म्हणून विषाद कां ? विषाद वाटला तरी क्षणभरच आणि तरीहि जें वाटलें तें मला किंवा कुणालाहि लिहायलाच हवें. कारण त्याशिवाय मनाचीं सगळीं कारंजीं खुलणार नाहीत. त्यात मला अपयश आलें तरी हरकत नाही. निदान त्यामुळे माझ्या गळ्यात असंख्य सूर खेळूं लागतील. हे सूर ज्याचें त्याला ऐकूं येतात. इतरांना कदाचित् ऐकूं येणार नाहीत. पण ज्याने ते सूर थोडेसे कां होईना पण ऐकले त्याला कळेल की श्रुत स्वरांच्या गोडीपेक्षा या अश्रुत स्वरांची माधुरी कांही औरच आहे, अवीट आहे. हे अश्रुत स्वर जागवायचे असले तर ज्याला जेवढे जमेल तेवढे त्याने गळ्यांतून काढलेच पाहिजे; जेवढे लिहितां येईल

तेवढें लिहिलें पाहिजे, जेवढें दाखवतां येत असेल तेवढें दखविलें पाहिजे, तरच जें सुरांच्या पलिकडे आहे, बोलाच्या पार आहे त्याचा साक्षात्कार होईल. तो थोड्याशाच प्रमाणांत जरी प्रत्येकाला झाला तरच आयुष्याला अर्थ आहे. तरच आयुष्यांत माझ्या मित्राला कुतुबमिनारमुळे वाटलें तसें उंच उंच निराळें निराळें नाही तर आयुष्यांत आहे काय दुसरें ! एरवी तो एक गद्य, रुक्ष व्यवहार आहे.

मी कितीहि भरकटत बसलों तरी माझ्या मनांतलें सगळें मी सांगूं शकणार नाही; फार तर संकेत करूं शकेन आणि तो करतां करतां स्वतःच्या असमर्थतेंत जें अपयश आहे त्याची गोडी अनुभवत बसेन. माझ्या असमर्थतेबद्दल मला मुळीच खंत नाही. माझ्या त्या मित्रासारखेंच मीहि नुसतें हसायला हवें !

●

गोंडवन साहित्य संस्था, चंद्रपूर

[उद्दिष्ट आणि कार्य]

चंद्रपूर हा जिल्हा प्रामुख्याने गोंडवनांत मोडतो. तो वाङ्मयीन व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला म्हणून नांवाजलेला नि उपेक्षित असा आहे. या जिल्ह्यांत वाङ्मयविषयक व शिक्षणाला पूरक अशी समाजोपयोगी एकहि संस्था नाही. भौगोलिक दृष्ट्या हा भाग आधीच एका बाजूला पडत आहे आणि दळणवळणाच्या दृष्टीनेहि ह्या भागाला शेवटचेंच स्थान आहे. वास्तविक हा भाग पौराणिक, ऐतिहासिक आणि इतर अनेक दृष्टींनी महत्त्वाचा, तसाच निसर्गसंपन्न असूनहि उपरोक्त कारणांनी मागे पडत आहे. ह्याकरिता ह्या भागाची अेक प्रातिनिधिक संस्था म्हणून "गोंडवन साहित्य संस्था" नांवाची एक समिति २६ जानेवारी १९५० ला स्थापन करण्यात आलेली आहे. तिचा प्रचार व प्रसार जिल्ह्यांत व भौगोलिक दृष्ट्या गोंडवनाची जी प्रादेशिक मर्यादा आहे तेथपर्यंत करावयाचा आहे. ह्या कार्यासाठी स्थानिक व जिल्ह्यांतील सर्व वाङ्मयप्रेमी लोकांचें सहकार्य हवें आहे. समितीपुढील प्राथमिक उद्दिष्ट जिल्हाभर संस्थेचे सभासद तयार करावयाचें असून तदनंतर आपल्या भागांतील वाङ्मय प्रसिद्ध करावयाचें, संस्थेच्या गोंडवनांतील प्रमुख ठिकाणीं शाखा स्थापन करावयाच्या, शक्यतोंवर "मधुवन" नामक मासिकपत्रिकेद्वारा वाङ्मय, शिक्षण व अद्यावत् साहित्याची प्रचार व प्रसार करावयाचा, त्याकरिता मध्यवर्ती ग्रंथालयाची योजना करावयाची आणि या वैभवशाली गोंडवनाला ललामभूत अशा "साहित्य मंदिराची" उभारणी करावयाची असें आहे.

श्री. वा. ना. विगम
सरचिटणीस गों. सा. सं.

कला म्हणजे काय ?

काका कालेलकर

★

कल्पनातरंग दोन तऱ्हेचे असतात, प्राणवान् आणि हतप्राण किंवा अल्पप्राण. कवि व चित्रकार पवित्र असतील तर प्राणवान् भावना त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करतात; प्राणवान् विचाराचे फवारे त्यांच्या लेखणींतून किंवा कुंचलींतून उडूं लागतात आणि अखिल समाज हादरून जागा होतो. तोच कवि किंवा चित्रकार विलासी असला तर तो समाजाला हतप्राण कल्पनांचा कैफ चढवतो व समाज वीर्यहीन बनतो. आणि जर का तो कवि किंवा चित्रकार स्वतःच अल्पप्राण असेल तर त्याची निर्जीव कलाकृति अथवा कविता जन्मल्या ठिकाणींच नाश पावते.

यथार्थदर्शी कलेला कलाच म्हणतां येत नाही. विषयमुग्ध होऊन एकांतांत केलेला विलास उघडपणें लोकांच्या नजरेस पडल्यास जशी लाज वाटते, तशीच लाज यथार्थदर्शी कला पाहतांना वाटावयास पाहिजे. जें चित्र पाहिलें असतां मनांत उपभोगाची किंवा विषयाची कल्पना येते तें चित्र अपवित्र होय. अशा प्रकारचीं चित्रें कित्येक वर्षांपूर्वी राजवाड्यांतील अन्तःपुरांतून टांगून ठेवण्याची फॅशन होती. संयमविमुख पाश्चात्य आदर्शांमुळे किंवा शिरस्त्यामुळे हल्लीं हल्लीं अशीं चित्रें प्रतिष्ठित गृहस्थांच्या दिवाणखान्यांतहि दिसूं लागलीं आहेत. अधःपाताचा यापेक्षा सबळ पुरावा काय पाहिजे ?

दूर दूर झुकतील–

★

जाति–केशवकरणी

दूर दूर झुकतील आपुल्या नौका लाटांवरी
स्वैर सखि, कल्लोळीं सागरीं !
शांततेमधीं सहचरासवें तरशिल तूं अंबुधी,
विमल तुज न्हाणिल मधु कौमुदी !

परि अथांग दरिया पिऊनियां वारुणी
घालील पुढे थैमान पुरा झिंगुनी !
मम गिळील जीवा श्रमां तुंग ऊर्मिनी !

एकच परि परतीराहुनि तव नजरेने प्रेमले,
मुग्ध मृत मज संजीवनि मिळे !
लुकलुकती ह्या अनंत नाभिं निशिं ओघळल्या तारका !
एक तरि उजळिल मम मार्ग का ?

शोधितों जिवींची माझी मी प्रेमला,
कीं जीव तिचा वंचका जगा लोभला !
घरट्यांत दंग वा द्रवल्या भरवित पिलां !

अहा ! पहा, उगवली निळी तव चमचमती चांदणी,
हिरकणी कोंदणीं तेजस्विनी !
असें तुझें मीं चित्र रेखिलें हृदयीं रम्य—भव्यसें,
हरपलें काळमानही दिसे !

जा दिगंतरा तूं सुखें कुठे उडुनियां,
तव स्मृतिंनी फुलविन जीवनास माझिया,
विनवितों परी तुज, स्मरुनि आंसवांस या—

राहूं दे तव हृदयीं एवढी स्मृति माझी कोमला—
"होता जीव कुणी एकला !"

—अरविंद मंगरूळकर

बालझाक्

मधुकर केशव शेटे

★

अप्रतिम कल्पनावैभव हा जर लेखकाचा प्रधान गुण मानला तर बालझाक्ला बरेंच महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. आपल्या कल्पनेंतून नित्य नवी प्रतिसृष्टि निर्माण करण्यांत त्याचा हात खंडा असे. केवळ फ्रान्समध्येच नव्हे तर जगांतहि एवढें विपुल लेखन करणारा साहित्यिक दुसरा क्वचितच झाला असेल. आपल्या कल्पनाशक्तीला बटीक बनवून तिला त्याने अक्षरशः राबवलें.

लेखकाच्या जीवनाचा त्याच्या लेखनावर अटळ परिणाम होतो. साहित्यिकाला ज्या परिस्थितींतून जावें लागतें तिचा ठसा कळत न कळत त्याच्या साहित्यावर उमटतोच. बालझाक्च्याहि जीवनाचें प्रतिबिंब त्याच्या लिखाणांत आरशासारखें स्पष्ट दिसतें. ज्या अनुपम कल्पकतेच्या साह्याने त्याने एवढी प्रतिसृष्टि निर्माण केली तिचा पाया त्याच्या लहानपणींच रचला गेला. इ. स. १७९९ सालीं एका प्रतिष्ठित व श्रीमंत घराण्यांत ऑनर द बालझाक्चा जन्म झाला. बालकांना हक्काने मिळणारें आईचें प्रेम मात्र त्याला मुळीच मिळालें नाही. सर्व सुखसाधनांची रेलचेल असूनहि त्याची आई नेहमीच असंतुष्ट असे. पैसा खर्च करणें म्हणजे महत्पाप; पैसा कमावण्यासारखें पुण्यकर्म नाही, अशा विचाराची ही स्त्री होती. हिच्याकडून बालझाक्ला मातृसुख मिळालें नाही. कारण, मुलांना करड्या शिस्तींत ठेवून त्यांच्यासाठी कमींतकमी खर्च करायचा अशी तिची विचित्र नीति होती. म्हणूनच, 'मला आईच नव्हती' असे त्याने कडवटपणाने पुढे उद्गार काढले. जन्मापासून चार वर्षेपर्यंत तो दाईच्या घरीं वाढला. ह्या अवधींत घर त्याला वर्ज्य असे. फक्त सुटीच्या दिवशीं आपल्या आईबापांना भेटण्याची परवानगी होती. तो सात वर्षांचा झाला तेव्हा त्याला दूरच्या एका शाळेंत डांबण्यांत आलें. तेथेच वसतिगृहांत त्याची राहण्याचीहि सोय होती. ह्या ठिकाणीं सात वर्षे त्याला मठांतल्यासारख्या कडक शिस्तींत व जाचांत काढावीं लागलीं. अधिक खर्च येऊं नये म्हणून त्याची आई त्याला गरम कपडे व मोजेदेखील पाठवीत नसे. फ्रान्सच्या त्या कडक थंडींत लहानग्या बालझाक्ने तीं सात वर्षे कशीं काढलीं असतील कोणास ठाऊक! आईच्या ह्या उदासीनतेमुळे तो लहानपणापासूनच तिचा द्वेष करीत असे. 'कधीहि न भरून येणारी जखम' असा त्याने तिच्यासंबंधीं उल्लेख केला आहे. वसतिगृहांतल्या त्या तुरुंगवासाचें वर्णन पुढे त्याने 'लुई लाँबेआ' ह्या कादंबरींत केलें आहे. मातृप्रेमाला

पारखा झाल्यामुळे व तेथल्या हालांमुळे त्याचा स्वभाव अतिशय संवेदनाक्षम बनला. कठोर वास्तवतेपासून दूर जाऊन रम्य स्वप्नसृष्टींत विहार करण्यास त्याने आतापासूनच सुरवात केली. त्या अमानुष व निष्प्रेम वातावरणाने त्याच्या अफाट कल्पनाविलासाचा पाया घातला.

चवदाव्या वर्षी ह्या भयानक शाळेंतून त्याची मुक्तता झाली. पण तो घरीं परततो न परततो तोंच दुसऱ्या एका तेवढ्याच कडक शाळेंत त्याची रवानगी करण्यांत आली. आपल्याच कल्पनासृष्टींत विहार करीत असल्यामुळे स्वप्नाळू बालझाक्चा नंबर शाळेंत शेवटी कोठे तरी असे. दैवानेच हात दिल्यामुळे तो कसाबसा १८१६ साली मॅट्रिक झाला.

पण तो मॅट्रिक झाला तरी त्याच्या मागचा आईचा ससेमिरा कांही सुटला नाही. विद्यापीठांत शिकत असतांनाहि त्याचा मोकळा वेळ व्यर्थ जाऊं देण्याला ती तयार नव्हती. म्हणून विद्यापीठांत शिकत असतांनाहि बिचाऱ्या बालझाक्ला रिकाम्या वेळांत एका वकीलाकडे कारकुनाचें काम करावें लागे. मुलाने कमींतकमी खर्च करून जास्तींत जास्त पैसे मिळवावेत असें इच्छिणाऱ्या आईबापांकडून बालझाक्ला आणखी काय मिळणार !

हा जाच असह्य होऊन १८१९ सालीं बालझाक्ने स्वतंत्र जीवन जगण्याचें ठरवलें. त्याने कारकुनीला रामराम ठोकला व लेखक होण्याचा निश्चय केला. ह्या त्याच्या निश्चयाने त्याच्या प्रतिष्ठित घराण्यांत एकच कल्लोळ उडाला. एवढ्या मातबर घराण्यांतल्या मुलाने लेखकाची दरिद्री वृत्ति पत्करावी म्हणजे काय ! पण आता बालझाक् हट्टालाच पेटला होता. सर्व बंधनांतून मुक्त होण्याचा त्याने पणच केला होता. प्रथमच त्याच्या आईला त्याच्यापुढे हार खावी लागली. आणखी दोन वर्षेपर्यंत अगदीं मोजकाच खर्च त्याला देण्याचें तिने कबूल केलें. ह्या अवधींत बालझाक्ने लेखन करावें. पण ह्या दोन वर्षांत त्याच्या बुद्धीचा प्रकाश न पडल्यास त्याला परत आपल्या कारकुनीवर हजर व्हावें लागणार होतें.

आता आईमुलांतील झगड्याला नवीन वळण लागलें. मुलाने ह्या दरिद्री छंदाचा नाद सोडावा म्हणून त्याच्या आईने भगीरथ प्रयत्न सुरू केले. पॅरिसच्या दरिद्री वस्तींतील सर्वांत भिकार खोली त्याला पाहून दिली. तुटका दरवाजा व मोडकें छप्पर असणाऱ्या ह्या खोलींत बालझाक्ने आपल्या साहित्यसेवेला सुरवात केली. त्याच्या आईने पुरेसे पैसे न दिल्यामुळे, त्याला स्वतःच पाणी आणावें लागत असे.' साधा हातरुमाल देखील तो विकत घेऊं शकत नसे. त्या खोलींत उन्हाची घगधग व थंडीची पीडा सारखीच असह्य होई. पण बंधनांचे पाश तुटल्यामुळे व कल्पनेचे पाठबळ असल्यामुळे, त्या दरिद्री खोलींत तो राजवैभवाचें सुख भोगूं लागला. एखाद्या नवशिक्या लेखकाप्रमाणे प्रथम काय लिहावें हेंच त्याला कळेना. शेवटी 'क्रॉम्वेल'वर शोकान्तिका रचण्याचें त्याने ठरवलें. जीवनाचा व लिहिण्याचाहि अनुभव नसताचाच असल्यामुळे त्याचें पहिलें लिखाण अर्थातच टाकाऊ निघालें. पण एवढ्याने निराश न होतां कादंबरी—लेखनाकडे त्याने आपला मोर्चा वळवला. पण कशा तरी जुळवलेल्या ह्या नश्वर कृति क्षणकस ठरल्या. दोन वर्षांच्या अवधींत कसे तरी पैसे मिळ-

वून आईबापांच्या जाचांतून मुक्त होणें त्याला आवश्यक होतेंच. म्हणून लेखनाची नियमित भट्टीच त्याने सुरू केली. ह्या भट्टींतला ताजा माल पॅरिसच्या पुस्तक-विक्रेत्यांकडे जाऊं लागला. प्रथम बाल्झाक् टोपण नांवाने व क्वचित् दुसऱ्या लेखकांच्या सहकार्याने लिहीत असे. लक्ष्मी आता थोडीशी प्रसन्न झाली होती. केवळ पैशासाठी तो लेखणी झिजवूं लागला. एखाद्या यंत्रासारखी त्याची लेखणी चालत असे. दरवर्षी २५-३० कादंबऱ्या लिहिणें म्हणजे त्याच्या हातचा मळ होता. दुर्दैवाने हें पहिलें लिखाण टोपण नांवानी लिहिलेलें असल्याने ह्याची नीट मोजदादहि होऊं शकत नाही.

लहानपणापासून बालझाक् प्रेमाचा भुकेला होता. आईचें नैसर्गिक प्रेमहि ह्याला मिळालें नव्हतें. प्रेमाची ही तहान आता उफाळून आल्यास नवल नाही. त्याच्या शेजारीं नऊ मुलांची आई असलेली एक पंचेचाळीस वर्षांची स्त्री राहात असे. प्रत्येक स्त्रीला हेलन मानणारा स्वप्नाळू बालझाक् ह्या पोक्त स्त्रीकडे आकर्षिला गेला. ह्या मदाम द बर्नीकडे तो प्रेयसी व माता ह्या दोन्ही नात्यांनी पाहूं लागला. त्यांच्या वयांतील वाढत्या अंतरामुळे ह्या प्रेमसंबंधांतील वैषयिकता हळुहळू कमी होत गेली. पण मदाम द बर्नीच्या मृत्यूपर्यंत हा स्नेह कायम होता. प्रेमाला आसुसलेल्या तरुण बालझाक्चें पहिलें प्रेमनिधान म्हणून ह्या स्त्रीला महत्त्व आहे. "ती माझी माता, मित्र, पत्नी, सहकारी व सल्लागार होती," ही बालझाक्ची हिच्याविषयी भावना असे.

सारासार विचार न करतां कोणत्याहि कामांत सर्वस्व पणाला लावणें हा त्याचा बाणा असे. कादंबऱ्या आपल्या नांवाने प्रसिद्ध करूं लागल्यापासून त्याला थोडी प्रसिद्धीहि मिळूं लागली. त्याची पत वाढून त्याला कर्ज मिळत गेलें तसतसा तो अधिकाधिक कर्जबाजारी बनला. त्याच्या कादंबऱ्या प्रसिद्ध करणाऱ्या एका भागीदारींतून इतरांनी अंग काढून घेतलें, एकटा बालझाकच तेवढा भागीदार उरला. छापखानेवाले, कागदवाले ह्यांचें देणें देतां देतां त्याला १५ हजार फ्रँकचें कर्ज झालें. हें कर्ज मात्र ह्याला कधीच फेडतां आलें नाही. तें उलट वाढतच गेलें. ह्या कर्जातून मुक्त होऊन आपण लक्ष्मीला पायाशी लोळण घ्यायला लावूं अशी त्याला शेवटपर्यंत खात्री वाटत असे, पण दुर्दैवाने तो कधीच ऋणमुक्त झाला नाही.

कारण ज्या कामाला हात लावूं तें यशस्वी होईलच असा त्याला भलताच आत्मविश्वास. आता लेखनाखेरीज इतर व्यवसायहि त्याने हाताळण्यास सुरवात केली. कर्ज फेडण्यासाठी तो जें जें करी त्यामुळे त्याचें कर्ज कमी न होतां वाढत मात्र असे. लेखनांत त्याला नेहमी अनुकूल पडणारा दैवाचा फांसा इतर बाबतींत हटकून प्रतिकूल पडे. त्याने स्वत:चा छापखाना चालवण्याला सुरवात केली. नेहमीच्या दुर्दम्य उत्साहाने टाईप जुळवण्यापासून मुद्रितें तपासण्यापर्यंत सर्व कामांत तो जातीने लक्ष घाली. पण अनुभव नसल्यामुळे ह्या कामांत त्याला प्रचंड कर्ज झालें. कामगार रोख पैसे मागूं लागले; बालझाक्च्या प्रॉमिसरी नोटा त्यांना आकर्षक वाटेनात. हें कर्ज फेडण्यासाठी ह्या बहाद्दराने नवीन उपक्रम सुरू केला. एक टाईप फाउंड्री ह्याने चालू केली. सर्व फ्रान्समध्ये आपल्या टाइपाला प्रचंड मागणी

असल्याचीं स्वप्नें त्याला पडूं लागलीं. पण झाले भलतेंच! त्याच्या भागीदारांनी वेळींच आपलें अंग काढून घेऊन धूर्तपणाने कामाचा सर्व भार बालझाकवर झोंपवला, झालें; बालझाकचें कर्ज आणखी वाढलें. बालझाकने कोणत्याहि कामाला 'हात लावला की कज' असा विचित्र प्रकार सुरू झाला.

नेपोलियनप्रमाणेच परिस्थितीशी झुंजण्याचा त्याचा स्वभाव होता. आता निराळेंच नांव धारण करून तो पॅरिसच्या एका अप्रसिद्ध विभागांत गुप्तपणें राहूं लागला. सावकारांना आपला पत्ता लागूं नये म्हणून त्याने ही युक्ति केली. त्याने आपला लेखनाचा कारखाना अविश्रांत चालू ठेवला. आता त्याचें कर्ज साठ हजार फ्रँकपर्यंत फुगलें होतें. हें कर्ज फेडण्यासाठी सर्व शक्ति एकवटून त्याने लेखन सुरू केलें. वडिलांपासून त्याला उत्तम शरीरसंपदेची देणगी मिळाली होती. म्हणून ह्या अतिश्रमाचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर प्रथम कांही वर्षें तरी दिसला नाही. त्याच्या इतर सर्व गोष्टींप्रमाणे लिहिण्याची पद्धतहि विचित्र होती. कामाकरता दिवस व विश्रांतीकरता रात्र हें वेळापत्रक त्याने पार बदलून टाकलें होतें. रात्रीं बारा वाजतां जागा होऊन बालझाक लिहिण्याला सुरवात करी. सावकारांच्या कचाट्यांतून सुटून निवांत लेखन करतां यावें म्हणून बालझाकने ही चमत्कारिक वेळ पसंत केली होती.

लिहिण्याच्या अगोदर बालझाक एक विशिष्ट पद्धतीचा पायघोळ झगा घालीत असे. त्याच्या लिहिण्याच्या टेबलावर निळसर कोऱ्या कागदांचा गठ्ठा, चार लेखण्या व त्याची विद्यार्थीदशेंतील दऊत ठेवलेली असे. पांचसहा तास अविश्रांत लेखन केल्यावर तो कॉफीपान करी. आपल्या एका ठरीव पद्धतीने तो कॉफी तयार करीत असे. 'कॉफीमुळे कल्पनांना चेतना मिळते, स्मृति धावूं लागतात, कथानकांतील पात्रांना पेहराव चढूं लागतात; व कागदावर कागद शाईने लिहिले जातात,' असें तो म्हणे. एकूण सुमारें पन्नास हजार कप तीव्र कॉफी त्याच्या पोटांत गेली असावी असा अंदाज आहे. सकाळीं आठ वाजेपर्यंत अव्याहत लिहिल्यावर तात्पुरता तो लेखनापासून परावृत्त होत असे. स्नान केल्यावर नऊ वाजल्यापासून तो आपल्या कादंबऱ्यांचीं मुद्रितें तपासायला सुरवात करी. ह्या कामीं त्याच्याइतका चोखंदळ इसम दुसरा झाला नसेल. त्याच्यासाठी सुवक मोठ्या कागदावर चोहोंकडे भरपूर मोकळी जागा सोडून मुद्रितें काढण्यांत येत. मुद्रितें तपासतांना ही सर्व मोकळी जागा पार भरून जात असे. इतकेंच नव्हे तर छापलेल्या पानांच्या मागेंहि तो लिहूं लागे. अगोदर लिहिलेलें सर्वच आतां हिणकस वाटल्यामुळे, त्याचें मुद्रितें तपासणें म्हणजे जवळ जवळ सर्व मजकूर बदलून टाकणेंच असे. एवढ्यावरच न थांबतां, नको असलेला मजकूर हा बहाद्दर खुशाल कात्रीने कापून काढी. अशा रीतीने नवीन मजकूर, काना, मात्रा, बाण, चिन्हें, दुरुस्त्या, उभ्या आडव्या रेषा ह्या चक्रव्यूहाने तें मुद्रित भरून जाई. बालझाकच्या लेखणीच्या फटकाऱ्यांनी घायाळ झालेलें हें मुद्रित छापखान्यांत परत रवाना होई. प्रत्येक मुद्रिताला बहुधा पांचसहा वेळां व क्वचित् पंचवीस वेळांहि ह्या भयंकर दिव्यांतून जावें लागे. मुद्रितावर रचलेल्या ह्या चक्रव्यूहाचा भेद करणें जुळाऱ्यांना प्राणसंकट वाटे. कानामात्रांच्या व उभ्याआडव्या रेषांच्या त्या गुंतावळीपुढे कसलेले जुळारी देखील हात टेकीत. त्याच्या ह्या विक्षिप्त पद्धतीला पुढे प्रकाशकहि कंटाळले. पुन्हापुन्हा टाईप जुळवण्याचा हा अवास्तव खर्च त्यांना बालझाककडून

अनुक्रमणिका

वसूल करायला सुरवात केली. मुद्रितांशी अशी तीनचार तास हातघाईची लढाई खेळल्यावर तो दुपारचें जेवण करी. विश्रांति त्याच्या वेळापत्रकांत नव्हतीच. पुन्हा लिहिण्याला तो सुरवात करी ती संध्याकाळीं पांच वाजेपर्यंत. नंतर रात्रीचें जेवण करून आठ वाजतां ही स्वारी झोपी जाई ती रात्री बारा वाजेपर्यंत. रात्रीं बारा वाजतां पुन्हा लेखन सुरू होई. वर्षानुवर्षे हा लेखनाचा कारखाना असाच अव्याहत सुरू होता. बालझाकच्या रूपाने ईश्वराने लेखनाचें मानवी यंत्रच तयार केलें होतें की काय न कळे!

असें तडाखेबंद लेखन करणारा लेखक अप्रसिद्ध किती दिवस राहणार! त्याची कीर्ति वाढूं लागली. साहित्यक्षेत्रांतला हा नवोदित तारा हळूहळू तरुण स्त्रियांना आकृष्ट करू लागला. त्याच्यां प्रेमपात्रांची संख्याहि वाढूं लागली. गुलहौशी पॅरिसमध्ये प्रेमप्रकरणांना काय तोटा! ह्या सर्व प्रेमसंबंधांत मदाम द हान्स्काबरच्या प्रेमाने त्याच्या उत्तरायुष्याची मोठी जागा व्यापलेली आहे. अद्‌भुत कादंबरीलाहि लाजविणारी ही प्रेमकथा आहे. युक्रेनमध्ये राहणाऱ्या एका श्रीमंत पोलिश–रशियन सरदाराची मदाम द हान्स्का ही पत्नी. ह्या रसिक स्त्रीने मनाला विरंगुळा म्हणून एक पत्र बालझाकला पाठवलें. त्याच्या 'सीं द ला वी प्रिवि' ह्या नवीन पुस्तकाने तिला मोहनी घातली होती. स्त्रियांविषयी अपरंपार सहानुभूति बाळगणाऱ्या ह्या लेखकाविषयी तिच्या मनांत उत्सुकता निर्माण झाली. तेव्हा सहज चाळा म्हणून तिने त्याला वरील पत्र पाठवलें. नंतर आणखी एक पत्र तिनें त्याला पाठवलें. वरील दोन्ही पत्रांत तिने टोपण नांव लिहिल्यामुळे, इच्छा असूनहि बालझाक् तिला उत्तर पाठवूं शकत नव्हता. तेव्हा तिच्या नांवाने पत्र पाठविण्याची आपली इच्छा त्याने वर्तमानपत्रांत जाहीरात देऊन प्रसिद्ध केली. ह्यावर तिने आपल्या नवऱ्याचें मन वळवून युरोपची सफर केली व नवऱ्यासह स्वीत्झर्लंडमध्ये फ्रान्सच्या सरहद्दीजवळच्या एका गांवांत मुक्काम ठोकला. बालझाकहि गुप्तपणें त्या गांवीं गेला. तेथे तिच्या नवऱ्याचा डोळा चुकवून क्वचित् मिळणाऱ्या वेळांत हीं प्रेमपात्रें आपलें प्रेम भागवून घेत. सरदार व हान्स्का युक्रेनला परत गेल्यावर बालझाक् पॅरिसला परतला व पुन्हा साहित्यसेवेंत मग्न झाला.

पण लिखाण जोमांत सुरू असतांनाहि 'अव्यापारेषु व्यापार' करण्यास तो चुकत नसे. आपले हाल वाढवण्याचा जणूं त्याने विडाच उचलला होता. सार्डिनियामध्ये रोमन लोकांनी पूर्वी चालवलेल्या चांदीच्या खाणी आहेत असें त्याला कुणीसें सांगितलें. झालें; ह्या खाणी चालवून त्वरित कोट्यधीश होण्याचा त्याने निर्णय घेतला. त्या काळचीं दळणवळणाचीं साधनें ठीक नसत. अनेक हालअपेष्टा सोसून बालझाक् सार्डिनियाला गेला. तेथे गेल्यावर त्याला कळलें की त्याला ही बातमी देणाऱ्या इसमानेच त्या खाणी चालवायला घेतल्या होत्या. बालझाक् निराश होऊन परतला. मग एक जागा विकत घेऊन त्याने तेथे सफरचंदांची बाग करण्याचा प्रयत्न केला. लिखाणापासून नाही तर सफरचंदांपासून तरी लक्ष्मी प्राप्त व्हावी ही त्याची मनीषा. पण एकदीड हात उंच वाढलेलीं तीं झाडें पाण्याच्या अभावीं करपून गेलीं व पाया खोल न खणल्यामुळे, त्या जागेवर उभारलेलें घरहि कोसळलें. आता नाटकें लिहून लक्ष्मीला वश करावयाचें त्याने ठरवलें.

पण नाटक लागण्याच्या आदल्या दिवसापर्यंत त्याचें नाटकच लिहून तयार नसे. मग पात्रांसाठी धांवपळ सुरू होई. शेवटी नाटकाचा नाटकगृहांत बोजवारा उडत असतांना बालझाक् त्याच नाटकगृहाच्या एखाद्या कोपऱ्यांत अतिश्रमामुळे गाढ झोपलेला आढळून येई.

मदाम द हान्स्काच्या भेटीला सात वर्षे होऊन गेलीं होतीं. चिरविरहामुळे बालझाक्च्या प्रीतीची धार आता बरीच बोथट झाली होती. इतक्यांत बालझाक्ला एक पत्र मिळालें व साराच मनु पालटला. हान्स्काचा नवरा मृत झाल्याची बातमी त्यांत होती. झालें, बालझाक्च्या प्रेमाला नवी पालवी फुटली. हान्स्काशीं लग्न करून लक्ष्मी व सहचरी असा दुहेरी डाव साधण्याची ईर्षा त्याच्या मनांत प्रबळ झाली. बालझाक्ने तिला पत्रांवर पत्रें पाठवायला सुरुवात केली. पण तिने जणूं त्याचें सत्वच पाहण्याचें ठरवलें होतें. ती त्याला नक्की कांहीच कळवीना.

सावकारांचा कायमचा ससेमिरा मागे असतांनाहि बालझाक्ने आपल्या ग्रंथांची संयुक्त आवृत्ति काढण्याचा हक्क स्वत:कडेच ठेवला होता. आतां ह्या संयुक्त आवृत्ती-साठी इसारा म्हणून १८४२ सालीं १५ हजार फ्रँक त्याला प्रकाशकांनी दिले. सुमारें वीस ग्रंथांची ही संयुक्त आवृत्ति होती. ह्या संयुक्त आवृत्तींतला प्रत्येक ग्रंथ समाज-जीवनाच्या विशिष्ट अंगाचें प्रदर्शन करणारा होता. ह्या सर्व ग्रंथांतून समाजाच्या सर्वांगीण जीवनाचें दर्शन व्हावें ही कल्पना असल्यामुळे बालझाक्ने ह्या संयुक्तावृत्तीला 'कॉमेडी ह्यूमाइन' (Comedie Humaine) असें सार्थ नांव दिलें.

एवढें प्रचंड काम अव्याहत करणारें शरीरयंत्र लवकर खिळखिळें झाल्यास नवल काय! १८४४ सालापासून त्याचें दणकट शरीर थकत चालल्याची चिन्हं दिसूं लागलीं. डोकेंदुखी, सूज, संधिवात ह्यांनी त्याच्या शरीरांत ठाणें दिलें. नेहमीं आशावादी असणारें त्याचें मन आतां निराश होत चाललें. कर्जाचा डोंगर वाढतच होता. मदाम द हान्स्काने त्याला अजून झुलवतच ठेवलें होतें. दहा वर्षांपूर्वीची प्रणयपूर्ति त्याला आता किती दिवस दिलासा देणार! पण लवकरच मदाम द हान्स्काचें पत्र त्याला मिळालें. ह्या पत्रांत तिने त्याला भेटण्याची इच्छा प्रगट केली होती. ह्या पत्राने त्याच्या थकल्या शरीरांत जणुं नवजीवन ओतलें. चालू असलेल्या लिखितांना तात्काळ कोपऱ्यांत फेकून देऊन तो तिला भेटायला गेला. तिच्यासह त्याने पुन्हा एकवार युरोपची सफर केली. १८४६ सालीं हान्स्काच्या मुलीचें लग्न झालें. आतां आपलें लग्न टाळण्याला तिला कोणतीच सबब उरली नाही. तरी तिने अजून त्याला नक्की कांहीच कळवलें नव्हतें. तो पुन्हा युक्रेनला गेला व परत आला. अशा अहंमन्य बाईशीं लग्न करायला बालझाक्च्या आईचा व त्याच्या इतर नातलगांचा विरोध होता. अशा विरोधाला बालझाक् थोडाच जुमानणार! स्वत: कर्जबाजारी असूनहि, सुमारें तीन लाख फ्रँक खर्च करून त्याने पॅरिसमध्ये तिच्यासाठी टुमदार घर सजवलें. अखेर बालझाक्ने युक्रेनची दुसरी सफर केल्यावर ही प्रेमदेवता आपल्या भक्तावर प्रसन्न झाली. बालझाक्ची तपश्चर्या फळाला आली. युक्रेनमध्येच मार्च १८५० मध्ये त्यांचें लग्न झालें. हान्स्काचें बालझाक्वर खरें प्रेम होतें, की एवढ्या मोठ्या लेखकाकडून विनवण्या करून घेण्यांतच तिला भूषण वाटत असे,

ईश्वर जाणे! आपल्या हट्टी स्वभावामुळे तिने बालझाकला बराच काळ झुलवलें, एवढें मात्र खरें!

युक्रेनमध्ये लग्न होऊन पॅरिसला परत येतांनाच तो आजारी पडला. तशांतच वाटेंतील कांही अडाणी डॉक्टरांनी आपलें बुद्धिकौशल्य चालवून त्याची प्रकृति आणखीच बिघडवून ठेवली. 'कॉमेडी ह्युमाईन' पूर्ण करण्यास आपण जगत नाही हें त्याला कळून चुकलें. एवढ्या महत्प्रयासाने मिळवलेल्या पत्नीशीं संसार करायला तो सहा महीने देखील जगला नाही. बालझाक शेवटचे दिवस मोजीत असतां त्याची ही पाषाणहृदयी बायको कपडे व जडजवाहिरांचा शौक करण्यांतच मग्न असे. शेवटी १८ ऑगस्ट १८५० च्या रात्रीं बालझाकने कायमची विश्रांती घेतली. अलेक्झांडर ड्युमा, व्हिक्टर ह्युगोसारखे नामांकित साहित्यिक त्याच्या प्रेतयात्रेला हजर होते. आपल्या कल्पनाभांडारांतील अमूल्य रत्नें लुटवणारा हा कुबेर अखेर कर्जातच मेला.

('स्टीफन त्वाइग'च्या 'बालझाक' चरित्रावरून संक्षेपानं)

●

चिरप्रवासिनी

अयि नदी नदी नदी
दचकतेस लचकतेस कासि मधीं मधीं,
हास्य आणि लास्य संपणार तव कधी!
देशकाल कोणता ग भान नच तुला
धांवतीस सारखी उसंत ना कधीं!
तुंग हर्म्य घोर विपिन दुर्ग पर्वत
गर्वपूर्ण नगर गांव नत शतावधि
खळखळे नि अडखळेहि तव खळे न गुञ्जन
काय सत्य सांगतीस वद पदोपदीं!
तुज कळे न काय आज विसवें शतक
तोच आर्ष राग गासि गाईला अधी!
विन्धिली जिव्हारिं विव्हला परभृता
आर्त साद घालते न यांवशीं तधीं!
माधवीय पवनजाल अडवितां जरा
स्वरें कड्यावरून तोंच घेसि कासि उडी
कौमुदी निशापटांत स्वप्न चित्रिते
उगिच हांसुनी पुढेच चालशी सुधी
बोल कोणतें ठिकाण तूज गांठणें
चिरप्रवास काय त्वदिय साध्य निरवधि!

—वत्सला

याल तुम्ही भूवरती धावुन !

*

'मोहन ! मोहन !' करिते वसुधा
स्वर्गहि करितो 'मोहन ! मोहन !'
भारतभाग्यविधात्यां बा पू
तव पदपद्मीं आत्मसमर्पण ! १.

मानवतेला विसरुन मानव
दानव होती जेव्हां भूवर !
विश्वसुखास्तव विश्वनाथ मग
अवतरतो प्रिय भारतभूवर ! २.

चुकल्या विश्वा विश्वमोहना
सत्य अहिंसेची तूं सुखकर !
वाट दाविशी निर्भयतेने
गोळ्यांना झेलुनी हृदयावर ! ३.

उपकार तुझा हिमालय
उंच, उंच किति हिमालयाहुन !
मानवसेवागंगा तु म ची
सुखकर, शीतल श्रीगंगेहुन ! ४.

हृदयाला या नाही वाणी
वाणीलाहि हृदय नसे या !
कसें दाखवूं भाव मनाचे
ओळखून घ्या तुम्हीच सदया ! ५.

कृतघ्न मानव पश्चात्तापें
जळतां 'बापू' आतां अनुदिन !
हाथ मारुनि स्वर्गसुखाला
याल तुम्ही भूवरती धांवुन ! ६.

—नारायण माधवराव सरपटवार

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी.......

श्री. प्रभाकरराव जोशी

मधुकर श्रीधर मंगरूळकर

★

" चल बाबा ! जाऊं या. रात्रीचे दोन वाजले. उद्याचा ' वर्किंग डे ' आहे. पुष्कळ झालं गाणं ऐकणं— "

" थांबरे बुवा ! इतका वेळ थांबलास आणि जोशीबुवाचं गाणं न ऐकता जाणार ! अगदीच अरसिक आहेस तूं— "

असले उद्गार गणेशचतुर्थीच्या रात्री नागपुरांत जो संगीत–मेळावा पं. भातखंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जमतो, त्या रात्रीं बहुधा दरवर्षी ऐकायला मिळतात; प्रभाकरराव जोशी यांचें गाणें बहुधा उत्तररात्री. त्यांना इतर गायकांपेक्षा जास्त वेळ दिलेला असावा हें देखील ठरलेलें. आणि रागदारी गायल्यानंतर त्यांनी एखादें ' मध्यमांतलें ' पद म्हटलेंच पाहिजे हें जणुं ठरलेलेंच ! बारा वर्षे सतत हाच क्रम चालू असल्यामुळे त्यांचा तो जणुं हक्क झाला आहे आणि श्रोतेदेखील त्यांचा लाडका हक्क पार पाडायला तयार असतात.

महाल प्रायमरी शाळेच्या इमारतींत ५-७ वर्षांपूर्वी झालेला उत्सव मला आठवतो. त्यांनी म्हटलेला ' सखी मन लागेना ' हा बागेश्रीचा ख्याल आणि ' चलत चलत मथुरा ' ही द्रुत लयीची चीज अजून माझ्या कानांत घुमत आहे. विशेषत: ख्यालांतल्या ' लागेना ऽ ' यांतील कोमल गांधारावरचे हेलकावे ! त्याच कार्यक्रमांत गाइलेली कै. वझेबुवांची ' सखी मुखचंद्र छबि ' ही खंबावतींतील चीजहि फार लोकप्रिय झाली होती. यंदाच्याहि उत्सवांत त्यांनी म्हटलेला ' नंद ' किती तरी काळ लक्षांत राहील. ' धुंद्रु बारे सैंया ' हा ख्याल व ' रहे रैन पिया–' ही चीज त्यांनी फार तयारीने म्हटली. " गमपधनीऽप, " या स्वरसमुदायावर निरनिराळ्या प्रकारांनी घेतलेले आलाप फार बहारदार होते. त्यानंतर म्हटलेल्या, 'धांवत येई सख्या यदुराया' या बालगंधर्वांच्या पदाने रंगत आणली. नागपुरांत चक्रधर हा राग त्यांनीच प्रथम ऐकवला. 'येरी माई पिया' हा ख्याल व ' हमारी कोन सुने–' ही चीज ऐकावी ती त्यांच्याकडूनच. शुद्ध ऋषभावरच्या सभेची जागा कांही औरच आहे.

नागपूरला बालगंधर्वांचीं पदें मूळस्वरूपांत जर ऐकवून कुणी लोकप्रिय केली असतील तर तीं प्रभाकररावांनीच असें म्हणायला मला बिलकुल हरकत वाटत नाहीं. 'करीन यदुमनीं सदना' "तात करी दुहिता–" 'विराट ज्ञानी–' 'कोंदटला सुमनीं' 'मजला घडावी देवा, पतीपदसेवा' 'चावत येई सख्या' इत्यादि बालगंधर्वांचीं पदें नागपुरांत अजून लोकप्रियता धरून आहेत याचें कारण ती प्रभाकररावांच्या तोंडून वारंवार ऐकायला मिळतात. बालगंधर्वांचा पाहिजे तितका सहवास न मिळूनहि ध्वनिमुद्रिकांच्या सहाय्यानें व क्वचित् स्वतः ऐकून त्यांनी ती गायकी कंठगत केली आहे.

आज नागपुरांतल्या उदयोन्मुख तरुण व तडफदार गायकांत त्यांची गणना होते ती उगीच नाहीं. त्यांच्या गळयाला जोरदार फिरत आहे. आवाज चोरटा लागलेला कधी ऐकूं येणार नाहीं. मध्यसप्तकाच्या षड्जापासून तारसप्तकाच्या पंचम धैवतापर्यंत सरळ एकाच जातीने चकरा घेत भिंगरीसारखा आवाज वर जातो. आरोह असो, अवरोह असो त्या धर्मांत फरक पडायचा नाहीं. मराठी नाट्यकलेच्या ऐन भरभराटीच्या काळीं ज्या प्रकारचे गायक नट आढळत होते, त्या प्रकारांत प्रभाकररावांना बसवायला हरकत नाहीं. हॉलच्या कोनाकोपऱ्यांत बसलेल्या श्रोत्यालाहि कणन् कण ऐकूं जावा असा त्यांच्या आवाजाचा धर्म आहे. मेहनतीने त्याला एक प्रकारची धार आली आहे आणि तानेला गोडवा आलेला आहे.

कै. भातखंड्यांच्या गेल्या पुण्यतिथीप्रसंगीं ते 'नंद' गात असतांना मी समोर बसलेल्या बाळासाहेब बक्षींकडे पाहिलें. त्यांचा आवाज गहिंवरून आला होता. डोळे पाण्याने भरले होते. आणि ओठ 'वा, वा' म्हणण्यासाठी विलग होत होते. आपल्या या शिष्यवराचा पराक्रम पाहिल्यानंतर कोणत्या गुरूला आनंदाचें भरतें येणार नाहीं !!

प्रभाकररावांचा गाण्याचा नाद जर कुणी जोपासून नीट विकासाला लावला असेल तर तो त्यांच्या वडिलांनी. त्यांचे वडील खरेखुरे रसिक आहेत. घड्याळाच्या यंत्रांशी त्यांचा जरी संबंध येत असला तरी त्याच घड्याळाच्या स्प्रिंगसारख्या ताना त्यांच्या डोक्यांत थैमान घालीत असतात. श्रीमंत बाबूराव देशमुखांच्या निकटवर्ती स्नेह्यांपैकी ते एक आहेत. त्यांनी आपल्या मुलांचा कल पाहून प्रभाकराला एक दीड सप्तकाची छोटी हार्मोनियम स्वतः करून दिली. आणि त्या पेटीवर पेटीवादनाचे आणि गायनाचे पहिले धडे त्यांच्या वडिलांनी त्यांना दिले. आजहि ती पेटी त्यांनी मोठ्या आस्थेने जपून ठेवली आहे.

बालवयांतच आवाजावर नीट संस्कार होऊं लागले. त्यांच्या वडिलांनी त्यांना श्री. बाळासाहेब बक्षी यांच्या स्वाधीन केलें. १९३५ पासून ५–६ वर्षे ते त्यांच्या भारत गायनसमाजांत शिक्षण घेत असत आणि त्यानंतर ते श्री. शंकरराव प्रवर्तकांच्या अभिनव संगीत विद्यालयांत दाखल झाले. शंकररावांनी त्यांच्यांतला गायकाचा अंकुर ओळखला होता. त्यांच्या बरोबरच श्री. यादवराव जोशी नांवाचे त्यांचे वर्गबंधू होते. या दोन विद्यार्थ्यांवर अपाड मेहेनत सुरू झाली. विद्यार्थी

पडला असला तरी जोंपर्यंत कढल्या जात नाही तोपर्यंत त्याच्या गुणाचा कांही उपयोग नाही हें तत्त्व श्री. प्रवर्तकांनी ओळखलें होतें. त्यांनी ग्वाल्हेरच्या माधव म्युझिक कॉलेजचे प्रिन्सिपॉल गुरुवर्य राजाभय्या पूछवाले यांच्या करवीं आपल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली आणि पदवीदान समारंभाच्या निमित्ताने व्यंकटेश थिएटर-मध्ये त्यांचा पहिला जाहीर गायनाचा जलसा झाला. राजाभय्यांनी त्यांना 'संगीत बाल-भास्कर' ही पदवी दिली. गुरु आणि शिष्य या दोघांनाहि एकमेकांच्या कर्तृत्वाविषयी खात्री आली व ते या शिष्यद्वयांना घेऊन उमरावती, अकोला व जळगांव या ठिकाणी त्यांच्या गायनाचे जलसे करून आले. या मुलुखगिरीने त्यांच्या कीर्तीचा तेजोभास्कर जास्त तेजाने प्रकाशूं लागला होता. श्री. प्रभाकरराव हे शिष्य कुणाचे या प्रश्नावर अहमहमिका लागू लागली. पण स्वतः प्रभाकरराव दोन्ही गुरूंचें ऋण कबूल करतात.

यानंतर मात्र त्यांचे मित्र श्री. यादवराव जोशी हे जे संगीत-सन्यास घेऊन अज्ञात-वासांत गेले ते आज पटकेपर्यंत. प्रभाकररावांची कीर्ति मुंबईपर्यंत गेली होती. १९३५ च्या सुमारास बोलपटांच्या ध्वनिमुद्रिका लोकप्रिय व्हायला लागून दोन वर्षें झालीं होतीं. सर्वसाधारण श्रोतृसमाज किंवा रेकॉर्ड खरेदी करणारा वर्ग शास्त्रीय संगीताच्या ध्वनि-मुद्रिका विकत घ्यायला धजत नसे. अशा वेळेला, 'हिज मास्टर्स व्हॉईस' या सुप्रसिद्ध कंपनीने त्यांना पाचारण केलें व त्यांच्या रेकॉर्डस घेतल्या. 'देसकार' मधील, "जाग, जाग, जाग कीऽऽनो भौंऽर" ही व 'बाबुल मोरा—' ही भैरवी या दोन्ही ध्वनिमुद्रिका लोकप्रिय ठरल्या होत्या. त्याचप्रमाणे श्री. काळे यांनी रचलेली 'हृदयिच्या निवासा धुंडुनि तुला मी दमलें' किंवा 'कां रे छळिसी मजसी मुकुंदा' ही मिश्र झिंझोटीची ठुमरी, किंवा 'देवगांधार' मधील 'मन चोरूनि जाशी' व 'मिश्रकॉफी' मधील 'विमल त्या अंगना' या मुद्रिका फार लोकप्रिय झाल्या होत्या. त्या त्यांचे गुरु श्री. प्रवर्तक यांनी रचल्या होत्या.

निरनिराळ्या शाळाकॉलेजांतून त्यांना आता आमंत्रणें येऊं लागलीं होतीं. अमरावती, अकोला, गोंदिया, बिलासपूर, रायपूर, जबलपूर, दक्षिण हैद्राबाद, वारंगळ वगैरे जागीं त्यांचे कार्यक्रम झडूं लागले. त्यांची बैठक कधी रंगली नाही असें झालें नाही. 'आज माझा आवाज नीट नाही. पडसें झालें आहे—' ही गायकांची नेहमीची नाजुक तक्रार त्यांचे तोंडून कधी ऐकूं यायची नाही. कसल्याहि प्रकारचा चोखंदळ रसिकवर्ग असो ते त्याला रिझविल्याशिवाय राहात नाहीत. यवतमाळला गंधर्व कंपनी असतांना त्यांच्या गुरूने त्यांना नेऊन गंधर्वांना ऐकविलें होतें. 'यशवंत संगीत मंडळी' नागपुरांत असतांना कंपनींत श्री. सरनाईकांच्या समोर त्यांचें गाणें वाजविलें. बाळासाहेब बक्षींच्याकडे असतांना त्यांच्या वडिलांना नटवर्य कृष्णराव गोरे यांनाहि त्यांचें गाणें ऐकविलें होतें. कृष्णरावांनी तर "मला हा मुलगा देऊन टाका" अशी मागणीच त्यांच्या वडिलांजवळ केली होती. त्यांच्या मनांतली भीड चेपण्यासाठी त्यांच्या वडिलांनी आणि त्यांच्या गुरुद्वयांनी जी मेहनत घेतली त्याचें प्रतीक म्हणजे त्यांची आजची तयारी !

माणसाला अवधूत महाराजांसारखे अनेक गुरु करावे लागतात. विद्यादान करणारा हा एक गुरु असला तरी संस्कार करून त्या विद्येची जोपासना नीट करवून

घेणारा गुरु लाभला नाही, तर मिळालेल्या विद्येला कांही किंमत नसते. आवल्या आवडत्या मित्राचा तल्लख मुलगा म्हणून श्रीमंत बाबूरावजींची त्यांच्याकडे लहानपणापासूनच विशेष मर्जी होती. बाबूरावांचा वाडा म्हणजे संगीत कलाकारांचें गानस्थळच ! सवाई गंधर्वांपासून वसंतराव देशपांड्यापर्यंत प्रत्येकाची तिथे हजरी लागलेली. नागपुरांत कुणी मुसलमान कलावंत आला की त्याची ताजाबागला बाबा ताजुद्दीनच्या कबरेसमोर हजरी लागली पाहिजे तद्वत श्रीमंत देशमुखांच्या वरीं हजरी झालीच पाहिजे हा एक अलिखित नियम ठरून गेला आहे. आणि त्याचबरोबर तंबोरा घेऊन गाण्याच्या साथीला किंवा हार्मोनियमच्या साथीला एका ठिकाणीं प्रभाकरराव हे असायचेच हें ठरलेलें. तबल्यावर बाळासाहेब आठवले आणि पेटीला प्रभाकरराव हें समीकरण बहुवा ठरून गेलें आहे. मास्तर कृष्णरावांचा हरिभाऊ ऑर्गन वाजवायला नसला तर प्रभाकरराव पेटी वाजवायला आहेतच !

या सान्या गोष्टींचे त्यांच्यावर नकळत संस्कार झाले आहेत. मास्तरांचें "जो पिया जोऽऽडुं, पिया मै नाही तोडुं" हें मिराबाईचें भजन, त्यांनी अक्षरशः आपल्या गळ्यांत बसविलें आहे. आणि तेवढ्याच रसील्या ढंगाने ते गातात. 'घनराशी दिसतां' या पदाची मूळ चीज "परदेसी सैंया। नेहा लगाये। ऽऽ। दुख दे गयो सुख ले गयो—" ती ते कोणत्या ढंगाने गातात हें ऐकायला ते स्वतः गातांनाच ऐकलें पाहिजे. अशल्या पदांना बाळासाहेब आठवले आपल्या ढंगदार, नाजुक आणि नखरेदार लग्गयांनी अशी कांही मजा आणतात की बैठकीला ताबडतोब रंग भरतो. एखाद्या अबलख घोड्याने चौखुर धावून नंतर डौलांत दुडकी चाल धरून, आपल्या सौष्ठवपूर्ण अंगप्रत्यंगाचें डौलदार प्रदर्शन करावें त्याप्रमाणे बाळासाहेबांचा तबला नव्या नव्या ढंगाने नटत असतो. प्रभाकररावांच्या गाण्याने तबला रंगतो की बाळासाहेबांच्या साथीने त्यांचें गाणें रंगतें हें सांगणें फार कठिण आहे. श्रीखंड केशरामुळे चांगलें लागतें की केशराचा रंग श्रीखंडामुळे खुलतो हें जसें सांगणें कठिण तसें. या जोडाचें आहे. जसें अहमदजान थिरकवा असावे तबल्यावर आणि कादर बक्ष सारंगीवर अशा थाटांतच बालगंधर्वांचें गाणें ऐकावें त्याप्रमाणे प्रभाकररावांचें गाणें ऐकावें म्हणजे बाळासाहेब तबल्यावर पाहिजेत आणि त्यांचे मित्र श्री. नानासाहेब बेखंडे पेटीवर पाहिजेत. घारीसारखे तानांच्या आकाशांत घिरट्या मारतांना कुठून तरी सर्व समेच्या भक्षावर एकदम झेंप घेऊन येतील हें सांगणें कठिण. बाळासाहेबांचा तबला हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होण्याइतका श्रेष्ठ आहे. 'तात करी दुहिता' गात असतांना 'माते घांव घे' या ओळीवर त्यांचा तबला ऐकावा. गोजिरवाणी कालवड जणुं थयथय घांवत आहे असा अक्षरशः भास होतो.

१९४२ सालापासून ते मुंबई नभोवाणी केंद्रावरून गाऊं लागले होते. हल्ली नागपूर केंद्रावर गातात. श्रीमंत बाबूराव देशमुखांसारख्या चोखंदळ रसिकाला त्यांचें गाणें आवडतें यांत सारें कांही आलें. श्रीमंत बाबूरावांच्या घरच्या खासगी कार्यक्रमास एक शिस्त विशेष कटाक्षाने पाळली जाते. गवयाला साधारणपणें आपल्या मताप्रमाणे गाऊं द्यावें. त्यांनी पुरें म्हणतांच बैठक संपावी अशी ती शिस्त. अनेक वेळा बैठकी अर्धवट संपल्या म्हणजे उरलेली बैठक

प्रभाकररावांनी गाजवली आहे. बाबूरावजी त्यांना आपल्या कुटुंबियांपैकीच एक समजतात, यांतच त्यांच्या गायकीचें मोठेपण आहे.

शास्त्रशुद्ध गायकीबरोबर, नागपुरांत पंजाबी गाण्यांतला ढंग प्रभाकररावांनीच लोकप्रिय केला. ख्याल गायनाने आवाज भसाडा व जड होतो. पण ती अडचण त्यांना भासत नाही. त्यांचा आवाज पोलादपट्टीसारखा लवचिक आहे. त्यांच्या ' ऐसी न मारो पिचकारी ' किंवा कॉफींतील ' कौन तऱ्हासे तुम फेकत होरी ' किंवा ' मेरे सैंया उतरेंगे पार । नदिया तुम धीरे बहो ' या ठुमऱ्या ज्यांनी ऐकल्या असतील त्यांना माझ्या विधानाचें महत्त्व पटेल. लाहोरवाले बरकत अलीखाँच्या कांही भुरक्यांच्या छटा कधी कधी ते गळ्यांतून उतरवितात. सुप्रसिद्ध गायिका कु. पद्मावति शालिग्राम (सौ. गोखले) यांच्या इच्छेवरून त्यांच्या गायनाचा कार्यक्रम श्री. राजाभाऊ गर्गे यांच्या घरीं झाला होता. त्यावेळीं 'मोरे सैंया उतरेंगे–' या ठुमरीने पद्मावाईनां असें वेड केलें होतें की पंधरा दिवसांनीच पत्र पाठवून नोटेशनसुद्धा तें पद त्यांनी मागविलें व त्या बरहुकुम ती चीज गेल्या महिन्यांतच हैद्राबाद रेडिओवर गातांना.मी ऐकली. पंजाबी ढंगांत त्यांची आणखी ऐकण्यासारखीं पदें म्हणजे भैरवींतील ' तुम जावो कान्हा जमुना के तीर ' ' अकेली मत जाबो राधे, ' किंवा सौ. हिराबाई गात असत ती दादऱ्यांतील भैरवी " मतवाले तोरी यादरे. "

नागपुरांत जी एलकुती एक संगीत परिषद झाली ती अशा कलावंताचा मान करणार नाही असें कसें होईल ! नागपूरस्थ गायकांत प्रथम गायचा त्यांना मान दिला गेला. त्यांच्या गायकीचें भव्यत्व त्यांनी त्या दिवशीं गायलेल्या शंकरा रागांत दिसून आलें. शंकरा रागच असा आहे की तो पहाडी आवाजवाल्यांनीच गावा. इतर मग सगळेच गातात.

त्यांना नाटकांचें संगीत दिग्दर्शन केलें आहे. मामा वरेरकरांच्या ' न्यू मॉडेल हायस्कूल ' ने केलेल्या ' सदा बंदिवान ' मधील पदाचें संगीत दिग्दर्शन अजून माझ्या आठवणींत आहे. मास्टर विनायकानी देखील त्यावेळीं त्यांची तारीफ केली होती.

अशा प्रकारचा कलावंत संगीतक्षेत्रांत जर कुठे असला तर त्याच्या गुणांचें खरें चीज होतें. सकाळी १० ते सायंकाळीं ५ वाजेपर्यंत मुलांना शिकवावें, रुक्ष विषयाशी काथ्याकूट करीत वेळ घालवावा आणि अशा रुक्ष पार्श्वभूमीवर संगीतसेवा करावी. इतकें असूनहि त्यांनी आपली कीर्ति कायम ठेवली हें त्यांना भूषणावह आहे. आज ते पदवीधर आहेत. शिक्षणशास्त्राची पदवी त्यांनी मिळविली आहे पण त्यांनी आपला आवडता व्यवसाय सोडला नाही. कलेला खरोखर जिवंत ठेवलें आहे तें अशा हौशी कलावंतांनीच. गाण्याच्या शौकापायीं त्यांनी मॅट्रिकच्या वर्गांत तीन वेळा इतिहास, भूगोल यांसारख्या विषयांत कंपार्टमेंट मिळविलें होतें आणि बी. ए. तहि ! बी. ए. पास झाल्यावर १५ रुपयांवर पोटासाठी एम्प्रेस मिल्समध्ये चार महिने कार_नी केली. आज ते स्थाइक झाले आहेत.

नागपूरकरांचा स्थानिक आवडता गायक कोण ? अशी जर कोणी चढाओढ लावला तर त्यांनाच खात्रीने जास्त मतें मिळतील यांत मला शंका वाटत नाही.

प्रा. बनहट्टींनी नाट्यशताब्दि महोत्सव मंडळातर्फे विख्यात कलावंत श्री. गोविंदरावजी टेंबे यांच्या सत्काराचा आणि पेटीवादनाचा कार्यक्रम व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट मध्ये ठेवला होता. तिथेहि नागपूरकरांतर्फे भेट म्हणून कु. विमलाताई चोरघडे आणि प्रभाकरराव जोशी यांचीच गाण्यासाठी निवड झाली होती. अशा पदवीधर सुशिक्षित कलावंताला परिस्थितीने जसा ठेवायला हवा होता तसे ठेवलें नाही हें दुर्दैव. जर ते मुंबई-पुण्यांत जन्मते तर बसवराज, कुमार गंधर्व या गायकांच्या नामावलींत आणखी एक भर पडली असती.

प्रभाकररावांचें गाणें मर्द आहे. त्यांत जनानीपणा नाही. नागपूरच्या गायन-परंपरेचें प्रभाकरराव एक प्रतीक आहेत. सिटी कॉलेजांत असतांना त्यांच्या व श्री. दाणी यांच्या प्रयत्नाने आंतर कॉलेजीय संगीत चढाओढ सुरू झाली होती. सरस्वतीची सुवर्णमूर्ति कॉलेजतर्फे ठेवली होती. या सरस्वतीने जणुं प्रभाकररावांचा पाठपुरावाच केला होता. "जिथें जाशी तेथें तूं माझा सांगाती" या न्याया-प्रमाणे प्रभाकरराव जोशी सिटी कॉलेजांत आणि मॉरिसमध्ये अखेपर्यंत या मूर्तीने त्यांना सोडलें नव्हतें.

कांही दिवसांपूर्वी नागपूर नभोवाणीवर "मी ऐकलेले कांही कलावंत" अशा मथळ्याखाली श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांचे भाषण झालें होतें. त्यांत त्यांनी श्री. प्रभाकररावांविषयी "तरुण व तेजस्वी गायक–" अशा मानाचा उल्लेख केला होता. यांत मी त्यांच्या एका गुणविशेषाची भर घालूं इच्छितों. "अजातशत्रू!" ते सग-ळ्यांचे मित्र आहेत. पं. पलुस्करांच्या पुण्यतिथीला ते जेवढ्या आपलेपणाने गातात तेवढ्याच आत्मीयतेने पं. भातखंडे यांच्या उत्सवांत गातात. त्यांना मित्राशिवाय कांही प्रिय नाही. गणेशपेठेंतील श्रावण मिस्त्रीचा क्लब बंद झाल्यापासून "गायनाचा अड्डा" जरी कमी झाला असला तरी त्यांचा मित्रपरिवार वाढत आहे. आपला प्रिय मित्र 'भट्टु जोशी' यांच्या गायनाचा कुठे वास येतो का यावर ते जणु टपून बसले असतात. पण प्रभाकरराव गात असतात—

"हमारी कौऽऽनऽऽ सुने बात जियरा— "

●

भैरवी

★

विद्युन्मय पंख तुझे झेपावत ये विशाल
उजळ धरा फेकुनिया तेजस्वी रश्मिजाल.
कम्पित हो आगमनें स्थिरचल भूपृष्ठावर
मेरुमन्दार धीर उन्मळो क्षणीं समूळ!

अग्निकणांचा लेउनि साज येइं अंगावर
तीक्ष्ण खड्ग लखलखतें शोभवीत कर भासुर.
अंगप्रत्यंग तुझें दाहक अति अग्निहुन—
विक्षेपांतूनि प्रकट प्रलयाचें प्रत्यंतर!

भयकंपित लाख बळी येथे; ये, करि प्रहार
नररुंडांचा रुळवी वक्षावरि दिव्य हार.
पिउनी आकंठ रक्त तृप्त भैरवी हो तूं—
प्रेतांच्या राशींतुनि मुक्तपणें करि विहार!

मार्दव मग चित्तांतिल वाहूं दे ओसंडुन
अमृतमय हृदयांतिल वाहूं दे संजीवन.
प्रेमभरे आळवूनि गा भैरवि शेवटली—
कलेवरांतील सत्त्व एकमात्र हो चेतन!

सात्त्विक या दीपिकांत स्नेह ओत नेत्रांतिल
उजळूं दे त्या प्रभेंत पावन हा भूमिगोल,
मिळतां नवसंजीवन, भूमिहूनि स्वर्ग उणा—!
विद्युन्मय पंख तुझे झेपावत जा विशाल.

—वसंत वऱ्हाडपांडे

●

सृष्टीचें आह्वान

★

रोज प्रातीं पृथ्वीने विश्व नवें पाहिलें
येतो प्रकाश अरुण घडवित युग नवीन,
आणि कणकणांत धवल किरण काव्य कोरतें;
कळ्यांचे श्वास नित्य वाताला- गंध देत,
नवल मधुर स्पर्शानें अखिल विश्व जागतें,
कालचें विरून जाई, रात्रीच्या अंधारीं,
शिळें जाई विरघळुनी गडद तमाच्या द्रवांत,
पचवुनी हें पाप सर्व, उकलत मग जाइ गोल
रेषा त्या पसरुनिया, विकसित होइ प्रभात।
कालचें रात्रि मरे, नव प्रातीं नवा जन्म,
नवी भावना उदित, नवी प्रेरणा फुले;
नवें तत्त्व उदया ये, नव मूल्यें; धारणा;
अन् विश्वाच्या वाटिकेंत नूतन आशा उमले।
नित्य घडे कणकणांत भाव हे समावले।१।

पण शिळेंच घोळत मनीं, मानव हा जागतसे,
नव्या प्रातीं कालच्याच तत्त्वांचा करि रवंथ;
वैर जुनें, सूड मनीं, घटना या शिळ्या-जुन्या
आणि त्याच योजनेंत हाताळित जुना पंथ।
बदलत्याहि काळांत, कुजकें नि सडकें मन,
'आज' उजडला तरी 'काल' मध्ये घोटाळें;
सृष्टि बदलली तरी, हवा वाहते नवी,
भूताला बघे दृष्टि, मन तेथे रेंगाळें।
पूर्वज ते शूर, वीर, भारतहि स्वर्ण-भूमि;
दाटला कधिं हवेंत, सोन्याचा धूर सर्व;
धुजला नि धुफला ही होती धरा मंगला,
या जुन्या कथांचाच आजहि अम्हांस गर्व;
चालला निघून काळ, दिवस निघुन चालले।
रोज प्रातीं पृथ्वीने, विश्व नवें पाहिलें।१।

—यशवंत धर्माधिकारी

●

विदर्भाचें राष्ट्रकूट

वा. वि. मिराशी

★

दोन वर्षांपूर्वी ऑक्टोबर १९४८ मध्ये नागपूर युनिव्हर्सिटीच्या एका सभेकरिता मी नागपुरास आलों असतां एकाच दिवशीं दोन नवीन ताम्रपट माझ्या दृष्टीस पडले. त्यांपैकी एक डॉ. य. खु. देशपांडे यांना अकोल्यास मिळाला होता व दुसरा रामटेकजवळ नगरधन येथे नागपूरचे श्री. हिरालाल उरासराव महादुले यांना जमीन खणतांना सांपडला होता. पहिल्याला या लेखांत 'अकोल्याचा ताम्रपट' व दुसऱ्याला 'नगरधनचा ताम्रपट' असें उल्लेखिलें आहे. प्राचीन ताम्रपट क्वचितच सांपडतात. म्हणून एकाच दिवशीं दोन ताम्रपट प्रकाशांत आलेले पाहून मला सानंदाश्चर्य वाटलें. पण याहिपेक्षा अधिक कौतुकाची गोष्ट ही की ते दोन्ही ताम्रपट राष्ट्रकूटवंशांतील 'नन्नराज' या एकाच नांवाच्या राजानी दिले होते. या ताम्रपटां-विषयीं संक्षिप्त टिपणें स्थानिक वर्तमानपत्रांत व युगवाणीच्या त्या वर्षाच्या एका अंकांत प्रसिद्ध झालीं होतीं. त्यानंतर डॉ. य. खु. देशपांडे यांनी अकोल्याचा ताम्रपट पुण्याच्या 'पराग' मासिकाच्या मार्च १९४९ च्या अंकांत प्रसिद्ध केला व नगरधनचा ताम्रपट प्रस्तुत लेखकाने भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत (दक्षिण महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ३, पृ. १०९-११५) प्रकाशित केला. हे दोन्ही ताम्रपट यथावकाश 'एपिग्राफिया इंडिका' मध्ये अधिकृतरीत्या पुनः प्रकाशित होतील. तथापि त्यापूर्वी दोन्ही ताम्रपटांवरून विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर काय प्रकाश पडतो तें प्रस्तुत लेखांत संक्षेपाने सांगावयाचें आहे.

या दोन ताम्रपटांपैकी नगरधनचा ताम्रपट हा अगोदरचा आहे. हा स्वामिराज नामक राजाच्या कारकीर्दींत त्याच्या नन्नराज नामक भावाने नंन्दिवर्धनाहून दिला असून त्यांत दोन भूमिदानांचा निर्देश आहे. पहिल्या दानाने महामात्रांच्या किंवा माहुतांच्या गणाच्या (संघाच्या) विनंतीवरून कांहीं ब्राह्मणांना चिंचपट्टिका गांवांत कांहीं जमीन दिली होती. दुसऱ्या दानाने नन्नराजाने (किंवा त्याचा भाऊ स्वामिराज याने) आषाढ संवत्सरीं चैत्र महिन्याच्या अमावास्येस सूर्यग्रहणप्रसंगीं शूलनदीच्या उत्तर तटावरील अंकोलिका गांव त्याच ब्राह्मणांना दिला होता. या ताम्रपटाची मिति शेवटी '३२२ वें वर्ष, कार्तिक शुद्ध ५' अशी दिली आहे.

ताम्रपटांत दिलेलें वर्ष कलचुरि शकाचें आहे. त्याची तारीख १९ मार्च इ.सन ५७३ ही येते. या तारखेस बार्हस्पत्य संवत्सर 'आषाढ' हाच असून त्या वर्षी चैत्र अमावास्येस सूर्यग्रहणहि होतें. तेव्हा ताम्रपटाचा हा काळ निश्चित झाला असें मानण्यास हरकत नाही.

ताम्रपटांत राजवंशाचें नांव नाही. तथापि स्वामिराज व नन्नराज हीं नांवें राष्ट्रकूटांच्या नामावळींतच दिसत असल्याने हे राजे राष्ट्रकूटवंशाचे होते यांत संशय नाही. या ताम्रपटाच्या आरंभीं स्वामिराज स्वतःचें 'भट्टारकपादानुध्यात' (सम्राटाच्या पायांचें चिंतन करणारा) असें वर्णन करतो, त्यावरून तो स्वतंत्र नसून मांडलिक होता असें स्पष्ट दिसतें. या ताम्रपटांत कलचुरि शकाचा उपयोग केला आहे तो कलचुरि साम्राज्यसत्तेचा सूचक आहे. या पूर्वीच्या सातवाहन व वाकाटक राजांच्या लेखांत त्या त्या राजांच्या राज्यारंभापासूनचीं वर्षे दिलेलीं आढळतात. इ. स. ५००च्या सुमारास वाकाटक राजवंशाचा अस्त झाला. त्यानंतर सुमारें पन्नास वर्षांच्या अवधींत कलचुरि सम्राट कृष्णराज हा उदयास येऊन त्यानें आपलें साम्राज्य उत्तर महाराष्ट्र, गुजरात, कोंकण व विदर्भ या प्रांतांवर पसरविलें. कृष्णराजाच्या नाण्यांचा एक मोठा संचय अमरावती जिल्ह्यांत धामोरी येथे कांही वर्षांपूर्वी सांपडला होता. बैतूल जिल्ह्यांतहि त्याचीं कांही नाणीं सांपडलीं आहेत. त्याचा स्वतःचा कोरीव लेख मात्र अद्यापि या प्रांतांत सांपडला नव्हता. प्रस्तुत ताम्रपटावरून कलचुरींचें साम्राज्य इ. स. च्या सहाव्या शतकांत विदर्भावर पसरलें होतें ही नवीन माहिती निश्चितपणें प्रथमच मिळत आहे. विदर्भाच्या इतिहासांत सन ५०० तें ६५० हा दीडशें वर्षांचा काळ अंधकारयुग म्हणून गणला गेला होता. यावर प्रस्तुत ताम्रपटानें किंचित् प्रकाश पडत आहे यांत त्याचें महत्त्व आहे.

दुसरा अकोल्याचा ताम्रपटहि असाच महत्त्वाचा आहे. तो राष्ट्रकूटवंशी एका नन्नराजानेच दिला होता. त्या ताम्रपटांत त्याची वंशावळ खालीं दिल्याप्रमाणे दिली आहे —

दुर्गराज
|
(पुत्र)
गोविन्दराज
|
(पुत्र)
स्वामिकराज
|
(पुत्र)
नन्नराज

नन्नराजाने हा ताम्रपट पद्मनगराहून दिला असून त्यांत त्याने वटपूरक गांवांतील कांही जमीन ब्राह्मणास दान दिली होती. या ताम्रपटाच्या शेवटी त्याचा काळ 'शककाल संवत्सर ६१५ कार्तिक शुद्ध पौर्णिमा' असा दिला आहे. या शककालाचा

पुढे 'शालिवाहनशक' असें नांव प्राप्त झालें. तेव्हा या ताम्रपटाचा काळ इ. स. ६९३ हा येतो.

या राष्ट्रकूट नन्नराजाचेच आणखी दोन ताम्रपट या प्रांतांत यापूर्वी सांपडले होते. त्यांपैकी एक ताम्रपट मुलताईजवळ तिवरखेड येथे होता. त्याची मिति शककाल संवत्सर ५५३ (इ. स. ६३१) ही त्यांत दिली आहे. दुसरा ताम्रपट मुलताई येथेच सांपडला होता. त्याचा काळ शककाळ संवत्सर ६३१ (इ. स. ७०९) असा त्यांत दिला आहे. दोन्ही ताम्रपटांत नन्नराजाची वर दिलेलीच वंशावळ आढळते. पण त्या दोहोंत अंतर ७८ वर्षांचें आहे. सामान्यतः कोणाहि राजाची कारकीर्द २५-३० वर्षांपेक्षा अधिक असत नाही. गुप्तवंशांतील राजे दीर्घायुषी होते. पण त्यांच्यांतहि कोणाहि राजाची कारकीर्द ४०।४५ वर्षांपेक्षा अधिक नव्हती. तेव्हा नन्नराजाने ७८ वर्षांपेक्षा अधिक काळ राज्य केलें असणें असंभवनीय वाटतें. म्हणून या दोन ताम्रपटांपैकी कोणता तरी एक बनावट असावा असा संशय संशोधकांस वाटत होता. डॉ. अ. स. अळतेकरांनी आपल्या 'राष्ट्रकूट व त्यांचा काळ' या इंग्रजी पुस्तकांत या प्रश्नाचा सविस्तर विचार करून मुलताईचा ताम्रपट बनावट असावा असें ठरविलें होतें. आता उजेडांत आलेल्या अकोला ताम्रपटाने हें अनुमान चूक ठरत आहे; कारण त्या ताम्रपटांतील शक संवत्सर ६१५ हें वर्ष मुलताई ताम्रपटाच्या शक संवत्सर ६३१ ला जसें जवळ आहे तसें तिवरखेडच्या शक संवत्सर ५५३ ला नाही. तिवरखेडच्या ताम्रपटाचें बारकाईने निरीक्षण केल्यास त्याच्या बनावटपणाचीं आणखीहि गमकें सांपडतात. तेव्हा अकोल्याच्या ताम्रपटाने नन्नराजाचा शक संवत्सर ६१५ ते ६३१ (इ. स. ६९३ ते ७०९) हा काळ निश्चित ठरला हा मोठाच लाभ त्या ताम्रपटाच्या प्राप्तीपासून झाला आहे.

याप्रमाणे तिवरखेडाचा ताम्रपट बनावट ठरल्याने त्या ताम्रपटांतील काळावर बसविलेलीं डॉ. अळतेकरांचीं आणखी कांही अनुमानें चुकीचीं ठरलीं आहेत. भारतीय इतिहासांत राष्ट्रकूट राजवंशाचें महत्त्व विशेष आहे. या वंशांत एकापेक्षा एक महाप्रतापी राजे होऊन गेले. त्यांनी दक्षिण हिंदुस्थानांत फार मोठें साम्राज्य स्थापलें व अनेकदा उत्तर हिंदुस्थानांत हिमालयापर्यंत स्वाऱ्या करून मराठ्यांच्या अगोदर आपल्या भीमथडीच्या घोड्यांस गंगायमुनांचें पाणी पाजलें. त्यांचा विद्या व कला यांसहि उदार आश्रय होता. त्यांच्या दरबारीं बरेचसें अपभ्रंश वाङ्मय निर्माण झालें. जगांतील आश्चर्यांमध्ये ज्याची गणना करण्यांत येते तें वेरूळचें 'कैलास' लेणेंहि या वंशांतील पहिल्या कृष्णराजाने खोदविलें. तेव्हा या राजवंशाचा भारतास व विशेषतः महाराष्ट्रास विशेष अभिमान वाटतो. पण या वंशाचा आरंभीचा इतिहास अद्यापि अज्ञात आहे. याचा पहिला ज्ञात कोरीव लेख सामानगडचा ताम्रपट शक संवत्सर ६७५ (इ. स. ७५३) चा आहे. तो दंतिदुर्ग नृपतीने दिला असून त्यांत दन्तिदुर्गाच्या तीन पूर्वजांचें वर्णन आहे. वेरूळच्या दुसऱ्या एका लेखांत त्यापूर्वीच्या आणखी दोन पूर्वजांचा उल्लेख आहे. या घराण्याचा मूळ पुरुष दन्तिवर्मन् हा सातव्या शतकाच्या आरंभीं कलचुरींचा मांडलिक म्हणून उदयास आला असावा. तिवरखेडचा शके ५५३ (इ. स. ६३१) चा ताम्रपट खरा मानून तो देणारा नन्नराज हा दन्तिवर्म्याचा पिता किंवा भाऊ असावा असें अनुमान

डॉ. अळतेकर यांनी केलें होतें व हा साम्राज्यस्थापक राष्ट्रकूट वंश मूळचा विदर्भी-तील असें त्यांनी म्हटलें होतें. तें विदर्भाला निःसंशय गौरवास्पद होतें. पण तिवरखेड ताम्रपट बनावट ठरल्याने तें विधान चुकीचें ठरत आहे. मुलताई व अकोला येथे सांपडलेले ताम्रपट देणारा नन्नराज दन्तिदुर्गापूर्वी पांच पिढ्या होऊन गेला नसून त्या दोघांच्या काळांतील अंतर फार तर २५–३० वर्षांचें असावें असें स्पष्ट दिसतें. तेव्हा विदर्भातील राष्ट्रकूट वंश हा सम्राट् राष्ट्रकूटवंशाची शाखा नसून त्याहून भिन्न होता हें निर्विवाद आहे.

सम्राट राष्ट्रकूट वंशाचा विदर्भात सांपडलेला पहिला ज्ञात ताम्रपट पहिल्या कृष्णराजाचा भांदक येथील शक संवत्सर ६९४ (इ. स. ७७२) चा आहे. अर्थात् तो मुलताई ताम्रपटानंतर सुमारें पाऊणशें वर्षांनी दिला होता. त्यानंतर या सम्राट् राष्ट्रकूट वंशाचे अनेक ताम्रपट विदर्भात सांपडले आहेत. तेव्हा इ. स. च्या आठव्या शतका-पासून विदर्भ राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत अंतर्भूत झाला होता यांत संशय नाही. या काळांत विदर्भाच्या पुरातन मांडलिक राष्ट्रकूट वंशाचें काय झालें असा प्रश्न उद्भवतो. त्याचा आता थोडक्यांत विचार करूं.

मागे सांगितल्याप्रमाणे विदर्भातील राष्ट्रकूट घराणें प्रथम कलचुरींचे मांडलिक म्हणून उदयास आलें. आरंभीं त्याची राजधानी नन्दिवर्धन येथे होती असें दिसतें. नगरधनचा ताम्रपट नन्दिवर्धनाहून दिला होता. नन्दिवर्धन (हल्लीचें नगरधन) हे पूर्वी वाकाटकांच्या राजधानीचें शहर होतें. वाकाटकांच्या काळीं बस्तर संस्थानांतील नलवंशी राजांची विदर्भावर स्वारी होऊन त्यांनी त्याचा कांही भाग व्यापला होता. या नलवंशी राजांनीहि नन्दिवर्धन हीच आपली राजधानी केली होती असें दिसतें. कारण त्यांचा विदर्भात सांपडलेला ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिला आहे. वाकाटकांनंतर उदयास आलेल्या सामन्त राष्ट्रकूटवंशानेहि या पूर्वीच्या परंपरेस अनुसरून नन्दिवर्धन येथेच राजधानी स्थापिली असावी. पुढे मात्र तेथून राजधानी हलविलेली दिसते. सातव्या-आठव्या शतकांतील नन्नराजाने दिलेल्या मुलताई ताम्रपटांत राजस्थानाचा उल्लेख नाही. त्याच्या अकोल्याच्या ताम्रपटांत आरंभीं पद्मनगराचा उल्लेख आहे, पण तें पद्मनगर व वाकाटकांच्या एका अपूर्ण ताम्रपटांत उल्लेखिलेलें व संस्कृत वाङ्मयांत भवभूतीचें जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध असलेलें पद्मपुर एकच किंवा भिन्न हे अद्यापि ठरावयाचें आहे. भवभूतीचें पद्मपुर गोंदियाजवळ अद्यापि प्राचीन नांवाने विद्यमान आहे व तेथे प्राचीन अवशेषहि बरेच आहेत हें प्रस्तुत लेखकाने यापूर्वीच दाखविलें आहे. तिवरखेडचा ताम्रपट नन्नराजाने अचलपुराहून दिला होता असा त्यांत निर्देश आहे. तथापि तो ताम्रपट आता बनावट ठरल्याने त्याचें महत्त्व नाही.

विदर्भातील राष्ट्रकूट वंश प्रथम कलचुरींचा मांडलिक होता म्हणून त्याच्या नगरधनच्या ताम्रपटांत कलचुरि शकाचें वर्ष दिलें आहे. सातव्या शतकाच्या आरंभीं कलचुरि साम्राज्याचा अस्त होऊन चालुक्य उदयास आले. त्यांनी आपल्या प्रांतांत पूर्वीपासून प्रचलित असलेल्या शक संवताचा पुरस्कार केला. त्यांच्या मांडलिकांनीहि त्यांचेंच अनुकरण केलें. कलचुरींच्या अस्तानंतर विदर्भ चालुक्यांच्या साम्राज्यांत

 अन्तर्भूत झाला. ऐहोळे येथील सुप्रसिद्ध शिलालेखांत चालुक्य सम्राट् द्वितीय पुलकेशी

' तीन महाराष्ट्रांचा स्वामी ' झाला असें म्हटलें आहे. या तीन महाराष्ट्रांत अर्थात् विदर्भ अन्तर्भूत होताच. मुलताई व अकोला येथील ताम्रपट देणारा नन्नराज हा चालुक्यांचा मांडलिक होता, त्यामुळे त्याने आपल्या लेखांत शकसंवताचा निर्देश केला आहे. चालुक्य इ. स. च्या आठव्या शतकांत नामोहरम होऊन राष्ट्रकूट उदयास आले. राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत विदर्भ अन्तर्भूत झाल्यावर येथील मांडलिक घराणें पदच्युत झालें नाही असें दिसतें. यानंतरचे त्या घराण्याचे कोरीव लेख अद्यापि सांपडले नाहीत हें खरें पण इतर कांही उल्लेखांवरून इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं अचलपूर येथे राष्ट्रकूट सामन्त कक्कर हा राज्य करीत होता असें दिसतें. हा कक्कर कदाचित् पूर्वीच्या सामन्त राष्ट्रकूटवंशांतीलच असेल. हें सामन्त घराणें मालखेडच्या सम्राट् घराण्याशीं शेवटपर्यंत राजनिष्ठ राहिलें व त्याने त्याच्या वतीने कलचुरि सैन्याशी पयोष्णी (अचलपुरापासून जवळच वाहत असलेल्या पूर्णा) नदीच्या कांठी सामना दिला. त्याचें वर्णन राजशेखराच्या विद्धशालभंजिका नामक नाटिकेंत केलें आहे. जिज्ञासु वाचकांस त्याविषयी सविस्तर माहिती प्रस्तुत लेखकाने लिहिलेल्या ' तरुण भारता 'च्या या वर्षीच्या दिवाळी अंकांत मिळेल.

●

वेलीवेलीला बहर—

वेलीवेलीला बहर
माझ्या चित्ताला मोहर

कोंन्दे वाऱ्यांत सुगन्ध
भाव हृदयीं हो धुन्द

फुलें उमलीं फुलली
बाग आशेची खुलली

रङ्ग आकाशीं भरले
प्रेम जीवनीं रङ्गलें !

—सौ. प्रतिभा

विदर्भ साहित्य संघ

परीक्षा-समिति

ऑगस्ट १९५० मधील परीक्षांचे निकाल

मराठी प्रवेश

वर्ग १ लाः- य. र. पिंगळे, दारव्हा; शं. ना. गावंडे, आर्वी;

वर्ग २ राः- कमल के. पांडे, दि. ल. क्षीरसागर, प्र. उ. भेद, विमल द. दाणी, सुधा र. लोहकरे, सुनंदा के. निमोणकर, सिस्टर अमेलिया, सिस्टर एड्रियन, भा. ग. ठोंबरे.

वर्ग ३ राः- महेशचंद्र रामशंकर महेता.

मराठी प्रारंभ

वर्ग १ लाः- मीनाक्षी रघुनाथ पिंगळे, दारव्हा.

वर्ग २ राः- तु. ना. फाले, त्र्यं. मा. पाचघरे, ता. तु. चव्हाण, म. भी. वावनेकर, मारुती शं. देशमुख, गु. ना. गालफाडे

वर्ग ३ राः- ना. बा. गंधे, बा. ना. बोडखे, वि. दे. वाघ, शा. न. रुइकर, अ. का. सहस्त्रबुद्धे, अ. मु. मोडक, कुं. दु. येडे, चो. रा. येडे, ते. ल. बावनथडे, ति. भि. बिसेन, द. र. माणके, दुर्गा ल. पाठक, न. म. कुंजाम, प्र. रा. श्रीखंडे, मो. भा. कोलते, रा. अ. बिसेन, लीला पु. फडनवीस, वि. सु. डोये, शरयु वा. अत्रे, शालिनी गो. जोशी, श्री. वा. बापट, मो. कृ. लिमये, श. के. पांडे, सु. र. पिंगळे, ए. भि. घाटे, गो. का. कुळकर्णी, गो. शं. जुनगडे, ना. न. लड्डा, र. तु. पाटील, श. ज्ञा. वराडे, अ. दि. व्यवहारे, आ. वि. पवार, मु. आ. झिंझर्डे, शांताबाई विडवैकर, सु. श्री. सालोडकर, हे. रा. विडवैकर, गो. कृ. राठोड, ना. धु. तुराळे, प. पु पैठणकर, पु. ही. मुंधडा.

साहित्य विनीत

वर्ग १ लाः- प्रभाकर त्र्यंबक ओकटे, अकोला; कु. विमला जयवंतराव देशमुख, अमरावती; वि. श्री. गोखले, अमरावती; श्री. ग. हाडोळे, आकोट; म. श्री. धावेकर, मु. ह. शुक्ला, भंडारा; नी. कृ. राऊत, वरूड; ह. शा. नासरे, मा. मा. चौरे, वर्धा; कु. गोदावरी, दे. नाकाडे, सुदाम ह. फुलझेले, हिंगणघाट.

वर्ग २ राः- उषा वा. दामले, के. पं. देशमुख, कृ. ब. इंगोले, नलिनी दे. हिंगवे, ना. कि. गणोरकर ना. गं. पाटणकर, प्र. दे. बैस, प्रभावती शं. जोशी, भा. वि. सावरकर, म. ब. फुरसुले, वि. ना. वानखडे, स. त्र्यं. कुळकर्णी, स. वि. लवाळे, सु. शं. यादवडकर, कमल ज. देशमुख, द. अ. रोडे, दि. वि. यावलकर, प. त्र्यं. कुळकर्णी, प्र. मा. चाळीसगावकर, म. बा केचे, प्र. ना. गावंडे, श्री. अ. वाघमारे, कमल. पां. धंत्ते, लीला रा. प्रधान, वेणू के. पांडे, लीला गं. पैकने, सुमती स. कुंडले, टि. रा. गांधी, दि. रा. वाघमारे, भा. वि. पांडे, पद्मा ग. वेटावदकर, सौ. मंगला शद्रे, र. बा. मुनीश्वर, वि. गो. नाईक, अं. सं. जवळे, पां. रा. पिंपळे, सु. मो. टेणी,

न. ल. कणेरे, ना. सी. बेलसरे, शे. आ. वंजारी, चं. रा. पिंपळशेंडे, न. रा. निमजे, पु. अ. बोरखडे, र. भी. धिरे, व. ज. सिंगोटे, विशाला अय्यर, सुधा अ. चेपे, द. ह. अग्रवाल, र. वा. पाटेकर, व. पां. पाटील,

वर्ग ३ रा— चं. ज. शट्टा, दे. पुं. वानखडे, प्र. सू. भागवत, मा. तु. गावंडे, मा. शं. भागडे, श. शं. जोशी, श्री. वा. सोहोनी, श्री. वि. खेतान, श्री. ह. राजंदेकर, सरल के. मुजुमदार, सुधा. कृ. देशपांडे, सुशीला कोपुल, सुशीला. भा. ओक, सं. आ. टोंबरे, त्रिं. दे. जोशी, रा. रा. पानवाले, के. वि. सोनवाने, म. त्र्यं. म्हैसाळकर, सी. आर. तवर, सुधा श्री. गोखले, सु. ज. देशमुख, भि. न. मोहोकार, म. तु. शेगोकार, रा. रा. गनगणे, स. शं. खोटरे, भा. वा. जोशी. वि. वि. गोखले, आ. रा. मानापुरे, आ. श्री. द्रुगकर, के. डो. मनरे, द. म. कुर्वे, शं. के. पातुरकर, द. दे. रानडे, म. र. कोंगरे, वि. झी. उइके, नी. दौ. उपासे, भि. दौ. लोहे, ल. दौ. मानकर, न. रा. दुबे, ना. स. वावरे, वि. श्रा. फुलकर, ल. ल. भिमनवार, लीला. रा. वेले, श्री. वा. देशपांडे, द. रा. मराठे, म. वि. पाठक,

साहित्य परिचित

वर्ग २ रा— शकुन. वि. जवळेकर, वसुमती. वि. चित्रे, शकुंतला. धों. आंबेकर, मालिनी. ब. टोंगू, गं. ना. पोटनार, भ. रा. सावरकर,

वर्ग ३ रा— सौ. सुधा. गो. डोंगरे, प्र. रा. देशपांडे, उषा त्रिं. रहाटगांवकर, दुर्गा द. नाईक, प्र. बा. हिरडे, लीला. वि. हरणखेडकर, विमल. वि. धांदे, सुहासिनी श्री. जोशी, सुमन ल. खोलकुटे, य. शे. कुळकर्णी, कि. द. कटाळे, वा. सि. राऊत, म. रा. देवघरे, म. व. देशमुख, व. ग. देशमुख.

साहित्य स्नातक

वर्ग २ रा— कु. आ. बोरीकर, मु. वा. पांढरीकर, सि. मा. धामोरीकर, बा. उ. जुमडे, मा. वा. वडस्कर

वर्ग ३ रा— दा. ना. आसमवार, सुलोचनाबाई जुमडे.

साहित्य पारंगत

वर्ग २ रा— केशवराव वसंतराव कदम, आर्वी.

प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक

साहित्य विनीत या परीक्षेंत पहिल्या वर्गांत सर्वांत जास्त गुण मिळविल्याबद्दल श्री. महादेव श्रीराम धात्रेकर (भंडारा केंद्र) यांना "प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक" देण्यांत आलें आहे.

प्रभानिवास, जेलरोड,
नागपूर नं. १
ता. १–९–१९५०

वि. भि कोलते,
संचालक,

रा. पु. सगदेव,
कार्यवाह

परीक्षासमिति–वि. सा संघ.

टीप—निकालाचें छापील पत्रक कोणाला हवें असल्यास कचेरीकडे ८ आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

मुशाफिराचें जीवन

(छन्द-देवीवर)

★

मोहवुनी रूपाराणी
नको मज बोलवूं ग
आळवुनी नांव माझें
नको मज हिणवूं ग—१

सामाजिक सीमारेषा
ओलांडुनी जातांना ग
भिजविती माझ्या उषा
भंगलेल्या स्वप्नांनी ग—२

जीविताच्या पथावर
कोण; कोठें;·भेटुनी ग
भेट होतां; दुरावूनी—
कोण;कोठें;-जाणार ग—३

सहवास संपतांच
भंगलेल्या मूर्तिचें ग
अंतरिच्या गाभाऱ्यांत
सांपडती तुकडे ग—४

तुटलेले दुवे माझे
तुटलेल्या तारका ग
तृणांवर दंवबिंदु
नयनांचीं आंसवें ग—५

मुशाफिराचें जीवन
त्यांस नाही रूपरेषा
पुनर्भेट व्हावयाची
नको आशा,नको भाषा—६

—योगेश्वर अभ्यंकर

अनुक्रमणिका

साहित्याचा वनवास

पु. य. देशपांडे

★

प्रभु रामचंद्राच्या वनवासाची कथा भारतातील आबालवृद्धांना माहीत आहे. जुनी पिढी नव्या पिढीला ही कथा सांगते आणि अशा रीतीने हजारों वर्षे ही कथा भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनाच्या जिव्हाळयाचा भाग होऊन बसली आहे.

कैकयी ही रामाची सावत्र आई. तिला वाटलें, ' राम हा राजा दशरथाचा सर्वांत वडील मुलगा. शिवाय तो दशरथाच्या तीन बायकांपैकी सर्वांत वडील बायकोचाहि मुलगा. म्हणून दशरथाच्या नंतर तोच अयोध्येचा राजा होणार आणि आपला मुलगा भरत याला मात्र रामाच्या ओंजळीनेच पाणी प्यावें लागणार. ' ही गोष्ट कैकेयीला रुचली नाही. तिला ती शल्यासारखी बोचूं लागली. तिला आठवलें की, राजा दशरथाने आपल्याला तीन वर मागण्याचा अधिकार दिला आहे व तो आपण अद्याप बजावलेला नाही. तिने अवतार आणला. राजाने तिची मनधरणी सुरू केली. तिने तीन वरांची राजाला आठवण दिली. वर मागण्यास राजाने तिला अनुज्ञा दिली आणि त्या तीन वरांपैकी रामाला चौदा वर्षे वनवासांत पाठवावें, असा एक वर तिने मागतांच राजा दशरथ मूर्च्छित पडला व अखेरीस त्या धक्क्यामुळे त्याचें प्राणोत्क्रमण घडून आलें.

प्रभु रामचंद्राने वनवास आनंदाने पत्करला. तत्कालीन समाजजीवनाच्या उच्चतम व आदर्श मूल्यांची सजीव मूर्ति म्हणजे प्रभु रामचंद्र. रामाचा वनवास म्हणजे उच्चतम व आदर्श जीवनमूल्यांचाच वनवास ठरला.

आधुनिक जगांत राजा ही संस्था नामशेष झालेली दिसत असली तरी राजकारण कायमच राहिलेलें आहे; नव्हे, तें अधिक प्रखर व उग्रतम बनलें आहे. आणि राणी कैकेयीच्या सुप्रसिद्ध तीन वरांच्या मागे जी मनोवृत्ति होती तीच आधुनिक राजकारणाची आता अधिष्ठात्री देवता बनली आहे. या देवतेने आधुनिक काळांत अथवा कलिकालांत जीवनाच्या सर्व उच्चतम मूल्यांना वनवासांत पाठवून दिलें आहे.

उच्चतम जीवनमूल्यांचें दर्शन घडविणारें साहित्य व सौंदर्यपूर्ण सृजनशीलतेचे सर्व प्रकार यांच्या नशिबीं या आधुनिक काळांत वनवासच आलेला आहे. प्रभु

रामचंद्राच्या वनवासाला निदान चौदा वर्षांची कालमर्यादा तरी होती; पण साहित्य व कला यांच्या आधुनिक काळांतील वनवासाला कालमर्यादाहि असलेली दिसून येत नाही. बिनाचौकशी व बिनामुदतीच्या राजकीय कारावासाप्रमाणे साहित्य व कला यांना बेमुदत वनवासाची सजा मिळालेली आहे !

*

पुष्कळदा मला लोक विचारतात, 'काहो, तुम्ही आता काव्यलेखन अजिबातच बंद करून टाकलें आहे का ?' आणि कांही चोखंदळ मित्र व रसिक तर असाहि टोला मारतात की, 'राजकारणाच्या 'कांचनमृगा' मागे लागून साहित्याच्या 'सीते' ला मात्र तुम्ही अंतरवून बसला आहांत. ……… सोडा हें राजकारण आणि चिरंतन टिकेल अशी साहित्यनिर्मिति करण्यावर आपली सारी शक्ति केंद्रित करा. असें साहित्य जर तुम्ही निर्माण करूं शकला तर तीच भारतीय समाजाची खऱ्या मोलाची सेवा ठरेल. राजकारणाच्या 'कांचनमृगा' ची शिकार साहित्य–सीताहरणाच्या दुःखाशिवाय तुमच्या पदरीं दुसरें कांहीहि बांधूं शकणार नाही.'

लोकांची ही वाणी व रसिक मित्रांचे हे मर्मभेदी शब्द कधीकधी माझ्या काळजाला जाऊन भिडतात. आधुनिक राजकारण आणि विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळांतील भारतीय राजकारण हें खरोखरच 'कांचन–मृगा' च्या मृगयेप्रमाणे झालेलें आहे. १५ ऑगस्ट, १९४७ च्या नंतरच्या राजकारणाचा मी जेव्हा विचार करूं लागतों तेव्हा राजकारणाचें समाजजीवनांतील सर्वश्रेष्ठ स्थान डोळ्यांना दिसत असतांहि राजकारणाच्या मृगयेंतून मानवी जीवनाचीं नवीं मूल्यें हातीं येतील, या गोष्टीवरील माझा विश्वास आता डासळत चालला आहे, हें मला कबूल केलेंच पाहिजे. पण त्याबरोबरच मला हेंहि सांगितलें पाहिजे की, स्वातंत्र्यासाठीं गांधीजींच्या नेतृत्वाखाली जें राजकारण झालें त्याच्याशी माझें जीवन संलग्न झाल्याबद्दल मला यत्किंचितहि विषाद वाटत नाही. उलट, त्या राजकारणांतील अनुभवांमुळे माझ्या जीवनाला जी समृद्धि लाभली व त्या अनुभवांच्या प्रभावामुळे मला जें जीवनदर्शन घडलें त्याचा विसर मला कधीहि पडणें शक्य नाही. गांधीजींच्या हयातीपर्यंतचें राजकारण हें जीवनमूल्यांची प्रतिष्ठा वाढविणारें राजकारण होतें, असा माझा अनुभव आहे आणि म्हणून आज ना उद्या नवसाहित्य व नवकला यांच्या निर्मितीचें तें स्फूर्तिनिधान ठरल्याशिवाय राहणार नाही, असा मला विश्वास वाटतो. माझ्या बाबतींतच हें असें घडून येईल, असें म्हणणें आज तरी धाष्टर्याचें ठरेल. पण सन १९२० ते १९४७ पर्यंतचा कालखंड हा भारतीय इतिहासाचें आत्यंतिक मोलाचें असें सांस्कृतिक मानधन ठरेल याबाबत माझ्या मनांत तिळमात्र शंका नाही.

*

असें जर आहे तर मग राजकारणाच्या मृगजळाचा हव्यास सोडून साहित्य-निर्मितीकडे माझें मन अद्याप कां ओढलें जात नाही, असा प्रश्न शिल्लक उरतोच. या प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठीच हा लेख लिहावयास मी उद्युक्त झालों आहे. सन १९२० ते १९५० च्या काळांत माझ्या मनावर जे अनेक संस्कार झाले त्यांपैकी गांधीदर्शन, मार्क्सवाद आणि आधुनिक विज्ञान यांनी केलेले संस्कार हे प्रमुख होत.

पैकी मार्क्सवादाच्या मगरमिठींतून माझी आतां पूर्ण मुक्तता झाली आहे, असें मला म्हणतां येण्यासारखें आहे. ही मुक्तता घडवून आणण्याच्या कामीं सन १९४२ चें गांधीप्रणीत आन्दोलन हें जसें राजकीयदृष्ट्या कारणीभूत झालें तसाच आधुनिक विज्ञानांतील सापेक्षतादर्शन व परमाणुदर्शन यांचा प्रभावहि कारणीभूत झाला आहे. आणि आज माझें मन, एकीकडे गांधीदर्शनाची ओढ व दुसरीकडे आधुनिक विज्ञानाची ओढ यांच्या रस्सीखेचींत करकचलें जात आहे.

या रस्सीखेचीचा साहित्यनिर्मितीशी काय संबंध ?– असाहि प्रश्न विचारला जाण्याचा संभव आहे. या बाबतींत माझ्यापुरतें उत्तर असें की, गांधीदर्शन असो, मार्क्सवाद असो अथवा विज्ञानदर्शन असो, यांचा माझ्या मनावर जो संस्कार होतो तो केवळ बौद्धिक स्वरूपाचा नसतो. माझ्या आंतरिक अनुभव-साकल्यांतून मानवी जीवनाबाबतचे जे जिव्हाळ्याचे प्रश्न माझ्या अंतर्यामांत निर्माण होतात आणि जे कलात्मक साहित्याला प्रेरक अशा कल्पना-विचारांचा कल्लोळ माझ्या अंतःकरणांत उफाळून देतात त्या आंतरिक कल्लोळाशीच हीं सर्व दर्शनें इतक्या जिव्हाळ्याचा संबंध जोडतात की, त्यांच्या संघर्षाचें सृजनशील रूपांत निराकरण घडून आल्याशिवाय कसल्याहि प्रकारची कलात्मक साहित्यनिर्मिति माझ्या बाबतींत अशक्य होऊन बसते. माझ्या मनाची घडणच ही अशा प्रकारची असल्यामुळे माझ्या अंतःकरणांतील वैचारिक संघर्ष आणि माझें अनुभवसाकल्य यांच्या सजीव संवादित्वाशिवाय माझ्या बाबतींत तरी साहित्य वा कलानिर्मिति अशक्य आहे.

★

साहित्यनिर्मितीचे विचार माझ्या मनांत वारंवार डोकावतात. कधी कधी त्यांचा जोर इतका होतो की, नित्याचे सर्व व्यवहार बेदरकारपणें बाजूला सारून मी लेखणी हातीं घेतों. पण समोरच्या कागदावर शब्द साकार होण्यापूर्वीच लेखनाला प्रेरक झालेले विचार व कल्पना आंतरिक वैचारिक संघर्षांत गुरफटल्या जातात आणि त्यामुळे माझ्या लेखणीची हालचाल आपोआप बंद पडते. हें असें किती तरी वेळा घडून आलेलें आहे.

जीवनानुभवांतून आपोआप वर उसळून येणाऱ्या भावना-विचार–कल्पना ह्याच कलात्मक साहित्य वा इतर कलाप्रकार साकार करण्यास कारणीभूत होत असतात, असा माझा अनुभव आहे. अमूर्त भावना-विचार–कल्पनांची एक सुसंगत समूर्त प्रतिमा म्हणजेच कलाकृति.

आधुनिक विज्ञानानें निर्माण केलेल्या कल्पना इतक्या सूक्ष्म, मूलगामी व प्रचंड प्रभावी आहेत की, त्यांच्या प्रखर वास्तवतेपुढे माझ्या सर्व भावप्रतिमा फिक्या फिक्या पडून जातात आणि अखेरीस आंतल्या आंतच विरून जातात. सापेक्षतादर्शनानें सूचित केलेली दिक्कालाची सूक्ष्म व भव्य कल्पना माझ्या कलात्मक प्रतिभेला घेरी आणते. परमाणु–विज्ञानाचे सूक्ष्मतम व तरल सिद्धांत माझ्या सृजनशील कल्पकतेची भंबेरी उडवितात. आधुनिक जीवशास्त्र, शारीरशास्त्र व मानसशास्त्र वैयक्तिक भावसृष्टि, विचारसृष्टि व कल्पनासृष्टि यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवितात.

मानवामानवांतील नात्यांचा आशय व अर्थ हाच सृजनशक्ति प्रवृत्तीचा खरा गाभा आहे. पण विज्ञानजन्य आधुनिक यंत्रयुगाने मानवामानवांतील पारंपरिक अशा सर्व नात्यांचा इतका धुव्वा उडविला आहे कीं, कोणतेंहि मानवी नातें आज पुरेसें सार्थ वाटेनासें झालें आहे. आधुनिक विज्ञानाने व तज्जन्य यंत्रनिर्मितीने जीवसागरावर एवढें प्रचंड वादळ उठविलें आहे की, मानवांच्या चिमुकल्या जीवनौकांची त्यामुळे दाणादाण उडाली आहे. फुटलेल्या जीवनौकांच्या ओंडक्यांना बिलगून कांही कलावंत जीव कसेबसे जीवसागरावर तरंगत आहेत व किनाऱ्यावर फेकले जाण्याची आशा–अपेक्षा करीत आहेत ! वेडी आशा ! वेडी अपेक्षा !—

*

आधुनिक विज्ञानाने निर्माण केलेली प्रचंड कल्पनासृष्टि व विचारसृष्टि आणि विज्ञानजन्य यंत्रांनी मानवी समाजाची व मानवी जीवनाची केलेली दुर्दशा इतकी व्यापक व भयानक आहे की, त्यामुळे मानवी जीवनाला आज जितकी क्षुद्रता आलेली आहे तितकी ती मानवी इतिहासांत पूर्वी कधीहि आली नव्हती.—

“ शेकडोंशे योजनांचा परिघ पृथ्वीचा असे
शेकडों सहस्रावर्धींच्या अंतरीं ग्रहगोल ते ॥

कोटिकोटी योजनांवरि चमकती त्या तारका
कल्पनेच्या पार गतिने फिरत भव्यचि व्याप हा ॥

गगनमंडळ नृत्य करितें तांडवाचें सर्वदा
तारकांची माळ तुटते, फेकिली जाते सदा ॥

बनति त्यांचीं कितिक जगतें, कितिक विरती अंतरीं
मानवांचे क्षुद्र कण हे येति जाती त्यांवरी ॥

ज्ञान, प्रीती, प्रगति, सुख तें–त्या कणांच्या वल्गना
आण पेला— कालनिद्रा जीवतापा हरिल ना ॥

★

मानवाची व मानवी जीवनाची आत्यंतिक क्षुद्रता, हा आधुनिक विज्ञानयुगाचा व यंत्रयुगाचा परबल आहे. अशाहि परिस्थितींत मानवी जीवनमूल्यांची प्रतिष्ठा राखण्याची भाषा कधी कधी ऐकूं येते. पण ती किती पोकळ वाटते ! एकेका जीवनमूल्यासाठी, वैयक्तिक स्वाभिमानाच्या व मानवी प्रतिष्ठेच्या अगदी सामान्यतम अंगाची अब्रू राखण्यासाठी चोहीकडून पेटलेल्या जीवनाच्या होमकुंडांत गांधीजींप्रमाणे आपल्या सर्वस्वाची अखंड आहुति देत राहणें, एवढा एकच मार्ग आता बाकी उरला आहे. देशादेशांत, शहराशहरांत, गावागावांत शेकडों, हजारों, नव्हे, लक्षावधि लोक गांधीजींप्रमाणे मानवी जीवनमूल्यांच्या प्रतिष्ठेसाठी आपल्या सर्वस्वाची आहुति देण्यास पुढे सरसावतील तरच कदाचित् नवें साहित्य व नवी कला यांच्या निर्मितीला अनुकूल वातावरण या दुर्दैवी मानवी जगांत निर्माण होईल. असें जोंवर घडून येत नाही तोंवर साहित्य व कला यांना वनवासांत भिरंगत राहण्याशिवाय दुसरें कोणतें भवितव्य असूं शकणार !

पण—

" मरणाच्या कारंज्यांतुन
वाहे जीवनाचा झरा
रम्य विश्वाचा पसारा ! —"

विज्ञानजन्य यंत्रयुगाने भूतलावर सुरू केलेलें मृत्यूचें तांडव पाहून जे यत्किंचितहि भेदरून जाणार नाहीत, मृत्यूच्या कारंज्यातूनच जीवनाचा झरा वाहत असतो व तोच मानवी विश्वाला रम्यता प्राप्त करून देत असतो, या सत्याची चैतन्यमय जाणीव जर साहित्यकारांना व कलावंतांना, नित्य येणाऱ्या अनुभवांपैकी एखाद्याहि अनुभवांतून झाली, तर तिच्यांतूनच मानवी प्रतिभेला नवा बहर येईल. प्रतिभेचा हा नवा बहर वनवासाचेंहि कलापूर्ण व सौंदर्यपूर्ण असें नंदनवन बनवील आणि मग, ज्या विज्ञानाने व विज्ञानजन्य यंत्रांनी मानवी जीवनाला क्षुद्रतम बनवून टाकलें तेंच विज्ञान व तींच यंत्रें जीवनमूल्यांचें मृत्युंजय असें भव्य दर्शन घडविणाऱ्या कलात्मक मानवी प्रतिभेच्या पायाशीं लोटांगण घालूं लागतील !

मृत्युंजयी साहित्य व मृत्युंजयी कला हीच साहित्य व कला यांच्या विज्ञान-युगीन वनवासाचा अंत घडवून आणण्यास समर्थ ठरेल.

●

जसा मी आहे—

★

जसा मी आहे तसा
दाखवितां जगता
तें घे ना समजुन
पुरतें उमजुन
दाखविण्याचे दांत वेगळे
खाण्याचे परि दुजे आगळे
हाच न्याय तें ठेवितसें
इथेच माझें
पुरतें चुकलें
दंतावलिचे भाग वेगळे
हे ह्यासाठी
हे त्यासाठी
हें कळवाया हवें जगाला

हें तर झालें
स्पष्ट विवेचन
आणि इतकें
करित राहिलें,
तरि ही होइल
काय सुदर्शन
जसा मी
आहे तसा
दिसेन ह्या जगता!

जसा मी आहे तसा
मला तरी का
आहे ठाउक!
इमारतीचा भाग दर्शवी
नवग्रंथाच्या वरचें वेष्टन,
हेंच आधि ने
मनास हरखुन

तशी न्यूनता
लपवायाला
त्वरें धावतें
मम अंतर्मन
ठिगळें लावुन
वेताने वा शिवून
अथवा वरचा खाली
काठ ओढुनी
नेसावें तें लागे धोतर.
हीच वृत्ति मी
मनास लावी.

तरिहि द्वैत हें
मनांत राही
जसा मी
आहे तसा
दिसेन का जगता!

मा. नी. गलगलीकर

●

साने गुरुजींचीं पत्रें

★

(१)

जय हिन्द

ता. ४।४।४९

सेवेशीं कृ. सादर प्रणाम,

तुमचें पत्र पोचलें. तुमची तळमळ प्रभु कृतार्थ करो. समाजवादी विचारसरणींत जी अपूर्णता वाटते ती तुमच्या सारख्यांनी येऊन दूर करायला हवी! समाजवादी चळवळ केवळ भाकरीची नाही. आचार्य नरेंद्रदेव परवां म्हणाले त्याप्रमाणे ती एक मानवतेची चळवळ आहे. बुद्ध देव म्हणत "उपाशी माणसाजवळ अन्नब्रह्माच्या भाषेंत मी बोललें पाहिजे." मी तुमच्या कर्मक्षेत्रांत येऊं इच्छित नाही. ज्याला प्रत्यक्ष सेवा म्हणतात ती माझ्या हातून होत नाही; म्हणून मी दुःखी असतो. विमलाताई, तुम्ही एक मुलींचें गुरुकुल कां नाही काढीत ? मुलांचीं छात्रालयें आहेत. परंतु मुलींचीं नाहीत. ज्या मुलींच्या छात्रालयांत सर्व जातिधर्मांच्या मुली असतील, जेथे आद्योगिक, सांस्कृतिक, श्रमिक वातावरण राहील. तुम्हांला तें शक्य होईल. छात्रालय अशा ठिकाणीं हवें जेथे शिक्षणाच्या सर्व सोयी आहेत. नवीन मुली यांतून बाहेर पडोत. मी काय सांगूं !

मजवर रागवूं नका. तुम्ही किती काम करता ! मी येऊन शाब्दिक बडबड करण्यापलीकडे काय वेरे करूं शकेन ! शिबिर किती तारखेपर्यंत आहे ! श्री. दादासाहेबांच्या प्रवचनांचा सारांश साधनेला पाठवाल काय ! मला थकवा वाटतो. साधनेचें कामहि खूप. यायचें म्हणजे शनिवार रविवार. त्या वेळेस कोठे तरी आधीचाच अडकलेला. तुमचें शिबिर यशस्वी होवो. सर्वांस प्रणाम.

तुमचा,
—पां. स. साने

(२) १०।३।५०

जय हिंद १३ मधुभुवन
पारशी कॉलनी, दादर, मुंबई

प्रिय श्री. विमलाताई,

सप्रेम प्रणाम,

तुमचें व त्या आधी आलेलें श्री. आनंद कळमकर यांचें—अशीं दोन्ही पत्रें मिळालीं. तुमची प्रकृति बरी आहे वाचून आनंद झाला. ती. दादांचा आशीर्वाद आहे. प्रभूचा तर सर्वांनाच आहे. तुमची प्रकृति पूर्ववत् होवो व सेवेचा आनंद लुटायला मिळो.

तुम्ही 'जनतन्त्रा'बद्दल लिहिलेंत. त्याचें पक्षातीत धोरण राहणार, वाचून आनंद झाला. परंतु मजजवळ लिहायला असें कांही नाही. साधनेचाच संसार गळ्याला फांस झाला आहे. विमल, मजजवळ ना विचारपुंजी ना अनुभवपुंजी. मी अंतर्बाह्य भिकारी आहे. शूद्र प्रवृत्तीचा मी आहे. गेलीं ३० वर्षें मानसिक झगडा चालला आहे. एक मन म्हणतें जा, कोठे देवाजवळ जाऊन बैस. परंतु माझी कर्ममय प्रवृत्ति. कोणाला जेवण करून वाढावें, कोणाला नोकरी करून. सटरफटर पुस्तक मुलांसाठी लिहून दिडकी मिळाली तर मदत करावी. असेंच देवाजवळ बसलों तरी करणार. मी राजकीय वृत्तीचा नाही. काँग्रेस सर्वसंग्राहक, धर्मातीत व त्यागवृत्तीला वाव म्हणून वावरत होतों तिच्यांत. करीत होतों प्रचार. करीत असे सभासद, विकीत असे खादी. झाडीत असे संडास. तोहि काळ गेला. मी पंढरपूरच्या उपवासानंतर केवळ अलिप्त कुठे राहणार होतों तर मित्रांवरील आसक्तीने पत्र काढून बसलों. आतां त्याचेच पाश वेढीत आहेत. साधना चालवतांना नवीन काय देऊं, दर वेळेस वाटतें. लोकांजवळ लेखांनी भिक्षा मागणें मला जमत नाही. मोबदला द्यायला पैसे नाहीत. तरी जनतंत्राला मी काय लिहून पाठविणार! शेतकऱ्यांचे तरी कोणते प्रश्न मी अभ्यासिले आहेत! तुम्हां मित्रांस यश येवो. मजवर कोणी रागवूं नका. क्षमा असा.

—पां. स. साने

ती. दादांस कृ. सा. प्रणाम. त्यांच्या चंदू वगैरे मुलांस अ. आ.

—पां. स. साने

प्रेषक—प्रमिला ठकार

विश्वदर्शन

★

सुनील लोचनीं
नभचा निलिमा
स्नेहल वदनीं
चंद्राची सुषमा १

विशाल कपाळीं
नभाचें औदार्य
प्रशांत चर्येत
सागर गांभीर्य २

सूचवी ऋजुता
सरल नासिका
गालिंच्या खळींत
भाग्याची पताका ३

दिशेचें सुहास्य
आरक्त अधरीं
फुलांचें मार्दव
स्नेहल अंतरीं ४

स्वर्धुनि शुचिता
रदनीं धवल
तारांची दिव्यता
नयनी उज्ज्वल ५

सुदीर्घ केशांचा
संभार मोकळा
उघळी प्रीतीचा
सुगंध आगळा ६

आरक्त कपोलीं
प्रसन्न प्रभात
मधुर कंठांत
गंधर्व संगीत ७

मांगल्य मनोज्ञ
आरक्त कोंदणीं
विधीने निर्मिली
निरुंद जिवणी ८

निष्पाप भावांत
संध्येची चारुता
निगूढ मौनांत
निशेची शांतता ९

भालिंच्या तिलकीं
बालार्क आरक्त
किरण साक्षात
ज्योतीचे अव्यक्त १०

नयन करितां
मांगल्य प्रदान
बितळे क्षणांत
निराश जीवन ११

हृदिचें सौहार्द
सुखाचें साधन
सखीचें सान्निध्य
मुक्तींचें निधान १२

सौंदर्य ज्ञानांत
शुक्राची चांदणी
गमते सुरम्य
सुखाची पर्वणी १३

सौंदर्य सौजन्य
सत्याचा आगम
सुमुखि गमतो
त्रिवेणी संगम १४

श्रीकृष्णें स्वमुखिं
दाविलें साद्यंत
विश्वाचें दर्शन
अव्यक्त अनंत १५

सखीचें देखितां
सुहास्य वदन
नव्हेच काय तें
विश्वाचें दर्शन १६

—कमलाग्रज

●

ग्रंथसमीक्षा

हि म शि ख रें *

श र चंद्र मु क्ति बो ध

डौलदार भाषाशैलीचा कल्पनाऐश्वर्याने नटलेला असा 'हिमशिखरें' हा आपला गद्यकाव्यसंग्रह श्री. क्रांतदर्शी बुधे यांनी नुकताच मराठी रसिकांसमोर ठेवला आहे. मला वाटतें अध्यात्मप्रधान आणि मौलिक असा हा पहिलाच गद्यगीत-संग्रह आहे. 'हिमशिखरें'तील गीतें मधुर, सुंदर आणि सफाईदार आहेत यांत शंकाच नाही. परंतु प्रस्तावनाकारांनी अध्यात्मप्रतीतिप्रधान काव्याची विस्तृत चर्चा करून या गीतांतून अध्यात्माची प्रतीति प्रस्फुटित झालेली आहे असाहि निर्वाळा दिला आहे. म्हणूनच 'हिमशिखरें' बद्दल विशेष कुतूहल वाटणें अगदीं साहजिक आहे.

महाराष्ट्राला अध्यात्मवादी काव्याचें वावडें नाहा हें खलील जिब्रानच्या लोक-प्रियतेवरून सिद्ध झालें आहे. परंतु महाराष्ट्रांत अध्यात्मप्रधान साहित्याची निर्मिति होत नाही हें खरें आहे. वारे निराळ्याच दिशेने वाहत आहेत. तेव्हा आजच्या सामाजिक संक्रमणकालांत श्री. बुधे यांनी ही जी स्वतःची अनुभूति रसिकांसमोर ठेवली आहे तिच्या जाणिवेचें पृथःकरण मोठें अगत्याचें ठरेल आणि नव्या साहित्या-संबंधीं कयासहि बांधतां येतील, असें वाटतें.

प्रतीकांच्या मदतीने कवीने आपली अनुभूति प्रकट केलेली आहे. कवि राधास्वामी संप्रदायाचे असून परमेश्वरभक्ति ही त्यांची वृत्ति आहे. परमात्म्याशी भेटण्यासाठी त्यांचा आत्मा तळमळत आहे. रतिभावांतील उत्कटता सर्वोच्च असते. तेव्हा परमात्म्याच्या ठाया प्रणयभावाने भक्ति केल्यासच त्याच्याशी मीलन होऊं शकतें, अशी कवीची धारणा आहे. सूफी संतांचीहि भूमिका अशीच होती. ते परमात्म्याला स्त्रीरूप मानत व त्याच्यासाठी रात्रंदिवस तळमळत. या प्रेमाला ते 'इश्क हकीकी' म्हणत. परंतु आत्म्याला त्या महान् प्रेमाप्रत—त्या महान् सौंदर्याप्रत एकदम पोचणें कसें शक्य आहे ! म्हणून ते "इश्क मजाजी"तून "इश्क हकीकी—" कडे जात. इहलोकांतील सौंदर्य, प्रणयाच्या अनुभूतींतूनच परमात्मप्रेमाप्रत उन्नत होतां येतें अशी त्यांची श्रद्धा होती. कर्मकांडावर आधारलेल्या कट्टर मुस्लिम धर्माविरुद्ध

* कवि—श्री. क्रांतदर्शी बुधे. प्रकाशक : वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. मूल्य २॥ रु.

अनुक्रमणिका

सूफी संताचा हा प्रेममार्ग म्हणजे उघड उघड विद्रोह होता आणि त्यांचा हा नवा सार्वभौम प्रेमधर्म पाळण्यासाठी त्यांना अतोनात छळ सहन करावा लागला होता. सूफी संत हल्लाज याला तर सुळावरच चढावें लागलें होतें. सर्वसाधारण मानव व समग्र सृष्टीशी सूफी संत एकजीव झाले होते. बुधे यांची भक्ति देखील प्रणय-प्रधान आहे. परंतु परमात्म्याला पुरुष मानलें असून त्यांनी स्वतःकडे स्त्रीची, प्रेयसीची भूमिका घेतली आहे. परतत्त्वाच्या मीलनासाठीं ही प्रेयसी तळमळत आहे. आणि या विरहानुभूतीचीं अनेकानेक सूक्ष्म आंदोलनें, मधुर स्मृति, अंतःकलह, समर्पण वृत्ति, संपूर्ण समर्पण वृत्ति नसल्याने आलेली आत्मग्लानि; आत्मग्लानींतून उन्नत होणारी लीन वृत्ति वगैरे विरहभावनेच्या अनेक छटा या गद्यकाव्यांतून प्रकट करण्याचा प्रयत्न श्री. बुधे यांनी केलेला आहे. किंबहुना त्यांच्या विरहानुभूतीच गीतरूपाने साकार झालेल्या आहेत.

पुस्तकाच्या आरंभींच जें गद्यगीत दिलेलें आहे त्यांत त्याची काव्यासंबंधींची भूमिका विशद झालेली आहे. त्यांचें काव्य हें " देहाच्या अनिश्चितीच्या " जाणिवेंतून उदयास आलें आहे. तें " पार्थिव संस्कारांनी " गतिशून्य होत नाही व तें " अर्धवट साक्षात्कारांनी हुरळूनहि जात नाही " तर जें त्या परतत्त्वासाठी —

> उपजतेक्षणींच युवतीचं तारुण्य घेऊन जें प्रेमास्पदाला रिझविण्यासाठी शांत; दास्य, सख्य आणि वात्सल्य या यौवनलीलांस आवाहन करतं;
>
> तें काव्य—तेंच कवीची जीवनसाधना होऊं शकेल आणि त्या काव्याचा सहजआविष्कार असलेली हिमशिखरें—तीं मात्र अंतरीं स्फुरणाऱ्या प्रार्थनेप्रमाणे अनंताच्या दिशेने उंचावत राहतील.

देह क्षणभंगुर असून आत्मा अमर आहे हा त्यांचा विश्वास; म्हणूनच जगहि क्षणभंगुर आहे हें ओघाने आलेंच. म्हणून संपूर्ण जीवनास तिलांजलि देऊन ते त्या परमात्म्याच्या विरहानें व्याकुळ झाले आहेत. कवीची ही प्रीति ऐहिक प्रीतीच्या विरुद्धच आहे. या ऐहिक प्रीतीला ते मोहच मानतात. प्रेममार्गापासून दूर नेणारी अशी दुष्ट शक्ति मानतात. निसर्गाचें प्रसन्न सौंदर्य मात्र त्यांच्या मनाला ओढतें व त्या निसर्गाच्या अर्भकाचें कौतुक करावेंसें त्यांना वाटतेंच—

> ' तुझ्याच ' या एकमेव शब्दांत तूं अंग चोरून बसलेला दिसतोस......

अशा साक्षात्कार झाल्याचा त्यांना भास होतो. जड राहणें ही त्यांना शुद्ध बळजबरी वाटते. ते म्हणतात;—

> ' व्यवहार, कर्तव्य—असले क्षुद्र विचार प्रत्यही माझ्या आड येतात रे..

त्यांचें आणि ह्या परमतत्त्वाचें द्वंद्व सदोदित चालत असल्याचा त्यांना प्रत्यय येतो. स्वतःचें जीवन त्यामुळे अधिकाधिक भावसघन होत चाललें आहे याची त्यांना जाणीव होते—

> 'मइयाशीं नित्याचा विरोध साधून
> किती अद्‌भुत-रम्य केलंस तूं माझं जीवन.'

आणि त्यामुळे त्यांना मृत्यूचें भय वाटत नाही. त्याचेबद्दल एक प्रकारचा सलाभाव निर्माण होतो ... त्यांना वाटतें—

> 'खरोखरीच संहारांतून विविध साक्षात्काराचे क्षण उदयास येतात.
> मृत्यूचं विस्तीर्ण आकाश माझ्या अनुभूतींनी व्यापून जातं आणि आनंदानं स्वतःच उजळलेल्या असंख्य दीपांनी तळपून उठतं.'

विरहाच्या अनेक भावना प्रकट करतांना त्यांच्या कल्पनाशक्तीची त्यांना फार मदत झाली आहे. उलट कल्पनांचा पिसाराच अधिक डोळे दिपवतो असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाही...

उमरखय्यामचें प्रतीक असलेलें गीत या संग्रहांतील उत्कृष्ट गीतांपैकी एक आहे. प्रियकराची वाट पाहात असलेली विरहिणी निराश अवस्थेंत बसलेली आहे. समोरून सुंदर स्त्रियांच्या घोळक्यांत खय्याम येतांना दिसतो. मद्याचे पेल्यावर पेले तो पीत आहे. विरहिणीला त्याची कींव वाटते. खय्याम तिला म्हणतो—'चल, तुझा प्रियकर मी तुला दाखवतों.' तो गोसाव्याच्या मेळ्यांत दारूचे पेले रिकामे करतांना दिसतो. तिला प्रियकराच्या हातीं दारू पाहून वैषम्य वाटतें. ती प्रियकराच्या हातांतील दारू उडवून लावते. कारण तिला तिची दुर्गंधि सहन होत नाही. मात्र, सांडलेली दारू जिव्हेच्या सहस्र हातांनीं खय्याम गोळा करूं लागतो. त्याची विलक्षण मदिराशक्ति पाहून ती मनाशी लाजते. आपल्या प्रियकरासंबंधीं आपणास ती आसक्ति नाही याची तिला प्रचीति येते. भावसौंदर्य, प्रतीकसौंदर्य आणि आत्मविश्लेषणात्मकता यामुळे हें काव्य उच्च दर्जाचें झालें आहे यांत संशय नाही.

तरीहि या संग्रहाचें वैशिष्ट्य म्हणजे आत्मपरीक्षण नव्हे. या गीतांमध्ये विरहभावनाच प्रधान आहे. या गीतांवरून बुधे यांची सहानुभवाची शक्ति दिसून येते. विरहिणीला आपल्या मानसिक अवस्थेप्रमाणेच निसर्गाचें रूप आनंददायक अगर तापदायक वाटूं लागतें. गीत ३५ मध्ये मेघ, अनिल, कोकिला या सार्‍यांचे ध्वनि त्यांना भेसूर वाटतात. कारण कदाचित्—

> या भेसूर कलरवांनी माझं अंतःपुर विदीर्ण होईल अन् ते जीवभाव पांगून प्रखर विश्वतेजांत एकादे वेळीं भस्मसात् होतील...

 ही मीलनासाठी आर्त हुरहुर त्यांना सापली आहे. पण एवढें तत्त्वज्ञान पाठीशीं

असतांना त्यांना मीलनाची कल्पना नाही. प्रियकराचा अनेक रूपांत साक्षात्कार होतो असें ते सांगतात परंतु ती त्यांची निव्वळ इच्छापूर्ति आहे असेंच मानावें लागेल. कारण त्या जाणिवेचें खालील वर्णन पाहा —

पुष्पहार घालून मी तुझ्या शेजारी उभी राहिलें तोंच तूं मला
आपल्या बाहुपाशांत घेतलंस

परमात्म्याने आत्म्याला कवळतांच त्या दैवी ऐक्यतन्मयतेंत जगाचें भान कोठलें उरायला ! युगें युगें साधना करीत असलेली विरहिणी प्रियकराच्या बाहुपाशांत जातांच अत्युत्कट मीलनानुभूतीने तल्लीन नाही का होणार ! सान्त अनंताच्या मलिनांत एक असीम तन्मयता नाही का प्राप्त होणार !

पण 'हिमशिखरें'च्या विरहिणीला तसें कांहीच वाटलेलें दिसत नाही. देण्याघेण्याची जाणीव विरलेली नाही. ती तावडतोब म्हणतेच ना, की—

समोर कीर्तीचा सुरम्य गालिचा पसरला होता
त्यावर सोन्यामोत्यांचा सडा पडला होता.

कोणास ठाऊक त्या महान् क्षणीं तिला ही कल्पना कशी सुचली ! तिची बुद्धी खडखडीत जागी होती असेंच ना ! व झालेल्या साक्षात्काराचें वर्णन हें असें बिघडूं शकतें ! त्यांचीं गद्यकाव्यें कल्पनारम्य आहेत; कोठे कोठे त्यांत विलक्षण हुरहुरहि आहे परंतु तींत अध्यात्मानुभूतीचा मागमूसहि नाही हें खरें आहे. अनुभूतिबरोबर प्रतीक स्वयमेव आलें पाहिजे. अध्यात्मप्रधान काव्यांत तर अनुभूतीच्या अभिव्यक्तीस साहाय्य करण्यापुरताच प्रतीकांचा उपयोग होऊं शकतो. तशीं कांहीं प्रतीकें बुधे यांनीहि कांही ठिकाणीं वापरलेलीं आहेत. खालील एक उदाहरण म्हणून सांगतां येईल—

' शब्द आणि संकोच ह्यांच्या सीमेवर घोटाळणाऱ्या—
प्रीतिइतकीच मी दीन झालें आहे '

परंतु ही स्थिति सगळीकडे नाही. आजपर्यंतच्या कवींनी मनमुराद उपयोगांत आणलेल्या कल्पनांची ही गुंतावळच या गद्यकाव्यांत महत्त्वपूर्ण झालेली आहे. या कल्पनेच्या करामतींतूनच आशय चांचपावा लागतो. हीं गीतें लिहिणारा कलावंत " किती जागरूकपणें आपलीं गीतें सुंदर करण्यासाठी नक्षीकाम करीत होता हें यावरून सांगतां येईल.

ऐहिक जीवनाचा बुधे यांनी कितीहि धिःकार केला असला तरी या गद्यकाव्यांतील त्यांची विरहवृत्ति त्यांच्या भौतिक जीवनविषयक दृष्टीचाच परिपाक आहे. सूफी संत, भारतीय संत, महाराष्ट्रीय संत यांचीं कोमल हृदयें जनतेसाठी हेलावत म्हणून ईश्वरापर्यंत उन्नत होत असत. तत्कालीन संकुचित आणि कर्मकांडावर आधारलेल्या, भेदाभेद मानणाऱ्या अशा धर्माविरुद्ध त्यांना बंड करावें लागलें. त्यांनी ज्या सार्वभौम प्रेमाचा पुरस्कार केला त्या प्रेमांत साऱ्या मानवजातीस स्थान होतें. प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांनी आपला प्रेममार्ग उतरविला असल्यामुळे त्या त्या

काळा त्यांना छळ सहन करावा लागला. त्यांच्या काव्यामागील महान् स्फूर्तीचें, त्यांच्या विराट आत्मविश्वासाचें मर्म यांतच होतें. अस्सल मानवप्रेमाचें प्रत्यक्ष व्यवहारांत आचरण करूनच ते परमेश्वरभक्ति करूं शकत असत. म्हणून मोठमोठीं प्रतापी राज्यें आलीं गेलीं परंतु ते संत जनतेच्या हृदयीं आजहि विराजमान आहेत. त्या काळीं त्यांची भक्ति, त्यांचें ईश्वरप्रेम सर्व समाजास पुढे नेणारें होतें परंतु आजचे भक्तिमार्गी, प्रेममार्गी बुवे यांची वृत्ति मात्र समाजाची अनवस्था पाहून साऱ्या मानवजातीचाच अस्वीकार करीत आहे. ते काय म्हणतात पाहा—

मानवा, पुरे कर तुझं नाटक
सॉक्रेटिसला विषाचा प्याला दिलास
येशूला सुळावर चढविलेंस
संतश्रेष्ठ पलटूदादाला जिवंत जाळलेंस
सदाचा तूं युगपुरुषाची विटंबना करीत आलास
त्याची थोरवी तुला पाषाणाला काय कळणार !

ज्या संताची कड घेऊन बुवे मानवाची खरडपट्टी काढीत आहेत त्यांनी जर हीं गद्यगीतें वाचलीं तर त्यांना काय वाटेल ? सॉक्रेटिसला विष कां प्यावें लागलें ? त्याने आयुष्यभर कोणतें काम केलें ? येशूला सुळीं कोणी दिलें आणि त्याचा धर्म कोणासाठीं होता ? पलटूदादांनी आयुष्यभर कोणतें कृत्य केलें ? कवींना माझी अशी विनंति आहे की त्यांनी याबद्दल नीट माहिती करून घ्यावी. ज्या मानवासाठी वरील संतांनी देह ठेवले त्या मानवाला शिक्षा काय म्हणून ? बुवे यांची ही शुद्ध दिशाभूल नव्हे का ?

याचें कारण स्पष्ट आहे. आधुनिक जीवनाची प्रतिक्रिया म्हणून बुवे यांचा हा अध्यात्म जन्माला आलेला आहे. आणि या जगांत अस्सल मानवी मूल्याची स्थापना करण्याचें बळ, त्या आदर्श, प्रेममय, सौंदर्यपूर्ण जगाचें स्वप्न पाहाण्याची शक्ति आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागाची त्यांची तयारी नसल्यामुळे त्यांनी जगाकडे पाठ फिरवली आहे. त्यांची इतिहाससंबंधींची खालील चुकीची कल्पना पाहा—

" इतिहास ? केवळ आभास आहे तो ! राजांचं ऐश्वर्य, राण्यांची विलोलता, हिऱ्यामोत्यांची धुलावण,— साऱ्यांची तऱ्हातऱ्हांनी गुंफण करणारा कुटिल कारागीर म्हणजे इतिहास. शब्दांना अर्थाचं, अर्थाला मोहक कथानकाचं रूप यायचं हेंच त्याचं कार्य !— सगळं सगळं कांही आभासावर उभारलेलं ...... "

या अशाच वृत्तामुळे त्यांच्या अंतरीची हुरहुर अध्यात्माचा आश्रय घेऊं पाहात आहे. त्यांच्या प्रेमानुभुतींची युगप्रातिकूल वृत्ति हीच त्यांची अनुभूति अध्यात्ममूलक नसून पलायनमूलक असल्याची खूण आहे......

बुधे यांची अनुभूति ऐहिकच आहे. ती त्यांना आजच्या परिस्थितींत जशी जाणवत आहे तशीच त्यांनी लिहिल्यास ती अधिकच लखलखूं लागेल यांत संशय नाही. त्यांच्या विरहवेदनेची मीरेच्या विरहवेदनेशी तुलना करून पाहाण्यासारखी आहे. मीरा देखील त्याच अमूर्त कृष्णाशीं तन्मय झाली होती आणि याची तिला स्पष्टच जाणीव होती—

" गगनमंडल पे सेज पिया की
किस बिध मिलना होय ...... "

असें ती स्पष्टच म्हणते. पण तिची अनुभूति इतकी अस्सल होती, तिचें वेड एवढें जबर होतें की ति या खालील ओळी—

" हरी मैंतो प्रेम दिवानी म्हारो दरद न जाने कोय "

वाचून हृदयवीणेची तार न् तार झंकृत होते! या वेडापायीं तिने व्यवहारांत केलें काय ! तर त्या मध्ययुगीन काळांत सर्व सामाजिक नीतिमत्तेच्या कल्पना सपशेल गुंडाळून ठेवल्या. महालांतली मीरा वाटेवर आली व प्रेमभजनांत तल्लीन झाली—

" साधुसंग बैठ बैठ लोक लाज खोई...... "

असें ती स्वतःच सांगते. त्याच सार्वभौम प्रेमधर्माने राजराणी मीरेस वाटेवरील जनतेंत आणून सोडलें होतें. आणि असें करण्यासाठी सर्व सामाजिक दर्दाच्या भारतीय स्त्रीधर्माच्या सर्वच कल्पनांना अर्धचंद्र तिला अगोदर द्यावा लागला होता. मीरेची ही महापूर आलेल्या वेगवान् नदीप्रमाणे धुंदावत जाणारी, स्वयंनिर्मित प्रतीकांच्या साहाय्याने प्रकट होणारी अस्सल विरहवेदना श्री. बुधे यांच्या विरह-काव्याशी तुलना करून पाहाण्यासारखी आहे. त्यावरून कवीच्या अनुभूतीचा प्रकार कळेल.

वास्तविक जीवनांतून स्फूर्ति मिळाल्याशिवाय कोणताहि कला निर्माण होणें कठिणच. स्वतःच्या जाणिवा खरोखर कशा आहेत याची कलावंताला नीट माहिती असलीच पाहिजे. प्रस्तुत संग्रहाच्या कवींनी या दृष्टीने स्वतःचें परीक्षण करणें उपकारक ठरेल. वास्तववादी महाराष्ट्रांत आज अध्यात्मप्रधान काव्य कां निर्माण होत नाही याचें कारण आता जनतेच्या आकांक्षांचें प्रतिनिधित्व त्या प्रकारचें काव्य करूं शकत नाही हेंच आहे. कलावंत हा समाजाचाच एक घटक असल्यामुळे त्याला समाजाच्या परिणामापासून अलग राहणें संभवत नाही. त्याला फक्त त्या वास्तवतेचा स्वीकार अगर अस्वीकार करतां येतो आणि अस्वीकार करण्याची भूमिका कवीच्या सर्व विचारांना, जाणिवांना संकीर्ण करते. ही संकीर्णताच नकारात्मक सामाजिक भूमिकेचा परिणाम होय. तीच संकीर्णता प्रस्तुत संग्रहाच्या कवींच्या जाणिवेबाबत आहे असें म्हणणें भाग आहे. रवींद्रांच्या काव्याकडे नुसती नजर जरी टाकली तरी, परतंत्र भारतास स्वतंत्र सांस्कृतिक चेतना कोणत्या पद्धतीने ते देत होते तें कळेल. बंगालची संपूर्ण वनश्री आणि ग्रामश्री; भारताची स्वातंत्र्याकांक्षा आणि उच्चतर

नैतिकतेची जाणीव त्यांच्या कवितेतून ओसंडते आहे. त्यांना त्या अज्ञेय सत्तेचा परिचय या ज्ञेय वास्तवतेतूनच झाला असल्यामुळे त्यांच्या कवितेत अभूतपूर्व टवटवी, सौंदर्य आणि मूर्तता आली. ते स्पष्टच म्हणतात—

मोह मोर युक्ति रूपे उठिबे ज्वलिया
प्रेम मोर भक्ति रूपे उठिबे फलिया

(मोहातून मुक्तीची शिखा प्रज्वलित होईल. प्रेमातूनच भक्तीकडे जाता येईल.)

आज भारत रवींद्रांच्या काळाच्याहि पुढे गेलेला. आजची युगाकांक्षा निराळी आहे, युगध्येय निराळें आहे. त्याच्याशी तल्लीन झाल्याशिवाय आजचें साहित्य निकोप आणि उच्चतर कसें निपजेल !

प्रस्तुत संग्रहाच्या कवींना प्रेमाची सूचना हीच की त्यांच्या संग्रहांतील विरह-भावना सत्य आहे, परंतु ती मानवी आहे. नाजुक विरहभावनेत फुरंगटून बसलेल्या वयःसंधींतील मुलीप्रमाणे ती आल्हादकारक आहे. तिच्यावरील अध्यात्मिकतेच्या बुरख्यामुळे ती उगीचच अंधुक आणि दूरस्थ भासत आहे. तिचें अस्सल मानवी स्वरूप त्यांनीं लोकांसमोर मांडल्यास त्यांच्या कलेला निराळीच टवटवी येईल व तिच्याविषयीं आपुलकी वाटेल. त्यांच्यासारख्या कलावंताने ही नवी निकड ओळखल्यास मराठी भाषा अधिक समृद्ध होईल यांत शंका नाही.

●

माझ्या पुढील प्रश्न !

दुर्गा भागवत

★

गेलीं कित्येक वर्षें मला एक पेंच पडला आहे की भाषा सोपी पण चांगली कशी लिहावी ! शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें आम्ही दादोबा पांडुरंगापासून शिकलों पण जें लिहायचें तें मनोरंजक पण मुद्देसूद, वाचकांच्या आपोआप गळीं उतरेल असें लिहायचें कसें, हें मात्र स्वतःच प्रयोग करून शिकावें लागतें. गांधीजी किती सोपें आणि समर्पक लिहीत ! वाटेल त्या विषयावर आणि अगदी आटोपशीर. पण त्यांचें अनुकरण करायला जा की तुमची आमची भाषा किती हास्यास्पद दिसते ! मी पुष्कळदा त्यांची नक्कल करण्याचा प्रयत्न केला आणि फसलें. मागाहून कां तें ध्यानांत आलें ! गांधीजी लिहीत तें त्यांच्या अनुभवांतून स्फुरलेलें होतें. त्यांच्या व्यक्तिमत्वाने सचेतन झालेलें होतें. शब्द साधे, छोटीं वाक्यें, केरपोतेऱ्यापासून तों राजकीय घटनेपर्यंतचे सारे लहान मोठे विषय ते एकाच गंगाजळींतून काढीत. पण त्यांत न्यून दिसत नाही. स्त्रीपुरुषांच्या संबंधाबद्दल अति उघडपणें ते लिहीत, पण तें चव्हाट्यावर बसून मोठ्याने वाचायलाहि संकोच वाटूं नये असें असे. पण त्यांनी 'सत्याग्रह', 'पतंगनृत्य', 'हिमालयाएवढी चूक' असे शब्द त्यांनी राष्ट्राला दिले. पण वाटेल त्या विषयावर सारख्याच गतीने आणि डौलाने चालणारी त्यांची लेखणी इतरांना लेखनांत सतत मार्गदर्शक होणारी असली तरी त्यांची भाषाशैली इतरांना मुळीच पेलण्यासारखी नाही हें बऱ्याचशा गांधीवादी वाङ्मयावरून स्पष्ट दिसून येतें. गांधीजींची भाषा स्फूर्तिप्रद असली तरी तिचें अनुकरण करणें अशक्य आहे. गांधींच्या वाङ्मयप्रणालींतून स्वतःचा स्वतंत्र भाषौघ काका कालेलकरांनी बनवला. काकांची भाषा प्रगल्भ आणि रसिकतेने कांठोकांठ भरलेली; पावित्र्य, धार्मिक संस्कार, विभूतिपूजा, व्रतबद्धता आणि निसर्गदृश्यांशी एकतानता यांचाच आविष्कार त्यांच्या लेखनांतून मुख्यतः दिसून येतो. त्यामुळे नास्तिकांना काकांच्या शैलींतून आनंद मिळाला तरी कुठलाच इषारा मिळत नाही. ताऱ्यांनी खचलेलें आकाश आम्हालाहि काकांप्रमाणेच विलोभनीय वाटतें. पण त्यांत त्यांना जें ईशदर्शन घडतें, जें तत्त्वस्फुरण होतें तें आम्हाला होत नाही. आम्हाला निर्मळ आनंद मिळतो. पण तो आनंद ताऱ्यांसारखाच लुकलुकणारा, खूप दूरचा आणि मनाला थंडावा आणणारा असतो. तारे आम्हाला जीवनज्योति वाटत नाहीत. त्यांच्या दर्शनाने आराम खचित वाटतो पण भावना उचंबळून येत नाहीत. सर्व-

साधारण भारतीयांना भावनात्मक लिखाण हवें. रूरकें पेरलेलीं हवींत, चंद्रसूर्यांपासून सारें झगमगणारें विश्व रूपकांच्या रूपाने आम्ही आमच्या अगदी जवळ आणूं पाहातों आणि मग त्या तादात्म्याच्या भावनेंत गुंगू लागतों, पण ही गुंगी ठराविक विषयांच्या लेखनवाचनालाच उपयोगी पडते. ओंवचा पल्ला गांठायचा असल्यास, शास्त्रीय दृष्टीने जगांतलें सौंदर्य चाखायचें असल्यास, जगांतलीं सुखदु:खें न्याहाळायचीं असल्यास आपल्याला कोणतीच अलंकारिक शैली घेऊन चालायचें नाही. बरें, अगदी रोखठोक लिहायचें म्हटलें तर लेखन रुक्ष होईल. तोहि मोठा दोष आहे. तर साधी, सोपी पण नीटनेटकी भाषा लिहिल्याशिवाय विद्येची वाढ होणार नाही. केवळ ललितवाङ्मयांतच बुड्या मारून गुळगुळीत भाषा लिहिली जाण्यांत वाङ्मयाचा अभ्युदय नाही. गांधीजींचें उदाहरण जें मी दिलें तें अशा करताच की काव्यक्षेत्राबाहेरचें लिखाण सुद्धा 'आत्मा ओतल्यास' किती प्रभावी होऊं शकतें तें दाखविण्यासाठी. निबंधवाङ्मयाची प्रत्येक विषयांत भरपूर वाढ होईल तेव्हाच भाषा सकस होईल व आपोआपच तिच्यांतलें सौंदर्यहि प्रगट होत जाईल. भाषा जसजशी घटते, झिजते, तसतशी तिला आपोआप झिलई चढते व व्यवहारांत रुळण्यामुळे वळण देखील लागतें. एकट्यादुकट्या कलावंताच्या परिश्रमाने जें होत नाही तें व्यवहाराच्या गंगाजळीने आपोआपच होतें. आपल्या भाषेकडेच पाहा. दर बारा वर्षांनी किती शब्दसंपत्ति तिच्यांत पडली ! किती नव्या विषयांचीं दारें मोकळीं झालीं ! जसजसें शास्त्रीय वाङ्मय विपुल व सर्वांना समजण्याच्या धोरणाने लिहिलें जाईल तसतसें बाकीचें सर्व तऱ्हेचें वाङ्मय देखील पुष्ट व तजेलदार होत जाईल. ज्ञानकोश, शब्दकोश, शास्त्रीय परिभाषा कोश यांच्या समृद्धीवरून भाषेची समृद्धि आणि त्या भाषेंतल्या वाङ्मयाची खोली सहज अजमावतां येते. त्या दृष्टीने पाहिलें असतां आपली मराठी भाषा इतर भारतीय भाषांच्या अग्रस्थानीं आहे. तेव्हा वेगवेगळ्या क्षेत्रांत लेखणी राबती ठेवणें आम्हाला सोपें आहे. जांभेकर, लोकहितवादी, चिपळुणकर, भागवत, फुले, आगरकर, टिळक आणखी कितीतरी प्रज्ञावंत निबंधकारांनी आमचा मार्ग उजळून ठेवला आहे. अगदी मनापासून निघालेले त्यांचे बोल त्यांनी आपल्या दणकट भाषेंत लिहून काढले आहेत. पण हे महाभाग काय किंवा राजवाडे, केतकरांसारखे संशोधक काय, लोकशिक्षक होते. त्यांना ती भूमिका हवी होती व पेलत पण होती. पण आमचें तसें आहे का ? त्यांच्या लेखनांत असणारा अधिकाराचा आविर्भाव, उपदेशाचा रंग, आमच्या विद्यार्थीवृत्तीला कसा शोभून दिसेल ? राजवाडे, केतकरांची भाषा कठिण होती, राकट होती तरी त्या काळीं व त्यांच्या मागे उग्र तपश्चर्या असल्याने ती खपून गेली. पण आता स्पष्ट व ललितभाषा असणें सर्व प्रकारच्या लेखनाचें प्रमुख अंग बनलें. इंग्रजांनी ही कला आत्मसात् केली आहे. शास्त्रीय विचारांचा कोंडमारा होऊं न देतां, भाषेला सुंदर मुरड घालणें हें पाश्चात्यांच्या आता अंगवळणींच पडलें आहे. त्यामुळेच अल्पशिक्षितालाहि निरनिराळे विषय वाचण्यांत गोडी वाटते व एकंदर ज्ञान वाढतें.

सध्या मला वाटतें एक प्रयोग करून पाहाण्यासारखा आहे. भाषेंत सहजपणा आणण्यासाठी अशिक्षितांचे बोल मनन करणें अगत्याचें आहे. ते बोल लोकगीतांतले नव्हेत, म्हणी उखाण्यांतलेच नव्हेत तर नेहमीच्या व्यवहारांतून उचलले पाहिजेत.

मला ते मार्गदर्शक झाले आहेत. कांही ठळक उदाहरणें सांगतें. एक महारीण मला गोष्ट सांगत होती. गोष्ट सांगतांना ती चोळी हा शब्द नुसता न वापरतां 'मदनिका चोळी' असा वापरी मी अजून समग्र संस्कृतसाहित्यांत चोळीचें उत्कृष्ट निदर्शक असें दुसरें वर्णन वाचलेलें नाही. अशा तऱ्हेचे कठिण संस्कृत वाक्प्रचारहि या लोकांना कळतात असें पाहिल्यानंतर त्यांच्या बोलींतले मुलरीण, कायेची बायको इत्यादि शब्द पाहिल्यानंतर सर्वसामान्य सुबोध मराठींतून संस्कृत शब्द हाकलून देणें हास्यास्पद होईल. ज्ञानदेव, तुकाराम या लोकांना कळतात. तेव्हा त्यांच्या साहित्यांतले सुद्धा सध्या रूढ असलेले संस्कृत शब्द वापरले तर भाषा प्रौढ पण सोपी आणि चांगली राहील. इंग्रजीवरून कठिण संस्कृत शब्द तयार करण्यापेक्षा हें बरें. तसे शब्द परिभाषेच्या सोईचे तेवढे वापरावे.

दुसरें एक उदाहरण असें की जसजसें आपण खालच्या वर्गाच्या वर्णनशक्तीचें निरीक्षण करतों तसतसें मोजक्या शब्दांत पुष्कळ अर्थ घालण्याची त्यांची शक्ति पाहून आश्चर्य वाटतें. उन्हाळ्यांत एकदा वारा थांबला होता. घाम निथळत होता. अशा वेळीं एक अशिक्षित बाई मला म्हणाल्या, "त्या झाडाकडे तर पाहा. पान न् पान खडं उभं आहे—जसा कांही त्याला हलूं नको म्हणून हुकूम आहे."

त्याचप्रमाणे कोटिबाज शैली लोकांना कां आवडते हेंहि लक्षांत घेण्याजोगें आहे. एकंदर भारतीय वाङ्मयच उपमा, दृष्टांत, कोट्यांनी भरलेलें आहे. मध्यप्रांताचे गोंड पावलोंपावलीं दृष्टांत वापरतात. उखाण्यांत तर दृष्टांतांचीच कमाल केलेली आढळते. कुणब्यांनाहि साधारणपणें कोणतीच गोष्ट उपमेशिवाय सांगतां येत नाही. नुकतीच एक गोष्ट घडली. एका गरीब पण ऐटबाज मिजासखोर मुलीबद्दल बोलणें चाललें होतें. 'हें सर्व परवडतं कसं, आणि खाण्यापिण्यांत, लेण्यांत ही ऐट तुझ्या मुलीला, सुचते कशी!' मी विचारलें. 'त्यांत काय झालं?' तिची आई हंसत म्हणाली 'बाई, मुंगी मातीच्या बिळांत राहूनच साखर खाते ना? तसंच माणसांचं. तें कांही गरीबी शिरमंती जाणत नाही. या दृष्टांतांतच सारें तत्त्वज्ञान येऊन गेलें. तत्त्वज्ञानप्रिय राष्ट्रांत कोटिबाजपणा प्रजेच्या हाडींमांसींच खिळलेला असतो, आणि म्हणूनच कोट्यांनी भरलेलें लेखन लोकांना आवडतें. सरळ सरळ लिहिलें तर तें त्यांना खटकतें. पण शास्त्रीय विचारांच्या लेखकांना कोटीबाज शैली मारक असते. त्यामुळे आपल्याकडे सरळ लेखन लोकप्रिय करण्यासाठी विशेष परिश्रम करावे लागतात; पण या परिश्रमांतूनच उद्याची सकस, साधी, शास्त्रीय भाषा तयार व्हायची आहे हा आशावाद स्फूर्तिदायक आहे.

•

अनुक्रमणिका

पडदे

गोविंद रामचंद्र दोडके

★

सुमार पांचचा, परंतु खोलींत उजेड कांही खूपसा नाही; अंधारहि नाही. पूर्वेकडील भिंतींतील दोन खिडक्या बंद आहेत. एका कोपऱ्यांत मेज व त्यावर लेखन-साहित्य, आग्नेयीकडील कोपऱ्यांत एक खुर्ची. दक्षिणेकडील भिंतींत दार. बाहेरून कुणीहि आलें की ह्याच दाराचा उपयोग करावा लागतो. दाराला पडदा, किंचितसा मळलेला. वाऱ्याबरोबर त्याची हालचाल चाललेली आहे. पश्चिमेकडील भिंतींत नैऋत्य कोपऱ्याजवळ दार, आणि भिंतीमध्ये आलमारी. तीवर पडदा घातला आहे मळकटच. वायव्य कोपऱ्यांत एक मेज. त्यावर शिवून झालेले दाराचे पडदे पडले आहेत. पूर्वेकडील भिंतीसमोर एक तढाव टाकला आहे व त्यावर भिंतीला टेकून दोन तक्के ठेविले आहेत.

खोलींत शांतता आहे याचा अर्थ असा मात्र नव्हे की तींत कोणीच नाही. ताई तढावावर बसली आहे. तिच्या डोळ्यांवरून व बसण्याच्या प्रकारावरून कुणालाहि कळून येईल की तिची झोंप नुक्तीच संपली असावी. जवळच आठनऊ वर्षांची उषा झोंपलेली.

बाहेर कुणी वाहणा काढून ठेवीत असल्याचा आवाज खोलींत ऐकूं येतो. पडदा बाजूला सारून बापू आंत येतो. हॅट खुंटीवर टांगतो. नंतर इकडेतिकडे पाहून प्रश्नार्थक उद्गार काढतो—‘ असं, झोंप झाली तर ? ’ अर्थात् त्याला उत्तराची अपेक्षा नसते. ताई त्याच्याकडे पाहते व तोहि तिच्याकडे बघतो. डोळे मिळतांच किंचित् कठोर आवाजांत—

बापू:—काय ग, झाले का पडदे तयार ?

हा प्रश्न आपल्याला विचारला जाईल ही कल्पना ताईला झालेली असते त्यामुळे नाजुकसें हास्य तिच्या गालांवर झळकत. उत्तर द्यायला शब्दांनी नाही बोलत ती. हनुवटी उचलून डोळ्यांनीच पडदे दाखविते. तो मेजाजवळ जातो. पडदे उचलून पाहतो व नंतर विचारतो—

सगळे झालेत ?

विचारण्याचें काय कारण असा भाव मुखावर प्रकट करून हळूंच—

ताई:—होय.

त्यांत एक खादीचा पडदा आहे. बापू आहे खादीभक्त. खादीचा पडदा कोणत्याहि दाराला लावून त्याचें समाधानं व्हायचें नाही. अगदी समोरच्या दारावर त्याला तो हवा. परंतु पडदा लांबीला लहान असतो. खादीचा पडदा बापू उचलतो व समोरच्या दाराजवळ जाऊन पडदा त्याला लावून पाहतो. खाली साहजिकच पांचसहा इंचांची निपूर जाते. ताईकडे बघतो व नंतर—

बापू:—कसा काय दिसतो ग !

बापूच्या हालचालीकडे तिचें लक्ष असतें. तिच्या मुखावर हास्य आतापर्यंत मंदगतीने फिरत असतें. परंतु आता तें पंख फडफडूं लागतें—

ताई:—बापू, काल आपल्याकडे ता मद्रासी साहेब नव्हता का आला ! इतर सगळा साज जरी व्यवस्थित असला तरी त्याचे मोजे चांगले सहा बोटें तरी बाहेर दिसत होते. हा तुमा खादीचा पडदा त्या दाराला त्याच्या तोंड्या पॅंटप्रमाणे शोभतो.

बापू:—चल, चल, चावट्ट कुठली.

ताई:—अगदी खरं सांगते रे, तो पडदा तिथं घ्यायला नकोच मुळी. आल्या-बरोबर कांही कुणाचं चांगलं मत व्हायचं नाही.

बापू:—उगाच एवढ्यातेवढ्या गोष्टींत इतरांचीं मतं काय पाहाचीं !

ताई:—पण चांगलं तर दिसायला हवं ना !

बापू:—किंचित् खाली घेतला तर !

ताई:—पण हा खटाटोप करण्यापेक्षा तिथं निराळाच पडदा घेतला तर नाही वाटतं बरं !

बापू:—बरं बुवा, आमचं काय तुमच्या मनाला येणार आहे ! बोलूं देतेस हेंच तर मुळी भाग्य.

तो खादीचा पडदा मेजावर भिरकावतो, आणि मग मेजाजवळ जाऊन खिडकीला लावण्याचा लहान उचलतो. त्याच्या मुखावर उग्रपणा, नाकपुड्या फेंदारलेल्या, ताईला ह्या प्रकाराची मौजच वाटत असते. ती त्याला हंसत हंसत लाडीक आवाजांत विचारते ‘ राग आला वाटतं ! ’

बापू:—माणसाला राग येऊं नये की काय !

ताई:—तसं नाही म्हणत मी.

बापू:—(पडद्यांत कर्टनरॉड घालीत) मग !

ताई:—पण कशावरून रागवायचं, कां रागवायचं याविषयी ताळतंत्र ठेवला म्हणजे झालं.

बापू:—(खिडकीकडे जातां जातां, वळून) म्हणजे !

ताई:—म्हणजे काय !

बापू:—मी कारण नसतांना वेड्यासारखा रागावलों म्हणतेस तूं !

ताई:—कारण असलं की माणसानं रागवायलाच हवं असं शास्त्र आहे वाटतं !

शास्त्र हा शब्द ऐकतांच आतापर्यंत टिकविलेला रागाचा अभिनिवेश नाहीसा होतो. खिडकीजवळ जाऊन पडदा लावीत असतांना बापू म्हणतो, ‘तुला काय वाटतं मी खरोखरच रागावलों होतों म्हणून ! ’

ताई:—नाही तर काय !

बापू:—वेडी कुठली ! अग गंमत केली तुझी. म्हटलं एका माणसाची काय स्थिति होते, बघावी तरी.

ताईचें तोंड गोरेमोरें होतें. राग देखील डोळ्यांमध्ये तरंगू लागतो. मनांत विचार हा—आपल्या भावनांशी खेळावं कुणी !

ताई:—मग ती दिसली का ?

बापू:—खरंच ! माणसं की नाही उगीच वेड्यासारखीं रागावतात. रागावण्या-पेक्षा रागावण्याचा नुसता आविर्भाव केलेला बरा. रागावण्याचं समाधान मिळतं आणि गोडगोड लाघवी बोलणं ऐकायला मिळतं.

ताई:—लाघवी ?

बापू:—(हंसून) जाऊं दे, शब्दाचं काय ? मला कांहीं तेवढ्यावरूनच राग यायचा नाही. नुसतं रागवायचं सोंग करायचं.

आतापर्यंत त्याने खिडकीला पडदा लावलेला असतो. पश्चिमेकडील भिंतींतून खिळ्यांची पुडी काढतो. ती सोडतो व एक खिळा हातांत घेतो. त्याला हातोडी हवी असते.

बापू:—हातोडी कुठं आहे ग ?

ताई:—(तुटकपणाने) काल राजानं घेतली होती.

बापू:—ए उषा, ऊठ, ऊठ, सूर्य खाली जायला आला तरी झोपेंतच आहेस तूं.

घरांतला सगळ्यांत लहान व चिमुकला जीव म्हणजे उषा. त्यामुळे ताई व बापूचा तिच्यावर जीव असतो. तिला कधी उषा, तर कधी राजा, तर कधी शाहू, तर कधी शाहूराजा अशा अभिधानांनी आंजारलेंगोंजारलें जातें. बापूची हांक ऐकून ती जागी होते. डोळ्यांची उघडझाप सुरू होते.]

बापू:—(ओरडून) ए उषा, काल तूं हातोडी घेतली होती ना आपलं डोकं फोडायला ? कुठं ठेवला आहे ती ? चल आण बरं.

बापूचें हे बोलणें ऐकतांच उषा डोळे किलकिले करते. दोघांकडेहि चोरून बघते व पुन्हा डोळे मिटून मोठ्याने घोरायला लागते.

बापूने खिळा खिडकीच्या चौकटींत रोवून आपल्या बोटांच्या चिमटींत धरून ठेवलेला असतो. फक्त हातोडीच मार'यची असते. अर्धाएक मिनिट तो तसाच उभा राहतो. हात दुखूं लागतो पण खाला घत नाहीं.

बापू:—ए राजा, ऊठना रे, माझ्या हाताला कळ लागली.

उषा हंसत हंसत चट्कन् उठते. तिच्या कपाळावर केसांच्या बटा रुळताहेत. डोळे अजून प्रकाशाकडे पाहूं शकत नसल्यामुळे त्यांची उघडझाप चाललेली आहे. पश्चिमेकडच्या दारांतून ती बाहेर जाते व लगेच परत येते.

उषा:—बापू, नाहीं सांपडत रे.

बापू:—कुठं ठेवली होती काल तूं ?

तिला हसूं येतं. जणूं काय तिला म्हणायचें असतें, वारे, वा ! तें जर मला माहित असतं तर तुला आणून नसती का दिली हातोडी ?

उषा:—इथंच तर ठेवली होती.

बापू:—(रागावून) मग गेली कुठं ती ! तूं जशी चोरूनचोरून पेपरमिंट खातेस तशी भुईनं गिळली वाटतं ती ! उघड्या डोळ्यानं बघ. वाल्ट नाही तर ! पाहयला नको—

उषा इकडे तिकडे फिरूं लागते. तिला खात्री मात्र अशी असते कीं, आपल्याला हातोडी कांही सापडायची नाही. बापूने रागवूं नये, ओरडूं नये म्हणून इकडे तिकडे उगाच नाच.

बापू:—देवा ! देवा ! हाताचा आता तुकडा पडायची वेळ आली. एक एक वस्तू जागेवर असूं द्यायच्या नाही ! नाही तरी बायका ह्या अशाच ! एक काम नाही नीट करतां येत, असल्या बायकांबरोबर पुरुष कसे संसार करतात तर देव जाणे बाबा !

त्याचा तो संताप पाहून आणि बोलणें ऐकून ताईच्या ओंठाभोवती घडी पडूं लागते. ती नाजुकसं हसून गंभीर आवाजांत म्हणते, 'हा रागवायचा आविर्भाव वाटतं !'

बापूच्या रागाचा पारा एकदम खाली येतो. परंतु लटका राग कायम ठेवून म्हणतो, 'बरं ! बरं !'

आतापर्यंत ताई शिवणांत गुंतलेली असते. परंतु बापूचा आपल्या शब्दांनी पुरता सूड घेतल्यावर तिची नजर भटकूं लागते. मागल्याच खिडकींत तिला हातोडी दिसते. ती जोरजोराने हसूं लागते.

बापू:—काय झालं ग हसायला ?

ताई (हसत हसत):—कुठं काय झालं !

बापू:—मग हसतेस ती !

ताई अधिकच हसूं लागते.

बापू:—ए वात्रटपणा पुरे कर बरं. सांग काय झालं तर.

हसणें कायमच. मजला वाढतो.

बापू:—सांगतेस की नाही ! मार मिळेल बरं !

ताई:—ए, असा हात घालणार कां अंगावर तूं !

बापू:—सांग तर मग.

ताई:—गोदमें बच्चा··· ···[नंतर उषाकडे वळून] बेटा ती हातोडी दे बरं बापूला खिडकींतली.

मागल्या खिडकींतली हातोडी उषा उचलते व बापूला देते. सगळे हसतात. डोक्यावरील आढें राहतें की जातें असा हसण्याचा आवाज. हळूहळू भरती ओसरते, पुन: कामाला मनःपूर्वक आरंभ होतो. खेळीमेळीचें वातावरण निर्माण होते. काम चालूं असतें. खिळे ठोकून पडदा बसवितो.

बापू:—ताई ग ऽ

आपल्याला कांही तरी महत्त्वाचें अथवा काम ऐकायला मिळणार अशा अपेक्षेने वर पाहते.

ताई:—काय रे !

अनुक्रमणिका

बापू:—किती छान हसलों आपण!

[काय बोलायचें तें न कळल्यामुळ उषा नुसती हंसून देते.]

बापू:—शाहूराजा, तो पडदा घे बरं.

मधल्या वेळांत शाहूराजाने आपल्या चिमुकल्या बोटांनी हावभार लावण्याला आरंभ केलेला असतो. अर्थात् ती ठसक्याने आणि फणकाऱ्याने बोलते.

उषाः—हें काय रे! मी आता ह्या कामांत गुंतलेली आहे ना! आता उठून तुला कशी देऊं बरं! घेना आपल्या हातानं.

बापू:—काम सांगितलं तर लहान माणसांनी असं म्हणावं का मोठ्या माणसाला!

उषा—आणि मोठ्या माणसानं तरी लहान मुलांना एक काम करीत असतांना मुद्दाम उठवून दुसरं काम सांगावं का!

बापू:—ताई, बघितलंस! हा सगळा तुझ्या लाडाचा परिणाम!

ताई:- मी काय लाड करते रे तिचे! तिला कांही बोलायला गेलें की, तूंच मला दटावतास आणि खुशाल तिला आपल्या पुढ्यांत घेऊन बसतोस.

बापू:—असं! तरीच म्हटलं बायकांची जात! आपल्या अंगाला कांही म्हणतां कांही लागूं देणार नाहीत. करूनसवरून नामानिराळं राहण्याची कला, मला वाटत, जगांतील राजकारणपटु पुरुष स्त्रियांजवळूनच शिकत असावेत.

ताई:—तर तर, पुरुष म्हणजे—

बापू:—बरं बरं. नको आपण अक्कल उगीच पाजळायला.

बापू:—(अर्जीजीने) राजा, ए राजारे, देना. (रागावून) हाणूं का आता हातोडा डोक्यांत!

उषा उठते व बापूसमोर जाऊन उभी राहते. आवश असा असतो की जणूं काय एखादा कर्मयोगी सत्याग्रही!

उषाः—हं मार, मार, हे घे. समोर केलं डोकं. अर्थात् बापू ह्यांत उभा असतो) आता कां बापुजी!

बापू:—उषा, तूं उठलीस ना! आता दे बरं पडदा. (उषा पडदा देते आणि पुन्हा शिवण हातांत घेते. पडदा लावून झाल्यावर बापू मेजाजवळ येतो. त्यावर फक्त एक खादीचा पडदा पडलेला असतो. त्याचा निर्णय केव्हाच लागलेला आहे. आता फक्त एक ताईजवळ आणि उषाजवळ असतो.) आता पुरें काम. राहिलेलें उद्यां करून टाकूं. (थोडं थांबून) उषा, आज फिरायला जायचं ना!

उषाः—विचारावं लागतं वाटतं!

बापू:—मग आतां हातांतलं काम ठेव बाजूला आणि तूं आपला नट्टापट्टा करायला लाग. जा बरं. तुम्हा आजकालच्या पोरींना आरशासमोर तासन्तास उभे राहून आपलीच वेडीविद्री रूपडीं पाहण्यांत काय मौज वाटते कुणाला ठाऊक!

उषाचें शिवणें चाललेंच असतें.

बापू:—हं चल ऊठ, मग खोळंबा नको उगाच. पावडरचे फ़राटे नकोत तोंडावर दिसायला. आणि हे बघ बारीकसं कुंकू लावण्याची काळजी घे बरं का. मला तुझं भोंडंभोंडं कपाळ अगदी नाही आवडत. कुंकू न लावण्याची देखील तुम्ही आजकाल फॅशन सुरू केली आहे. तरी तूं परकरी आहेस.

उषा:—(त्याच्याकडे टक लावून बघत व हसत) चल रे.

बापू:—चल रे काय ! जा लवकर. (जवळ जाऊन) जा ना बेटा. मग आपल्याला लांबवर नाही जाता येत फिरायला. [उषा आंत जाते.]

बापू:—ताई झालं का ग ?

ताई:—होय संपलच. (शेवटचा टाका मारून पडदा बापूकडे देते. विस्मृतीमुळे सुई पडद्याला तशीच राहते.)

बापू:—ताई, तूं चलतेस फिरायला ?

ताई:—हं ?

बापू:—फिरायला चलतेस का ?

ताई:—ऊं हूं.

बापू:—हं, हं, चल चल, काय करणार आहेस तूं घरीं ?

ताई:—ऊं हूं, ऊ, हूं.

बापू:—चल, चल.

ताई:—ऊं ऽ ऽ हूं.

बापू:—सगळ्या मुलखाची हट्टी पडलीस तूं. कुणाच्या देवाचं ऐकणार आहेस ?

[पडदा टांगतांना बोटाला सुई बोचते व तो विव्हळून चित्कार टाकतो.]

ताई:—काय झालं रे ? (त्याच्याजवळ जाते व हात हातांत घेते.)

बापू—बघितलंस सुई काढून घेतली होती का ? सगळं काम कसं गैदी. (आपला हात ओढून घेतो. ताई ओशाळते, लज्जीत होते. आपल्या चुकीची भरपाई करावी म्हणून चट्‌कन् त्याच्या बोटाभोवती रुमाल गुंडाळूं लागते.)

बापू:—इतकं छान दिसतं तुझं तोंड आता ! आपल्या चुकीनं दुसऱ्याला त्रास झाला असं आढळून येतांच तुझं तोंड पाहण्यासारखं होतं आणि म्हणूनच तर मला तुझ्याविषयी—

ताई:—बरं बरं रे, उगाच काही तरी बडबडूं नकोस. मला बोट बांधूं देशील की नाही ?

बापू:—माझ्या बोलण्यानं पट्टी नीट बांधून होत नाही ? का ? एखादी बारावावटळ आहे की काय माझे शब्द म्हणजे ? अग पण हा खटाटोप कशाला ? मुंगी चावली म्हणून काही द्रोणागिरी नको औषधाला.

बोट बांधून होतें. नंतर ताई आवराआवर करूं लागते. तोंड वगैरे धुतलेली उषा खोलींत प्रवेश करते व भिंतीला खोवलेल्या आरशाच्या कप्प्यामधून फणी काढते व जाते. आपल्याकडे कुणी पाहत आहे ही भावना तिच्या डोळदार चालण्यात

पुरेपूर दिसून येते. बापूचे डोळे तिच्या चालीबरोबर वळत असतात. म्हणत असतात " एह्हेऽ रे ! " पडदा लावून होती. काम संपतें. हातोडी व खिळे एका आल-मारींत ठेवतो. ताईचेंहि सगळें झालेलें असतें.

बापू:—हं फिरवा आपल्या तोंडावरून हात न् चला लवकर. नाहीतर कशाला उगाच ! (मग एखाद्या लहान मुलाला चुचकारण्याच्या आवाजात) चल, चल.

ताई:—वेळ लागेल पण. मग माझ्या नावानं ओरडशील. नाहीच येत मी. धुळीची रे कोण काळजी घेणार !

बापू:—अगं मी करीन तुला मदत. जा ना, आता का वेळ लावतेस !

(ताई जाते व उषा येते.)

बापू:—ओहोहोहो ! काय नटली आहे पोरगी ! जणुं स्वयंवरालाच निघाली आहे !

उषा:—बघ बरं असं काही बोललास तर !—

बापू:—तुझ्या डोळ्यांत कांही मावायचा नाही मी. (नंतर अजीजीने) उषा, इकडे ये ना ग !

उषा:—आम्ही नाही येत जा. (तो तिला धरण्याचा प्रयत्न करतो. स्टुलाभोवती धांवपळ सुरू होते. या देखाव्याला हास्याचें पार्श्वसंगीत असतें. पोरगी लवकरच त्याच्या हातांत गवसते. तो तिला धरून एक, दोन, तीन, चार, पांच, सहा-मुके घेतो.) तुमं नाही का रे तोंड—वगैरे कांही—

बापू:—आपण नको विचारायला बरं ! (आणखी एक मुका घेतो.) कारटे, लहान आहेस म्हणून बरं आहे. थोडीशी मोठी होऊन कॉलेजांत जायला लाग मग—

उषा:—बरं रे, चावट कुठला तर ! आटप लवकर. जायला उशीर होतो मग. (त्याचेच शब्द त्याला ऐकवते.) आपल्याला लौकर नाही जातां येत मग !

बापू:—हंसत व डोळे मिचकवीत अहो आजीबाई नमस्कार म्हटलं.

उषा:—(हंसून व मान वळून) नमस्कार म्हटलं !

अनुक्रमणिका

आभासाच्या पोकळींत

★

निसर्गाच्या नंदनांत
मुग्ध वनश्री-विलास
बिलगती स्पर्शसुखा
धुंद वल्लरी वृक्षास !

निळ्या निळ्या अस्मानांत
रासक्रीडा नक्षत्रांची
हिमांशुच्या हृदयांत
प्रीतीस्वप्नें रोहिणीचीं !

क्षितिजाच्या विळख्यांत
सुखावली धराराणी
सामिंद्राच्या काळजांत
मधु पुनवेचीं गाणीं

युगें लोटीत परी मी
एकटाच विरहांत
पोकळींत आभासाच्या
सखे, तुला गे शोधीत !

—उ. रा. गिरी

●

दिवाळीखालील अंधार

मा. ज. कानेटकर

★

एखाद्याला मनांतील दुःख लपवायचें असलें म्हणजे तो स्वतःच्या चेहऱ्यावर हास्याची आणि ढोंगी समाधानाची लकेर उमटविण्याचा प्रयत्न करतो पण अशाने त्याचें दुःखच विशेष उठावाने प्रत्ययास येतें. पाहुणचाराकरिता प्रसिद्ध असलेलें एखादें घराणें यदृच्छेने मोडकळीस आलें तरी त्यानंतरहि त्या कुटुंबांतील लोक पूर्वापार चालत आलेला पाहुणचार टिकविण्याची पराकाष्ठा करतात. पण अशा परिस्थितींत पाहुणचार घेत असतां सहृदय पाहुण्यास प्रत्यक्ष वेदनाच होतात. देशभक्तीबद्दल प्रसिद्ध असलेला स्वतःच्या पूर्वीच्या मुकामापासून भ्रष्ट झाल्यावरहि आपल्या नव्या स्वार्थवृत्तीला झांकण्याची शिकस्त करतो पण त्याला यश मिळत नाही. आमच्या दिवाळीचेंहि असेंच झालें आहे. दिवाळी हें समाजांत नांदत असणाऱ्या समाधानाचें प्रतीक आहे. सामाजिक समाधान व्यक्त करणारा तो एक दृश्य समारंभ आहे. हें समाधान संपलें आहे तरी आम्ही दिवाळी साजरी करतों व सामाजिक समाधानाची कृत्रिम लकेर आपल्या चेहऱ्यावर उमटविण्याचा प्रयत्न करतों. आमचाहि प्रयत्न यशस्वी होत नाही आणि आमचें समाधान दिवसेंदिवस जसें कमी होत आहे तसतशी आमच्या दिवाळीचें सणाचें स्वरूप नष्ट होत असून तिने संकटाचें स्वरूप घेतलें आहे. दिवाळी साजरी न करण्याचें धैर्य तर दाखवितां येत नाही आणि साजरी करावी म्हटलें की खरोखरच माणूस संकटांत सापडतो. दिव्याच्या माळिका आम्ही कितीहि हट्टाने उजळल्या तरी त्या मालिकांखालील असमाधानाचा अंधार दिवसेंदिवस अधिकाधिक काळाकुट्ट बनत आहे.

व्यक्त आणि अव्यक्त यापैकी व्यक्ताची आराधना करणें सोपें आहे. शरीर आणि आत्मा यांपैकी शरीराला सुंदर बनविण्याच्या दृष्टीने त्याची खुशामत करणें सोपें आहे, पण आत्म्याला सुंदर बनविणें फार कठिण आहे. रुद्राक्षाच्या माळा अगर कफनी कोणालाहि चढवितां येईल पण ज्या विरक्तीचें तीं प्रतीक आहे ती विरक्ति अंगीं बाणविणें म्हणजे चेष्टा नव्हे. सामुदायिक शेती वरपांगी करणें फार सोपें आहे, कारण निर्जीव साधनसामग्री एकत्र करण्यास मुळीच कष्ट होत नाही पण सहकारी वृत्तीचें निर्माण म्हणजे एक दिव्यच आहे. अशा अनेक उदाहरणांवरून हें आपणांस

 पटेल की बाह्यांगाचा अगर दृश्य जगताचा निर्जीव गोष्टींशीच संबंध येत असल्या-

मुळे साधनसामग्रीची जुळवाजुळव करणें फारसें जड जात नाही. क्वचित् असेंहि होईल की एखाद्या गरीब मित्राकडे पाहुणे म्हणून गेल्यास त्याच्यापेक्षा जास्त चांगलें जेवण खाणावळींतहि मिळेल पण खरा प्रश्न भावनेचा असतो. हें अगत्य कृष्णाला सुदाम्याच्या पोह्यांत दिसलें, रामाला शबरीच्या बोरांत दिसलें म्हणूनच त्यांनी अवशात सुग्रास जेवण आणि अगत्यपूर्ण उष्टीं बोरें अगर कोरडे पोहे यापैकी निकृष्ट भोजनच खुषीने पत्करलें.

या दृष्टीने आम्ही विचार केला तर आमची दिवाळी अगदी निर्जीव बनलेली आहे. तिचें बाह्यांग आम्हीं आजहि शक्यतोंवर पूर्वीसारखें ठेवतों—नव्हे रोषणाईच्या साधनांत बरेच नवे शोध लागल्यामुळे प्रत्यक्ष रोषणाई तर पूर्वीपेक्षाहि डोळे दिप-विणारी होत असते, पण रोषणाई जसजशी जास्त डोळे दिपवीत आहे तसतशी सामाजिक समाधानाची ज्योत अधिकाधिक मंद होत आहे.

हें सामाजिक समाधान दोन कारणामुळे नष्ट झालें आहे. पैकी निसर्गाचा कोप आणि आंतर्राष्ट्रीय राजकारणांतील वादळें, यामुळे निर्माण होणारीं सामाजिक संकटें मुकाट्याने सहन करण्याशिवाय कुणाशी इलाज नसतो. थोडाफार प्रयत्न करण्या-सारखा असतो पण भूकंपाने पाय मोडल्यानंतर फक्त लाकडी पाय बसवून देण्या-पलिकडे कांही करतां येणार नाही. पण सामाजिक असमाधान वाढण्याचें दुसरें जें कारण आहे तें मात्र सर्वस्वी मानवनिर्मित आहे व आम्हांला ते पूर्णपणें टाळता येणें शक्य आहे. याचा कोण विचार करणार आणि केव्हा करणार हे मात्र मी सांगूं शकणार नाही.

आपण हे प्रश्न स्वतःस विचारूं या. “मी जे व्यवहार कोणत्याहि एका दिव-सांत करतों त्यापैकी किती व्यवहारांत सहृदयता, सहकारवृत्ती आणि सहानुभूति यांचा अनुभव येतो ?” मला वाटतें हें प्रमाण हजारांत एक पडलें तरी मला मोठें समाधान वाटेल. दुसरा प्रश्न : रस्त्याने चालताना जणु एखाद्या कुत्र्याला आपण हिडिसफिडीस करावें अशागत किती रिक्षेवाले, टांगेवाले, मोटारवाले, पादचाऱ्यांशी वागतात ? याचें उत्तरहि स्पष्ट आहे. सार्वजनिक सभा, सिनेमा, यात्रा, अशासारख्या ठिकाणीं सौज-न्याचा अनुभव किती प्रमाणांत येतो ? याचेंहि उत्तर भयावह आहे. मग आता प्रश्न असा की समाजांतील सर्वच व्यक्ति एकाग्रतेने सामाजिक असमाधानाची आराधना-करीत असतील तर समाजांत गोडवा अगर अगत्य निर्माण कां व कसें व्हावें ? आणि हें जर होणार नसेल तर व्यवहारकारी समाज कसाहि वागला आणि त्याने कसेंहि ढोंग केलें तरी खरें समाधान निर्माण होऊं शकणार नाही आणि आमची दिवाळी म्हणजे फक्त एक हिडिस—कृत्रिम सामाजिक हास्यच राहूं शकेल.

समतेच्या नावाखालीं आम्ही हें वातावरण निर्माण केलें आहे. “प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत्” या वचनांत बरोबरीने वागविण्याची जबाबदारी वडील माणसावर टाकली आहे. ती त्याने पाळविली तरच गोडवापूर्ण समता निर्माण होऊं शकेल. मुलाने सोळा वर्षे पूर्ण होताक्षणींच जर बरोबरीचे हक्क गाजविण्यास सुरवात केली तर घरांतलें समाधान व सौजन्याचें वातावरण टिकूं शकणार नाही.

कोणी कोणास कमी लेखूं नये हें कोणीहि मान्य करील पण आज प्रत्यक्षतः अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की एखादा रिक्षावाला वाटेल त्याच स्वतःपेक्षा हलके समजूं लागला आहे. समतेचा उलटा अर्थ केल्याचा हा परिणाम आहे. ही साधी गोष्ट आज जरी आम्हांला पटली नाहीं तरी कांही काळाने अवश्य पटेल यांत मला मुळीच शंका वाटत नाहीं.

समाजांत बंधन असावें लागेल, तरतमभाव असावा लागेल. मानवी मूल्यांची आदरणीयतेच्या दृष्टीने क्रमवारी असावी लागेल आणि अगत्य, अदब, सौजन्य यांना प्रयत्नपूर्वक उभारावें लागेल. हें जर झालें तर क्वचित् आम्ही निसर्गाच्या कोपालाहि यशस्वीरीत्या तोंड देऊं शकूं. आंतर्राष्ट्रीय राजकारणनिर्मित हेलकावेहि सहन करूं शकूं पण आज आम्ही दिव्याच्या हस्य मालिका उजळण्याचा जसजसा हट्ट धरीत आहोंत तसतशी हृदयांतील मानवतेची ज्योत मावळत आहे इकडे आमचें दुर्लक्ष होत आहे—नव्हे कांहीजण तर ही ज्योत स्वतःच्या हातांनीच मालवीत आहेत.

हा प्रयोग जोवर थांबत नाही तोंपावेतों आमच्या दिवाळीखालील अंधार कायम राहणार हें स्पष्ट आहे. हा अंधार नष्ट करून अंतर्बाह्य दीपज्योति पेटविणें आम्हांला शक्य आहे. तें अत्यंत सुलभहि आहे. पण आमच्या मनाचे उधळलेलें घोडमें सध्या बेफाम झाल्यामुळे ही साधी गोष्टसुद्धा आम्हांला पटणें कठिण झालें आहे. आता फक्त एवढेंच पाहायचें : कडेलोटापूर्वी आम्ही शहाणे होतों की कडेलोट झाल्यावर आम्हांला हें पटतें.

●

तुझी नवी सायकल !

★

तुझी नवी सायकल
काय थाट विचारता !
संकेताची संकल्पांची
आता होईल सांगता १

पूर्वी संकेतस्थलास
तुला येण्या वेळ होई
पाय करती कुरकुर
सदा परतायाची घाई २

तेव्हा अर्धेच बोलून
माग होतें फिरावणें
दुज्या भेटीची मुख्याने
दिलीं वचनें घोळणें ३

जाऊं दुर दुर; आला
वीट चालण्याचा छंद
भांडूं विरोधी वाऱ्याशी
आक्रमित! प्रीतिपंथ ४

गडे खुप वेळ आता
बोलायचें, बसायचें
देणें घेणें फेडूनिया
कर्ज नवें करायचें ! ५

—चंद्रशेखर रं. शहापे

पोरीं गेल्या बाजारा—

भी. त्रिं. साठे

★

" आवं ये यसोदे— ये ऽऽ राध्ये, चालत नाही का व हाटा ! येळ्याचा बजार हाये ना आज. ये गंगु काकी ऽऽ —"

आणि त्याच शेवटच्या शब्दावर ती जरा चाचरली. तो शब्द राईला परत घ्यावासा वाटला. आज गंगुकाकी सोबत येणार नाही तर बरें होईल असें तिला वाटलें. वेळ्याच्या आटवडी बाजाराला जायचें होतें त्यांना गंगुकाकीची सोबत तिला दर खेपेस हवी असे पण आज... !.

केसांचा बुचडा घट्ट बांधून तिने एकदा बाजूच्या भिंतींत पुरलेल्या कांचेंत आपलें रूप पुनः पुन: न्याहाळून पाहिलें. कपाळावर आलेली केसांची बट हाताने सरकवून तिने आपल्या डोक्यावरील पदर नीट सावरला.

अनायासे गंगुकाकी समोर दिसलीच म्हणून तिने तिला विचारलें, " काहून-चालत नाही कावं काकी हाटा ? "

" मले अज बेस नाही लागत बटा ! राधीले धाडतो अजच्या दिस. तिरिप बुढाच्या आंतमंदीच वापिस येजा घरी बटा ! "

राईला कोण हायसें वाटलें ! तिच्या अगदी मनासारखें झालें. शेजारच्या यशोदेला आणि राधीला घेऊन ती बाजाराला निघाली. त्यांनी काखेंत आपापली टोपलीं, त्यांत चुंबळ, खोबरेल तेलाची बाटली, खाण्याच्या तेलाची बुधली आणि इतर सामान बांधायला फडकीं एवढें साहित्य प्रत्येकीजवळ होतें. नेहमीपेक्षा राई आज भघळपघळ बोलत होती. तिला रस्त्याच्या कडेवरील एखाददुसऱ्या फुल-झाडाला हाताने आरबाडावेंसें वाटे. हातांत आलेल्या कळया कुस्करल्या जातांना तिला कसल्यातरी गोड संवेदना होत. कसल्या तरी नाजुक कल्पना तिला सुचतीत. तिच्या जीवाला एकप्रकारचें ओढल्याओढल्यासारखें भासे. ती आज नेहमीपेक्षां बरीच नीटनेटकी दिसत होती. केस ठाकठीक बसविण्याचा निदान प्रयत्न तरी झाला होता. कपाळावरील कुंकवाचा टिळा नीट मधोमध नसला तरी तिचें कपाळ मात्र भोंडें नव्हतें. त्यांतल्या त्यांत धडकें आणि स्वच्छ लुगडें काढून नेसावयास तिला आज

अवसर मिळालेला दिसत होता. गांवांतल्या नाम्या शिंप्याने शिवलेल्या नव्यांतल्या नव्या फॅशनची तंग चोळी तिला आजच काढावीशी वाटली. उद्यापर्यंत तिला धीरच नव्हता मुळी. वाटेने त्याच त्या नेहमीच्या गप्पा तिला नकोशा वाटल्या. शहरांतल्या गोष्टींकडे तिचें मन धावूं लागलें. चारचौघींपेक्षा आपल्याला शहरांतील जास्त माहिती आहे असें तिला वाटून तिने राधीला विचारलें,

" कावं, तुनं नापकूर पाह्यलं ? "

" जसं काही तुनंच पाह्यलं ! आमी बी गुदस्ता आपल्या बाबासंगं गेल्तों. ह्या अस्मानाच्या माड्या आन् हवेल्या, घोड्याचे टांगे आन् पायानं दावतेत्–का मनतेत का बाई त्याले–रेक्से न्ह रेक्से. अदिक सिनेमामा का का मनतेत का बाई–"

" थेबी पाह्यलं कावं तुनं ! " यशोदेनं भुंवया उंचावत आश्चर्याने विचारलें आणि राईकडे एक खट्याळ नजर टाकली.

आपल्याला त्याहूनहि अधिक माहिती असल्याचा आव आणून राई म्हणाली, " ह्या बामनींनी, का सांगू माय, कशा तितरावानी दिसत्यात. आन् त्याहींचे रंगा-रंगाचे लुगडे, केरीच्या गाभ्यावानी तलम आन् उज्जर. रस्तेबी असे हाय बाई, का उलीसाबी गागरा नाही दिसत डोऱ्यानं. निजून घ्या वाटंवर खुश्शाल. कपडे गादनार नाही. बायका बी सायकली चालवतेत मानसावानी. आवं, मानसालेबी मांगं टाकतेत ह्या ! "

" खरंस् कावं ! बाप्पा ! " मध्येच यशोदा उद्गारली.

" तूंबी त हाये बापा सहरवाली–नापकूरवाली. पर कावं, नेवाले कव्हा येनार हाय वू तुले ? "

राईने एक गोडसा मुरका दिला, आणि त्या तिच्यांशी मिश्किलपणे लगट करत मनसोक्त हसूं लागल्या. समोरून येणाऱ्या न्हाव्याच्या पोराने हळूच शीळ घातला. तिरप्या नजरेने पाहात नुकत्याच कुठे फुटलेल्या मिसुरडीला पीळ भरल्यासारखें केलें. खिशांतला चारदोन आण्याचा खुर्दा उगीचच खुळखुळविला आणि ' सुंदरा मनामधि भरली ' ही लावणीची ओळ आपल्या नाजुकांतल्या नाजुक तमाशी सुरांत गुणगुणत समोर निघून गेला. त्याच्याकडे लक्ष द्यायला राईला आज क्षणाचीहि फुरसत नव्हती. पण त्याच्या पाठोपाठ येणाऱ्या विठू बाबाला पाहून मात्र त्या जरा चपापल्या. त्यांचें हसणें तात्काळ बंद झालं. खिदळणें कुठल्या कुठे विरून गेलें. बुढाबर झिजलेल्या काठीच्या आधाराने एक वाकलेली आकृति त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली. हाताचा तळवा कपाळावर जमिनीला समांतर धरून आणि डोळे ताणून त्याने त्यांच्याकडे नीट न्याहाळून बघितलें आणि तपकिरीची चिमूट नाकांत कोंबीत " रामा बावनकुळयाची राई कावं तूं ? आन् तूं लोडबा ठाकऱ्याची ! आन् तूं ... ! त्यानं तिसरीला विचारलें.

" मी किसना ढवऱ्याची " तिनं दबकत उत्तर दिलें.

" लग्नायेवाच्या पोरी तुमी. आता लाहान योड्याच हाआ. उद्या आपल्या आपल्या घरीं जान. वाटनं जवान मानसं येतेत जातत. बेस चालावं आपुन··· सारजी तुही माय नाही आली कावं भज संगं ! सैलानी सोडून देतंत पोरीयाइले ! का मनावं ! "

त्या बऱ्याच लाजल्या. खजील झाल्यासारख्या दिसल्या. पदरांची एकदम सावरासावर झाली. बोटें तोंडांत गेलीं. नजरा जमिनीवर खिळल्या. पण विठूबाला पुढे अवसर न देता त्या हळूच तिथून सटकल्या.

घोड्यावरून माल वाहून नेणारे शिंपी, मणेरीवाले, बांगड्यावाले, बैल विकायला चाललेले खेडुत, डोक्यावरून भाजी वाहून नेणारे माळी, लोहार, बारई आणि मधूनच वाटेवरील धूळ उडवीत बैल चौखूर उधळवीत जाणारें एखादुसरें पाटलाचें पोर त्यांच्याकडे मालकी हक्कानें नीट न्याहाळून बघत. त्यांना नजरेने साजेसें उत्तर देखील मिळे. सर्वजण आपापल्या सोयीप्रमाणे त्यांच्याकडे पाहून खाकरत, गुणगुणत, टोपी नीट बसवीत आणि समोर निघून जात. कुणी त्यांच्या बरोबरीनें चालण्याचा प्रयत्न करीत. नजरानजर झालीच तर समाधान मानीत आणि परत चालायला लागत. कमरेला खोचलेल्या पिशव्या अधूनमधून हातावर ओतल्या जात. त्यांतून तंबाखूचे तुकडे, सुपारीचीं खांडें, लवंगा निवडून काढून तोंडांत कोंबल्या जात आणि मुखरसाच्या पिचकाऱ्या रस्त्यावर पडत.

बाजाराचा मधमाशांच्या घाघावण्यासारखा अस्पष्ट आवाज गांवाबाहेरूनच ऐकायला येऊं लागला. पालवाल्यांच्या घोड्यांचें खिंकाळणें ऐकायला येऊं लागलें. गाव जवळ आला होता. आधी काय घ्यायचें तें ठरलेलें असावें. त्या वाण्याच्या पसाऱ्याकडे वळल्या. एका बाजूला नारळाचा उंच ढीग पडला होता. मघोमघ सुपारी, काथ, लवंग, हळद, कुंकू, मसाल्याच्या सामानांच्या पिशव्या पसरवून ठेवल्या होत्या. बाजूला उदबत्तीचे रंगीबेरंगी पुडे पडले होते. तंबाखूचीं वाळलीं पानें शेजारीच उभीं केलीं होतीं. गुळाच्या भेलीवर माशांची झुम्मड उडली होती आणि दुकानाभोवती गिऱ्हाइकांची. बसाप्पा वाणी गर्दींत मांडी ठोकून धोतर सावरून बसला होता. त्याच्या टोपीच्या तेलकट काठावरून टोपीची घडी नुकतीच परतविलेली दिसत होती. त्याच्या उजव्या हातावर एक मोठें ताट पैशांनी भरलेलें होतें. बेफिकिरपणें फेकलेल्या पैशांमुळे कित्येक आणेल्यापावल्यांना बिचाऱ्यांना ताट सोडून पळावें लागे. पण त्याची कुणाला देखील पर्वा नव्हती. बसाप्पा वाणी पोऱ्यावर मधून मधून संतापे. मधून मधून गिऱ्हाइकांवर खेकसून धावी. टोपल्यांतल्या सुपाऱ्या हिसकावून घेई आणि माल नाही म्हणून चक्क सांगे. खोटे पैसे खऱ्यांच्या पंगतीला बसत. फाटक्या नोटा अधिक फाटत. कोऱ्या नोटांना तेलाचे डाग पडत. 'पैसे कमी मिळाले' अशीच प्रत्येकाची ओरड. जास्त मिळाल्यास खिशांत जात. बसाप्पाला ते परत मिळत नसत. एखाद दुसरा नारळ बसाप्पाला न विचारतांच गिऱ्हाइकाच्या टोपल्यांत जाऊन बसे. बसाप्पाला तो दिसला तर तोच नारळ गिऱ्हाइकाच्या डोक्यावर फोडीपर्यंत त्याची मजल जाई. त्याच गोंधळांत राई, यशोदा आणि राधी ह्या तिघी पण शिरल्या. कारण 'बसाप्पा मुठीभर उचलून मसकन् देऊन देतो' अशी त्याची ख्याति.

सुपारीचा भाव शेजारीने विचारून चार पैशाची सुपारी मागण्यांत आली. बसाप्पाच्या कपाळावर मात्र आठ्या चढल्या नाहींत. कारण त्यांत विशेषसें कांहीच नव्हतें. शेरभर सुपारीला गिऱ्हाइकच नसे. सुपारींत काथाचे खडे घालण्याबद्दल

सांगण्यांत आल. पुढील कागद परवडत नसावा. पानांतच सुपारी गुंडाळून मिळाली. कारण सूतदेखील फार महागलें होतें. चारदोन सडकीं खांडं परत केली गेली. घासाघीस झाली. शेजारच्या बाईला धक्का लागला. प्रकरण हातघाईवर यायचें पण बसाप्पाच्या मध्यस्थीने थोडक्यांत निभावलें. विशेष कांही घडलें नव्हतेंच कारण सारें नेहमीचेंच. तंबाखुवाल्याने दोन पानें कमीच दिलीं. कारण मागाहून दोन पानें द्यावीं लागणार हें समजून त्याने दोन पानें राखून ठेवलीं. शेजारच्या गुळवाल्याची आर्जवी नजर त्यांच्याकडे गेली. पण आजच्या पुरवणी बजेटांत गूळ बसणें शक्य नव्हतें. आगडबीची आवश्यकता नसतांना देखील मुलांकरिता म्हणून तीन पैशाची डबी घेण्यांत आली. दोन पैशाचा वाटला मसाला आणि दोन पैशाची हळद मुद्दाम घ्यावी लागली. हिंगवाल्याने नाही हो करतां करतां 'मिरगाच्या' सबबीवर चार पैशाचा हिंग माथीं मारलाच. जांभळंवालीजवळून तीन पैशांचीं पंचेवीस जांभळें ओट्यांत घेतलीं गेलीं. ढिवरीणजवळून मुरमुऱ्याचे लाडू, टेंभरे आणि फुटाणे घ्यावे लागले. जांभळांनी जिभा जांभळ्या झाल्या आणि टेंभरांनी तोंडें चिक्कट झालीं. बऱ्याचशा वस्तूंचे भाव विकत नसतांनाहि सहजच पाहण्यांत आले. अर्थात् भाव विचारून वस्तु न घेतल्याबद्दल दोन गोष्टी ऐकणें हें ओघाने आलेंच. विड्याचीं पानें भलतींच स्वस्त झालीं होतीं. पण चुना महाग झाल्यामुळे पानवाले पुष्कळशा पानांत थोडासा चुना देऊं लागले. गिऱ्हाईक घासाघीस करीत. चुन्यांतली काडी उगीचच वेळणीच्या काठाला लावून आणि तो पानाला पुसून गिऱ्हाइकाचें समाधान करण्याचा प्रयत्न होई. मीठ पैशाने महाग झालें होतें. कारण पाकिस्तानांतच आमचीं मिठागरें राहून गेलीं. गोड्या तेलाचा भाव तीन पैशांनी महाग झाल्याने सारा बाजार खळबळून गेला. खोबरेल तेल बाकी स्थिर होतें. अवसेमुळे हाड्यामडक्यीं महागल्यामुळे लोक हवालदिल झाले. बिनपैशाच्या वाळ्याला भलताच भाव चढला होता. कुंभारदादा खुषींत होता.

जुम्माकाका तेल विकत बसला होता. त्याचं मुसलमानी नांव व ठिगळां-ठिगळांचा चोळणा हींच काय तीं इस्लामचीं लक्षणें. गिऱ्हाईक तिकडे वळलेलें त्याने बघितलें पण लक्ष नसल्यासारखें दाखविलें. जवळ येतांच त्याच्या दाट दाढी-मिशीच्या जंगलांतून मंद स्मित बाहेर डोकावलें. डोळ्यांची भेदकता जाणवली. पांच पैशाचें खोबरेल तेल शिशींत ओतलें गेलें. त्यांतच दोन पैशाचें आवळींचें तेल मागण्यांत आलें. माप कमी दिल्याची तक्रार. परदेशाहून येणारें तेलाचें जहाज बुडल्याचें कारण. बाटलीच्या बाहेर ओघळलेलें तेल हाताला पुसून तें तोंडाला लावण्यांत आलें. जुम्माकाकाचा हात दाढीवरून फिरला. शेजारून एक नवोढा गेल्याचें आढळून आलें. घम्कन् वास आला. अभावितपणेंच नाकें वर ओढलीं गेलीं. प्रत्येकीच्या नजरा त्या पोरीवर धावून गेल्या आणि त्यांनी तिचा चव्हाटा-[illegible] खेचलें.

"कोन मडुम आली बापा हे! चालते कशी मटकत. हेकोडा भांग [illegible] तिचा. आन् नखरा तरी!"

"तोंडाले का लावलं वो तिनं पांढरं पांढरं लाखडीवानी! आन् कानांत का लोंबते थे!"

"इशा माह्यराची पोरगी व्हय ये. सहरांत देली तिले. राधे, तूबी-अशीच मडुम बनशील कावो!"

"चाल उगच नोको खिल्ली करूं!" तिने लटक्या रागाने उत्तर दिलें. कुणाचा तरी धक्का लागला तिला.

"बाबलीचा कोन व्हय त! डोरे फुटले कमीनाचे"

त्या पुढे चालू लागल्या. त्यांचा घसा कोरडा पडल्यावर त्या शेजारच्या विहिरीकडे वळल्या.

"पानी पाज व् सकुबाई. माई ताहान लागली." विहिरीवरील रोजदारीणला राई म्हणाली आणि गटगट पाणी पिऊन लुगड्याला हात पुसत त्या विहिरीच्या पाळीवर बसल्या. पानाचें पुडकें सोडलें. कंबरेच्या पिवशा खुळखुळल्या. 'का माय, उंदराचे कानच देले कमीनानं' पानवाल्यावर लाखोली वाहिली गेली. 'काथाचे खडेची माई खडेल देले हदुरानं' वाण्याचा उद्धार झाला. विडे तोंडांत रगडले गेले. पिचक्या विहिरीच्या काठावर पडल्या. पाण्याचा लोट भर बाजारांतून वाहात होता.

"आवं, बिल्लोर भराचे हाओत वं. चाला कासार ओरींत." गर्दीतून धक्के बुक्के खात त्या तिकडे वळल्या.

धोंडीबा कासार आता म्हातारा झाला होता. त्याच्या दुकानालाहि म्हातारपण आला होता. बया कासारीणचा हात नरम होता. पण तिच्याजवळ चांगले बिलवर नसत. श्रीपत कासाराचा थाट नवा होता. वाटेल त्या तऱ्हेच्या बांगड्या पाहून घ्या त्याच्याकडे. स्वतःदेखील इतरपेक्षा ठाकठीक राहात असे. शहरांतला सिनेमा आणि हॉटेलें त्याला बरींच परिचित होतीं. त्याची ती रंगेल काळीसावळी मूर्ति! त्याच्या कानांतल्या फोव्याचा घमघमाट सर्व कासारओळींत पसरायचा. हाताला जाडजूड कांचाची हट्ट घड्याळ बांधलेली असायची. त्याचं काम म्हणजे 'टेमसीर' असा समज होता. गोड गोड भाषा त्याला अवगत होती. अति हळुवार हाताने–कारण त्याचे हात मुळांतच अति नाजुक–आपल्या गिऱ्हाइकांचीं कामें तो करून देई. त्याच्याकडे पाहणाऱ्या कुणाच्याहि चट्‌कन् लक्षांत येई की, त्याची भेदक दृष्टि कसल्या तरी गोष्टीचा शोध घेत आहे. त्याच्या दृष्टींतील चंचलता चट्‌कन् जाणवे आणि इरसालपणाचा प्रत्यय आणून देई. गावांतील तरुण त्याचा काट खात. पाठिमागे कुजबुज करीत. पण त्याचें आपलें सारें ठाकठीक होतें. नवें गिऱ्हाईक त्याच्याकडे जायचें तें जाईच. राईने देखील साधारण बऱ्यापैकी बांगड्या भरून घेतल्या.

जातां जातां नारायण मनेरीवाल्याने आपलेपणा दाखविला. त्यांनाहि परतफेड करावीशी वाटली असावी. त्या तिकडे वळल्या. फण्या केसांतून खराखरा चालवून पाहण्यांत आल्या आणि आणखी बारीक दात्याच्या फण्या मागण्यांत आल्या. एक फणी मनांत भरल्यासारखी दिसली. नाऱ्याने हळूच नजर चाळविली गंधाच्या शिश्या चुळबुळूं लागल्या. 'सुंदरी' छाप गंधाची नाऱ्याकडून शिफारस करण्यांत आली. आरशावरच्या चित्रावर बराच वेळ नजरा खिळलेल्या दिसल्या. 'शह्यरांतल्या बामनीनी' म्हणून मैत्रिणींना दाखविण्यांत आल्या. तंबाखु–चुना ठेवायला दोन टिनाच्या डब्या घेण्यांत आल्या. नाऱ्याची दृष्टि जणुं 'सारं दुकान आपलंच आहे. सारं लुटून न्याल तरी हरकत नाही' असेंच त्यांना सांगत होती. त्यांनी सारें दुकान उपसून काढलें. मधाशीं पाहिलेल्या मुलीच्या कानांतल्या 'लोंबल्या'सारखं कांही तरी त्यांनी पाहिलं. नजरा त्यावर खिळल्या. नाऱ्याने ते इअरिंग उचलून त्यांच्या हातीं ठेवण्यांत क्षणाचाहि विलंब लावला नाही. आपसांत कुजबुज सुरू झाली. पसंती–नापसंती.

स्वस्त-महाग पण—! पण मध्ये आला. पण पैशाची आसाबीस करण्याची पाळी नान्याने येऊं दिली नाही. कर्णाचा वारसा कर्णफुलें मोफत देऊन त्याने चालविला. मोबदल्यांत फक्त इशारादाखल नजरेची चाळवाचाळव!

सूर्य पश्चिमेकडे कलला होता. बाजाराला ओहोटी लागली. बसाप्या वाण्याने खुर्दा मोजायला सुरवात केली. गाठोड्यांना गाठी पडल्या. पैशाच्या पिवशा कंबरेस कोंबल्या गेल्या. अडेल तट्टांवर कोरडे उडविले गेले. त्यांच्यावर जीन कसले गेले. बैलांचे कासरे आवळले गेले. खेडुंत आपापल्या लेक्यांच्या वाटा चालूं लागले. बैल, घोडे, गाढवें घराच्या दिशेने पळायला लागलीं. राई, का कुणास ठाऊक, अबोल होती. ती निराळ्या सृष्टींत वावरत असावी; उद्या तिला नागपूरहून न्यायला येणार होते व म्हणूनच तिला बाजारा जायाची आज इतकी ओढ लागली होती!

●

विदर्भ साहित्य-संघ, अमरावती शाखा-वृत्त

दि. २५-७-५० रोजीं प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली अमरावती शाखेच्या कार्यकारिणीची सभा होऊन खालील ठराव मंजूर झाला.

(१) येत्या शिरगणतीच्या वेळीं द्विभाषिक प्रदेशांच्या सरहद्दीवरील मराठी-भाषिक व मराठी-भाषा यांच्या न्याय्य हक्कांचें संरक्षण व्हावें या दृष्टीने योग्य ती उपाययोजना व्हावी या दृष्टीने कारवाई करावी अशी मध्यवर्ती कार्यालयाला विनंती.

रविवार दि ३० जुलै रोजीं साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचें "साहित्य आणि जीवन" या विषयावर डॉ. जोशी-सभागृहांत प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचे अध्यक्षतेखालीं जाहीर व्याख्यान झालें.

दि. ११ ऑगस्ट रोजीं श्रीसन्त नामदेव महाराजांच्या ६०० व्या पुण्यतिथी-निमित्त संघातर्फे श्री. केशवराव देशपांडे, सहसंपादक 'उदय' यांचें जाहीर भाषण झालें.

दि. १८ ऑगस्ट रोजीं श्री. नारायणराव तांबे यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची सभा होऊन सौ. शान्ताबाई माडखोलकर यांच्या अकाली निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

स्थानिक शाखेचे एक चिटणीस श्री. मनोहर बाळापुरे, बी. ए. (ऑनर्स) यांची भारत-सरकारच्या 'मल्टिपर्पज एकॉनॉमिक्स सर्वे' या योजनेंत निवड झाल्या-बद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांना दि. २९ ऑगस्ट रोजीं निरोप देण्यांत आला.

दि. ५ ते १२ सप्टेंबर पर्यंत मॅट्रिक विद्यार्थिनींसाठी व ता. १० ते १५ पर्यंत विद्यार्थ्यांसाठी श्री. काकासाहेब सहस्रबुद्धे यांनी "आग्र्याहून सुटका" या नाटकावर शाखेतर्फे अभ्यासवर्ग चालविले.

दि. १५ ऑक्टोबर रोजी नगरभवनांत प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचे अध्य-क्षतेखाली श्री. पां. वा. गाडगीळ, संपादक, 'लोकमान्य' मुंबई यांचें 'वृत्तपत्रीय वाङ्मय' या विषयावर जाहीर व्याख्यान झालें. व्याख्यात्यांच्या विनंतिवरून वीर वामनराव जोशी व 'उदय'कार श्री. बामणगांवकर यांचीं भाषणें झालीं. प्रश्नोत्तरां-नंतर सभा संपली.

केशव देशपांडे
चिटणीस, वि. सा. संघ, अमरावती-शाखा

हरि नारायण आपटे यांच्या कलानिर्मितीचें रहस्य

कुसुमावती देशपांडे

★

हरि नारायणांनी आपल्या सामाजिक कादंबऱ्यांना ‘आजकालच्या गोष्टी’ हें आशयपूर्ण नांव दिलें. त्यावरून आपली पहिली कादंबरी लिहितांवेळींच त्यांना आपल्या ध्येयाची व कादंबरीलेखनांतील कलाहेतूची स्पष्ट जाणीव होती, हें दिसून येतें. आपल्या भोवतालच्या सामाजिक गटांचें सूक्ष्म निरीक्षण करीत राहण्याचा त्यांनी जणू विडाच उचलला होता. कादंबरीविषयी एक विशिष्ट हेतुपूर्ण दृष्टिकोन त्यांच्या मनांत प्रथमपासूनच होता. ‘मधली स्थिती’ची पहिलीं प्रकरणें पुणें वैभवांतून प्रसिद्ध होऊं लागलीं तेव्हां त्याच पत्रांत त्यांनी ‘कादंबऱ्यांचें उद्दिष्ट’ या विषयावर एक निनांवी लेख लिहिला. ‘कादंबऱ्यांचा आद्य उद्देश मनोरंजन करणें हा असला तरी त्याखेरीज गोड बोलून समाजाचे दोष दाखवणें व त्यास उन्नतीच्या मार्गावर नेणें हाहि आहे,’ असें त्यांत प्रतिपादन केलें होतें. कादंबरीलेखन बोधपूर्ण असावें, या प्रतिपादनांत कांही विशेष होतें असें नाही. हळबे, रिसबुड आदि लेखकांनीहि बोधवादाचा जयजयकार करीतच कादंबरीच्या प्रांगणांत उडी घेतली होती. परंतु, आपल्यांच्या विचारसरणींत सर्वांनीच ज्यांचा शाब्दिक स्वीकार केला आहे अशा सनातन तत्त्वांची जागा सामाजिक हिताहिताने घेतली व त्या हिताहिताचें दिग्दर्शन वस्तुस्थितीच्या चित्रणाच्या द्वारें झालें.

वास्तवाचें निरीक्षण व चित्रण करण्याची शक्ति हरि नारायणांना प्रथमपासूनच साध्य झाली होती परंतु ही शक्ति प्रथम एकांगी होती. समाजाचें काय चुकतें आहे, सामाजिक जीवनांत कोठे काय सडलें आहे, याची जाणीव ‘मधली स्थिती’मध्ये स्पष्टपणें दिसून येते. परंतु समाजाच्या प्रगतीचा मार्ग त्यांच्या दृष्टीसमोर अजून उजळला नव्हता. वास्तवाचें निरीक्षण करणें, भोवतालच्या व्यक्तींचीं प्रभावी शब्दांत हुबेहुब चित्रें वठवून देणें, त्यांच्या सुष्टदुष्ट भावनांचे अंतर्भेदी विश्लेषण करणें हें त्यांना साध्य झालें होतें. ही शक्ति हरि नारायणांच्या सामाजिक कादंबऱ्यांचा पाया होय. परंतु या पायावर केवढ तरी मंदिर उभारलें जावयाचें होतें व यापुढचें काम, समाजाचा पुढील मार्ग उजळण्याचें ज्यांत सामर्थ्य असेल अशा ध्येयवादांत, निश्चित सामाजिक दृष्टिकोनांतच असणं शक्य होतें. हा दृष्टिकोन व ध्येय हरि नारायणांना अनेक रीतींनी लाभलें. विचारशील व सुसंस्कृत अशा मित्रांच्या व काशीताई कानिटकर

यांच्यासारख्या भगिनितुल्य स्त्रियांच्या सहवासांत त्यांना ही दृष्टि लाभली, तशीच त्यांच्या अव्याहत अभिजात वाचनानें हरि नारायणांच्या प्रतिभेच्या या उमलत्या अवस्थेंत तिच्यावर कानिटकर दंपतीच्या जीवनाचा व विचारसरणीचा किती परिणाम झाला, हें अजून नीटपणें अजमावलें गेलें नाही. याच सुमारास त्यांचा ना. गोखले व आगरकर यांच्याशी परिचय झाला. सुधारकांच्या तत्त्वज्ञानाविषयी व वृत्ताविषयी प्रथम त्यांच्या मनांत असलेले गैरसमज दूर झाले व त्यांनी स्वतः त्या तत्त्वांचा स्वीकार केला.

स्त्रियांची दुःखपूर्ण परिस्थिति व स्त्रीशिक्षणाची आवश्यकता हे त्या काळच्या सुधारकांचे विशेष जिव्हाळ्याचे विषय होते. स्त्रियांच्या गुलामगिरीविषयी त्वेष व त्यांच्या दुःखाविषयी कळवळा यांनी आगरकरांचे लेख ओथंबलेले असत. त्यांच्या लिखाणांत त्वेष व उपरोध भरलेला असे परंतु हरि नारायणांनी वेगळा मार्ग काढला. त्यांची वृत्ति ललितलेखकाची परिणामकारी चित्रें काढून ते वाचकांना जणुं दृक्प्रत्यय देत; जें दिसलें नसेल तें दाखवीत व पाहूनहि जें जाणवलें नसेल त्याची जाणीव करून देत. हा आशय पाहायला, प्रथम स्वतः जाणवून घ्यावयाला मात्र त्यांना आगरकरांच्या सुधारणाप्रियतेने, अनेक इंग्रजी ग्रंथांच्या वाचनाने व कानिटकर दंपतीच्या अभिजात सहवासाने शिकविलें. 'गणपतराव' ही त्यांची दुसरी कादंबरी अपूर्ण राहिली. परंतु ह्या लहानशा कथेंतहि या सर्व गोष्टींचें स्वच्छ प्रतिबिंब पडलें आहे. ही प्रतीतीची गंगा मराठी कादंबरीच्या विश्वांत प्रथमच येथे अवतरली.

निरीक्षण व ध्येयदर्शित्व, वस्तुनिष्ठा व आत्मनिष्ठा यांच्या समन्वयांतून निर्माण होणाऱ्या हरि नारायणांच्या प्रभावी सामाजिक चित्रणाला येथून प्रारंभ झाला. निर्मितीच्या या दोन प्रतिरंगी परंतु परस्परांस अत्यंत आवश्यक अशा प्रक्रियांचा समन्वय हरि नारायणांच्या निर्मितीमध्ये जितका दिसून येतो तितका मराठी कादंबरींत इतरत्र कुठेहि दिसून येत नाही. या समन्वयाचा साकल्यरूप आविष्कार 'पण लक्षांत कोण घेतो' या त्यांच्या सर्वोत्कृष्ट कादंबरींत दिसून येतो व त्यानंतर 'मी' पासून 'आजच', 'कर्मयोग' इत्यादि त्यांच्या अखेरच्या कादंबऱ्यांपर्यंत त्यांची प्रतिभा हें सामाजिकचित्रणाचें कार्य करीत राहिली. आयुष्याच्या अखेरीस, आपल्या उतरत्या काळांतहि त्या प्रतिभेला कार्याचा विसर पडला नाही. बदलत्या जीवनप्रवाहाची साथ करणें व त्यावर भावोत्कट भाष्य करणें हें तिचें कार्य सतत चालू राहिलें.

हें कार्य ते सतरा वर्षें करीत राहिले. तेवढ्या अवधींत जवळजवळ तीन पिढ्या त्यांच्या नजरेखालून गेल्या व त्या तीन पिढ्यांतील लहानथोरांचें, सुधारकदुर्धारकांचें, सोज्वळ स्त्रियांचें व क्रव्याद् बायकांचें, गोड होतकरू मुलांचें व वाममार्गी लाञ्छनास्पद पोरांचें चित्रण त्यांनी केलें. कांही फ्रेंच कादंबरीच्या नमुन्याप्रमाणे त्यांनी आपल्या कांही मुख्य पात्रांची जीवनकथा अनेक कादंबऱ्यांत चालू ठेवली, त्याच व्यक्ति पुनःपुनः व विकसित अवस्थेंत भेटत राहिल्यामुळे त्यांची ओळख वाढते व त्यांच्यामुळे त्यांचें सामाजिक जगहि अधिक परिचयाचें होतें.

समाजांतील आपल्या स्वतःच्या वर्गाच्या पलीकडे त्यांची दृष्टि गेली नाही. यामुळे त्यांच्यावर आकुंचिततेचा आरोप करण्यांत येतो परंतु वास्तविक तो खरा नाही. आपल्या वर्गातीलच इतक्या अनेकविध वृत्तींची व विचारसरणींची त्यांनी छाननी केली, इतकीं जिवंत व्यक्तिचित्रें निर्माण केलीं की त्यांचें साकल्याने आकलन करूं गेलें तर हरि नारायणांनी निर्माण केलेला जीवनपट आकुंचित वाटण्याऐवजी केवढा तरी विशाल वाटूं लागतो ! फील्डिंग, थॅकरे वा डिकन्स या नांवाजलेल्या इंग्रजी कादंबरीकारांनी निर्मिलेले जीवनपट तरी याहून फार विशाल वा बहुरंगी आहेत, असें नाही. थॅकरेने उच्चवर्गीयांच्या चित्रणावर भर दिला. डिकन्सच्या कादंबऱ्यांत कांही थोडे उच्चवर्गीय व बरेच कनिष्ठवर्गीय लोक आहेत; परंतु त्याचें कौशल्य खरोखरी कनिष्ठ वर्गीयांच्या चित्रणांतच दिसून येतें. अशाच अनुभूतींच्या स्वाभाविक मर्यादा हरि नारायणांच्या प्रतिभेने पाळल्या. त्यांच्या सामाजिक निर्मितीमध्ये त्यांच्या ऐतिहासिक व्यक्तींची भर घातली म्हणजे उलट त्यांच्या निर्मितिक्षमतेचें व कल्पनाविश्वाच्या विशालतेचें आश्चर्य वाटतें.

हरि नारायण ऐतिहासिक कादंबरीकडे वळले ते भाषांतर वा रूपांतर यांच्या पायवाटेने. परंतु त्यांना खरी स्फूर्ति झाली ती त्यांच्या काळीं महाराष्ट्रांत नवीनच उदयास आलेल्या मराठशाहीविषयींच्या अभिमानाने व कुतूहलाने. इ. स. १८९० पासून महाराष्ट्रांत पूर्वजांच्या इतिहासाविषयी एक अभूतपूर्व आस्था उत्पन्न झाली. विद्वानांनी इतिहाससंशोधनाच्या कार्याला प्रारंभ केला व लोकमान्य टिळकांसारख्या राजकारणी नेत्यांनी शिवाजी स्मारक फंडाची व शिवजयंत्युत्सवाची चळवळ सुरू केली. केवळ शिवाजीमहाराजांच्या व्यक्तित्वाच्या व पराक्रमाच्या नव्हे तर एकंदर मावळे-मराठ्यांच्या वीरश्रीच्या व स्वराज्यनिष्ठेच्या नवस्मृतीने त्या काळीं महाराष्ट्र दिपून गेला होता. स्वराज्याची स्थापना व संरक्षण, हरप्रयत्नांनी व हरतऱ्हांनी करणाऱ्या मराठ्यांचें चैतन्य हा हरि नारायणांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचा मुख्य विषय आहे व तत्कालीन समाजांतील वृत्तींचें चित्रण हें त्यांचें ध्येय होय. तें साधण्यासाठी त्यांनी मिळाली तेवढी इतिहासाची साथ घेतली. पण त्याशिवाय दंतकथा, लोककथा, पोवाडे, समर्थांचे ग्रंथ, इत्यादिकांचीहि साह्य घेतलें. या सर्वांचा उपयोग मात्र त्यांनी चोखंदळपणें केला. उदाहरणार्थ, कवजी हा औरंगजेबाचाच हेर होता, असा त्याविषयी एक प्रवाद होता. या प्रवादाचा हरि नारायणांनी प्रवाद म्हणूनच उपयोग केला. मराठ्यांच्या वेषांतरकौशल्याचें, त्यांच्या काळीं गुहाभुयारांतून घडणाऱ्या चमत्कारवजा प्रसंगांचें त्यांनी अनेकदा वर्णन केलें. हरि नारायणांच्या ऐतिहासिक कथानकांत हे प्रसंग महत्त्वाचे दुवे म्हणून वापरले जातात. गतकालीन थोर व्यक्तींच्या चरित्राविषयी सामग्री व माहिती थोडी तरी उपलब्ध असते परंतु, तत्कालीन शहरांतील, राजमहालांतील, रस्त्यांतील जीवनाच्या अंगोपांगांकडे त्याच काळांतील झोपडींतल्या जीवनांतील सुखदुःखें, सौंदर्य व कौटिल्य यांच्याकडे इतिहासाचें दुर्लक्षच असतें. इतिहासांतील ही उणीव भरून काढणें हें ऐतिहासिक कादंबरीचें कार्य होय. तें करतांना दंतकथा, आख्यायिका, पोवाडे, लावण्या, प्रवाशांनी लिहून ठेवलेलीं वृत्तें इत्यादि सर्व सामग्रीचा उपयोग करणें आवश्यक असतें. हरि नारायणांनी अशा आख्यायिकादींचा उपयोग केला म्हणून त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या अद्भुतरम्य वाटतात असें बऱ्याच टीकाकारांचें मत आहे. परंतु हरि नारायणांनी

केलेल्या या अद्भुताच्या वापरांत एक विशेषता आहे. मराठी कादंबरीच्या प्रथमावस्थेंतील मुक्तामालादि कादंबऱ्यांतील सुखवादी, केवळ रोमांचकारी किंवा वाचकांच्या आत्यंतिक श्रद्धेवर अवलंबून असणाऱ्या अद्भुताशी याचें साम्य किंवा साधर्म्य नाही. साहसपूर्ण जीवनानें वास्तवाशी टक्कर घेतली, जाचणाऱ्या, दुःखपूर्ण वास्तवाचा कायापालट करून टाकावयाचें ठरवलें म्हणजे जो अद्भुतरस निर्माण होतो त्याचा आविष्कार हरि नारायणांच्या ऐतिहासिक कथांतून झाला आहे. ध्येयपूर्ण आकांक्षा व वास्तवाविषयी द्वेष यांच्या संघर्षांतून या विस्मयस्थायी अद्भुताची ठिणगी उत्पन्न होते. केवळ मनोविनोदन हें तिचें कार्य नव्हे. आधुनिक भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांच्या इतिहासांतहि अनेकदां या ठिणगीने भडका उडाला. अशा स्फूर्तिदायी अद्भुताची मराठ्यांशींतील आठवण हरि नारायणांनी आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत सांठवून ठेवली आहे.

हरि नारायणांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचें त्यांच्या ऐतिहासिकतेच्या दृष्टीने परीक्षण करतांना त्यांना ऐतिहासिक सामग्री किती उपलब्ध होती, हें अवश्य लक्ष्यांत घेतलें पाहिजे. त्या त्या ऐतिहासिक काळांतील सामाजिक परिस्थितीकडे त्यांनी जवळजवळ कांहीच लक्ष दिलें नाही, असा बऱ्याच टीकाकारांचा दावा आहे. ते असें म्हणतात तेव्हा त्यांच्या नजरेसमोर स्कॉट, थॅकरे इत्यादींसारखे पाश्चात्य कादंबरीकार असतात. स्कॉटच्या कादंबऱ्यांत तत्कालीन सामाजिक रीति, वेषभूषा, दिनचर्या यांची स्पष्ट कल्पना वाचकांसमोर उभी रहाते. थॅकरेची हेन्री एस्मंड ही उत्कृष्ट कादंबरी तिच्या नायिकेच्या अविस्मरणीय स्वभावचित्रामुळे तर प्रसिद्ध आहेच, परंतु त्या कादंबरीच्या अंगोपांगासाठीहि थॅकरेने तत्कालीन जीवनाची माहिती फार बारकाईने मिळविली. ड्यूक्स्, बॅरन्स् इत्यादि लोकांच्या वर्गाप्रमाणे त्याने त्या वेळच्या धर्मगुरुंचे, साहित्यिकांचें, नोकरचाकरांचें सूक्ष्म व भरदार वर्णन केलें. तत्कालीन कौटुंबिक जीवन जसें त्याने सत्यरूपाने चित्रित केलें तसें सार्वजनिक, रस्त्यावरील कॉफी हाउसेस्मधीलहि. एवढेंच काय, त्याने तत्कालीन भाषाहि कमावली. आपटे यांनी असा कांहीच प्रयत्न केला नाही, असा या टीकाकारांचा आक्षेप असतो. वस्तुतः तो खरा नाही. एक तर शब्दकळा व विचारसरणी यांच्या बाबतींत त्यांनी बरीच खबरदारी बाळगली. 'तख्ताची चाकरी,' "नैचा पिणें," "मनांत मोठा लाचार झाला" "ए सैतान तुम ही अवलाद...", "जुते पैजार" अशा किती तरी निवडक शब्दांची त्यांनी कुशलतेने पेरणी करून कालाची प्रतिमा निर्माण केली आहे. पात्रांनी अवलंबिलेली विचारसरणी त्या काळाला शोभून दिसावी याची तर त्यांनी विशेषच खबरदारी घेतली आहे. आपट्यांचे समकालीन बंगाली लेखक बंकिमचंद्र यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांशी आपट्यांच्या कादंबऱ्यांची तुलना केल्यास आपट्यांच्या कादंबऱ्या ऐतिहासिकतेच्या कसोटीवर जास्त सहजपणें उतरतात, हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. बंकिमचंद्रांची 'राजसिंह' व आपट्यांची 'रूपनगरची राजकन्या' या कादंबऱ्यांत वर्णिलेला कालखंड एकच. परंतु घटनांच्या रचनेंत तशीच स्वभावचित्रणांत आपट्यांनी ऐतिहासिकता अधिक कसोशीने पाळली. बंकिमचंद्रांनी औरंगजेब व राजसिंह यांचें स्वभावदर्शनहि आपल्या सोयीप्रमाणे ठोकळेबाजीचे केलें. त्यांचा औरंगजेब केवळ दुष्ट व खुनशीच नव्हे तर मूर्ख ठरतो तर त्यांचा राजसिंह हा सद्गुणांचा व यशस्वितेचा दैवी पुतळा आहे. तत्कालीन सामाजिक जीवनाकडे बंकिमचंद्रांनी आपट्यांच्या इतकेंहि लक्ष दिलें नाही.

अनुक्रमणिका

ऐतिहासिकतेविषयीं आपट्यांनी याहून अधिक जागरूकता बाळगली नाही, याचा दोष केवळ त्यांच्याकडेच आहे, असें म्हणतां येणार नाही. महाराष्ट्रीय वा हिंदी मनोवृत्तींत ऐतिहासिकतेचें बीज कधीं विशेष रुजलें, वाढलें नाही. इंग्रजी इतिहासाविषयीं लिहावयास सिद्ध झालेल्या स्कॉटला त्या कालखंडावर केवळ प्रमाणभूत ग्रंथच नव्हेत तर तत्कालिन जीवनांची जिवंत चित्रेंच अशा किती तरी रोजनिशा, पत्रसंग्रह, वर्णनें, वस्तुसंग्रह यांचा उपयोग करतां येतो. तत्कालीन वास्तुशिल्पापासून चहाच्या पेल्यापर्यंत सर्व सामग्रीची माहिती मिळूं शकते.

परंतु, या सर्व उणीवा मान्य करूनहि ज्या गोष्टीची आठवण ठेवणें अवश्य आहे ती म्हणजे हरि नारायणांनी आपण वर्णिलेल्या काळाच्या जीवनाचा गाभाच आत्मसात् केला ही होय. तत्कालीन समाजाच्या जीवनाचें जें केन्द्र होतें, त्या समाजाच्या जीवनशक्तीचा जो झरा होता, ज्यामुळे त्या समाजाच्या आकांक्षा आकारास आल्या त्या निष्ठामय ब्रह्माशीं हरि नारायणांचें पूर्ण तादात्म्य झालें व म्हणूनच इतर सामग्रीच्या अभावीहि त्यांच्या कादंबऱ्या लोकांच्या मनाची पकड घेऊं शकल्या. वर्णितकालांतील जीवनाशीं इतकें तादात्म्य स्कॉट वगैरेंच्या कृतींतहि जाणवत नाही याचें कारण उघड आहे. स्कॉट हा सौंदर्यवादी होता. सौंदर्याचें निधान म्हणून तो गतकालाकडे वळला. इंग्रजी साहित्यांतील 'रोमॅंटिसिझम्'च्या प्रथमावस्थेंत सौंदर्याचा, अद्‌भुतरम्यतेच्या रोमांचकारित्वाचा हव्यास भरास आला होता. या हव्यासामुळे स्कॉट गतकालाकडे वळला. आपट्यांच्या स्फूर्तीचें कारण याहून अधिक जाज्वल्य, निकडीचें होतें. त्यांच्या स्वतःच्या काळीं जी स्वातंत्र्यप्रीति उदयास आली, जें नवजीवन निर्माण होऊं लागलें त्याच्याशी साधर्म्य त्यांना मराठ्यांच्या काळीं दिसलें. शिवकालीन मराठे व नवमहाराष्ट्रांतील मराठे यांच्या सहानुभवाची जाणीव त्यांना झाली व म्हणूनच त्यांच्या हातून अशी निर्मिति झाली.

सामाजिक सुधारणेच्या निकडीने, आपल्या काळांतील सामाजिक दुःखांच्या जाणिवेने त्यांनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यांत त्यांनी आगरकरांच्या विचारसरणीचा पुरस्कार केला. राष्ट्रीयत्व व स्वातंत्र्य या कल्पनांना इतिहासाची जोड मिळवून देणाऱ्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून त्यांनी टिळकांच्या कार्याला हातभार लावला. सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रांत टिळक व आगरकर हे प्रतिस्पर्धी म्हणून सामन्याला उभे राहिले. परंतु हे दोघे जीवनाच्या दोन बाजूंची मूर्तिमंत प्रतीकें. हरि नारायणांच्या सारख्या अभिजात कलावंताच्या निर्मितींत जीवनाच्या या दोन्ही अंगांचा समन्वय झाला.

●

शेवट

ना. रा. शेंडे

✶

ती चिंचोळी तांबडी सडक जवळच्या थेट डोंगरमाथ्यावर चढली होती. एखाद्या सुंदर बंगाली युवतीच्या शेंदूर भरलेल्या भांगाप्रमाणे ती शोभिवंत दिसत होती. सडकेला दुतर्फा गगनभेदी वृक्ष विलसत होते आणि ते डोंगराच्या त्या उंचवट्यावर एकवटल्यासारखे दिसत होते तो भाग मयूरपिसाऱ्यासारखा भारीच मोहक दिसत होता.

त्या नयनरम्य उंचवट्यावर अगदी गर्द छायेंत आधुनिक पद्धतीची एक टुमदार बंगली होती. डोंगराच्या पायथ्याशी सडकेला लागूनच एक शिवमंदिर होतें व तेथूनच सुमारें एक मैल अंतरावर चिनूरचवरी नांवाचें एक छोटेंसें खेडें होतें आणि खेड्याला वळसा देऊनच सूरनदी डोंगराच्या कडेकडेने वाहात गेली होती.

कडक थंडीचे दिवस होते. रात्र बरीच झाली होती. पौर्णिमेचा चंद्र बंगलीवर लोंबकळत होता. सर्वत्र निरवता–निस्तब्धता होती.

धनंजयराव अजूनहि जागेच होते. त्यांच्या हालचालीवरून ते बरेच चिंताग्रस्त दिसत होते. भगवद्गीता चाळण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण त्यांचें मन रमेना. जवळचें वर्तमानपत्र उचलून त्यांनी चाळवाचाळव केली व लगेच तें पत्र त्यांनी भिरकावून दिलें आणि सोफ्यावर पाय ताणून जांभई दिली.

इतक्यांत मोटारीचा घर्रर घर्रऽऽ आवाज ऐकूं आला. त्यांनी खिडकींतून डोकावून पाहिलें पण त्या गडद अंधारांतून त्यांना नीटसें कांही दिसलें नाही. त्यांनी लगबगीने टेबलावर इतस्ततः पडलेलीं कागदपत्रें बाजूच्या कपाटांत कोंबून दिलीं. बाहेरून आलेलें पार्सलचें एक मोठें पुडकें टेबलाखाली पडलें होतें तें न्हाणीघराच्या कोपऱ्यांत उचलून ठेवलें.

थोड्या वेळाने दारावर टक्‌टक् झाली. 'कोण आहे ?' रिव्हॉल्वर खिशांत दडवीत धनंजयरावांनी करड्या आवाजांत विचारलें.

'मी सिद्धेश्वरी.'

धनंजयरावांनी दाराची कडी काढली आणि त्यांनी समाधानाचा एक सुस्कारा टाकला ! वीस बावीस वयाच्या सिद्धेश्वरीने आंत प्रवेश केला. काळ्या तलम वस्त्रांत झाकलेला तिचा गोरा स्निग्ध देह खूप आकर्षक दिसत होता. पाचूच्या कर्णफुलांची

चमक विजेच्या त्या निळसर प्रकाशांत तिच्या गोलाकार मुखकमलाची शोभा वाढवीत होती. तिचे नेत्र किंचित् घारे पण टपोरे होते व ते कसल्या तरी धुंदीने भारावल्यासारखे दिसत होते. तिच्या नाजुक करांगळींत एक आंगठी होती व तींतून तिचें लावण्य जणूं ओसंडत होतें.

ती बंगल्यांत शिरली तेव्हा तिशीच्या वयाचा एक दणकट, बांधेसूद व देखणा तरुणहि तिचेबरोबर आंत आला. तो येतांच धनंजयरावांनी एक तीक्ष्ण दृष्टि त्याचेवर टाकली आणि ' कोण बरं हा ? ' या प्रश्नार्थाने त्यांनी सिद्धेश्वरीकडे पाहिलें.

" हे सदानंद चौधरी. कालच्या कामगिरींत यांनी फार मोठा धोका पत्करून मला साहाय्य केलं. तुमचा परिचय व्हावा म्हणून— "

" छान छान. पण— "

सिद्धेश्वरीने वडिलांच्या ' पण ' चा अर्थ ओळखून चट्कन् उत्तर दिलें,

" हे फारच विश्वासू आणि धाडशी आहेत. तुमच्या कार्यात यांची बरीच मदत होईल. " धनंजयराव आलटून पालटून सिद्धेश्वरीकडे आणि सदानंदाकडे सारखे पाहातच उभे होते. सिद्धेश्वरी पुढे सांगूं लागली—" आणि बाबा, हे एक उत्तम लेखक आहेत. "

चिरूट शिलगावीत धनंजयराव म्हणाले,

" ठीक ठीक. मलाहि एका तरुणाच्या मदतीची गरज होतीच, ठीक झालं. अं ऽ काय ग नांव काय सांगितलं तूं यांचं ? "

" सदानंद चौधरी. "

" हां हां, नांव ऐकलं आहे कुठं तरी. पण कुठं बरं ऽ ? " क्षणभर धनंजयरावांनी छताकडे पाहून विचार केल्यासारखें दाखविलें अन् लगेच ते ' बसा बसा ना सदानंद, उभे कां असे ? बसा त्या कोचावर ' म्हणत " कुठं कामाला आहांत की काय तुम्ही ? " असा त्यांनी प्रश्न विचारला.

" हो ' क्रांति ' साप्ताहिकाचा संपादक आहे मी. "

' क्रांति ' नांव ऐकतांच धनंजयरावांच्या कपाळाव आठ्यांचें जाळेंच पसरलें पण स्वतःला जणुं कांहीच जाणवलें नाही असें दाखवून ते म्हणाले, " क्रांति साप्ताहिक, नाही का ? बरेंच गाजलेलें पत्र आहे हें. तिथेच तुमचं नांव वाचलं असावं बहुधा. बरं सिद्धेश्वरी, अग ए सिद्धेश्वरी ! "

" काय बाबा ? "

" अग फराळाचं दे या सदानंदांना. चल लौकर आटप तूं. थोडं महत्त्वाचं बोलणं करायचं आहे तुझ्याशी. बरं सदानंद, जा तुम्ही तिकडे फराळासाठी. जा, जा. संकोच नका मानूं जा. "

सदानंद फराळासाठी आंतल्या खोलींत गेल्यावर धनंजयरावांनी घाईघाईने एक पत्र लिहून काढलें आणि तें पाकिटांत बंद केलें.

थोड्या वेळाने सदानंद व सिद्धेश्वरी आलीं तेव्हा धनंजयराव कसल्या तरी विचारांत निमग्न झाले होते.

" बाबा, विश्रांति घ्या ना आता तुम्ही. " सिद्धेश्वरीने धनंजयरावांना विश्रांतीची सूचना देतांच ते थोडे चपापले आणि शांतपणें म्हणाले,

" अग थोडं बोलायचं आहे तुझ्याशी. ये बैस. सदानंद, अरे तुम्ही पुनः उभेच कां ? बसा बसा. आमचं कांही खाजगी बोलणं नाही. "

" हं, बाबा सांगा लवकर काय तें. बरीच झाली आहे रात्र आता नि मला बघा कशी झोप येतेय ती " लाडिवाळपणें सिद्धेश्वरी म्हणाली.

" झोप येते ना तुला मग झोप उद्या दिवसभर ! पण आता तुझ्यावर एक महत्त्वाची कामगिरी सोपवीत आहे " असें म्हणत धनंजयरावांनी सिद्धेश्वरीकडे एक लिफाफा सरकावला आणि पुढे ते म्हणाले,

" आत्ताचे आत्ता चंदूलालशेटला नेऊन दे आणि हे बघ सूर्योदयापूर्वी परत ये. "

" पण बाबा, मी भयंकर थकलें आहे. सदानंदांना नाही तरी शहरांत जायचंच आहे तेव्हा— "

" सिद्धेश्वरी ! " धनंजयराव दाडावून म्हणाले, " तुझं काम तुलाच केलं पाहिजे. सदानंद तूं येईपर्यंत इथंच थांबतील जा. "

सिद्धेश्वरी कांही एक न बोलतां अंगावर शाल लपेटून बंगलीबाहेर पडली. सदानंद तिच्या तडक जाण्याकडे पाहातच राहिला.

सदानंदाने बिछान्यावर अंग टाकलें पण त्याला झोप येईना. त्याच्यासमोर धनंजयराव व सिद्धेश्वरी ह्या बापलेकीच्या व्यवहाराचें गूढ उभें होतें. तो त्याच विचारांत सारखा गढून गेला होता.

सिद्धेश्वरीची झालेली पहिली भेट त्याला आठवली. कसला तरी मजकूर घेऊन ती त्याच्याकडे आली होती व तो कसेंहि करून प्रसिद्ध व्हावा अशी कळकळीने विनंती करीत होती. मजकूर बराच आक्षेपार्ह होता तरी सिद्धेश्वरीच्या आग्रहापुढे त्याला नकार देतां आला नव्हता. त्याने तिच्यासाठी एक कप चहा मागविला होता व तिने तो अर्धा करून सदानंदाला आपल्या हाताने देत ' घ्या की एवढा ' म्हणून मोठ्या स्नेहाने त्याला घ्यायला भाग पाडलें होतें. लगेच दुसरे दिवशीं तो गोवा मदन कॅफेमध्ये फराळासाठी गेला होता. सिद्धेश्वरी एकटीच एका कोपऱ्यांत चहा घेत बसली होती. त्याला पाहतांच ती उठली व तिने तो ' नको नको घ्या तुम्ही आपला चहा. मी बसतों असा बाजूला ' म्हणत असतांहि त्याचा दंड धरून त्याला आपल्या शेजारीं बसविलें व त्याने प्रसिद्ध केलेल्या मजकुराबद्दल पुनःपुन्हा आभार मानून त्याला अति आग्रहाने तिने आपल्या खोलीवर नेलें. किती लाघवी भाषण केलें तिने ! तो तिच्या त्या मधुर, शरीरतंतू झिणझिणविणाऱ्या बोलण्यावरच नव्हे तर तिच्या सुंदरतेवर भाळला आणि त्याने तिला हरप्रकारें साहाय्य करण्याचें वचन दिलें.

त्याला कालचा प्रसंग आठवला. ती घाईघाईने त्याच्याकडे आली. त्याला एका मोठ्या फर्ममध्ये घेऊन गेली आणि त्याच्या ओळखीने वीस हजारांचा सौदा तिने त्याचे नांवावर करून घेतला.

पण हें सर्व असें कां याचा तो राहून राहून विचार करीत होता. सिद्धेश्वरीच्या मोहजाळांत आपली फसगत तर होत नाही ना ? असेंहि त्याला वाटून जाई आणि मग तिचे वडील धनंजयराव किती अहंकारी व दुष्ट मांडवलदार आहे

याची कल्पना तो करीत बसला. त्याला त्याचे म्हणजे धनंजयरावांचे सारे प्रकार माहित असतांना तो सिद्धेश्वरीबरोबर त्याला भेटायला आलाच कां? सिद्धेश्वरी—एक सुंदर तरुणी वडिलांच्या ह्या सर्व दुष्ट कारवायांत आपल्या सुंदरतेचा कां बरं उपयोग करून घेत आहे? आणि तिचे वडील तरी मुलीकरवीं अशीं कृत्यें करून घेण्यास कां प्रवृत्त झाले आहेत? याचें कोडें त्याला कांही उलगडेना!

विचार करतां करतां त्याचें अंग शहारलें. आपण उगीच येथे आलों—कदाचित् आपणहि धनंजयरावांच्या जाळ्यांत अडकून जाऊं अशी त्याला भीति वाटूं लागली. वीस हजारांचा जो सौदा आपण आपल्या नांवावर पटविला तो उद्या आपल्यावरच तर उलटणार नाही ना ह्या कल्पनेने तर त्याच्या छातींत धस्स झालें!

सदानंद अंथरुणावरून उठला आणि दिवाणखान्यांत येरझारा घालूं लागला. त्याच्या पायाला कांहींसें लागलें म्हणून त्याने खाली वांकून पाहिलें. जाड पुष्ठाची ती वही त्याने उचलली व सहज चाळून पाहिली. 'धनंजयरावांची दैनंदिनी!' त्याची जिज्ञासा वाढली. त्याने धनंजयरावांकडे नजर टाकली. ते शांतपणें आपल्या खोलींत घोरत पडले होते.

ती दैनंदिनी घेऊन सदानंद आपल्या बिछान्यावर येऊन पहुडला आणि एकेक पान चाळत असतां त्याचें आश्चर्य सारखें वाढत गेलें. हाताला लागेल तें पान तो घाईघाईनं वाचूं लागला—

"बॅरिस्टरी सोडून आज चिनूरचवरी गांव विकत घेतलें व टेकडीवर बंगला बांधून आयुष्याचे दिवस कंठण्याचें ठरविलें...आज बंगलींत पाऊल ठेवलें खरें पण चिनूरचवरीच्या लोकांची दैना पाहून आपलें हें सुख स्वार्थी आहे याची जाणीव झाली तेव्हा लागलेंच दीनदुबळ्या जनतेसाठी वाटेल त्या अपेक्षा सहन करून कांही तरी करावें हा निश्चय कायम केला..."

—"आज चिनूरचवरीच्या लोकांचा सायदा माफ केला. यंदा अवर्षणामुळे लोक बरेच हवालदिल झालेले दिसले..."

—"गावांत बरेच कष्टाळु व प्रामाणिक शेतकरी आहेत पण त्यांना गरीबीमुळे शेतीचें पीक पाहिजे तसें काढतां येत नाही. तेव्हा त्यांना ट्रॅक्टर्स व भरपूर बी-बियाणा देण्याचें ठरविलें..."

—"गावांत शाळा नाही. मुलेंमुली अशिक्षित आहेत... शाळेसाठी एक मोठी इमारत व तसेंच एक छोटा दवाखाना बांधण्यासाठी दहा हजार रुपये अलगत काढून ठेवीत आहे..."

—"आजच्या व्यवहारांत चंदूलालशेटने आपल्याला तीस हजारांच्या खड्डयांत टाकलें. काळा बाजार करून त्याने अनेक उद्योगधंदे सुरू केले. पण त्याला आता चांगला हात दाखविला पाहिजे. त्याने लुटलेला व लुटत असलेला पैसा खेडुतांच्या कामीं कसा येईल याची योजना आखली पाहिजे "

वाचतां वाचतां सदानंद सिद्धेश्वरीचा उल्लेख दिसतांच थोडा थबकला आणि मग मोठ्या उत्सुकतेने तें पान पुनः पुन: वाचूं लागला.

—सिद्धेश्वरी आपली एकुलती एक मुलगी आहे. तिचें सुख तें आपलें सुख. पण लोकांच्या कल्याणासाठी तिच्या रूपाचा फायदा घेऊन... जनतेसाठी थोडेंफार

कांही करूं शकलों तर केवढें मोठें पुण्य !... कांही लोक मुलीचा गैरफायदा घेतो असेंच म्हणतील ना ! पण त्याची पर्वा नाही... ”

—अलीकडे शिवमंदिराकडे कोणी फिरकत नाही... पण ह्या मंदिराने आपल्याला खूप साथ दिली...लोकांना ह्या मंदिराची मळतीच भीति वाटते... दुष्टांचा संहार करून इतरांना अभय देण्यासाठी जें कांही केलें तें ..पण नशीबीं येईल तें आनंदाने भोगीन !... ”

नंतर सदानंदाने अगदी शेवटलें पान उघडलें—

—“ सिद्धेश्वरी कुणावर प्रेम करते हें अजून कळलें नाही. तसें कळलें तर तिच्या मर्जीप्रमाणे तिचें लग्न शक्य तितक्या लवकर उरकून घेतलेलें बरें. गरीबीचें जीवन कंठणाऱ्या पण चतुर व विद्वान् तरुणाबरोबर तिचें लग्न व्हावें अशी आपली इच्छा आहे. आता यापुढे तिचा अधिक उपयोग करून घेणें इष्ट नाही. ········ ”

दैनंदिनींतील टिपणें वाचून सदानंद थक्कच झाला. ज्याला आपण स्वार्थी, घमेंडी व भांडवलदार—काळा बाजार करणारा भांडवलदार समजून नांवें ठेवलीं तोच हा घनंजयराव इतका उपकारी, इतका स्वार्थत्यागी व इतका मोठ्या मनाचा हें कळून तर सदानंदाचें अंतःकरण कृतज्ञतेने भरून आलें. ज्या ‘ क्रांती ’तून आपण घनंजयरावांच्या कृष्णकारस्थानांवर कडक कोरडे उगारले तो घनंजयराव एक देव-माणूस निघावा व त्याचा आपला असा परिचय घडावा हें आपलें केवढें भाग्य ! आणि ती सिद्धेश्वरी—ह्या अल्पशा वयांत किती खपली आहे ! कुणाला कल्पना येणार आहे ह्या स्वार्थत्यागाची, निरपेक्ष जनसेवेची ! ‘ आपल्या सौंदर्याचा सौदा करणारी ’ म्हणून आपण ह्या देवतेची मनांतल्या मनांत केवढी निंदा केली आहे !

त्याने ती दैनंदिनी जागच्याजागीं ठेवली आणि तो पुन्हा येरझारा घालूं लागला. सिद्धेश्वरी आता केव्हा येते याची त्याला हुरहुर लागली.

घड्याळांत चारचे ठोके पडले आणि बाहेर मोटारीचा आवाज ऐकूं आला. सदानंद दार उघडून व्हरांड्यांत आला. सिद्धेश्वरी लगबगीने मोटारींतून उतरून धावतच बंगलीच्या पायऱ्या चढूं लागली. सदानंद सामोरा गेला पण तिकडे दुर्लक्ष करून ती थेट पळत बंगलींत शिरली आणि घाबऱ्या घाबऱ्या ती ओरडली, ‘ बाबा—बाबा, उठा उठा, घात झाला घात ! ’

घनंजयराव खडबडून जागे झाले आणि त्यांनी विचारलें,

“ काय ग घडलं इतकं घाबरण्यासारखं सिद्धेश्वरी ! ”

“ मी चंदूलालशेटकडे गेले तेव्हा त्यांच्या घराची पोलिस झडती घेत होते. मी त्यांच्या माडीच्या मागच्या बाजूने व्हरांड्यांतील खुर्चीवर पडून राहिलें आणि सर्व कांही ऐकलें. तुमची सर्व कागदपत्रं त्यानं पोलिसांच्या स्वाधीन केलीं अन् काळ्या बाजाराचा अस्सल आरोपी म्हणून त्यानं तुमचा पत्ता दिला. बाबा, घाई करा. पोलिस येतच असतील. तुम्ही पळा. दूर दूर कुठं तरी जा. ” सिद्धेश्वरी काकुळतीनं म्हणाली.

“ मी पळून जाऊं ! पोरी, काय सांगतेस मला ! ” गंभीरपणें घनंजयराव म्हणाले, “ हं, सिद्धेश्वरी त्या कपाटांतील सर्व कागदपत्रें व मालमत्ता घे तसेंच ते औषधांच्या पार्सलचे गठ्ठेहि घे अन् तूं चिनूरचवरील जा. चल चल, त्वरा कर. ”

" आणि तुम्ही बाबा ? "

" अग माझी तूं जराहि चिंता करूं नको आणि हें बघ हा दोन लाखांचा चेक घे. नीट जपून ठेव. अन् नीघ त्वरित ! "

सदानंद हा सर्व प्रकार पाहून स्तंभितच झाला ! धनंजयरावांचें त्याच्याकडे लक्ष गेलें. ते त्याच्याजवळ जाऊन पाठीला थोपटीत मायाळुपणें म्हणाले, " सदानंद, तुम्ही मला एक मोठा काळा बाजारवाला, उलट्या काळजाचा समजत असाल ! आणि तुमचें समजणेंहि रास्तच आहे. पण सिद्धेश्वरी तुम्हाला सर्व कांही सांगेलच. माझा तुमच्यावर विश्वास आहे. सिद्धेश्वरीकडे लक्ष राहूं द्या. शक्य झालें तर आताच तिच्याबरोबर जा. "

" बाबासाहेब, मला क्षमा करा. मी तुम्हाला ओळखूं शकलों नाही. रात्रीं मी तुमची दैनंदिनी वाचली आणि... " सदानंद गहिंवरून म्हणाला.

" अखेरीस कां होईना तुम्ही मला समजूं शकलां हें मी माझें भाग्य समजतों. बरं तर, जा जा तुम्ही सिद्धेश्वरीबरोबर ! "

" बाबा ऽ ऽ ! "

" जा पोरी जा. तुझं सत्त्व तुझं रक्षण करील जा ! "

—पोलिस धनंजयरावांच्या बंगल्यावर आले तेव्हा बरेंच उजाडलें होतें. त्यांच्याबरोबर चंदूलालशेटहि होता. पोलिसांनी त्यांच्या दृष्टीने वाटणारीं महत्त्वाचीं कागदपत्रें ताब्यांत घेतलीं. त्यांना टेबलावर एक चिठ्ठी आढळली. " मी पूजेसाठी शिवमंदिरांत जात आहे. " एवढेंच तेथे लिहिलें होतें. धनंजयरावांच्या अपेक्षेप्रमाणें पोलिस व चंदूलालशेट यांनी देवळांत प्रवेश केला तोंच रिव्हॉल्वरचा आवाज झाला आणि चंदूलालशेट धाडकन् जमिनीवर लोळला !

पोलिस धनंजयरावांना घेऊन जात होते. जातांना त्यांनी एकवार चिनूर-चवरीकडे अभिमानाने पाहिलें. त्याची खेडुत जनता आनंदाने आपापल्या कामाला लागली असल्याचें पाहून त्यांनी समाधानाचा एक निःश्वास टाकला !

धनंजयरावांना, दूरच्या एका टोकाला उभें राहून, सिद्धेश्वरी आणि सदानंद सजल नेत्रांनी अभिवादन करीत होतीं !!

●

विदर्भ साहित्य संघ वार्ता

★

विदर्भ साहित्य संघासाठी जागा आणि वार्षिक देणगी

विदर्भ साहित्य संघातर्फे मंगळवार ता. ३ आक्टोबर १९५० रोजीं सकाळीं ९ वाजतां न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या नेतृत्वाखाली संघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांचें शिष्टमंडळ शिक्षणमंत्री ना. पं. मिश्र आणि महसूल मंत्री ना. पु. का. देशमुख यांच्या भेटीस गेलें होतें. शिष्टमंडळांत संघाध्यक्ष श्री. माडखोलकर, उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे, कोषाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. य. खु. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. डॉ. कोलते आणि प्रा. डॉ. देशमुख; श्री. ए श्री. पटवर्धन आणि संघाचे चिटणीस श्री. रा. पु. सगदेव हे होते.

संघातर्फे जें निवेदन ना. पं. मिश्र यांना सादर करण्यांत आलें, त्यांत (१) विदर्भ साहित्य मंदिरासाठी जागा, (२) वार्षिक देणगी आणि (३) संघाच्या परीक्षांना मान्यता, अशा तीन मागण्या करण्यांत आलेल्या आहेत.

वरीलपैकीं "जागा ताबडतोब आमच्या ताब्यांत येऊन येत्या विजयादशमीस आम्हांला भूमिपूजन करतां आलें पाहिजे," अशी विनंती श्री. माडखोलकर यांनी केली. त्यावर ना. पं. मिश्र यांनी असें आश्वासन दिलें की, "जागेचा प्रश्न शक्य तितक्या लवकर निकालांत निघेल अशी काळजी मी घेतों. ना. देशमुख यांनाहि आपण या बाबतींत विनंती करावी."

देणगीसंबंधी ना. पं. मिश्र यांनी अनुकूलता व्यक्त केली व नव्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत तशी योजना करण्यांत येईल, असें सांगितलें. परीक्षांना मान्यता देण्याच्या मागणीसंबंधी बोलतांना ते म्हणाले, "या बाबतींत हिंदी साहित्य-संमेलनाच्या परीक्षांना कोणत्या तत्त्वावर मान्यता देण्यांत आलेली आहे, याची चौकशी करून मग मी निर्णय देईन, तथापि हाहि प्रश्न अडचणीचा नाही."

आपल्या उत्तराच्या शेवटी ना. पं. मिश्र यांनी असें आश्वासन दिलें की, "मध्यप्रदेश सरकारचें धोरण हिंदी व मराठी या प्रस्तुत राज्यांतील दोन्ही भाषांना समदृष्टीने वागविण्याचेंच राहील. नागपूर हें भारताच्या मध्यभागीं वसलेलें शहर

असल्यामुळे उत्तर आणि दक्षिण अशा दोन्ही भारतांतील अनेक भाषांचें संमीलन येथें झालेलें आहे; व त्या दृष्टीने भारतीय भाषांच्या व्यासंगाचें केंद्र व्हावयाला नागपूरची भूमि अगदी योग्य आहे. विदर्भ साहित्य संघ आणि मध्यप्रदेशांतील हिंदी साहित्यसंमेलन यांनी सहकारितेने संयुक्त समिति निर्माण करून या राज्यात अॅकॅडेमी-सारखें भाषा, संस्कृति आणि कला यांच्या व्यासंगाचें केंद्र उत्पन्न करावें अशी माझी या दोन्हीहि संस्थांना सूचना आहे. "

या नंतर ना. पं. मिश्र यांनी कळकळीने दिलेल्या या आश्वासनाबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानून तेथून लगेच शिष्टमंडळ ना. पु. का. देशमुख यांच्या निवासस्थानीं गेलें. तेथे श्री. बाबासाहेब देशपांडे यांनी विजयादशमीला आम्हांला मुहूर्त करतां आला पाहिजे ही गोष्ट लक्षांत घेऊन हा प्रश्न ताबडतोब निकालांत काढावा अशी विनंति ना. देशमुख यांना केली.

ना. देशमुख यांनी सर्व गोष्टी लवकरच करतो असें आश्वासन दिल्यानंतर त्यांचा आभारपूर्वक निरोप घेऊन शिष्टमंडळ परतलें.

विदर्भ साहित्य संघाला जागा मिळाली.

मध्यप्रदेश सरकारने वि. सा. संघाला जेल रोडवर भगिनी मंडळाच्या इमारती शेजारी आणि मुरलीधर मंदिराच्या समोर ०·७५ एकर जमीन देणगी म्हणून जरूर त्या अटींवर सवलतीच्या दराने देण्यासंबंधी जो निर्णय घेतला, तो गुरुवार ता. १९ आक्टोबर १९५० रोजीं सायंकाळीं महसूल खात्याच्या सेक्रेटरींनी पत्ररूपाने संघाध्यक्ष श्री. माडखोलकर यांना कळविला; व विजयादशमीच्या सुमुहूर्तावर भूमि-पूजन करण्याची परवानगी दिली.

मंत्रिमंडळाच्या संमतीचें शिक्कामोर्तब झाल्याबरोबर विदर्भसाहित्य संघाच्या नांवें या जागेचें रजिस्ट्रेशन होईल.

शुक्रवार ता. २० आक्टोबर १९५० रोजीं सकाळीं ९॥ वाजतां मध्यप्रदेश सरकारने विदर्भ साहित्य संघाला दिलेल्या पाऊण एकर जागेच्या भूमिपूजनाचा समारंभ संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्तें उत्साहाने पार पडला. ही जागा जेलरोडवरील मुरलीधराच्या देवळासमोर असून, तिच्या पूर्वेस जेलरोड, पश्चिमेस भगिनीमंडळ, उत्तरेस अंबाझरी रोड आणि दक्षिणेस धीरन कन्या शाळेची जागा आहे. जेलरोड आणि अंबाझरी रोड अशा दोन रस्त्यांच्या कोपऱ्यावर दोन्ही हम-रस्त्यांना लागून नव्या मध्यवस्तींत ही जागा असल्यामुळे ती अत्यंत सोईस्कर आणि प्रशस्त आहे.

या भूमिपूजनाला वि. सा. मंदिरसमितीचे अध्यक्ष न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, समितीचे निमंत्रक श्री. ए. श्री. पटवर्धन, संघाचे कोषाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, परीक्षासमितीचे संचालक प्रा. डॉ. कोलते, 'युगवाणी'चे संपादक प्रा. चोरघडे, संघाचे चिटणीस श्री. रा. पु. सगदेव प्रा. डॉ. देशमुख आणि श्री. नानासाहेब जोग, श्री. यशवंत शास्त्री, श्री. ना. रा. शेंडे, श्री. ग. नि. भवाळकर

श्री. कुंदर दिवाण, श्री. ग. त्र्यं. भिडे, श्री. केशव केळकर, श्री. सुरेश ढोळके प्रभृति मंडळी हजर होती. नझूल सर्व्हेअर श्री. कुळकर्णी यांनी जागेच्या सीमा दाखवून दिल्यावर भूमिपूजन करण्यांत आलें व सर्वांना प्रसाद वाटण्यांत आला. नंतर पुढील कार्यासंबंधीं विचारविनिमय करण्यांत आला. त्यांत सर्वानुमतें असा संकल्प श्री. माडखोलकर यांनी प्रकट केला की, जागेचें रजिस्ट्रेशन झाल्याबरोबर मंदिराच्या उभारणीचें काम हातीं घेण्यांत यावें व नियोजित दोन इमारतींपैकीं एक इमारत ताबडतोब बांधण्यांत यावी.

मंदिरसमितीचे अध्यक्ष न्या. मू. मंगळमूर्ति यांनी विजयादशमीचा मुहूर्त साधण्याची संघाची इच्छा सफल करण्याच्या बाबतींत गृहमंत्री ना. पं. मिश्र आणि महसूलमंत्री ना. पु. का. देशमुख यांनी दाखविलेल्या तत्पर सहानुभूतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. श्री. नानासाहेब जोग, श्री. यशवंत शास्त्री, श्री. शेंडे, डॉ. कोळते आणि श्री. रा. पु. सगदेव यांनी मंदिरनिधीचा मुहूर्तहि या सुप्रसंगीं केला.

शकुंतला दिवाणजी
सरचिटणीस, वि. सा. संघ

माहे ऑगस्ट १९५० मध्ये झालेल्या परीक्षांचा अहवाल

वि. सा. संघातर्फे घेण्यांत आलेल्या ऑगस्टच्या परीक्षांना निरनिराळ्या १४ केंद्रांतून एकूण ३०८ विद्यार्थी बसले. त्यांपैकी १९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. खाली दिलेल्या केंद्रांच्या नांवापुढे केंद्राधिकारी व त्यांचे सहकारी यांचीं नांवें दिलीं आहेत. परीक्षासमिति वि. सा. संघातर्फे त्यांची आभारी आहे. संघाने चालविलेल्या या कामांत सर्वांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

पुढील परीक्षा जानेवारी १९५१ च्या ६ व ७ तारखांना होतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५ डिसेंबर १९५० ही आहे. त्या ठिकाणच्या उमेदवारांनी तेथील केंद्रव्यवस्थापकांच्या तर्फेच आपले अर्ज पाठविणें सोईचें होईल. कोणत्याहि एका परीक्षेसाठी कमीतकमी दहा विद्यार्थी असल्यास त्या त्या ठिकाणीं स्वतंत्र केंद्र देण्यांत येईल. माहितीसाठी सर्व पत्रव्यवहार ' कार्यवाह, परीक्षा समिति, वि. सा. संघ; प्रभानिवास, जेलरोड, नागपूर नं. १ ' या पत्त्यावर करावा.

(१) अकोला—श्री. प्र. ना. खोडे.
(२) अचलपूर—श्री. एम् जी. रिंगणगांवकर; श्री. दे. मे. देशपांडे;
श्री. बी. जी. अत्रे, श्री. रा. दा. देशपांडे;
(३) अमरावती—श्री. द. शं. फडके.
(४) आकोट—श्री. मा. चं. बहादकर, श्री. सु. मुकर्जी आणि श्री. रा. वा. ठाकरे.
(५) आर्वी—श्री. ह. घ. सगणे.
(६) गोंदिया—श्री. ना. ग. डबीर; श्री. प. त्र्यं. घुधे आणि श्री. व. बा. पाळेकर.
(७) दारव्हा—श्री. कृ. आ. पाठक; श्री. के. बी. लिमये, श्री. म. शा. बल्लाळ व
श्री. दि. ल. जोगळेकर.

(८) नागपूर—प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, श्री. मा. के. बेतुले, श्री. ल. ग. बाराणशीवार.

(९) नांदुरा—श्री. म. के. राजूरकर, श्री. बि. वा. पांडे, श्री. र. गो. शास्त्री.

(१०) भंडारा—श्री. ज. रा. गोडबोले, श्री. ना. ल. पोतदार आणि श्री. डोंगरे.

(११) यवतमाळ—श्री. शं. य. मेहग, श्री. श्री. कॉ. जोशी, श्री. प्र. कासळीकर, श्री. उपाध्ये, श्री. वि. ल. मानमोडे व श्री. गो. मा. जोशी.

(१२) वरूड—श्री. त्र्यं. ग. दाभोडे, श्री. शा. बा. पोतदार, श्री. सि. ग. देशमुख व श्री. ग. रा. पवार.

(१३) वर्धा—श्री. ब. पं. तांदळे, श्री. व्ही. जी. नामजोशी, श्री. म. ता. राजूरकर व श्री. शा. आ. बलकी.

(१४) हिंगणघाट—श्री. रा. वि. करपे, श्री. टी. टी. मेहता, श्री. पं. बि. हुलके व श्री. म. रा. सिंगरू.

खालील सद्गृहस्थांनी परीक्षक म्हणून काम केले त्याबद्दलहि परीक्षासमिती वि. सा. संघातर्फे आभारी आहे—

प्रा. अ. ना. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. बा. बा. भोळे, डॉ. एम्. ए. करंदीकर, डॉ. मा. गो. देशमुख, प्रि. श्री. ल. पांढरीपांडे, प्रि. ह. ना. नेने, डॉ. बा. भा. पाठक, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. पां. कृ. सावळापूरकर; श्री. पु. गो. निजसुरे, श्री. रा पु. सगदेव, सौ. उषाताई कोलते.

प्रभानिवास, जेलरोड,	वि. भि. कोलते	रा. पु. सगदेव
नागपूर नं. १.	संचालक,	कार्यवाह,
ता. २५-९-१९५०	परीक्षासमिती–वि. सा. संघ.	परीक्षासमिती–वि. सा. संघ

●

कार्यकारी मंडळाची अत्यंत निकडीची विनंति

(१) विदर्भसाहित्यसंघाच्या वृत्तांत जाहीर केलेल्या सर्वसाधारण सभेला सर्वांनी हजर राहावें कारण घटनादुरुस्तीचा महत्त्वाचा मुद्दा चर्चेला येत आहे.

(२) सभासद बनविण्यासाठी ज्या ज्या सभासदांनी संघाचीं रसीदबुकें घेतलीं असतील त्यांनी अगत्यपूर्वक तावडतोब बुकें व सभासदांचीं नांवें संघाचे खजीनदार श्री. बाळासाहेब दवळे, संपादक “महाराष्ट्र” महाल, नागपूर, यांच्या पत्त्यावर परत करावी. कारण सभासदांची अधिकृत यादी निवडणुकींच्या अगोदर म्हणजे या महिन्याच्या आंत छापली जावयाची आहे. या कामीं कोणत्याहि कारणाने मुळीहि विलंब होऊं नये.

●

महत्त्वाची

विदर्भ साहित्य संघाच्या साधारण सभेची सूचना

विदर्भ साहित्य संघाने नेमलेल्या घटनासमितीने कार्यकारीमंडळाच्या रचनेंत पुढील मूलभूत फरक व तदनुषंगिक इतर किरकोळ बदल सुचविलेले आहेत. त्यांचा विचार करून घटना दुरुस्त करण्यासाठी वि. सा. संघाची साधारणसभा ता. २६ नोव्हेंबर १९५० रोजीं दुपारीं ४॥ वाजतां नागपूर येथें नॅशनल कॉलेजच्या (धंतोली) सभागृहांत भरेल. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावें ही विनंती. युगवाणी सर्व सभासदांकडे जात असल्यामुळे या सूचनेव्यतिरिक्त सभेची स्वतंत्र सूचना सभासदांकडे पाठविली जाणार नाही.

घटनेंत सुचविलेले बदल पुढीलप्रमाणेः—

१. वि. सा. संघाच्या कार्यकारीमंडळाची रचना पुढीलप्रमाणे राहील.

अध्यक्ष १; उपाध्यक्ष १; सरचिटणीस १; चिटणीस ३; खजिनदार १; संपादक 'युगवाणी' १; संचालक परीक्षा-समिति १; सभासद ८; एकूण १७.

अध्यक्ष आणि इतर ११ सभासद यांची निवडणूक दर तीन वर्षांनी मतदार सभासदांमधून केली जाईल. ही निवडणूक होतांच अध्यक्षांनी मतदार सभासदांमधून एक उपाध्यक्ष (अध्यक्ष नागपूरचे नसल्यास उपाध्यक्ष नागपूरस्थ असावा) आणि दोन सभासद कार्यकारी मंडळावर नियुक्त करावे. या पंधराजणांनी आणखी दोन सभासद स्वीकृत करून घ्यावे. नंतर या सतरा सभासदांनी अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांव्यतिरिक्त, इतर पदाधिकाऱ्यांची निवडणूक करावी. अशा रीतीने तयार झालेले कार्यकारीमंडळ तीन वर्षेपर्यंत अस्तित्वांत राहील.

२. दरवर्षी भरविण्यांत येणाऱ्या संमेलनप्रसंगीं संमेलनाध्यक्ष म्हणून एखाद्या श्रेष्ठ साहित्यिकाला आमंत्रण देण्यात यावें. कार्यकारीमंडळाने संमेलनाध्यक्ष-पदासाठी तीन नांवें बहुमताने सुचवावीं व त्यांतून कुणालाहि एकाला आमंत्रण देण्याचा अधिकार, ज्या गावीं संमेलन भरणार असेल तेथील स्वागतमंडळाला असावा. संमेलनाच्या तारखांपूर्वी एक महिना अगोदर संमेलनाध्यक्षाची निवडणूक झाली पाहिजे. संघाच्या घटनात्मक सभांव्यतिरिक्त संमेलनांतील इतर सर्व कार्यक्रमांचें अध्यक्षपद संमेलनाध्यक्ष स्वीकारतील व समारोपाचेंहि भाषण तेच करतील.

३. द्रव्यनिधि व मालमत्ता या सदरांत पुढील कलमें जोडावीं.

"संघाच्या स्थावर मालमत्तेची व्यवस्था करण्यासाठी कार्यकारीमंडळाने एक वेगळें आजीव विश्वस्त मंडळ नेमावें व त्याकडे संघाच्या स्थावर मालमत्तेची सर्व व्यवस्था सोपवावी."

"संघातर्फे करण्यांत येणारे, कार्यकारी मंडळाने मंजूर केलेले सर्व करारनामे व इतर व्यवहारांचे दस्तैवज करण्याचा अधिकार संघाध्यक्षांना राहील."

"संघातर्फे किंवा संघाविरुद्ध होणारी सर्व कायदेशीर कारवाई आणि फिर्यादी सरचिटणिसांच्याच नांवाने होतील"

शकुंतला दिवाणजी
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ.

ता. १ नोव्हेंबर १९५०

निरोप

★

१. युगवाणीचा हा दिवाळी-अंक वाचकांच्या हातीं देतांना त्यांतील उणीवांची जाणीव ठेवूनहि मला अनेक रीतींनी समाधान होत आहे. एकतर एवढा मोठा अंक गेल्या पांच वर्षांच्या युगवाणीच्या आयुष्यांत आजवर निघालेला नसावा असें मला स्मरतें. दुसरें मजकुराच्या दृष्टीने विविध रुचींच्या वाचकांना यांत वाचनीय असें पुष्कळच सांपडेल असा मला विश्वास आहे. या अंकाचें स्वरूप ललितगंभीर असें असून विदर्भाच्या साहित्यिक क्षमतेची कल्पना यावरून कुणालाहि येईल.

२. दुसरी समाधानाची गोष्ट म्हणजे हा अंक माझ्या संपादनाखाली निघणारा शेवटचा अंक होय. ही जबाबदारी यापुढे साहित्यसंघाच्या निवडणुकींत यशस्वी झालेल्या श्रेष्ठ आणि ज्येष्ठ साहित्यिकांवर पडावयाची आहे. माझी शक्ति संपादनाच्या बाबत इतकी अपुरी होती की युगवाणीसंबंधींच्या माझ्याहि कल्पना मला प्रत्यक्षांत उतरवितां आल्या नाहीत. मार्गांतील दुर्लंघ्य अडचणींची जाणीव मला आहे आणि त्यांतून मार्ग काढून युगवाणीचा दर्जा वाढविणें कुणालाहि मनपेक्षा देखील जड जाणार आहे हे निर्विवाद. पण तरी देखील माझ्या मर्यादांची इतरांना माझ्यापेक्षा अधिक जाणीव असणें शक्यच नसल्यानें संपादनाच्या कार्यांतून मुक्तता मिळत असल्याचा खरोखरच मला आनंद होत आहे. याच स्थळीं मला ज्यांनी ज्यांनी सहज व अट्टाहासानें जाऊनहि मदत केली त्यांना युगवाणींत जें काय चांगलें आलें असेल त्याचें श्रेय आहे त्या सर्वांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतों. त्यांचे दान गुप्त, निरपेक्ष असें आहे आणि त्यांचा उच्चार करण्यांतहि तसा दोष आहे पण दानासाठी झोळी पसरतांना माझ्या चेहऱ्यावर उमटलेले भावच माझ्या कृतज्ञतेत मी नम्रपणें नमूद करीत आहे.

३. श्री. द. ना. ठाकूर यांनी तर मला जें साहाय्य आणि सहकार दिला त्याबद्दल भावनेमुळे मला कांही लिहिणेंहि अशक्य आहे. या मासिकाची यापुढे स्वतंत्र व्यवस्था मासिक चालू ठेवावयाचें असल्यास कार्यकारी मंडळाला मन घालून करणें अगत्य आहे. सभासदांना व इतर मराठी भाषी जनतेला विदर्भ साहित्य संघाची नियमित आठवण करून देणारें हे एकमेव माध्यम बंद पडणें अनर्थावह आहे. या मुद्यावर योग्य तो विचार संघाचें कार्यकारी मंडळ करील असा मला विश्वास आहे. माझ्या परीने मला नम्र विश्वास असा होता कीं वि. सा. सं. चे हजार सभासद यंदा झाले असते तर मासिक पुढे चालविणें सुगम झालें असतें. पण त्यासाठी कार्यकारी मंडळाचे प्रयत्न अपुरे पडले. आज सभासदांची संख्या ५६० पर्यंत आहे. हे मासिक चालावें, विदर्भांत मासिक नाही तें असावें असें ज्या ज्या वाचकांना वाटत असेल त्यांनी अजूनहि १ रु. भरून वि. सा. सं.चे सभासद व्हावें अशी माझी त्यांना शेवटची विनंति आहे.

४. या अंकाच्या अनुषंगानेच एक क्षमायाचना म्हणजे मुद्दाम दिवाळी अंकासाठी निवडलेले लेख, स्थळ आणि विशेषतः कालमर्यादेच्या अडचणींमुळे समाविष्ट करतां आले नाहीत. ते जर घेतले असते तर ६० पानांचा मजकूर अधिक वाढला

असता. अंकाच्या छपाईसंबंधाने श्री. खांडेकर, श्री. बेनोडेकर, श्री. मुळे प्रभृतींनी व प्रेसच्या कामगारवर्गाने अक्षरशः अविश्रांत मेहनत घेऊनहि अंक पुरा करणें साधलें नाही. राहिलेल्या लेखांत—(१) ऋग्वेदांतील साहित्य-प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, हा अत्यंत महत्त्वाचा लेख (२) श्री. व्य. नी पंडित यांचा "ऋतु बदलला पण-" हा सुंदर ललित निबंध (३) श्री. प्रभाकर माचवे यांचा "संस्कृति म्हणजे काय ?" हा विचारप्रवर्तक लेख (४) प्रा. बाळकृष्ण मुंडी यांचा भक्त नामदेवावरील संशोधनात्मक पण भक्तिमधुर लेख (५) श्री. केशव केळकर यांची 'मृदुला' ही मनोविश्लेषणात्मक सुंदर श्रुतिका (६) श्री. वसंत वरखेडकर यांचा "साहित्यिकापुढील यक्षप्रश्न" हा जिव्हाळ्याचा मुद्दा (७) डॉ. गोगटे आणि श्री. मनोहर सरपटवार यांच्या भावमधुर कविता (८) श्री. तु. ना. काटकर यांचा ललित उपयुक्त असा "लावलेल्या झाडाचीं फळें" हा सुंदर निबंध—इ. आहेत. (श्री. वामन चोरघडे यांची गोष्टहि अर्थात समाविष्ट न करण्यांत हेंच कारण होतें.) युगवाणीचा वर्षारंभाचा म्हणजे पुढील अंक त्यांच्या लेखनाने सुंदर सजेल. हे लेख अनुक्रमणिकेच्या क्रमानेच मागे राहिले आहेत. मी या सहृदय साहित्यिकांना माझ्या अगतिकतेबद्दल क्षमा करण्याची विनंती करतों. संपादनाचें कार्य किती कडू असतें हें अशा वेळीं कळतें. अंकासाठीं मुद्दाम मागविलेले कांही लेख मला परत करावे लागलें. त्यासंबंधीं जें मला लेखकांकडून ऐकावें लागलें तसें आजवर मला ऐकावें लागलें नव्हतें आणि मी कुणाचें ऐकून घेतलेंहि नव्हतें. हे आयुष्यांतील अनुभवभांडारांत भर टाकणारेच प्रसंग असल्याने माझ्या निरोपाच्या वेळीं मी याहि लेखकांबद्दल क्षमा व आभार व्यक्त करतों.

५. युगवाणीचा डिसेंबर १९५० चा अंक बंद राहील. वर्षभरांत सभासदांना जेवढ्या पृष्ठांचा मजकूर मिळावयाचा तेवढा मिळाल्याने ते मजवर किंवा प्रकाशकांवर नाराज होणार नाहीत अशी आशा आहे. पुढील अंक जानेवारींत सहाव्या वर्षाचा पहिला आरंभांक म्हणून निघेल.

६. स्थलसंकोचास्तव परीक्षणार्थ आलेल्या पुस्तकांची पोंच देता आली नाही. त्यांची साद्यंत ग्रंथी पुढील अंकीं येईल.

७. एक चूक ठळकपणे राहून गेली. पू. साने गुरूजींचीं पत्रें आम्हांला मध्यप्रांतांतील सुप्रसिद्ध अध्यात्मवृत्ति कु. विमलाताई ठकार एम्. ए. यांच्या सौजन्याने मिळालीं. त्यांचा नामनिर्देश चुकीने प्रमिला ठकार असा पडला. त्याबद्दल दुःखी आहे. वाचकांनी चूक सुधारून घ्यावी.

८. शेवटीं युगवाणीच्या संपादकीय आमदानींत माझ्याकडून लेखकांना, मित्रांना, वाचकांना, सभासदांना कळत नकळत माझ्या प्राक्तनसदोषामुळे अन्याय प्रमाद घडला असेल त्यांनी मला या माझ्या निरोपाच्या वेळीं उदारपणे क्षमा करावी. युगवाणी मासिक चाललेंच पाहिजे ही कांही माझीच इच्छा नाही. काळाचा कौलहि तोच आहे. त्याची जबाबदारी आणि उपायहि सभासदांच्या हातीं आहे. त्याचा या दिवाळीच्या उत्साहांत व आनंदांत अवश्य विधायक विचार मराठी भाषेच्या सध्याच्या स्थितींत व्हावा अशी विनंती व इच्छा आहे. यापेक्षा अधिक काय व कशें लिहूं ! सभासदांच्या व साहित्यिकांच्या प्रयत्नांनी युगवाणी चालू राहील अशी मला बळकट आशा आहे. नमस्कार !

सर्वांचा नम्र

ता. ८।११।५० वामन कृष्ण चोरघडे

मुद्रक, प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

काव्य-वेच्यांच्या संग्रहाची दुसरी आवृत्ति छापून तयार होत आली आहे. ती लवकरच प्रसिद्ध होईल.

सभासद नोन्दणीची अखेरची तारीख २० ऑक्टोबर १९४९.

विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांच्या नोन्दणीची अखेरची तारीख २० ऑक्टोबर १९४९ ही निश्चित केली आहे. या तारखेपर्यंत झालेल्या सभासदांना डिसेंबर ४९. अखेर होणाऱ्या नवीन निवडणुकींत मताधिकार राहील. १९४८ सालाकरिता प्रसिद्ध झालेल्या सभासदांची १९४९ ची वर्गणी (नवीन नियमाप्रमाणे रुपये तीन) ता. २० ऑक्टोबर ४९ च्या आंत मध्यवर्ती कार्यालयांत जमा झाली पाहिजे. थाकीदार—सभासदांना नवीन निवडणुकींत मताधिकार राहणार नाही. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांनी या दृष्टीने आपल्या कार्याला लागावें अशी कळकळीची विनंती आहे.

ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ.

अनुक्रमणिका

" युगवाणी " (Yugawani)   Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104/Genl. I A अन्वयें ' युगवाणी ' मासिकास लायब्ररीसाठी मंजुरी दिली आहे.

मानव्याचें विश्वदर्शन

" जगांत सर्वत्र जातिवादाचे व संप्रदायाचें स्तोम माजलें असतांना, चहुकडे तलवारींची आणि शस्त्रास्त्रांची भाषा ऐकू येत असतांना, मानव मानवाचा वैरी बनण्यांत जीवनाचें सार्थक मानीत असतांना जो महाभाग उच्च स्वराने, मला माझ्या अहिंसेची शरम वाटत नाही, असें नम्र आत्मप्रत्ययाने सांगतो, मानव द्रोहाच्या विषारी झंझावातांत ज्याची मानव्यनिष्ठा विझून न जातां वरती उफाळते त्याचें चरित्र व चारित्र्य, त्याचें तत्त्वज्ञान व धोरण सागरासारखें व्यापक आहे, गंगेसारखें पवित्र आहे आणि गौरीशंकरासारखें उज्ज्वल व उत्तुंग आहे. कालिदासाचा देवतात्मा हिमालय हा जर पृथ्वीचा मानदंड असेल, तर मानवात्मा गांधी हा अखिल मानवतेचा मानदंड आहे. त्याच्या वृत्तीवरून, उक्तीवरून व कृतीवरून मानवतेची लांबी, रुंदी, उंची व खोली मोजतां येते, अशा महामानवात्म्याला, त्याच्या अकुंठित निष्ठेला, त्याच्या अमर्याद पराक्रमाला, त्याच्या अनंत वीर्याला, त्याच्या अमित विक्रमाला शतशः प्रणाम. " नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते " हेंच मानव्याचें भव्य, पुण्यकारक आणि कल्याणमय ' विश्वदर्शन ' आहे ! "

—आचार्य दादा धर्माधिकारी.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ' युगवाणी ' कार्यालय १९/४२५ मुधोळकर पेट, अमरावती येथे प्रकाशित केलें.